
संरक्षणाची कथा आणि व्यथा



लेफ्टनंट कर्नल मा. शं. परांजपे

संरक्षणाची कथा आणि व्यथा

लेखक

लेफ्टनंट कर्नल भा. त्र्यं. परांजपे (निवृत्त)

प्रस्तावना

डॉ. प. ल. जोशी

एम. ए., पीएच. डी., प्रपाठक, नागपूर विद्यापीठ

राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग

'भारतीय संविधान, शासन व राजकारण,' 'राज्यशास्त्राची मूलतत्त्वे,'
'शासनसंस्थेची मूलतत्त्वे', 'संवैधानिक इतिहास', 'नागरिक शास्त्र'
इत्यादी ग्रंथांचे लेखक

विजय प्रकाशन

सीताबर्डी, हनुमान गल्ली, नागपूर १२

विजय प्रकाशन अठ्ठेचाळीस

प्रकाशिका
सौ. जयश्री उपाध्याय
विजय प्रकाशन
हनुमान गल्ली, सीताबर्डी
नागपूर ४४० ०१२

मुखपृष्ठ/रेखाचित्र
प्रा. काशीनाथ साळवे

पहिली आवृत्ती
जुलै १९७९

मुद्रक
दि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय
रुईकर मार्ग
नागपूर ४४० ००२

मूल्य पंचवीस रुपये

अनुक्रमणिका

प्रशासन (राजा-राज्यकर्ते) आणि संरक्षण

महाभारत शांति पर्व अध्याय ७८ श्लोक ४१

"किं तैर्येऽनडुहा नोह्याः किं धेन्वा वाप्यदुग्धया ।
वन्ध्यया भार्यया कोऽर्थः कोऽर्थो राज्ञाप्यरक्षता ॥

जो बोझ न ढो सके, ऐसें बैलों से क्या लाभ ? जो दूध न दे, ऐसी गाय किस काम की ? जो वांझ हो ऐसी स्त्री से क्या प्रयोजन है ? और जो रक्षा न कर सके ऐसे राजा से क्या लाभ है ?

अग्निपुराण २१३·१०

"अरक्षिता प्रजा यस्य नरकं तस्य मंदिरम् ।"

ज्या राजाची प्रजा अरक्षित असते त्या राजाचा, नर्क हाच राजप्रासाद !

समर्पण

" आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥ "

— मृत्युंजय स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



" जागतिक राष्ट्रमालिकेत भारताला उच्चतम नि उज्ज्वल स्थान मिळवून देण्याकरिता, आमचे तरुण जे जे काही करतील, ते ते करीत असताना, त्यांच्या हातून सावरकरांच्या एकनिष्ठ देशसेवेचे अनुकरण घडो ! त्यांनी ज्या रीतीने कार्य केले, त्याच रीतीने जर, खरेखुरे एकनिष्ठ भारतीय म्हणून, आम्ही सर्वांनी देशाची सेवा केली, तर जगातले महत्तम राष्ट्र म्हणून भारताला श्रेष्ठ स्थान मिळेल; यात यत्किंचितही संशय नाही. त्या थोर नेत्याला माझे प्रणाम.. "

के. एम. करीआप्पा

(श्री. धनंजय कीर लिखित स्वातंत्र्यवीरांच्या चरित्रातून)

स्वतंत्र हिंदुस्थानच्या पहिल्या हिंदुस्थानी सर सेनापतींनी, स्वातंत्र्यवीरांना केलेल्या आदरपूर्वक हार्दिक प्रणामानंतर, मी एक क्षुद्र जवान काय अधिक बोलणार ? माझे हे वेडेवाकुडे चोपडे, मृत्युंजय स्वातंत्र्यवीरांच्या पावनचरणांवर श्रद्धायुक्त अंतःकरणाने परम आदरपूर्वक ठेवीत आहे.

भा. त्र्यं. परांजपे

प्रस्तावना

' युद्धस्य कथा रम्याः ' हे वचन बरेच प्रसिद्ध असले तरी, युद्धविषयक साहित्याची आपल्या भाषेत बरीच वाण आहे; यात शंका नाही. महाराष्ट्राला सैनिक परंपरा आहे असे आम्ही मोठ्या अभिमानाने म्हणत असतो. इंग्रजांशी व तत्पूर्वी मोगलांशी मराठ्यांनी जे ऐतिहासिक लढे दिले, तसेच टिळक व सावरकर प्रभृती राष्ट्रधुरीणांनी सैन्यभरतीचा जो पुरस्कार केला व मराठा सैनिकांनी या शतकातील विविध लढायांत जो पराक्रम गाजविला, त्यामुळे ही सैनिकपरंपरा उज्ज्वल ठरली आहे. बासष्टच्या चीनयुद्धाच्या वेळी, महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांना (श्री. यशवंतराव चव्हाण) केंद्र शासनात भारताचे संरक्षण मंत्री म्हणून जेव्हा पाचारण करण्यात आले, त्या वेळी प्रत्येक मराठी माणसाचा माथा उंच झाला आणि त्याला धन्यता वाटली. ' सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून जात आहे ' या शब्दांत मराठी माणसाच्या भावना व्यक्त झाल्या. परंतु या थोर परंपरेची अभिव्यक्ती मराठी ललित किंवा शास्त्रीय साहित्यातून पुरेशी होऊ नये ही बाब खचितच भूषणावह नाही. ले. कर्नल परांजपे यांनी ही उणीव भरून काढण्यास सतीचे वाण घेतले असून या विषयावर त्यांचे बरेच लिखाण नियतकालिकांतून व ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले आहे व होत आहे. ऐंशी वर्षांच्यावर वय झाले असले तरी एखाद्या तरुण शिपाईगड्यालाही लाजवेल असा उत्साह व ध्येयवाद त्यांच्या ठिकाणी आहे. या देशातील सर्वसामान्य नागरिकांनाच नव्हे, तर लोकप्रतिनिधी व शासनकर्त्यांनाही संरक्षणविषयक अत्यंत महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या विषयाबद्दल जे भयंकर अज्ञान आहे, त्यामुळे ते व्यथित आहेत. ' संरक्षणाची कथा आणि व्यथा ' हे त्यांचे प्रस्तुत पुस्तक त्यांच्या इतर लिखाणाप्रमाणेच अशा व्यथेतून लिहिण्यात आले आहे.

सतत जागरूकता ही लोकशाहीची किंमत आहे. नागरिकांनी ही किंमत मोजल्याशिवाय, लोकशाही यशस्वी होत नाही. आपल्या देशासमोरील समस्या कोणत्या ? त्या सोडविण्यासाठी शासन कोण व कशा प्रकारे चालवितात; हे समजल्याशिवाय नागरिक आपल्या मताधिकाराचा सुबुद्धतेने वापर करू शकणार

नाहीत. यासाठी महत्त्वाच्या समस्यांची व त्या सोडविण्यास कटिबद्ध असलेल्या शासकीय यंत्रणेची माहिती नागरिकांना असणे आवश्यक आहे. संरक्षणाचा विषय अशाच महत्त्वाच्या विषयांपैकी एक आहे. विकसनशील देशात आर्थिक विकासावर स्वभावतःच अधिक भर देण्यात येत असतो. तरीपण संरक्षणाचे धोरण व सज्जता ह्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. देशाने कितीही आर्थिक प्रगती केली तरी अचानक आलेल्या परचक्राने ती धुळीस मिळाल्याशिवाय राहत नाही. याउलट देशाची सर्व शक्ती संरक्षणासाठीच खर्च करण्यात आली तर आर्थिक विकास साधत नाही व देश विपन्नावस्थेस जातो. संरक्षण व आर्थिक विकास हे दोन परस्परावलंबी विषय होत. कारण औद्योगिक व कृषिविषयक विकास होऊन देशाचा आर्थिक पाया भक्कम व शक्तिशाली झाल्याशिवाय संरक्षणाची सामग्री निर्माण होत नाही. संरक्षणाच्या साधनांच्या बाबतीत आत्मनिर्भरतेला अत्यंत महत्त्व आहे. अर्थात आर्थिक विकास व संरक्षण हे वरवर विरोधी विषय दिसत असले तरी, दोन्ही अत्यंत निकडीचे विषय आहेत व त्यात योग्य समन्वय घडवून आणावा लागतो.

आपल्या देशात शासक आणि नागरिक या दोघांच्या ठिकाणी संरक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबतीत अनास्था आढळते. अंतर्गत राजकारण आणि सत्तास्थाने काबीज करण्यातच राजकारण करणारे, इतके मशगुल असतात की सीमेवरील संरक्षणासाठी प्राणाहुती देणाऱ्या सैनिकांची एरवी त्यांना आठवणच येत नाही. एकदा लढाईला तोंड लागले तरच त्यांची आठवण होते. आपल्या राष्ट्राला ज्या परिस्थितीत स्वातंत्र्य मिळाले ती व आपले राजकीय सामाजिक तत्त्वज्ञान या अनावस्थेला बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहे. चातुर्वर्ण्यामुळे आपल्या देशातील तीन-चतुर्थांश युद्धक्षमता वाया गेली. क्षत्रियत्व त्यांच्यात निर्माण झाले नाही. गांधीवादातील अहिंसेच्या तत्त्वावर बराच जोर देण्यात आला. समाजवाद्यांना आर्थिक विकासाशिवाय जीवनाच्या इतरही अंगांच्या विकासाचे महत्त्व लक्षात येत नाही. साम्यवादी विचारकांना साम्यवादी राष्ट्रे दुसऱ्या देशावर आक्रमण करूच शकत नाहीत असे वाटते. अशा परिस्थितीत संरक्षणाचे महत्त्व पटवून त्याचे ज्ञान नागरिकांत प्रसारित करणाऱ्या व्यक्ती निश्चितच अभिनंदनास पात्र ठरतात.

ले. कर्नल परांजपे यांनी ग्रंथलेखनामागील आपला मनोदय व्यक्त करताना "भारताची घरच्या आघाडीचीच फक्त स्वातंत्र्याच्या पहिल्या पंचविशीत काय परिस्थिती होती यावर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न आहे," असे म्हटले आहे. संरक्षण म्हणजे काय व त्याची आवश्यकता काय, तसेच संरक्षणाचा अधिकार आणि भार कुणावर याची तात्त्विक चर्चा करून लेखकाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात संरक्षणाचे अधिकारग्रहण कसे झाले हे स्पष्ट केले आहे. "प्राणातिपाता वेरमणी" एवढेच बुद्धाचे पंचशील सांगते; परंतु एखाद्याने दुष्टबुद्धीने प्राण घेतला तर काय करावे हे मनुस्मृती सांगते अशा शब्दांत भारताच्या परराष्ट्र-

धोरणातील पचशीलाचा समाचार घेऊन, परराष्ट्रधोरण आणि संरक्षण यांत सुखसंवाद निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनी सुचवली आहे. यानंतर संरक्षणाची यंत्रणा, राष्ट्रपती, परराष्ट्रमंत्रालय व संरक्षणमंत्रालयाचे संबंध ह्यांची चर्चा करून संरक्षण मंत्रालयाच्या Logistics ची बाजू अधिक सुटसुटीत, निर्णायक व कमी वेळ खाणारी अशी करण्यावर त्यांनी जोर दिला आहे.

'सेनापरिचय' आणि 'भारताच्या राखणदाराची ओळख' ही त्यांची यापुढील प्रकरणे उद्‌बोधक आहेत. आपल्या देशाच्या सैनिकांची मूल्ये किती श्रेष्ठ प्रतीची आहेत हे दाखवून, आजचा भारतीय जवान आता पूर्वीचा हिंदुस्थानी शिपाई नाही, त्याच्या जीवनाला आता नवी प्रगत सामुदायिक जाणीव उत्पन्न झाली आहे, त्याच्या जीवनाला सघनता आणि आशय निर्माण झाला असून, एकाने आज्ञा करावी व दुसऱ्याने तिचे पालन करावे, अशी स्थिती आज नाही; असे त्यांनी विशद केले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाष आणि लोकमान्य टिळक ह्यांनी भारतीय सैनिकांची वृत्ती बदलली असता गांधीयुगात व आजही 'शांततेने बंड उभारले आहे' तरीपण युद्धाचे खरे उद्दिष्ट शांतता हेच असते. "ज्याला शांती म्हणतात ती दोन युद्धांच्या मधली स्थिती आहे आणि ती निलंबित जीवनासारखी, केसाने टांगलेल्या तलवारीसारखी लटकलेली असते," असे सांगून आपण आपल्या जवानांची ओळख ठेवतो काय? असा रोख सवाल लेखकाने टाकला आहे. यापुढील प्रकरणांतून भारताच्या तीन पंतप्रधानांच्या कारकिर्दीत संरक्षणाचे धोरण व अवस्था कशी होती त्याची कथा आणि एकंदरीत व्यथा यांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

ले. कर्नल परांजपे यांनी संरक्षणाची जी कथा सांगितली त्याची थोडक्यात कथा ही अशी आहे. पण ती सांगताना त्यांच्या ठिकाणची तळमळ आणि जाज्वल्य देशभक्ती पानापानातून व्यक्त होते. या कथेत काही पुनरुक्तीचे दोष आढळतील, एखादे वर्णन करताना मध्येच भावनाविव्हळ होऊन थोडेसे विषयांतरही त्यांनी केले असेल. तरीपण विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी हे ग्रंथलेखन केलेले असल्याने हे दोष क्षम्य ठरतील. फाळणीच्या वेळी स्थापन झालेल्या संयुक्त संरक्षण मंडळाची कार्यपद्धती, वाटणीची तत्त्वे व ओढाताण व नंतरची Armed forces Nationalisation Committee याबद्दलची अधिक चर्चा, तसेच संरक्षणमंत्री, पंतप्रधान आणि सेनापती ह्यांचे परस्पर संबंध, निर्णयप्रक्रिया, भारतीय जवानांनी विविध लढायांत केलेली कामगिरी इत्यादी बाबतीत अधिक स्पष्टीकरण झाले असते; तर ग्रंथाची उपयुक्तता अधिक वाढली असती असे वाटते. एकंदरीत संरक्षणाची बाब आपल्या शासकांनी ज्या पद्धतीने हाताळली आहे त्याबद्दलची एका सच्च्या सैनिकाची प्रतिक्रिया, या ग्रंथातून व्यक्त झाली आहे. त्यांच्या या लिखाणातून भारतीय नागरिकांच्या व शासकांच्या मनोवृत्तीवर कोरडे ओढले असून

त्याबद्दल व शासकीय धोरणाबद्दल व्यथा व्यक्त झाल्या आहेत.

आपल्या देशाचे India that is Bharat हे नाव, जनमनगण हे राष्ट्रगीत आणि देशाची फाळणी इथूनच संरक्षणाची कथा व व्यथा या दोन्हीही एकदमच सुरू झाल्या, असे त्यांचे मत आहे. त्यांनी सांगितलेल्या व्यथांची जंत्री थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येईल. स्वतंत्र भारताच्या आतापर्यंतच्या युद्धांत, राज्यकर्त्यांनी लोकशाही प्रक्रिया धाब्यावर बसवून, लोकांना पूर्णपणे विश्वासात घेतले नाही, तसेच सहकारी मंत्र्यांशीही विचारविनिमय न करता, अनेक बाबतीत महत्त्वाचे निर्णय घेतले. दुसरीकडे रणकारणाकडे म्हणजेच देशाच्या संरक्षणाच्या बाबतीत लक्ष देण्यास कोणास रस नाही, भारतीय नागरिकांना युद्धाचे गांभीर्य आणि संरक्षणाचे महत्त्व अजूनही समजले नाही, लष्कराविषयी लोकांत स्वारस्य नाही, भारताव्यतिरिक्त बहुधा सर्वच देशांत सैनिक सेवा सक्तीची असल्यामुळे बराकी-शिवाय खाजगी घरांतील लोकही योद्धे आहेत, भारतात प्रादेशिक सेना आहे; पण तिचे अस्तित्व शपथ घेण्यापुरतेच आहे, आपली छात्रसेनादेखील बॉय स्काऊट-साम्खीच आहे. एकंदरीत सर्व सेनासंभार केविलवाणा आहे. जलसेनेकडे आपले १९७१ पर्यंत पूर्णतः दुर्लक्ष होते. हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरील राष्ट्रे नाविक सामर्थ्य वाढवीत असताना आपण मात्र वाळूतच तोंड दडवून बसलो आहोत. पाकिस्तानशी झालेल्या लढायांत संपूर्ण विजयाची संधी आपण नेहमी वाया घालविली आहे. " आपल्या सैनिकांनी रणांगणावर जे मिळविले ते वाटाघाटीच्या मेजावर आपण हरवून टाकले आहे. नेहरू, शास्त्री चाणक्याचे अंशमात्रही चेले नव्हते हे दुर्भाग्य." बांगला देशाच्या निर्मितीमुळे पाकिस्तानचे तुकडे झाले व नुक-सान झाले तरी, सामरिकदृष्टचा त्याचा फायदाच होय. कारण आता त्याला दोन सीमांवर लढाया कराव्या लागणार नाहीत. बांगला देशाला राज्य–संघाच्या एखाद्या योजनेत ओढून न घेण्याची आपण चूक केली. लढाईचे निर्णय घेताना सेनाध्यक्षांना विश्वासात घेतले नाही. युद्धबंदीच्या वेळी प्रथम आपण गोळी बंद करतो व नंतर विरुद्ध बाजूने तसे करावे म्हणून अनुनय करतो. भारतीय योद्धा शत्रू काय करतो याचा विचार न करता, आज्ञा मानतो आणि फुकट मरतो. आपल्या संरक्षणासाठी खर्चाची पुरेशी तरतूद करण्यात येत नाही आणि मंजूर झालेल्या रकमेतूनही बरीच रकम दरवर्षी परत करण्यात येते. संरक्षणाची कण-खर अशी योजना नाही. इत्यादी इत्यादी.

'व्यथाच व्यथा' हे एक स्वतंत्र प्रकरण लेखकाने लिहिले असून, त्यात आपल्या शासकांनी केलेल्या मूलभूत चुकांची चर्चा आहे. आपला देश समर्थ करा-वयाचा असेल तर, जाज्वल्य राष्ट्राभिमान, एकात्मभाव, आर्थिक शक्ती, तांत्रिक आणि वैज्ञानिक युक्ती आणि सामरिक सामर्थ्य या नव्या पंचशीलांचा त्यांनी पुर-स्कार केला आहे. ले. कर्नल परांजपे हे सिद्धहस्त लेखक आहेत. "संरक्षणाकडे

दुर्लक्ष होण्याचे कारण भारताला युद्ध समजलेच नाही, अय कमबख्त तूने पीईही नहीं;" "युद्ध ही अस्मानी आफत नसून, इन्सानी करामत आहे" अशा प्रकारच्या वाक्यांची रेलचेल आढळते. अर्थात ग्रंथलेखनाचा हा सबंध प्रपंच त्यांनी मोठ्या पोटतिडकीने केला आहे यात शंका नाही. त्यांच्या सर्वच विचारांशी सहमत व्हावे असा त्यांचा आग्रह नाही. गांधीवाद, संयुक्त राष्ट्र संघटना, इत्यादीविषयी थोडे अनुदार विचार व्यक्त करण्याचे त्यांनी स्वातंत्र्य घेतले असले तरी, अहिंसा, शांतता व मानवतावाद या मूल्यांचाही आपल्या देशात अनेकदा जो अतिरेक होतो त्यांवर त्यांना प्रहार करावयाचा आहे आपले विचार व धोरण ह्यांना व्यवहारवादाची जोड असावी असेच त्यांना सांगावयाचे आहे. या देशातील शासकांनी व जनतेने संरक्षणाचे महत्त्व ओळखावे, याबद्दलची अनास्था सोडावी व या विषयात अधिक रस घ्यावा, तसेच संरक्षण सज्जतेला लागावे, हाच त्यांच्या लेखनामागचा हेतू आहे. एका कट्टर सैनिकाला शासकांच्या व जनतेच्या ठिकाणी असलेल्या संरक्षणविषयक अनास्थेबद्दल काय वाटते, आपल्या संरक्षणविषयक धोरणाबद्दल त्याच्या भावना किती तीव्र आहेत, हे समजण्यासाठी तरी, हे पुस्तक वाचकांनी अवश्य वाचावे.

पद्माकर ल. जोशी

"वन्ही तो चेतवावा" : "यत्न तो देव जाणावा"

श्री समर्थ रामदास

माझी कैफियत

आपल्या देशाच्या–आता पाकिस्तानात गेलेल्या सिंधू नद या नावावरून ओळखल्या जाणाऱ्या सिंध प्रदेशावर खिस्ती शकापूर्वी ५२२ व्या वर्षी इराणी राजाने केलेले आक्रमण, हे पहिले परकीय आक्रमण होते. शेवटले आक्रमण इंग्रजांचे होते. ते निपटून काढून १९४७ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या १५ तारखेच्या मध्यरात्रीपासून आपला देश **तुकडे पाडून** स्वतंत्र झाला.

इंग्रजांनी आपल्यावर ९० वर्षे एकछत्री राज्य केले. या काळात त्यांनी आपल्या देशाचे उत्तम प्रकारे संरक्षण केले. याचा अर्थ त्यांनी आपल्या देशावरील त्यांच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण केले हा आहे.

खंडित स्वरूपात आपला देश स्वतंत्र होताक्षणीच, त्याच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी आपल्यावर येऊन पडली. देशाचे संरक्षण ही लोकांची जबाबदारी तर आहेच, परंतु ती लोकांनी निवडून दिलेल्या विश्वस्त राज्यकर्त्यांवर सर्वात अधिक असते. राज्यकर्त्यांनी आचरावयाचा 'राजधर्म' सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म असल्याचे महाभारतात सांगितलेले आहे.

"सर्वादीक्षाःराजधर्मेषु युक्ताः सर्वाविद्याः राजधर्मेषु चोक्ताः
सर्वे लोका राजधर्मप्रविष्टाः सर्वे धर्मा राजधर्मप्रधानाः"

आपल्या देशातून कोरून खरवडून काढून, 'पाकिस्तान' हे नाव घेतलेल्या नव्या देशाने, आपल्या काश्मीरवर ता. २२ आक्टोबर १९४७ रोजी काहीही कारण नसता दगलबाजीने अचानक प्रकट हल्ला चढविला आणि तेव्हापासून आपल्या देशाच्या सक्रिय संरक्षणाला प्रारंभ झाला. १९६२ साली चीननेही तेच केले. तेव्हापासून आपल्याला दोन उघड शत्रूंशी लढावे लागले आहे. १९७१ साली झालेल्या युद्धात आपल्या सैन्याने पाकिस्तानचा पूर्ण पराभव करून 'बांगला देश' हा एक पूर्वी आपलाच प्रदेश असलेला, नवा स्वतंत्र देश जन्मास घातला. अशारीतीने आपल्या स्वातंत्र्याची पहिली पंचविशी युद्धमय गेली.

आपल्या देशाच्या गळयाला सर्व बाजूंनी एक भयंकर सरकफास पडलेला आहे. तो कोणत्याही क्षणी आवळला जाण्याची भीती आहे. म्हणजेच आपला भविष्यकाळ युद्धमयच जाणार असल्याचा दाट संभव आहे. १९७२ पासून या क्षणापर्यंत शांतता आहे. ती अशीच टिकून राहावी अशी आपली हार्दिक इच्छा आहे. त्याबरोबरच आपली गेलेली इंच इंच भूमी परत मिळविण्याच्या, आपल्या राज्यकर्त्यांच्या सरकारी घोषणाही आहेत. शांततेचा काळ म्हणजे दोन युद्धांच्या मधला काळ. तो अल्प अथवा दीर्घ असणे, हा भाग वेगळा. हा तथाकथित शांततेचा काळ, म्हणजे आगामी युद्धाच्या तयारीचा काळ होय.

आजच्या जागतिक परिस्थितीत लष्करी प्रश्नांची राजकीय, आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक इत्यादी अनेक प्रश्नांची इतकी गुंतागुंत झालेली आहे की, केवळ लष्करी-दृष्टया कशाशीही संबंध नसलेला-अलिप्त असा दृष्टिकोन उरलेला नाही. म्हणून कोणाही सुबुद्ध नागरिकाला राष्ट्राच्या एकाही प्रश्नाविषयी, आणि त्यातल्या त्यात स्वातंत्र्य कायम रक्षू शकणाऱ्या लष्करी विषयाबद्दल "मला काय त्याचे" ही वृत्ती परवडणार नाही.

आपल्याला शांतीच पाहिजे असली तरी,-आपल्या शेजाऱ्यांनी आपल्याला क्षणभरही उसंत दिलेली नाही. युद्धाचे तीन पवित्रे (Postures) असतात. १. आक्रमण (Attack), २. संरक्षण (Defence), ३. यथास्थिती : जैसे थे (Status Quo). भारताचा " जैसे थे " हा तिसरा पवित्रा होता आणि नेहमीकरिताच असेल ! ही 'यथास्थिती' १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री होती ती, असे अल्पसंतोषी भारत मानतो. परंतु ती यथास्थिती आपल्या शत्रूंना उध्वस्त करावयाची आहे-त्यांनी केली आहे. तिच्या संरक्षणात भारताची पहिली पंचविशी खर्ची पडली; ती कशी हे सांगण्याचा हा माझा अल्प प्रयत्न आहे.

आपल्या संरक्षण-मंत्रालयाची वार्षिक इतिवृत्ते, राज्यसभेच्या कामकाजाची इतिवृत्ते आणि 'इंस्टिटयूट ऑफ डिफेन्स स्टडीज' या संरक्षण-मंत्रालयाशी संलग्न असलेल्या संस्थेची प्रकाशने यांचाच या निबंधाकरिता मी मुख्य आधार घेतला आहे. तसेच आणखीही ग्रंथ मी 'पाहिले' आहेत. हे सर्व साहित्य मला कोठून आणि कसे मिळाले, हे सांगितलेच पाहिजे असे मला वाटत नाही आणि साह्यकर्त्यांच्या नावांची यादी देऊन त्यांचे जाहीर लेखी आभार मानले पाहिजेत असेही मला वाटत नाही. तसेच संदर्भ ग्रंथांची लांबलचक यादीही मी जोडलेली नाही. (अशी यादी तयार करणे कठीण नाही.) कारण मी केलेल्या परिश्रमांची जाहिरात मला करावीशी वाटत नाही.

या निबंधाला डॉ. प. ल. जोशी यांची प्रस्तावना लाभली, हे मी माझे भाग्य समजतो. ही प्रस्तावना लिहिण्यापूर्वी, त्यांच्या व माझ्या तीन बैठकी झाल्या होत्या. लेखकाशी प्रदीर्घ चर्चा करून लिहिल्या गेलेल्या प्रस्तावना, क्वचितच असतील.

डॉक्टर साहेबांना मी जेव्हा 'प्राध्यापक' 'प्रोफेसर साहेब' असे संबोधू लागलो, तेव्हा ते म्हणाले "मी प्राध्यापक नाही, प्र-पाठक (Reader) आहे. प्रोफेसर त्याच्या वरची पायरी." हे त्यांचे शब्द ऐकताच माझ्यापुढे दुसरे चित्र उभे राहिले. आजकाल 'कॉलेज' हे नाव असलेल्या एखाद्या शिक्षण संस्थेत 'पोटाला लागताक्षणीच' कसा तरी एम. ए. झालेला व्याख्याता (**Lecturer**) प्राध्यापक–प्रोफेसर म्हणवून घेऊन मिरवीत असतो.

प्रस्तावना, दोन शब्द, ग्रंथपरिचय, इत्यादी मोलाने मिळतात. मी आतापर्यंत तसे केलेले नाही, आणि कधीही करणार नाही. या पुस्तकाची प्रस्तावना **मोले घातले वर्णाया** नाही. मी डॉक्टर साहेबांचा सदैव ऋणी राहीन.

माझ्या '**सैन्यातल्या सावल्या**' या पुस्तकाचे प्रकाशन नागपूरचे प्रकाशक **विजय प्रकाशन** यांनी केले आहे. प्रस्तुत पुस्तक पहिल्या पुस्तकासारखेच नीटस आणि आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध करीत आहे, त्याचा मला अतिशय आनंद होतो आहे.

या पुस्तकाच्या वेष्टनाकरिता, त्यांनी मिळविलेले चित्र अतिशय अर्थपूर्ण आणि मार्मिक आहे साधारणपणे वेष्टनाच्या मागच्या भागावर चित्र नसते आणि असलेच तर ते लेखकाचे छायाचित्र असते. प्रस्तुत पुस्तकावर लेखकाचे छायाचित्र नाही. जे चित्र आहे तेही अतिशय अर्थपूर्ण आणि गंभीर आहे.

धारातीर्थी देह ठेवणाऱ्या "परम उग्र वीरव्रती" योद्धयाविषयी; **भीष्म पितामह** म्हणतात–

"द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमण्डलभेदिनौ ।
परिव्राट् योगयुक्तश्च रणेचाभिमुखो हतः ॥"

सूर्यमंडलाचा भेद करून, परमगतीला जाणारे दोन पुरुष आहेत. एक योगयुक्त संन्यासी व दुसरा रणांगणात लढताना मृत्यूला सामोरा जाणारा योद्धा. अशा परमश्रेष्ठ, स्वर्गाचा अधिकारी असलेल्या शूराची उलटी रायफल आणि तिच्यावर त्याचे शिरस्त्राण, हे सर्वमान्य प्रतीक आहे. या प्रतिकाचे ते चित्र आहे. त्याला मावळत्या सूर्यबिंबाची, त्या शूराच्या जीवनसंध्येची–पार्श्वभूमी आहे. या आपल्या योद्धयांना लेखक, प्रकाशक, चित्रकार, शेवटी सादर वंदन करीत आहेत. वाचकही करतीलच ! अशा उत्तमरीतीने हे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल मी प्रकाशकांचे मन:पूर्वक आभार मानतो.

या पुस्तकातील त्रुटी आणि दोष यांची मला जाणीव आहे. "नेटके लिहिता ये ना। वाचिता चुकतो सदा ॥ अर्थ तो सांगता ये ना।" या श्री समर्थ रामदासांच्या शब्दांत, माझे सर्व दोष मी कबूल करतो आणि त्यांच्याच शब्दांत, प्रभुरामचंद्रांना विनवितो : "बुद्धि दे रघुनायका।" शेवटी त्यांच्याच शब्दांत वाचकांना सांगू

इच्छितो की " नाना ग्रंथांच्या संमती । आणि मुख्य आत्मप्रचीती ॥ नाना संमती अन्वये । म्हणोनि मिथ्या म्हणता नये ॥ "

या पुस्तकाच्या सर्वाधिकारातून जे उत्पन्न येईल त्याचा विनियोग स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यात केला जाईल.

अगत्य असो द्यावे !

भा. त्र्यं. परांजपे

उपक्रम

" काय बोलिले जी येथ ?"

दासबोध १–१–१ समर्थ रामदास.

जुने देश स्वतंत्र होताच आणि नवी राज्ये निर्माण होताक्षणीच, त्यांच्यावर मुख्य दोन जबाबदाऱ्या पडतात. एक आपआपल्या राज्यांचे सर्व प्रकारच्या आक्रमणापासून संरक्षण आणि दुसरी त्या कर्तव्याविषयी कायमची जागृतता राखणे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर थोड्याच काळात इस्रायल–यहुदी राष्ट्राला त्याची ' वचनदत्त भूमी ' (The Promised Land) मिळाली आणि नवे इस्रायल राज्य अस्तित्वात आले. या नव-निर्मित स्वतंत्र राज्याने आणि राष्ट्राने आपले संरक्षण समर्थपणे करून त्यात यश मिळविले. इतकेच नव्हे तर, विस्ताराचीही लालसा उरी बाळगली आणि ते आपल्या संरक्षणासाठी डोळ्यांत तेल घालून, सर्व तयारीनिशी कंबर कसून अहोरात्र खडे आहे. हे करीत असतानाच तितक्याच हिरीरीने त्याने आपला सर्वांगीण विकासही घडवून आणला. इस्रायलच्या ज्या भूमीवर गवताची काडी उगवत नव्हती, की पान डोलत नव्हते, ती भूमी इस्रायलने अत्यंत परिश्रमाने सुपीक करून सोडली आहे. हे एकच उदाहरण इस्रायलने घरची आघाडी कशी लढविली ते पाहण्यास पुरे आहे. प्रस्तुत निबंधात भारताची 'दाराच्या आघाडीची 'च, फक्त स्वातंत्र्याच्या पहिल्या पंचविशीत

काय परिस्थिती होती, यावर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न आहे.

देशाचे संरक्षण हा वरवर दिसतो तसा संकुचित विषय नाही. संरक्षणाचा हेतू देशाच्या पार्थिव सीमांच्या आत कोणाही परकीयाचे आक्रमक पाऊल न उमटू देणे हा तर असतोच, त्याशिवाय देशातील लोकांना आपले सर्व स्वातंत्र्य सर्व हक्कांसह निरामयपणे आणि स्वाभिमानाने भोगता येऊन, आपला सर्वांगीण विकास आणि उत्कर्ष करून घेण्याची संधी निर्वेधपणे प्राप्त व्हावी आणि लोक व देश निर्भय व्हावेत हा असतो. असा सुरक्षित आणि सुविकसित देश, सर्वांना हवीहवीशी वाटणारी जागतिक न्याय–नीती, सुरक्षितता आणि शांती यांच्यात मोलाची भर टाकीत असतो.

इस्रायलने जरी आपले संरक्षण आणि विकास करण्यात कसूर केला नसला तरी त्याने जगाचा ' कसूर ' केला असल्याचा त्याच्यावर आरोप केला गेलेला आहे. त्याने मांडलेल्या युद्धामुळे, जागतिक शांती आणि सुरक्षितता यांच्यात भर पडली नाही. त्याची बाजू न्यायाची आहे किंवा नाही हा प्रश्न, अलाहिदा आहे; आणि तो वादग्रस्त आहे. आपल्या संरक्षणाकरिता भारत जरी युद्धात ओढला गेलेला असला, तरीही एक महत्त्वाची गोष्ट निर्विवाद आहे, ती ही की, संतुष्ट, अलिप्त आणि शांतिप्रिय भारताची बाजू न्यायाची असून, त्याने आपल्या (बऱ्या-वाईट–देशाच्या दृष्टीने) गेल्या तीस वर्षांतील कर्तृत्वाने जागतिक शांतीत भर टाकलेली आहे. ही वस्तुस्थिती देशोदेशीचे मुत्सद्दी आणि विचारवंत मान्य करतात.

(१) कोणी, (२) कशाचे, (३) कोणापासून, (४) केव्हा, (५) का, (६) कसे, (७) कोठून आणि (८) कोठे हे संरक्षणाचे आठ प्रश्न प्रत्येक देशापुढे असतात. यापैकी ' कोठून ' आणि ' कोठे ' या दोन प्रश्नांविषयी, प्रश्न पडू शकतो. त्याचे उत्तर कोठून म्हणजे देशाच्या सरहद्दीपासून संरक्षणाचे क्षेत्र म्हणा अथवा रेषा सुरू होते ? हे निश्चित करणे हे एक (भूमितीच्या सिद्धांतानुसार रेषेला लांबी असते; परंतु रुंदी नसते.) आणि कोठे म्हणजे, संरक्षणाची ' नाजुक सीमा ' रेषा (Criticle Boundary) निश्चित करणे हे दुसरे. (नाजूक सीमा रेषांविषयी जरूर तो खुलासा पुढे केलेला आढळेल.) या दोन सीमा रेषांनी व्यापलेला प्रदेश कोणता हे मनोमन ठरविणे, हे या दोन प्रश्नांचे संयुक्त उत्तर आहे.

हे आठ प्रश्न भारताला दश–दिशांनी गळफासासारखे वेढून बसलेले आहेत. (अष्ट–दिशांत वरचे आकाश–अवकाश यांची दिशा आणि खालच्या भूपृष्ठाखालच्या ' पाताळाची ' दिशा, या दोन दिशा मिळवून दिशा दहा होतात.) भारताने वरच्या ऊर्ध्वदिशेत अजूनपर्यंत तरी अणुस्फोट केलेला नाही. त्याने भूपृष्ठाखाली एक प्रायोगिक स्फोट केलेला आहे. (त्याविरुद्ध जगाने उगाचच कावकावही केलेली आहे.) भारत अणुशक्तीचा विध्वंसाकरिता–स्वसंरक्षणाकरताही उपयोग करणार

नाही; अशी त्याची ' चालू ' प्रतिज्ञा आहे. त्या कारणाने भारताच्या संरक्षणाच्या आठ प्रश्नांना दिशा मात्र दहा आहेत. त्यापैकी पश्चिम, वायव्य, उत्तर, ईशान्य आणि पूर्व या दिशा भारताला स्वसंरक्षणाकरिता गेल्या पंचवीस वर्षांत लढवाव्या लागलेल्या आहेत. त्यांचा अनुभव आणि निष्कर्ष अतिशय व्यथित करणारा आहे. कसा ते पाहण्याचा हा एक अल्प प्रयत्न आहे.

□□

२

संरक्षणाचे व्याकरण

आपल्या या अतिप्राचीन देशाचा प्राचीन भूगोल पाहिला असता, असे दिसून येते की, तो जम्बूद्वीपातल्या 'भारत वर्ष' (किंवा भरतखंड) या नावाने प्रसिद्ध होता. (दुष्यंत–शकुंतला–पुत्र भरत याच्या नावावरून आपल्या देशाला भारत हे नाव मिळाले, ही चुकीची समजूत आहे. ऋग्वेदकाळी 'भरतकुल' या नावाचे एक विशेष पराक्रमी कर्तबगार आर्यकुळ होते. यावरून आपल्या देशाला हे नाव मिळालेले आहे.) त्याविषयी पुराणात असे म्हटलेले आहे की, "अत्रापि भारत वर्षं जम्बुद्वीपे विशेषतः। यतोहि कर्मभूरेषा अत्तोऽन्या भोग-भूमयः ॥" जम्बुद्वीपातील भारतवर्षाला एक विशेष महत्त्व आहे. भारतवर्ष ही कर्मभूमी आहे. दुसरे इतर देश भोगभूमी आहेत.

प्रागैतिहासिक काळापासूनच भारतीयांना आपल्या मातृभूमीविषयी उत्कट प्रेम तसाच नितांत आदर वाटत आलेला आहे. निजून उठताच सर्वप्रथम ते या परम-पवित्र भूमीला वंदन करीत असत. तिची क्षमा मागत असत. नंतर ते जमिनीला पाय लावीत. "समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडले। विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥" त्यांना जननी आणि जन्मभूमी यांच्या-पुढे स्वर्गदेखील तुच्छ वाटत होता. लागलीच त्यांची दुसरी प्रार्थना असे "योनो द्वेषत् पृथिवि यः पृतन्यात् योऽभिदासान्मनसा यो वधेन। तं नो भूमे रन्धयपूर्वकृ-

त्वरि" जे आमचा द्वेष करतात, जे सैन्य घेऊन आमच्यावर चालून येतात व जे आम्हाला मारण्याकरिता टपलेले आहेत, त्यांना तू नष्ट कर. "मा नः पश्चान्मा पुरस्तान्नुदिष्ठान्मोत्तरादधरादुत।" मागून, पुढून, वरून, खालून आमच्यावर कोणीही प्रहार करू नये. प्राचीन वैदिक आर्य नुसतीच ईश्वराची करुणा भाकून आणि सर्व भार देवावर टाकून स्वस्थ निष्क्रिय बसणारे ऐतखाऊ नव्हते. "अहमस्मि सहमान उत्तरो नाम भूम्याम्। अभीषाऽस्मि विशाषाडाशामाशां विषासहिः॥" मी आपल्या मातृभूमीसाठी व तिच्या दुःखनिवारणासाठी सर्व प्रकारचे कष्ट भोगावयास तयार आहे. ते कष्ट माझ्या वाट्यास कितीही, कसे आणि केव्हाही आले तरी, मला त्याची पर्वा नाही. अशी त्यांची प्रतिज्ञा होती आणि त्यांना तितका आत्मविश्वासही होता.

प्राचीन वैदिक आर्यांनी पृथ्वी नवखंड असल्याचे सांगितले आहे. तसेच ती सप्तद्वीपात्मक असल्याचेही सांगितलेले आहे. द्वीप या शब्दाचा त्यांचा अर्थ, सर्व बाजूंनी पाण्याने पूर्णपणे वेढलेला भूभाग, असा निरपवाद नव्हता. प्राचीनकाळी आपल्या भारतवर्षाचे किंवा भरतखंडाचे, आर्यावर्त आणि दक्षिण पथ असे दोन भाग केले होते. कालांतराने दक्षिण पथ हे नाव मागे पडले आणि भरतखंड हे एकच संपूर्ण देशाचे नाव प्रचारात आले. याचे कारण कालांतराने आर्य आणि द्रविड एकजीव झाले. ऐतिहासिक काळातील पहिल्या परकीय आक्रमकांनी (आणि प्रवाशांनी) सिंधू नदीवरून भरतखंडाला हिंदुस्थान हे नाव दिले. त्यांनी सिंधूतल्या 'सिं' चे 'हिं' केले आणि 'धू' चे 'दू' केले. तसेच वैदिक आर्य धर्माला हिंदु धर्म हे नाव दिले. त्यानंतर पश्चिमेकडील युरोपातील साहसी आणि दर्यावर्दी लोकांनी त्याला India हे नाव दिले. तेही सिंधू नदीच्या (Indus इंडस) या पाश्चिमात्यांनी दिलेल्या नावावरूनच आले. स्थान याचे मूळ संस्कृत नसून ते स्ताँ या पर्शियन शब्दावरून तयार झाले. सारांश, हिंदुस्थान किंवा इंडिया ही परकीयांनी आपल्या देशाला दिलेली नावे आहेत.

१५ आगस्ट १९४७ रोजी खंडित होऊन आपला देश स्वतंत्र झाल्यावर, त्याची जी घटना तयार झाली तिने आपल्या देशाच्या प्राचीन नावाचा जीर्णोद्धार करून, त्याला 'भारत' हे नाव दिले. परंतु त्याच्यबरोबर त्याचे 'इंडिया' हे परकीयांनी दिलेले नावही कायम ठेवले. आता आपल्या देशाचे 'कायदेशीर' नाव **भारत म्हणजे (That is) इंडिया** हे आहे. परंतु व्यवहारात त्यातला एकच भाग (पहिला किंवा दुसरा) उपयोगात आणला जातो. जोड नाव असलेला दुसरा एकही देश जगात नाही. या जोड नावापैकी **भारत** हे नाव फक्त देशाच्या अंतर्गत उपयोगात आणले जाते. त्याचा भारताच्या सीमांच्या बाहेर उपयोग झालेला नाही— सरकारी रीतीने, कारण ते नाव फक्त Home Consumption करताच कायम केलेले दिसते. दुसरा **इंडिया** हा भाग भारताबाहेरील सर्व सरकारी व्यवहारात

उपयोगात आणला जातो, हा भाग Export करता आहे. कित्येक मोठमोठ्या कारखान्यांत अशा दोन प्रकारच्या वस्तू बनविण्यात येत असतात. प्राचीन दक्षिण-पंथाच्या खालच्या टोकाला असलेल्या सीलोन हे विलायती नाव असलेल्या देशानेही आपले विलायती नाव टाकून देऊन जुने लंका हे नाव पुन्हा चालू केले आहे. इतकेच नव्हे तर आदरार्थी ते नाव श्रीकारापासून सुरू करून, ते **श्रीलंका** असे केले आहे. त्या देशाने जोड नाव घेतले नाही.

घटना समितीत आपल्या देशाच्या नावाविषयी चर्चा चालू असताना जवाहरलाल नेहरूंनी इंडिया हेच नाव चालू राहावे, असा आग्रह धरला होता. आणि त्याचे समर्थन काय, तर ३/४ शतकांपासून पश्चिमेकडील साहेब लोक आपल्या देशाला याच नावाने ओळखतात. त्यांना आता दुसऱ्या नावाची सवय करण्याचे कष्ट देणे योग्य होणार नाही. (बरोबरच आहे. कष्ट म्हणजे हिंसा !) नेहरूंच्या म्हणण्याला पूर्ण विरोध करणे शक्यच नव्हते. तेव्हा त्वयार्धं मयार्धं या न्यायाने घटना समितीने **'भारत' दचाट इज इंडिया** या नावावर शिक्कामोर्तब केले.

आपल्या देशाचा आणखीही एक विशेष आहे. आणि त्याच्यावरही घटना समितीने शिक्कामोर्तब केलेले आहे. भारताची राष्ट्रगीतेही दोन आहेत. दोन राष्ट्रगीते असलेला जगात दुसरा एकही देश नाही. एक आहे अत्यंत स्फूर्तिदायक तेजस्वी इतिहास असलेले, मातृभूमीविषयी उत्कट प्रेम आणि परम आदर व्यक्त करणारे आणि तिचे उज्ज्वल यशोगान असलेले **वंदे मातरम्** आणि दुसरे ज्याच्यात काहीच नाही, जे केवळ प्रासंगिक असून ज्याच्यात मिळमिळीत आळवणीच असणारे **जन मन गण** (आता ते गैरलागू झालेले आहे. कारण त्याच्यात दिलेल्या भारतीय प्रदेशांची यादी आता बदलेली असून अनेक राज्य-नामे त्यातील यादीत नाहीत.) दुसरी गोष्ट घटनेने जरी दोन राष्ट्रगीते मान्य केली असली. तरी एकाही सरकारी समारंभात "वंदेमातरम्" हे राष्ट्रगीत गायले-वाजवले जात नाही. तसेच सरकारने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत वगैरे फक्त 'जन मन गण' हे एकच राष्ट्रगीत छापलेले असते.

घटना समितीत जेव्हा राष्ट्रगीताबद्दल चर्चा झाली तेव्हा वंदे मातरम्‌चा इतिहास, पुण्याई आणि स्फूर्ती कोणीही नाकारू शकला नाही. तरीही 'जन मन गण' हेच राष्ट्रगीत असावे असा जवाहरलाल नेहरूंचा आग्रह होता. आपल्या आग्रहाच्या समर्थनार्थ, त्यांनी दोन कारणे दिली होती. एक कारण हे होते की, **वंदे मातरम** बँडवर वाजविता येत नाही. परंतु या कारणाला यत्किंचितही आधार नव्हता-(नाही). १५ आगस्ट १९४७ पासून घटना 'लागू' होण्याच्या दिवसा-पर्यंत सर्व लष्करी आणि पोलिस बँड, वंदे मातरमच वाजवीत होते. एकाही बँड मास्तरची या बाबतीत तक्रार नव्हती. ता. २८ फेब्रुवारी १९४८ रोजी फर्स्ट बटालियन सॉमरसेट लाईट इन्फन्ट्री ही शेवटली गोरी ब्रिटिश पलटण मायदेशी

जाण्यासाठी मुंबईस बोटीवर चढली, तेव्हा तिच्या इंग्रज बँडवाल्यांनी **वंदे मातरम्** वाजवूनच प्रयाणापूर्वी निरोपाची सलामी भारताला दिली होती आणि वंदे मातरम् वाजत असेपर्यंत प्रत्येक इंग्रजाने आपले आयुध रायफल आणि तलवार आदराच्या पवित्र्यात धरलेले होते. बँड हा रणवाद्य-मेळ आहे. त्याचा उद्देश योद्ध्यांना उत्साहित करणे हा होता. प्रत्येक देशाच्या सेनादलात फार पूर्वीपासून रणवाद्ये आहेत. भारतात ऋग्वेदकालापासून रणवाद्ये आहेत. " आमच्या सैनिकांत बल व उत्साह उत्पन्न कर...शत्रूंना रणातून पिटाळून लाव...सतत गंभीर गर्जना करीत राहा " अशा अर्थाच्या इच्छा रणवाद्यांना अनुलक्षून ऋग्वेदात केलेल्या आहेत. रणवाद्यांची ही महती राष्ट्रगीतवादनाने अधिकच वृद्धिंगत होत असते.

'वंदे मातरम्' च्या ऐवजी 'जन मन गण' हे राष्ट्रगीत असावे, या जवाहरलाल नेहरूंच्या आग्रहाचे दुसरे कारण हे होते की, त्याची 'चाल' युरोपियन आणि अमेरिकन लोकांना फार फार आवडते ! ती चाल रवींद्र संगीताची आहे. रवींद्र संगीत अभिजात भारतीय संगीत नसून ते पाश्चात्त्य संगीताच्या जवळचे आहे. तेव्हा त्यांना जवळ असलेली चाल आवडणे साहजिक आहे. नेहरूंनी भारतीयांच्या भावनांचा किंचितही विचार केला नाही. त्यांना परकीयांच्या आवडीची अधिक कदर वाटली आणि घटना समितीच्या सन्माननीय सभासदांनीही नेहरूंच्या आग्रहाला मान तुकविली. राजहट्ट आणि बालहट्ट नेहमीच प्रभावी ठरतात. जवाहरलाल नेहरू हे लोकशाहीतले राजेच होते. नागेंद्रसिंग म्हणतात, " In a democracy the prime minister is a fondled child " लोकशाहीत प्रधानमंत्री लाडावलेले बाळ असते. पंडित जवाहरलाल नेहरूंचा दोन्ही नात्यांनी जय झाला. भारताच्या संरक्षणाची **कथा** त्याच्या " भारत दॅट इज इंडिया " या विचित्र नावाने सुरू होते. त्याच वेळी, त्याच्या 'जनमनगण' या राष्ट्रगीताने त्याची तशीच **व्यथाही** सुरू होते. परंतु प्रत्यक्ष 'कथा' आणि व्यथा, त्याच्या किती तरी आधीच, ज्या दुर्दैवी क्षणी अधीर झालेल्या एका राजकीय पक्षाने राष्ट्रपित्याच्या प्रतिज्ञेविरुद्ध देशाचे तुकडे करण्यास मान्यता दिली; त्या क्षणीच त्याच्या संरक्षणाची कथा आणि व्यथा या दोन्हीही एकदमच सुरू झालेल्या आहेत.

संरक्षण या शब्दाची व्याप्ती अफाट आहे. आत्मरक्षण ही प्राणिमात्राची स्वाभाविक मनोवृत्ती आहे. मानवी मनाचे अनेक 'धर्म' आहेत. त्यांचा सत्त्व, रज आणि तम या गुणत्रयीत अंतर्भाव होतो. त्यातला तमो गुण हाच सर्व अस्वस्थतेचे आणि संघर्षाचे कारण आहे. प्राणिमात्राला आपल्या अस्तित्वाकरिता एकसारखे झगडावे लागते. त्यात जो यशस्वी होते तो टिकतो. हे झगडे एक-एकटे किंवा एकामागून एक असे नसतात. प्रत्येकाला वेळी अवेळी अनेक आघाड्यांवर लढावे लागते. या कारणामुळे, संपूर्ण मानवजीवन हा एक न संपणारा लढा-युद्ध आहे. मानवाच्या ज्या अनेक अंतःस्फूर्ती अथवा मनोविकार आहेत, त्यांचेही आपसात

झगडे होत राहतात. या जीवनसंघर्षातून कोणीही, संत सज्जन देखील, वगळले जात नाहीत. म्हणून संतश्रेष्ठ तुकाराम म्हणतात "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग."

मानवाच्या स्वभाव धर्माचे किंवा अंतःप्रवृत्तीचे निरुपद्रवी किंवा सुष्ट आणि उपद्रवी किंवा दुष्ट असे दोन वर्ग आहेत. कित्येक वेळी सुष्ट वृत्तीही अती तीव्रतेमुळे, किंवा दुसऱ्या एखाद्या विरोधी वृत्तीच्या प्रभावामुळे, दुष्ट बनू शकते. एखाद्या वस्तूविषयी ममत्व वाटणे दुष्टपणाचे नसते. परंतु दुसऱ्या कोणाच्या मालकीच्या वस्तूबद्दल ममत्व उत्पन्न होणे, तिचा येन केन प्रकारेण अपहार करण्याची इच्छा उत्पन्न होणे, ही दुष्टता ठरते. जे काही आपले मानले गेलेले, आपले झालेले असेल ते घेण्याची, त्याचा कोणी अपहार करण्याची इच्छा करू नये, तसे करण्याचे प्रयत्न करू नये असे वाटणे साहजिक आहे आणि असे वाटणे, जे आपले ते आपल्यापाशीच राहावे अशी इच्छा करणे हा दुष्टपणा नाही. इतकेच नव्हे तर, अपहाराचा प्रतिकार करणे हीही दुष्टता ठरत नाही. त्या क्रियाप्रतिक्रियांतून निर्माण होणारा संघर्ष दुष्ट ठरू शकतो.

मानवी मनाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत, ममत्व उत्पन्न होण्याच्या पूर्वीची एक नैसर्गिक आणि–निर्हेतुक अवस्था असते. अगदी तान्हेमूल, जे हाताला येईल ते घट्ट धरून ठेवते. ती वस्तू सोडवू देत नाही आणि क्षणार्धातच आपणच ती टाकून देऊन, दुसरे हाताला लागेल ते घट्ट धरून ठेवते. या त्याच्या क्रियांत ममत्वाचा लेशही नसतो. ते मूल आपला आंगठा चोखते ते भूक लागली म्हणून नसून, एक चाळा म्हणून. ते चोखणे थांबवून दुसरेच काही तरी तोंडात घालू पाहते. या आणि अशाप्रकारच्या क्रियांत, ममत्व किंवा क्षुधा–शमन असे काहीही नसले तरी, यातूनच ममत्व, लालसा, संग्रह इत्यादी गुणावगुण उत्क्रांत होतात.

संपत्ती, प्रतिष्ठा, सत्ता यासारख्या कित्येक इष्ट कामनांना दुष्ट म्हणता येणार नाही. परंतु त्यांच्या परिपूर्तीकरिता केले गेलेले प्रयत्न दुष्ट असू शकतात. मानवाच्या काही श्रद्धा असतात, काही भावना असतात आणि काही निष्ठा असतात. त्यांच्याबाबतीत कोणा दुसऱ्याशी वादविवाद, संघर्ष इत्यादी–निर्माण झाल्यास, त्यांची जपणूक, करणे, त्यांचे संरक्षण करणे, कोणत्याही परिस्थितीत दुष्ट ठरू शकत नाही. या संघर्षात तो कित्येक प्रसंगी सर्वस्वाच्या बलिदानाला सिद्ध झालेला असतो.

नुसते जिवंत राहणे म्हणजे जीवन नव्हे. ज्या जीवनाला गती–वेग नाही ते खरे जीवन नाही. जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी, त्याला घाम, रक्त आणि अश्रूंचे शिंपण करावे लागते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र ही मानवाची प्रगत आणि उत्क्रांत स्वरूपे आहेत. त्यांचे पृथक तसेच एकत्र संरक्षण करावे लागत असते. मानवाच्या व्यक्तिगत अंतःप्रेरणा आणि धारणा यांचा समाजावर प्रभाव पडून, समाजाचा 'स्वभाव' बनतो. राष्ट्रभावना ही त्याच्या पुढची पायरी, राष्ट्राच्या

प्रेरणा, इच्छा, आकांक्षा, श्रद्धा, निष्ठा, या सर्वांचा परिपाक म्हणजे त्या राष्ट्रीयत्व प्राप्त लोकांची संस्कृती, तिची प्रकृती राष्ट्रीयत्वापासून वेगळी करता येत नाही. आणि ती सर्व प्रकारांनी धडधाकट सुदृढ राखणे म्हणजे संस्कृतीचे आणि राष्ट्रीयत्वाचे संरक्षण करणे होय. संस्कृती भावनिष्ठच फक्त असत नाही, ती वस्तु–निष्ठही असते.

संरक्षणाची चिंता करण्याच्या आधी, आपल्यासाठी संरक्षण करण्यासारखे काही आहे काय, हा पहिला विचार. काही आहे असे प्रतीत झाल्यावर त्याला निश्चित स्वरूप देणे, त्याचे मानचित्र तयार करून ते अहर्निशि समोर–म्हणजे मनोमानसी–हृदयी बाळगणे, ही पुढची मजल. प्राण्याला जिवंत राहण्यासाठी इतर सर्व जीवसृष्टीसारखे अन्नपाणी तर लागतेच; त्याशिवाय त्याच्या जीविताला परिपोषणाकरिता आणि त्याच्या तुष्टी आणि पुष्टीसाठी मानसिक, भावनिक आणि हार्दिक खाद्यही आवश्यक असते. यानेच इतर सर्व जीवांपासून मानव वेगळा असल्याचे सिद्ध झालेले आहे.

जपण्या जोपासण्यासारखे आणि सुरक्षित राखण्याच्या योग्यतेचे आपल्याजवळ काही तरी आहे, याची सततची आणि स्पष्ट जाणीव आणि त्याकरिता कराव्या लागणाऱ्या कष्टांचीही जाणीव, स्वाभिमानी आणि सतेज युयुत्सू वृत्ती निर्माण करते. प्रथमतः मनुष्य स्वतःच्या ऐहिक कल्याणकारी परिस्थितीचे संरक्षण करण्याची धडपड करीत असतो. त्यातील यशापयशाने त्याच्या अंतःस्थ सत्त्वाच्या संरक्षणाची कमीअधिक तीव्रता उत्पन्न होते. ऐहिक आत्मकल्याणकारी संरक्षणाच्या प्रयत्नात यश मिळाले तर, त्यातून महत्त्वाकांक्षा पल्लवित होते आणि परस्वापहाराची दुष्टबुद्धी निर्माण होते. त्याला आत्मगौरवाचा आणि आपल्या प्रभावाचा, अधिकाराचा परिघ विस्तृत करावासा वाटतो आणि तो त्या दिशेने प्रयत्न करतो. ममत्वातून लालसा आणि त्यातून परस्वापहाराची दुष्टबुद्धी या क्रमाने आक्रमक प्रवृत्ती फोफावते.

या प्रवृत्तीतून उद्‌भवणाऱ्या क्रियांचा प्रतिकार म्हणजे संरक्षण. आक्रमण आणि संरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्याच्या दोन्ही बाजूंवरील ठशांचा खडबडीतपणा जसाच्या तसा कायम राहण्यातच त्या नाण्याचे मूल्य साठवलेले असते. खडबडीत जीवनच खरे जीवन होय ! कित्येक वेळी नाण्याची एखादी बाजू चोपडी, गुळगुळीत झालेली असते. अशी अवस्था मानवजीवनात उत्पन्न होणे याचा अर्थ आक्रमणाला दंडेलीला निमूटपणे शरण जाणे. एका बाजूने का असेना, गुळगुळीत झालेल्या नाण्याची दर्शनी चलनातली किंमत शून्य असते. असे नाणे तुच्छ, टाकाऊ ठरते. तीच गोष्ट मानवी जीवनाला लागू आहे. गुळगुळीत आणि गुळमुळीत जीवन हे पूर्ण मानवी जीवन नव्हे !

Alice in wonder land या पुस्तकात एक अतिशय मार्मिक वाक्य आहे.

" The more there is of yours, the less there is of mine." तुझ्या-जवळ जे आणि जितके अधिक ते आणि तितके माझ्याजवळ कमी. कमी असणारा अधिक असणाऱ्याच्या जवळचे अधिक, अधिक असलेलेच नव्हे तर त्या दुसऱ्याचे स्वतःचे असलेलेही, त्याच्यापासून हिसकून घेण्याचे प्रयत्न करतो. जोपर्यंत या प्रयत्नांचे स्वरूप इच्छा एवढेच असते, तोपर्यंतच्या स्थितीला तणावाची स्थिती म्हणतात. तणावाचे रूपांतर कृतीत होणे म्हणजे आक्रमण करणे. आक्रमणाचा प्रतिकार म्हणजे संरक्षणाचे प्रयत्न. आक्रमण आणि संरक्षण या दोन्ही क्रिया प्रति-क्रियांना संयुक्त नाव **युद्ध** हे आहे. **हेनरिक फॉन ब्यूलो** हा विचारवंत युद्धाला समभुज त्रिकोणाची उपमा देतो. या त्रिकोणाच्या तळरेषेशी एका भुजेने केलेल्या कोनाला तो 'आक्रमण' हे नाव देतो. दुसऱ्या भुजेने तळरेषेच्या दुसऱ्या टोकाशी केलेल्या कोनाला तो 'संरक्षण' हे नाव देतो. दोन्ही भुजांनी साधल्या गेलेल्या शिरो-बिंदूशी झालेल्या कोनाला तो 'युद्ध' हे नाव देतो. तळरेषेशी भुजांनी केलेल्या एका कोनाला तो युद्धाचे अधिष्ठान (Subject) आणि दुसऱ्या कोनाला युद्धाचा हेतू (Object) अशीही नावे देतो.

मनुष्यप्राणी अथांग सागरात इतस्ततः हेलकावत, हिंदकळत, तरंगत भ्रमण करीत राहणाऱ्या पर्वतप्राय हिमखंडासारखा, भूतलावर वास करीत असतो. त्या हिमखंडाचा जलपृष्ठावरील दिसणारा भाग पाण्यात बुडलेल्या अदृश्य भागापेक्षा अनेक पटींनी लहान असतो. त्या हिमखंडाची कल्पनातीत शक्ती त्याच्या अदृश्य भागातच असते. मोठमोठ्या प्रासादतुल्य जलयानांचे भक्कम पोलादी जलपृष्ठा-खाली असणारे तळ, त्याने काकडीसारखे चिरून टाकलेले आहेत. मानवाचे खरे आणि सर्वाधिक मानस, असेच दडलेले, सहजासहजी वरून न दिसणारे असते आणि मानव ते शक्य तितके दडवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि आपले सोज्ज्वळ, निरुपद्रवी आणि परोपकारी दर्शनच फक्त इतर सर्व लोकांना दिसावे, असे शिकस्तीचे प्रयत्न तो करीत असतो. म्हणून व्यवहारात तो दुटप्पी आणि दुहेरी असतो. (अपवाद वगळून) अज्ञाताचा शोध घेणे सोपे नसते आणि अज्ञाताची भीतीही सर्वात अधिक वाटते. म्हणून प्रत्येक माणूस दुसऱ्या माणसाविषयी साशंक असतो–त्याने तसे असणे स्वाभाविक ठरते. त्याने आत्मरक्षणाकरिता सावध चित्त असणे फलदायी ठरते. सृष्टीच्या आणि नियतीच्या दरबारात बेसावधपणाला क्षमा नसते.

प्रामाणिकपणाने आणि हक्काने आत्मरक्षण करणारा, आक्रमणाला प्रतिकार करू पाहणारा, आपल्या वर्तनाचे सोज्ज्वळ समर्थन करतो यात नवल नाही. परंतु आक्रमकही आपल्या दुष्टबुद्धी आक्रमक क्रियांचे 'चोराच्या उलटचा' या (अ) न्यायाने आगाऊच समर्थन करीत असतो आणि त्याला तो सावध चित्ताचा आधार देतो. तो म्हणतो : " He was about to kill me in self–defence; so I

had to kill him in self defence." तो आत्मसंरक्षणाकरिता माझी हत्या करू पाहत होता. म्हणून आत्मसंरक्षणाकरिताच मला त्याला ठार मारावे लागले. दोघेही आत्मसंरक्षणाकरिताच केवळ परस्परांना मारून टाकण्याचे प्रयत्न करीत असतात. रशियन राजनीतिशास्त्रज्ञ क्रुश्चेव्ह आणखी पुढे जातो. तो म्हणतो, " One of us must go to the grave. We do not want to go to the grave. They also do not want to go to the grave. So what can be done ? We must push them into the grave. दोघांपैकी एकाला कोणाला तरी नष्ट व्हायलाच पाहिजे. (एका मॅनात दोन तलवारी असू शकत नाहीत.) हे ठीक आहे. परंतु या अफाट पृथ्वीवर फक्त एकच कोणी तरी राहू शकतो. तेथे दुसऱ्याला जागा नाही आणि हक्कही नाही. हे रशियाचे गृहीत कृत्य आहे. त्याला आधार देण्याची क्रुश्चेव्हला मुळीच आवश्यकता वाटत नाही. आणि तो एकच म्हणजे रशिया, दुसरे कोणीही नाही, हाही त्याला झालेला साक्षात्कार ! आम्हाला कबरीत गाडून घ्यायचे नाही. तोही तेच म्हणतो. तेव्हा त्यालाच आम्ही पुरून टाकले पाहिजे.

दोन व्यक्तींच्या सक्रिय संघर्षाला मारामारी म्हणतात. दोन व्यक्तिसमूहांच्या मारामारीला दंगा म्हणतात. दोन देशांच्या दंग्याला, परस्परांची क्रूर हत्या करणाऱ्या, स्थावर जंगमाचा शक्य तितका विध्वंस करणाऱ्या दंग्याला, युद्ध म्हणतात. युद्धाची अनेक कारणे असू शकतात. देशात युद्धामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांची गुंतागुंत होते. किंबहुना अशा गुंतागुंतीमुळेच युद्ध उभे राहते. आंतरराष्ट्रीय गुंतागुंत सोडविण्याकरिता (सर्वच गुंता उकलण्याकरिता) साम, दाम आणि भेद हे सर्वमान्य आणि शांततेचे उपाय आहेत. ते विफल झाले म्हणजे, दण्ड–युद्ध हा उपाय उपयुक्त ठरू शकतो. **क्लॉझविट्झ** हा जर्मन युद्धशास्त्रज्ञ म्हणतो, " **War** is the continuation of the policy of a nation by other means." देशाची राजनीत, रेटीत नेण्याचा युद्ध हा 'दुसरा' मार्ग असतो. परंतु तो नेहमीच अखेरचा असतो असे नव्हे. कित्येक बलदंड मदोन्मत्त तोच उपाय पहिल्या धडक्यालाच योजीत असतात. ज्या देशाची आत्मरक्षणाची योजना कडेकोट बंदोबस्ताची; आणि भय अथवा शंका उत्पन्न करणारी नसेल, त्या देशाविरुद्ध या उपायाने सहज यश मिळू शकते. म्हणून एक युद्धशास्त्रज्ञ म्हणतो, " A defenceless neighbour is a strong inducement for attack." असुरक्षित शेजारी आक्रमणाचे जोरदार प्रलोभन असते.

आंतरराष्ट्रीय गुंतागुंत उत्पन्न होण्याची अनेक कारणे Richard Rosecrance या ग्रंथकाराने आपल्या International Relations या ग्रंथात दिलेली आहेत. त्यांचा निष्कर्ष काढून हा ग्रंथकार म्हणतो, " Nations and peoples often waver in their persuit of peace." शांतीच्या शोधात असलेली

राष्ट्रे आणि लोक भ्रांतचित्त होऊन डळमळतात.–म्हणून युद्धे होतात. ' Causes of war ' या ग्रंथाचा लेखक L. L. Bernard युद्धाच्या कारणांची मीमांसा करून शेवटी म्हणतो, " Just war was always one in which one's own side was involved. The unjust war was always carried out by the enemy. " याचा अर्थ हा की आपलीच बाजू काय ती न्यायाची असून, शत्रूची बाजू अन्यायाची असते; असे प्रत्येकाचे प्रतिपादन असते. वर दिलेल्या क्रुश्चेव्हच्या सिद्धांताशी हा आग्रह जुळतो. दुसऱ्या जागतिक महायुद्धात, अमेरिकेने जपानच्या हिरोशीमा आणि नागासाकी या दोन गैरलष्करी लक्ष्यावर अणुबांब टाकून जी धर्मयुद्धाची कबर बांधली, त्या नृशंस कृत्याचे कित्येक प्रतिष्ठित अमेरिकनांनी नागडे निर्लज्ज समर्थन केले होते. त्यांचे म्हणणे असे होते की, ते युद्ध जर अधिक लांबले असते तर, त्यामुळे जपानची प्रचंड प्रमाणावर मनुष्य आणि वित्तहानी झाली असती. ती होऊ नये म्हणून अमेरिकेने हा अण्वस्त्रप्रयोग केला. याला कोणी killing कसाबकरणी म्हटले तरी ती kind killing दयार्द्रबुद्धीने केलेले उपकारक कृत्यच होते.

डॉ. ईश्वरीप्रसाद जयस्वाल आपल्या Hindu Policy या ग्रंथात म्हणतात, (त्या ग्रंथाचे हिंदी भाषांतर) " युद्धके कारण साधारणत: ये होते हैं–१. सम्राटपदकी आकांक्षा. २. राज्यविस्तार और सामंतोंसे अधिक करभार की इच्छा. ३. शक्तिसंतुलनकी चेष्टा. ४. शत्रुके धावों का बदला. ५. पीडित जन की रक्षा. ६. आत्मरक्षाकी आवश्यकता. यही कारण सब युगों और देशोंमें युद्ध के हेतु बनते हैं। युद्ध छेडनेका असली कारण सदा शत्रुकी दुर्बलताहि रही है। यदि सही देखा जाय तो, वास्तविकता यही है कि सारे संसार में जो भी राज्य बलवान और विस्तीर्ण बने वे अपनेसे दुर्बल राज्यों को दबाकरहि। और युद्ध छेडनेका असली कारण शत्रुकी दुर्बलताहि रहा, भलेहि इस कार्य के समर्थनमें ऊँचे सिद्धांतोंकी दुहाई की जाय। "

आक्रमणाच्या हेतूची मीमांसा करताना Raymond Allen ' On War ' या ग्रंथात म्हणतो, " There seems no other cause for war than War like passion itself. " युद्धखोरी हा स्वभावधर्म आहे, कारण मनुष्य जसा सामाजिक (Social), राजकीय (Political) प्राणी आहे तसाच तो भांडकुदळही (Pugnacious) आहे.

एका गालावर थप्पड खाल्ल्यावर दुसरा गाल दुसऱ्या थपडीकरिता पुढे करण्याने, म्हणजे नुसताच मार खात राहिल्याने संरक्षण होत नसते. तसेच ढाल, तटबंदी इत्यादी निर्जीव वस्तूंनी संरक्षण होत नसते. क्षणकालाचा त्यांचा आश्रय म्हणजे, सक्रिय निरामय संरक्षण नसून, तो फक्त आभास असतो. तो खरा मानणे म्हणजे, आत्मघात होय.

गौतम बुद्धानंतर भारतात जन्म घेणारी, शांती, समता आणि अहिंसा प्रतिपादणारी दुसरी विभूती **गांधीजी** ही आहे. त्यांनी आपल्या अहिंसा वृत्तीची भूमिका खालील सहा तत्त्वांवर आधारलेली होती – (1) Violence is better than cowardice, भीरुतेपेक्षा हिंसा अधिक चांगली. (2) Cowardice is wholly inconsistant with non–violence, कातरता अहिंसेशी पूर्णपणे विसंगत आहे. (3) Violence is any day preferable to impotence क्लैब्यापेक्षा हिंसा केव्हाही श्रेष्ठ असते, (4) Far better than cowardice would be meeting one's death fighting लढता लढता मृत्यू येणे भीरुतेपेक्षा अधिक उत्तम असते. (5) The coward desires revenge, but being afraid to die, he looks to others, may be the government of the day, to do the work of defence for him. भ्याडाला मृत्यूची भीती वाटते म्हणून तो आपला सूड उगविण्याकरिता आणि आपल्या संरक्षणाकरिता दुसऱ्याच्या–प्रस्थापित प्रशासनाच्या तोंडाकडे पाहतो. (6) A coward is less than a man, भित्रा मानवापेक्षा हीन असतो.

भारत स्वतंत्र होताच पाकिस्तानाने कोणचेही कारण नसता जेव्हा भारतावर आक्रमण केले तेव्हा, गांधीजींनी पाकिस्तानाला स्पष्टपणे सुनावले होते, " If there as no other way of securing justice from Pakistan, if Pakistan persistantly refused to see its proved error and continued to minimize it, the Indian Union Government have to go to war against it." पाकिस्तानापासून न्याय मिळण्याचा दुसरा मार्ग नसला, आपला शाबित झालेला अपराध मान्य न करणे पाकिस्तानने चालू ठेवले, त्याचे गांभीर्य कमी करीत राहणे चालू ठेवले, तर भारत सरकारला त्याच्याशी युद्ध करावे लागेल. शेवटी संरक्षणाकरिता युद्ध करण्याची आवश्यकता शांतिब्रह्म अहिंसाव्रती **गांधीजीं**नाही पटली; हे सर्व शांततावाद्यांना दुसरा गाल पुढे करण्यास सांगणाऱ्या अविवेकी अतिरेकी अहिंसावाद्यांनाही पटावे !

प्रतिबंध (Prevention), परावृत्ती (Deterence) आणि प्रतिकार (Resistance) ही संरक्षणाची तीन मूलतत्त्वे आहेत. प्रतिबंध हे प्रारंभीचे दुर्बल तत्त्व आहे. ते ढालीसारखे समोर उभे करण्यानेच केवळ संरक्षण होऊ शकत नाही. शत्रूच्या आघातांनी ही ढाल छिन्नविछिन्न होत असते. एकटी ढाल काहीच करू शकत नाही. तिला तलवारीची साथ मिळाल्याने तिची उपयुक्तता वाढते. प्रतिबंधाला परावृत्तीच्या सामर्थ्याची साथीदारी असावी लागते आणि तिच्यामुळे प्रतिकार सुलभ, तसाच प्रभावी होऊ शकतो. आक्रमणाचा प्रतिकार करणाऱ्याचा हेतू आक्रमकाचा नाश करणे हा नसून, प्रथमतः आणि मुख्यत्वेकरून आत्मरक्षण हा असतो. आत्मरक्षण म्हणजे सुरक्षित–जीवनाची शाश्वती आणि निश्चिती साध्य

करणे, मनगटाला मनगट भिडविण्याची तयारी म्हणजे संरक्षणाविषयी ' सावध पण. ' परावृत्ती उत्पन्न करू शकणाऱ्या शक्तीच्या अभावी, संरक्षण अशक्य होते. केवळ बचावाच्याच धोरणाने परावृत्ती निर्माण करता येत नाही. " ठहरो ! नहीं तो..." एवढ्याच दरडावणीने कोणी थांबत नसते. "नहीं तो क्या नतीजा होगा ?" याची वास्तव जाणीवच ' ठहरो ! नहीं तो ' या धमकीला अर्थ मिळवून देते. नहीं तो क्या ? याचे स्वच्छ उत्तर आक्रमकाला प्रतीत होण्यावरच संरक्षण अवलंबून असते. **जॉर्ज वाशिंग्टनने** म्हटले आहे, " If we desire to avoid insult we must be able to repel it. If we desire to secure peace, it must be known that, we are ready at all times for war." अपमान टाळावयाचा असेल तर त्याचे निवारण करण्याचे आपल्यात सामर्थ्य असले पाहिजे. जर आपल्याला शांती सुरक्षित ठेवावयाची असेल तर आपण सर्वकाळ युद्धाला तयार असले पाहिजे आणि आपण तयार आहोत हे जाहीर, सर्वांना पूर्णपणे माहीत असले पाहिजे. **रुडियार्ड किपलिंग** याच्या Arethmitic on the frontier या कवितेत चार अतिशय मार्मिक आणि अर्थपूर्ण ओळी आहेत—

" No proposition Enclid wrote
No formula the text books know
Will turn the bullet from your coat
Or ward the Talwar's downward blow."

युक्लिड या भूमितिशास्त्रज्ञाने मांडलेले एकही प्रमेय किंवा क्रमिक पुस्तकात सांगितलेला एकही सिद्धांत, तुमच्या अंगावर सोडलेली बंदुकीची गोळी परतवू शकत नाही किंवा तलवारीचा घाव चुकवू शकत नाही. निष्कर्ष हाच की संरक्षणासाठी परावृत्तीचे सामर्थ्य (Power of Deterence) संपादन केले पाहिजे आणि प्रतिकाराला (Resistance) सदैव तयार असले पाहिजे.

युद्धाच्या आक्रमण (Attack), बचाव (Defence) आणि यथास्थिती (जैसे थे) (Status Quo) या तीन अवस्था असतात. त्यातील आक्रमण आणि बचाव यांचे निरनिराळे डावपेच आणि पवित्रे असतात आणि प्रसंगानुरूप ते ते पवित्रे घ्यावे लागतात. या दोन्ही अवस्था कृतिशील असतात. तिसरी ' यथास्थिती ' या अवस्थेत, कोणतेही पवित्रे नसतात आणि ही अवस्था कृतिशून्य असते. जे जे होईल ते ते निमूटपणे पाहणे, याशिवाय या तिसऱ्या अवस्थेत काहीच नसते. त्यातही नुसते पाहूनच पुरे होत नाही. जे जे होईल ते ते नुसते हात चोळीत बसून **भोगावे** लागते. आत्मरक्षणाकरिता ' यथास्थिती ' ही अवस्था सर्वस्वी निरुपयोगी असते.

आक्रमण आणि संरक्षण या दोन्ही अवस्थांचा परस्परांशी निकट संबंध असतो. त्या परस्परावर परिणाम करतात. जर्मन युद्धशास्त्रज्ञ **क्लॉझवित्झ** म्हणतो " The reciprocal relationship between attack and defence is

the culminating point War." आक्रमण आणि संरक्षण यांच्या परस्पर संबंधांचा परमोच्च बिंदू म्हणजे युद्ध. तो पुढे म्हणतो. " Attack weakens as it progresses " प्रगतीबरोबरच आक्रमण कमजोर होत जाते. कारण ज्या ताकदीने एकवटून पहिला प्रहार केला जातो, ती ताकद शेवटपर्यंत जशीची तशीच टिकून राहत नाही. ताणलेले स्नायू नेहमीच ताणलेले राहू शकत नाहीत. ते थकतात, ढिले पडतात. तसेच मनाच्या तणावाचे, उत्कट स्थितीचेही होते. बेसावध शत्रूवरचा पहिला साधारण प्रहारही जोरदार ठरू शकतो. परंतु तो जोर ढिला पडला, तो क्षण निघून गेला, की संरक्षणात्मक प्रतिकाराला बळ चढू शकते. त्याचा आक्रमकावर परिणाम होतो. त्याचे प्रहार क्षीण होतात. या उलट " Defence is the stronger force with more negative aim," असे **क्लॉझविट्झ** सांगतो. संरक्षणाचे उद्दिष्ट नकारात्मक असते. त्यामुळे त्याच्या प्रक्रियेत शक्तीचा अपव्यय होत नाही आणि म्हणून प्रतिकार अधिक तीव्र, अधिक निकराचा होऊ शकतो. आक्रमणापेक्षा संरक्षण अधिक कठीण असते. " Invincibility lies in defence, possibility in attack." संरक्षणाच्या अवस्थेत अजिक्य ठरणे अधिक संभवते. आक्रमणात यशाची शक्यता असते. हे काहीही असले तरी दोन्हीही अवस्थांत सारखाच धोका असतो.

राष्ट्राचे संरक्षण म्हणजे त्याच्या व्यक्त–अव्यक्त सुप्त, शक्य सर्वांगीण सामर्थ्याची सुसूत्र आणि कार्यक्षम जुळणी, जोडणी, संघटन आणि नियोजन करून; देशाच्या सीमा बाहेरून होणाऱ्या प्रत्येक अहितकारी आणि संशयास्पद हालचालींचा निकराचा प्रतिकार. तसेच देशांतर्गत विध्वंसक उपद्रवी, आचारविचार, उच्चार आणि प्रवृत्ती यांचे दमन आणि पूर्ण निर्दाळण करून देशात सुरक्षिततेची खात्री, विकास आणि प्रगती यांची शाश्वती आणि वैचारिक, भावनिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन. संरक्षण या फक्त चारच अक्षरांच्या शब्दात इतका गंभीर आणि व्यापक अर्थ भरलेला आहे.

संरक्षणाची तीन क्षेत्रे आणि तीन कर्तव्य असतात. (१) **बाहेरच्या** उघड, छुप्या, संशयास्पद, शक्य, संभाव्य शत्रू, संशयित, मित्र आणि काही विशिष्ट परिस्थिती, तथाकथित तटस्थ यांच्याशी झुंज देणे आणि ती झुंज यशस्वी आणि दीर्घ परिणामी व्हावी म्हणून राष्ट्राच्या सर्व शक्तीचा विकास, संचय आणि योजनाबद्ध उपयोग. (२) **अंतर्गत** सुरक्षितता, शांती, स्वास्थ्य, प्रगती, निरामय जीवन यांना बाधा उत्पन्न करणाऱ्या, अस्तित्वात असलेल्या आणि संभाव्य अशा सर्व आचार, विचार आणि विकृती यांचे निर्बीजीकरण. (३) **आंतरराष्ट्रीय** प्रांगणात स्वराष्ट्राच्या निर्भय, सामर्थ्यसंपन्न निर्लेप प्रतिमेची स्थापना.

संरक्षणाचा हेतू विघटन–विनाश नसून मानवाचे यशोमंदिर उभारणे आणि त्या मंदिरात स्वराष्ट्राचे स्वतंत्र स्थान सुप्रतिष्ठित आणि सुरक्षित राखणे हा असतो

या तीन कर्तव्यांपैकी पहिल्या कर्तव्याला अग्रक्रम देणे, त्याकरिता सर्व शक्तीचा समन्वय करणे आणि वाटेल त्या प्रसंगाला यशस्वी प्रतिकार करण्यास सज्ज असणे–अग्रक्रम देणे, हे प्रत्येक स्वतंत्र देशाच्या प्रशासनाचे आणि लोकांचे कर्तव्य असते. " Being before welbeing " कल्याणकारी जीवनापेक्षा अस्तित्व अधिक महत्त्वाचे असते. प्रेताला श्रृंगार चढवल्याने प्राण परत आणता येत नाहीत. केव्हा, कोठून, कोणाकडून, कसे आक्रमण होईल, कशी चिंताग्रस्त परिस्थिती निर्माण होऊ शकेल, हे हेरणे सोपे नसते. आपले प्रभुत्व आणि अधिकार दुसऱ्या देशावर लादू पाहणारे, परंतु वरून साळसूदपणाचे पांघरूण घेतलेले देश, असुरक्षित किंवा अल्प सुरक्षित तसेच स्वतःच्या विशिष्ट स्थानाच्या कल्पना–साम्राज्यातच दंग असलेल्या देशावर, झडप घालण्यास टपून बसलेले असतात. आंतरराष्ट्रीय संबंधात मैत्रीसारखा फसवा, धोकेबाज असा दुसरा शब्द नाही.

देशांच्या सामरिक सामर्थ्यातली विषमता, युद्धाची शक्यता आणि धोका निर्माण करते. अधिक बलवान देश धमकीने, सामर्थ्याच्या प्रदर्शनाने आणि जरूर पडल्यास बलप्रयोगाने आपली राजकीय उद्दिष्टे साध्य करून घेतो. आपले राजकीय हित सुरक्षित राखतो. म्हणून सामर्थ्याची, विशेषेकरून सामरिक सामर्थ्याची स्पर्धा सुरू झाली आहे. या स्पर्धेचा हेतू आपला दबाव आणि प्रभाव निर्माण करणे हा असतो. ही ' भोज्य ' नसलेली–Winning Post यशाचा बिंदू नसलेली शर्यत आहे. शक्तीला मर्यादा नाही. अंत नाही आणि पूर्णविरामही नाही.

युद्धाचे यश देशातील एकजूट, साधनसमृद्धी, त्याग, अनुशासन, श्रद्धा, निर्धार इत्यादी अनेक गोष्टींवर अवलंबून असते. " War is much too serious a business to be left to the Generals alone." युद्ध हे फक्त एकट्या सेनापतीवर सोपविल्या जाण्यापेक्षा किती तरी अधिक गंभीर असते असे **क्लेमेंको** म्हणतो. युद्ध हा देशातील सर्व नागरिकांचा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा विषय असतो.

युद्ध हे सामूहिक साहस असल्या कारणाने ते यशस्वी करण्याकरिता सबंध देशाची एकवटलेली प्रेरणा, निर्धार आणि युयुत्सुवृत्ती त्यात ओतली गेली पाहिजे. प्रत्येक युद्धाला देशाचे आर्थिक, तांत्रिक, वैज्ञानिक सामर्थ्य, देशाचे सर्व मनुष्यबळ आणि सर्वंकष युद्धप्रयत्न या राष्ट्रीय शक्तीचा अखंड जोपासना केली गेली पाहिजे.

हे सर्व एका भीषण संहारकारी व्यक्तीत रूपांतरित होते आणि हीच शक्ती देशाच्या स्वातंत्र्याचे आणि स्वाभिमानाचे रक्षण करू शकते. असे सामर्थ्य ज्या देशाजवळ जितके अधिक, तितका तो देश शांतीचा खरा रक्षणकर्ता ठरू शकतो. युद्ध, शांती आणि राजकारण यांचा वेगवेगळा विचार करता येत नाही. युद्धाचे हेतू, साहित्य, योजना आणि नियंत्रण हा राजकारणाचा प्रांत असतो. शांती हवी असेल तर युद्ध समजून घेतले पाहिजे. युद्ध बंद होण्याकरिताच युद्धे होतात (War to

end War). मानवाच्या भांडकुदळपणाला भांडण हेच औषध म्हणजे विषाचा उतार विषच ! या सर्व जंजाळाला कंटाळून जाऊन **आन्द्रे बीन फ्रे** Introduction to strategy या ग्रंथात म्हणतो " War on the grand scale, and peace in its true sense may be buried side by side." मोठे युद्ध आणि खरी शांती यांचे शेजारी शेजारी दफन केले जावे. हा लेखक मोठ्या महायुद्धाविषयीच असे वैतागाने म्हणतो. युद्धाचे लहान, मोठे, रूढ, विशिष्ट, स्थानिक, सीमित, गनिमी, मैदानी इत्यादी प्रकार आणि पद्धती आहेत. शांतीचे तसे नाही. तिचे स्वरूप आणि परिणाम यांच्यात कधीच बदल होत नाही.

लाईड मलान हा लेखक शांतीला तिधारी तलवार म्हणतो. त्याने ' Peace is a three edged sword ' या ग्रंथात तलवारीच्या एका धारेला देशाच्या संरक्षणाची योजना हे नाव दिले आहे. दुसऱ्या धारेला युद्ध हे नाव दिले आहे. आणि या दोन्हीच्या मधल्या धारेला तो शांती हे नाव देतो. शांतीच्या एका बाजूला आक्रमण आणि दुसऱ्या बाजूला संरक्षण ही त्याची मांडणी अतिशय मार्मिक आहे. शांतीलाही धार आहेच. शांतीलाही आत्मसंरक्षण करावे लागते.

आंतरराष्ट्रीय सुरक्षितता म्हणजे शांती, ही एक निसटती पळपुटी संकल्पना आहे. चालू परिस्थितीत शांत सहजीवन की अण्वस्त्रादिकांच्या उपयोगाने सर्वंकष संहार या दोनच स्थिती उपलब्ध आहेत. संहाराची शक्यता आणि तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न, हेच शांती प्रस्थापित करण्याचे प्रयत्न. विनाशाचे प्रमाण जितके कमी, तितकी शांतीची शक्यता अधिक. युद्धे चालू नसली, प्रत्यक्ष हाणामारी गोळा-गोळी होत नसली तरी, तणावाची परिस्थिती कायम असणाऱ्या दोन युद्धांच्या मध्यंतराला शांती म्हणता येणार नाही. म्हणून प्रत्येक राष्ट्र संशयी बनते आणि अनपेक्षिताचा मुकाबला करण्याकरिता सज्ज राहण्याचा प्रयत्न करते. या स्थितीला धड युद्ध नाही आणि धड शांतीही नाही, No War No Peace हेच एक नाव द्यावे लागते. युद्ध ही अस्मानी आफत नसून इन्सानी करामत आहे. लोक, मुत्सद्दी, राज्यकर्ते यांनी केलेल्या, करावयास नको होत्या अशा, बऱ्या वाईट कृतींमुळे युद्धाचे प्रसंग निर्माण होतात. सेनापती आणि सैनिक युद्धे कधीच घडवीत नाहीत आणि ओढवूनही आणत नाहीत. [आधुनिक काळात सेनापतीला राजकारणात (अंतर्गत अथवा आंतरराष्ट्रीय) काहीही स्थान नसते.] ते फक्त देशाच्या प्रशासनाने जाहीर केलेली युद्धे लढतात आणि त्यांच्याच हुकुमाने आपल्या तलवारी निमूटपणे म्यान करतात. कोणत्याही परिस्थितीतल्या युद्धाला विरोध करणाऱ्यांना, त्यांचे व्यावहारिक महत्त्व आणि परिणाम न समजून घेणाऱ्यांना, युद्धाच्या अनर्थाची प्रसादचिन्हेदेखील ओळखता येत नाहीत. ते स्वतः तर देशाच्या युद्धप्रयत्नाविषयी उदासीन असतातच परंतु लोकांनाही बेसावध बनवीत असतात. परंतु काही जरी झाले तरी "युद्ध हे राष्ट्राच्या जीवनातील एक नित्यकर्म आहे," हा **बाल्डविनचा**

निष्कर्ष अविवाद्य आहे. युद्ध कधीही करावे लागले नाही असा जगात एकही देश नाही. राज्ये–राष्ट्रे युद्धातूनच निर्माण होत असतात आणि युद्धामुळेच जिवंत राहू शकतात.

युद्ध म्हणजे फक्त आक्रमण–हमला नव्हे. युद्धातला मुख्य महत्त्वाचा आणि कठीण भाग संरक्षण हा आहे. क्षणिक प्रक्षोभ, उत्तेजित भावना किंवा अविचार आक्रमणाला प्रवृत्त करतो. परंतु संरक्षणाला चित्ताची शांती, कृत्यांचा विवेक, योजनांची दूरदृष्टी, धैर्याची कसोटी, निर्धाराची चिकाटी इत्यादी गुणांची आवश्यकता असते. संरक्षण करीत असताना " Last round last man " शेवटची गोळी आणि शेवटचा सैनिक इतक्या निकराने लढावे लागते. संरक्षण हा युद्धातला धीर गंभीर पवित्रा असतो. तो समजायला कठीण असतो. सुसंरक्षित देशातच शांती नांदण्याची शक्यता असते.

सर्वसाधारणपणे लोकांचा असा समज आहे की, देशाचे संरक्षण करणे म्हणजे आपल्या सरहद्दीवर ठिकठिकाणी चौक्या पहारे बसविणे, मोर्चे उभे करणे आणि गस्त घालणे आणि त्यांच्या जवळपास सैन्य पसरवून ठेवणं (Deploy). या सीमांवरील सैनिकांनी कोणालाही सीमांचे उल्लंघन करू दिले नाही म्हणजे देशाचे संरक्षण झाले. या बंदोबस्ताने देशाचे संरक्षण होणार नाही आणि कोणताही आक्रमक परावृत्त होणार नाही. अशा नाममात्र बचावाच्या व्यवस्थेनेच नव्हे तर सीमेंट कांक्रीटच्या अभेद्य तटबंदीनेही देशाचे संरक्षण होऊ शकत नाही. पहिल्या महायुद्धानंतर फ्रान्सने जर्मनीसमोर सरहद्दीवर 'मॅजिनो लाईन' नावाची भरभक्कम तटबंदी उभारून, तिच्यावर जागोजागी लांब पल्ल्याच्या भारी तोफा बसविल्या होत्या. परंतु दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा, ही तटबंदी आणि तोफा जागच्या जागीच मुकाट उभ्या होत्या. अनपेक्षित दिशेने जर्मनी फ्रान्समध्ये घुसला. आता तर वायुसेनेच्या आगमनाने कोणत्याही अशा तटबंदीला अर्थच उरलेला नाही.

कायदेशीर (Legal), राजकीय (Political), भौगोलिक (Geographical), नैसर्गिक (Natural) अशा सरहद्दी असतात. कायदेशीर–राजकीय सरहद्दी, परंपरा, वहिवाट, तह, करार इत्यादींनी मुक्रर केल्या जात असतात आणि त्या नकाशावर–रेखांकित केल्या जातात. भौगोलिक किंवा नैसर्गिक सीमा जर संबंधित देशांनी मान्य केल्या असल्या तर त्याही नकाशात दाखविलेल्या असतात. त्याशिवाय सुरक्षिततेच्या रेषा Security Lines आणि Boundary Areas–सीमावर्ती प्रदेश हेही सीमांकनाचे प्रकार असतात. परंतु ते नकाशावर दाखविले जात नसतात. हे प्रकार मनातल्या मनात निश्चित करावयाचे असतात आणि ते आपल्या देशाच्या आत, आपल्या भूमीवर असतात. सीमांचा आणखी एक प्रकार असतो. त्यांना 'नाजूक सीमा' Critical Boundaries म्हणतात. या, ही मनोमन ठरविल्या जात

असतात. आणि त्या गुप्त असतात. विशेष गोष्ट ही की, त्या आपल्या कायदेशीर राजकीय सीमांच्या पलीकडे दुसऱ्या देशाच्या भूमीवर योजलेल्या असतात. यांना Significant Boundaries असेही म्हणतात.

या सीमा (मनातल्या मनात) ठरविणे हा युद्धशास्त्राचा विषय आहे. यांचा हेतू शत्रूला किती दूर, त्याच्याच प्रदेशात, थोपवून धरणे, आपल्या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने हितावह आहे (लष्करी हालचाली आणि डावपेचांच्या दृष्टीने); हे ठरविणे हा असतो. आपल्या भूमीवर शक्य तोपर्यंत लढाई करू नये, हे युद्धशास्त्राचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. ते श्रीसमर्थ रामदासांनी अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. ते म्हणतात, "युद्ध करावे खणखणाटे। सीमा सांडोनी।" "Great Brittain was defended on every other soil but their own." दुसऱ्यांच्या भूमीवर लढूनच ब्रिटिशांचे संरक्षण झालेले आहे असा इंग्रजांना अभिमान आहे आणि तो खरा आहे. ब्रिटिश भूमीला या क्षणापर्यंत परक्यांचा पाय लागलेला नाही. दुसऱ्या महायुद्धात खुद्द राजधानी लंडनवर जर्मनी विमानातून एकसारखी आग ओकीत होता तरी, एकही जर्मन, ब्रिटिश भूमीवर उतरू शकला नाही. ब्रिटिश–जर्मन–हवाई युद्धात शेवटी जर्मनीचा पराभव झाला.

देशांच्या सीमांचे असे प्रकार असले तरी नकाशात दाखविलेल्या सीमांच्या उल्लंघनालाच आक्रमण म्हटले जाते आणि तेथेच देशाचे संरक्षण सुरू होते. लार्ड कर्झन म्हणतो "frontiers are indeed a razor edge on which are suspended the mortal issues of peace and war." देशांच्या (कायदेशीर राजकीय) सीमा क्षुरधारेसारख्या तीक्ष्ण आणि सूक्ष्म असतात आणि त्यांच्यावरच शांती की युद्ध ? हे जीवघेणे प्रश्न टांगलेले असतात. हे शंभर टक्के सत्य आहे. कारण " Border disputes and Territorial integrity are the real basis of violence " (Gavin Kennedy–' The military in the Third Worl'd) सीमा-विवाद आणि प्रादेशिक अभंगत्व हेच हिंसेचे (युद्धाचे) खरे आधार (कारणे) असतात. **वाल्टर लिपमन** म्हणतो, "Every treaty or aggreement which purports to settle a mortal conflict is essentially a map." प्रत्येक अटीतटीच्या संघर्षाचा उपशम नकाशा करीत असतो. म्हणूनच चीनने आपल्याला हवे होते तसे नकाशे आधी तयार केले; आणि नंतर भारताने चीनचा प्रदेश बेकायदा बळकावला असल्याचा दावा मांडला आणि भारतावर भयंकर मोठा हल्ला चढवला.

संरक्षणाचा समानार्थी सुरक्षितता (Security) हा एक शब्द आहे. परंतु त्या शब्दाच्या उपयोगात आणि काही प्रमाणात अर्थातही फरक आहे. संरक्षण (Defence) हा शब्द देशाबाहेरून परदेशीयांकडून होणाऱ्या आक्रमणांच्या संदर्भात वापरला जातो. सुरक्षितता (Security) हा शब्द देशांतर्गत शांती,

सुव्यवस्था, कायदा आणि गुप्तता इत्यादींच्याबाबतीत वापरला जातो. संरक्षणाची साधारण कल्पना जरी ढोबळपणे करता आली तरी सुरक्षिततेची जाणीव आणि आवश्यकता सहजपणे प्रतीत होत नाही. कारण सुरक्षिततेचा भंग प्रत्यक्षपणे जाणवत नाही. ही ' घरची आघाडी ' मजबूत असली तर, दारची आघाडी झुंजविणे सोपे जाते.

घरची आघाडी दुर्बल होण्याच्या प्रक्रियेत उघड शत्रूचा आणि आपमतलबी, गुप्त महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या सोज्जवळ तथाकथित ' मित्र ' म्हणविणाऱ्यांचाही हात असतो. परकीयांकडून देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला धोका उत्पन्न होण्याचे प्रयत्न केले जात असतात. तसेच देशाच्या गुप्त, गोपनीय, प्रतिबंधित, वर्गीकृत इत्यादी संज्ञांनी नामांकित केल्या गेलेल्या माहितीचा आणि परिस्थितीचा वेध घेण्याची, नाना प्रकारे पराकाष्ठा केली जात असते. किल्लीच्या छिद्रातून पलीकडील बंद दालनातील ' हाल ' पाहणे एवढीच फाजील जिज्ञासा त्यात नसते. या प्रयत्नात अनेक प्रकारची हेरगिरी आणि फितुरी वापरली जात असते. अफवा पसरविणे, दहशत उत्पन्न करणे, विध्वंसक आणि हिंसक कृत्ये करणे, राजकारणात शिरून अराजक निर्माण करणे, इत्यादी प्रकारांनी देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला शत्रूकडून धक्का लावण्याचे प्रयत्न केले जात असतात. या हिंसक प्रकारांव्यतिरिक्त ' थंडे युद्ध ' हा आर्थिक आणि औद्योगिक आघाड्यावर आक्रमणे करण्याचा एक युद्ध–प्रकार आहे. या युद्धाविरुद्धही देशाला संरक्षणाची फळी उभारावी लागत असते.

सुरक्षितता ही एक प्रभावशाली राष्ट्रीय भावना असते. तिचा प्रभाव राष्ट्राच्या मनोधैर्यावर पडत असतो. तो अंतर्गत सुखसमृद्धी, प्रगती, विकास, शांती, अनुशासन इत्यादींवरही परिणाम करीत असतो. अंतर्गत असुरक्षितता संरक्षणाला बाधक होत असते; आणि भयंकर ठरू शकते. देशाच्या संरक्षणाला सुरक्षिततेची साथ असली पाहिजे.

संरक्षणाकरिता करावा लागणारा सशस्त्र संघर्ष, हा फक्त राज्याच्या प्रशासनाचा आणि सेनादलांचा प्रांत नसून तो प्रत्येक नागरिकाचा प्रत्येक बाबतीतला ' धर्म ' आहे. संरक्षणाच्या प्रयत्नांना प्रत्येक नागरिकाचा जीवाभावाचा सक्रिय पाठपुरावा असला पाहिजे. आणि राज्यकर्त्यांनीही लोकांना विश्वासात घेतले पाहिजे. नुसत्या ' सबकुछ ठीक ' असल्याच्या घोषणा, अतिशयोक्ती किंवा दर्पोक्ती, फसव्या ठरू शकतात. परस्पर विश्वासाचे वातावरण नागरिकांच्या स्वेच्छेच्या परम त्यागाला उत्तेजित करते. या परिस्थितीत युद्धप्रयत्नाचा प्रचार करावयाची जरूर पडू नये ! स्वतंत्र भारताच्या आतापर्यंतच्या सर्व युद्धांत प्रत्येक वेळा राज्यकर्त्यांनी अहिंसेच्या तत्त्वज्ञानाने भारून गेलेल्या भोळ्या जनतेला पूर्णपणे विश्वासात घेतले होते, असे म्हणता येत नाही. अनेक बाबतीतले निर्णय

व्यक्तींनीच सहकारी मंत्र्याशी विचार–विनिमय न करता घेतले होते काय ? अशा शंकांना जागा आहे. भारताची ही एक महत्त्वाची ' व्यथा ' आहे.

लोकशाहीत राज्यकर्ते लोकनियुक्त असतात. परंतु सेनापती कोठेही लोक–नियुक्त नसतात. पण रणकारण हा सैनिकाचा विषय असतो. भारताची सेनादले स्वयंसेवकांची आहेत. प्राचीन काळापासूनची ही भारतीय परंपरा आहे. चालू घटकेला भारत वगळून बहुतेक देशांत आणि विशेषत: बड्या देशांत, विशिष्ट काल-मर्यादेची सक्तीची सैनिकी सेवा आहे. (ब्रिटिश कालातल्या भारतीय सेनादलांना The largest Volunteer Army in the world असे बहुमानपूर्वक संबोध-ण्यात आले होते. तो बहुमान आजही कायम आहे.) सैनिकी सेवा सक्तीची नसल्याच्या ब्रिटिशांच्या गर्वाचे हरण दुसऱ्या महायुद्धाचे वेळी झाले.

आंतरराष्ट्रीय राजकारण आणि रणकारण वेगळे करता येत नाही. राज-कारणाचे यश रणकारणावरच अवलंबून असते. असे असुनसुद्धा राजकारणाचे विधाते–राज्यकर्ते रणकारणाला दासी बटकीसारखी वागणूक देतात. हाही एक भारतीय विशेष आहे. सर्व क्षेत्रांतले सर्व प्रकारचे राजकारण आपल्याला चांगले (च) समजते, असा (गैर) समज पोराटोरांपासून आणि गल्ली बोळांपासून ते पुढारी, लोकनेते, आचार्य आणि आश्रम व दिल्लीपर्यंत सर्वांचा झालेला आहे. गल्ली ते दिल्ली असा राजकारणाच्या दिंड्यांचा अखंड प्रवाह सुरू झाल्या कार-णाने रणकारणाकडे–देशाच्या संरक्षणाकडे लक्ष देण्यास, त्यात ' रस ' घेण्यास कोणास सवड नाही. रणकारण म्हणजे हिंसा–पाप या समजुतीमुळे भले भलेही त्याला अस्पृश्य समजतात. भारतात कोणीही अस्पृश्य समजला जाऊ नये ही गांधीजींचीच शिकवण आहे. त्यांनी युद्धाला अस्पृश्य मानले नव्हते आणि पापही म्हटले नव्हते. त्यांनी पाकिस्तानला निर्वाणीचे युद्धाचे बोल सुनावले होते. (ते वर दिले आहेत) भारतीय नागरिकांना युद्धाचे गांभीर्य आणि संरक्षणाचे महत्त्व अजूनही समजलेले नाही ही एक काळजी करण्यासारखी **व्यथा** आहे.

" हे शुद्ध का, आणि ते अशुद्ध का, हे व्याकरण शिकल्याने समजते " असा दादोबा पांडुरंग या मराठीच्या ज्येष्ठ व्याकरणशास्त्रज्ञाने व्याकरणाचा उपयोग सांगितला आहे. भाषेला व्याकरण असणे हे तिच्या परिपक्वतेचे लक्षण आहे. बोली भाषांना व्याकरण नसते. म्हणजे त्या भाषा नियमबद्ध नसतात. अशा भाषांतील शब्दांचे अर्थही सुनिश्चित नसतात आणि त्यांचा परस्परसंबंध स्पष्ट नसतो. अशा भाषांतील अभिव्यक्तीला मर्यादा पडतात. त्यामुळे सूक्ष्म अर्थबोध होऊ शकत नाही. अशा व्याकरण नसलेल्या भाषांत क्रियावाचक शब्द–क्रियापदेही फारच कमी असतात. प्रगल्भ भाषांना व्याकरण असून शिवाय त्या भाषांतील वाक्यांच्या शब्दांना त्यांच्या जाती किंवा प्रकारानुसार एक अनुक्रम असतो. हे अनुक्रमाचे बंधन कवी आणि संस्कृत भाषा पाळीत नाहीत. मराठी (गद्य) भाषेत कर्ता, कर्म

क्रियापद हा अनुक्रम आहे. त्याशिवाय सकर्मक आणि अकर्मक असे क्रियापदांचे दोन प्रकार आहेत.

आक्रमण आणि संरक्षण हे दोन्ही शब्द क्रियावाचक आहेत आणि त्यांची क्रियापदे सकर्मक आहेत. या दोन्ही क्रियांत एक शास्त्रीय अनुभव सिद्ध असा अनुक्रम आहे. आक्रमण आणि संरक्षण या क्रिया-प्रतिक्रिया आहेत. त्या दोन्हीच्या संगमाला युद्ध हे नाव आहे. व्याकरण हे जसे शास्त्र आहे तसेच युद्ध हेही शास्त्र आहे. आधी क्रियाप्रक्रिया होतात आणि मागून त्यांचे शास्त्र तयार होत असते. युद्धशास्त्रही तसेच तयार झाले. आधी मारामाऱ्या सुरू झाल्या, त्या प्रथम निःशस्त्र होत्या. मानवाच्या उत्क्रांतीबरोबरच त्याच्या साधनसंपत्तीत भर पडत गेली तशीच ती त्याच्या मारामारीच्या साधनांतही पडत गेली. आज मानवाने अणुपरमाणू परस्परांवर सोडण्यापर्यंत, प्रक्षेपित करण्यापर्यंत मजल गाठलेली आहे. मंत्रसामर्थ्य जर खरे असेल तर, प्राचीन भारतीयांची अस्त्रयुद्धे मान्य करावी लागतील.

युद्धशास्त्र एकटे स्वतंत्रपणे विकसित होत गेले नाही. ते राज्यशास्त्राचे साधन किंवा पूरक म्हणून विकसित होत गेले. राज्यशास्त्र आणि युद्धशास्त्र यांची युती कृत्रिम नाही. ती मानवस्वभावधर्मानुसार आहे. व्यक्ती, समाज आणि राज्य या तिन्ही अवस्थांशी म्हणजे मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्याशी युद्धशास्त्राचा निकट संबंध आहे. म्हणूनच **क्लॉझवित्झ** म्हणतो, " **War belongs to the province of social life, it is part of the inter course of human life "..." War is a social necessity."** मानवाच्या व्यक्तिगत, सामाजिक आणि राजकीय तसेच सांस्कृतिक जीवनात युद्ध अटळ आहे.

राज्यशास्त्राला व्याकरण आहे तसेच युद्ध शास्त्रालाही व्याकरण आहे. **हॅरोल्ड लास्की** याने राज्यशास्त्रावरील एका ग्रंथाला **Grammer of Politics** 'राज्यशास्त्राचे व्याकरण' हे नाव दिलेले आहे. या ग्रंथात एके ठिकाणी तो म्हणतो, **" The only way to do things for the people is to make them do things themselves."** लोकांच्याकरिता (प्रशासनाने) काही करावयाचा एकच मार्ग आहे आणि तो लोकांनाच करायला लावणे हा आहे. देशाचे संरक्षण करणे हे प्रशासनाचे काम असले तरी ते लोकांचे कर्तव्य आहे. संरक्षणाच्या बाबतीतली कर्तव्यनिष्ठा आपणा भारतीयांत उत्पन्न झालेली नाही ही संरक्षणाची **एक व्यथा** आहे. त्याच ग्रंथात एके ठिकाणी लास्कीने **लॉर्ड ग्रेचे** एक वाक्य उद्धृत केले आहे. **" Inter course of nations can not be strictly regulated by the rules of morality."** आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियंत्रण नीतिनियमानुसार काटेकोरपणाने करता येत नाही. कारण त्या संबंधातून उद्भवणारे प्रत्येक युद्ध न्याय्य असतेच असे नाही. **आक्रमणापेक्षा संरक्षण अधिक न्याय्य असते.**

" War has no logic " युद्धाला तर्कशास्त्राचा आधार नाही असे एका

अतिरेकी शांततावादी विचारवंताने एके ठिकाणी म्हटले आहे. परंतु ते बरोबर नाही. राज्यशास्त्राविषयी तो असे विधान करीत नाही. युद्धशास्त्र आणि राज्यशास्त्र वेगळी करता येत नाहीत. युद्धशास्त्र हा राज्यशास्त्राचा (निर्वाणीचा) क्रियाशील भाग आहे. असे असताना, एकाच भागाला तर्कशास्त्राचा आधार मान्य करणे आणि दुसऱ्या जुळ्या प्राणभूत भागाला तो अमान्य करणे हेच तर्कसंगत नाही. युद्धशास्त्राला व्याकरण तर आहेच त्याशिवाय तर्कशास्त्र ही (Logic) आहे. युद्ध हे जसे शास्त्र आहे तसेच ते कलाही आहे. काही एका मर्यादित आणि अवस्थेत ते कला ठरते.

'रणकारणात आणि प्रेमप्रकरणात सर्व काही उचित असते' असे म्हटले जाते. रणकारण राष्ट्रप्रेमातून निर्माण होते. प्रेमप्रकरणासारखेच राष्ट्रप्रेम भावनाविवश असते. प्रेमप्रकरणाला तर्कशास्त्र लागू पडो अथवा न पडो ! (कारण प्रेम आंधळे असते असे म्हणतात.) परंतु रणकारण तर्कसंगत असते. आक्रमण कदाचित आंधळे असू शकेल. परंतु संरक्षण डोळसच असते, असले पाहिजे. दुर्दैवाने आतापर्यंतचे भारताचे संरक्षण डोळसपणाने झाले नाही.

□□

३

संरक्षणाचा अधिकार आणि भार

कोणी म्हणतात मनुष्यानेच ईश्वर निर्माण केला. (Man made God.) ख्रिस्ती लोक एक ईश्वराचे राज्य (The kingdom of God) मानतात. हिंदू लोकही एक परलोकातले राज्य मानतात. परंतु तेथला राजा ईश्वर नसून इंद्र समजला जातो. इंद्राला वैदिक आर्य जरी देव म्हणत असले तरी, तो ईश्वर नव्हे. मानवाने ईश्वर निर्माण केला किंवा ईश्वराने चराचर सृष्टी निर्माण केली या वादात न शिरता पुढचा प्रश्न असा विचारावासा वाटतो की, हे स्वर्गातले राज्य कोणी निर्माण केले ? आणि त्याच्या पुढचा प्रश्न, हे आहे तरी कोठे ? या प्रश्नांची उत्तरे शतपथ ब्राह्मणात सांगितलेल्या मनाचे धर्म अथवा अंतःप्रेरणांपैकी 'श्रद्धा' आणि 'अ-श्रद्धा' या दोन देतात. हा ईश्वर आणि त्याचे राज्य कोणी निर्माण केले आणि ते कोठे आहे, या गोष्टींचा प्रत्यक्ष निर्णय लागला नाही—लावता आला नाही तरी, मानवनिर्मित राजा आणि त्याचे राज्य येथेच जमिनीवरच आहे आणि ते दिसते, अनुभवास येते. मनुष्य तेथे ठेचाळतो किंवा अडथळा न होता सरळ चालू शकतो. येथे श्रद्धा अथवा अ-श्रद्धा यांचा प्रश्नच येत नाही.

ईश्वर जर मानवनिर्मित असेल, तर त्याच्यावर त्याच्या निर्मात्याचे प्रभुत्व, अधिकार असे काही तरी असायला पाहिजे परंतु तसे काहीच अनुभवास येत नाही.

आणि मानव म्हणतो, " आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना." आपणच निर्माण केलेल्या संकल्पनेला आपणच शरण जाण्याची माणसावर लाजिरवाणी वेळ येते. अशा शिरजोर देवाचे हृदयपरिवर्तन करण्याचे, लाचार मानव प्रयत्न करतो आणि त्याने या प्रयत्नांना ' भक्ती ' हे नाव दिले आहे. मनासारखे काही झाले म्हणजे ' देव पावला ' म्हणावयाचे, आणि न झाले तर भक्ती कमी पडली; म्हणून तिचा डोज वाढवावयाचा किंवा अनुपान बदलावयाचे.

ईश्वर मानवनिर्मित आहे असे म्हणणाऱ्यांना निसर्गाशी झुंजावे लागते. (वस्तुतः सर्वांनाच निसर्गाशी टक्कर घ्यावी लागते. कोणी निसर्गालाच ईश्वर म्हणतात.) निसर्गावर जसजशी अधिक हुकुमत मिळवता येते, तसतसा मानव अधिक प्रगत होतो असे म्हणतात. हुकुमतीचे टप्पे–मजला दिसतात, अनुभवास येतात, तसे भक्तीचे काही टप्पे असल्याचे निश्चित सांगता येत नाही. मानव हुकुमत मिळवू पाहतो ती ऐहिक सौख्याकरिता आणि भक्ती करतो ती पारलौकिक सौख्या-करिता. ऐहिक सौख्य उपभोगू इच्छिणाऱ्या मानवाने कुटुंब-समाज इत्यादी आपल्या, सभोवती गोळा करून तो समाजशील प्राणी बनला. भक्ती करणारा समाजात जरी राहत असला तरी तो तसा समाजशील प्राणी नसतो. (अलीकडे एक अखिल भारतीय साधुसमाज स्थापन झालेला आहे.)

मानवाच्या भूतलावरील वाटचालीत विचार, आचार आणि व्यवहार यांना मार्गदर्शक आणि नियामक अशा श्रद्धा, विश्वास आणि दुसरी मूल्ये यांचे दोन स्रोत तयार झाले. एक धर्मसंस्थेत आणि दुसरा राजसंस्थेत परिणत झाला. प्रथम देव उत्पन्न झाला नंतर धर्म निर्माण झाला. त्याचे धर्मशास्त्र तयार झाले. प्रथम राजा–शासक–नेता उत्पन्न झाला नंतर राज्य उत्पन्न झाले. (याबाबतीत मतभेद आहे.) नंतर राज्याचे शास्त्र बनले. भाषा आधी उत्पन्न झाली नंतर व्याकरण तयार झाले. (ज्यांना बोली भाषा म्हणतात त्यांना व्याकरण नसते.)

पारलौकिक सुखाचा मार्ग या अर्थाने धर्म या शब्दाचा व्यवहारात उपयोग केला जातो. वैदिक हिंदू कर्तव्यांनाही धर्मच म्हणतात. मित्राशी, पत्नीशी, पित्याशी, शेजाऱ्याशी ठेवावयाच्या वर्तनाला मित्रधर्म, पत्नीधर्म इत्यादींचे धर्म म्हणतात. ' धर्म सुटला ' याचा अर्थ बंधने ढिली झाली किंवा तुटली, तोडली, असा वैदिक हिंदू करतात. प्राचीन हिंदु-शास्त्रकारांनी राज्यशास्त्राला राजनीती असे म्हटले आहे. राजसत्तेचा मुख्य आधार दण्ड-शक्ती हा आहे. त्या शक्तीच्या अभावी, राजा आपला राज–धर्म पाळू शकत नाही. म्हणून राज्यशास्त्राला दण्ड-नीती असेही म्हटले गेलेले आहे. राज्याचे सुस्थिर आणि सुदृढ आसन अर्थ हे आहे. तांदूळ हे या अर्थाचे प्रतीक आहे. म्हणून ' आसनार्थे अक्षतान् समर्पयामि ' असे आवाहित देवतेला सांगितले जात असते. आधी अक्षतांचे आसन मांडून त्यावर इष्ट देवतेची स्थापना करावयाची असते. कारण " सर्वाऽरंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः " म्हणूनच

चाणक्याने आपल्या राज्यशास्त्राच्या ग्रंथाला अर्थशास्त्र हे नाव दिले आहे. समाजातून राज्य निर्माण झाले. म्हणून राज्य–शास्त्राला नीतिशास्त्र असेही म्हटलेले आहे. सर्वसाधारणपणे नीतिशास्त्र, म्हणजे सदाचारशास्त्र, राजनीतिशास्त्र म्हणजे राजधर्मशास्त्र.

राज्याच्या उत्पत्तीचे अनेक सिद्धांत मांडले गेले आहेत. त्यात सामाजिक करार (Social contract) गरज, धर्म, ईश्वरी वरदान हे मुख्य आहेत. एखाद्या युद्धात एखाद्या व्यक्तीचे धैर्य, शौर्य, नेतृत्व इत्यादी गुण प्रकर्षाने प्रकट झाल्या कारणाने यश मिळते आणि त्या व्यक्तीविषयी लोकांत कौतुक, आदर, विश्वास उत्पन्न होतो. आणि ती व्यक्ती त्या समाजाचा नेता आणि **त्राता** या पदाला पोहोचते. या विभूतिपूजेतून त्या व्यक्तीचे राजेपण निर्माण होऊन, सर्वमान्य होते आणि ती व्यक्ती आपला राजवंश स्थापन करते. ती वंशही ' लोकमान्य ' होतो. कित्येक वेळी एखादी महत्त्वाकांक्षी, स्वयंमन्य, बलदंड व्यक्ती, बळजबरीने राजा बनून आपला राजवंश स्थापन करते. कालांतराने तोही मान्यता पावतो.

राज्याच्या ईश्वरी वरदान सिद्धांतानुसार राजाचे अधिकार ईश्वरी किंवा ईश्वरदत्त (Divine Right of Kings) मानले गेल्या कारणाने, राजाला अप्रमादशीलत्व (The king can do no wrong) आपोआपच प्राप्त होते. (वैदिक हिंदूही राजाला ' विष्णुपद ' देतात. परंतु त्याला हे अप्रमादशीलत्व देत नाहीत.) राजा चूक करू शकत नाही. म्हणजे तो जे काही बरेवाईट करतो, ते चूक असूच शकत नाही. म्हणून त्यांच्या राज्यातला मुलकी कायदा (Civil law) त्याला लागू होत नाही. राजावर फिर्याद करता येत नाही. (The king can not be sued) (The king includes queen and the Queen includes the king.) या इंग्रजांच्या धारणेविषयी **हॅरोल्ड लास्की म्हणतो,** " The Brittish crown covers a multitude of sins. The king can not be sued in the courts of the realm " इंग्रजांचा राजमुकुट अनेक पातकांवर पांघरूण घालतो. (त्यांच्या) देशातल्या न्यायालयात त्याच्यावर फिर्याद दाखल करता येत नाही. इंग्रजांनी आपल्या राजा/राणीला धर्मसंरक्षक Defender of the faith हे बिरुद दिले आहे. इतके सगळे सोपस्कार ब्रिटिश बेटांच्या लोकांनी आपल्या राजा/राणीचे केले असले तरी, ते त्याला/तिला अमरत्व देऊ शकले नाहीत. एका राजाला मृत्यू आल्यानंतर दुसऱ्या नव्या राजाचे ते एकाच दमात स्वागत करतात आणि त्याला दीर्घायुष्य चिंतितात. "The king is dead. long live the king." राजा दिवंगत झाला आहे; राजा (नवा) चिरायू होवो !

वैदिक हिंदू आपल्या राजाला निरंकुशत्व आणि लोकांपेक्षा श्रेष्ठत्व देत नाहीत. केवळ जन्माने राजपद मिळत नसे आणि अग्रजन्माने युवराजपदही मिळत

नसे. रामाची युवराजपदावरील नियुक्ती, लोकसंमतीने झाली होती. शिवाजी महाराजांना लोकांनी 'गोब्राह्मण प्रतिपालक' हे बिरुद अर्पण केले होते. तरी त्यांनी पांजरपोळ उघडले नव्हते; किंवा रमणे भरवून दक्षिणेची खैरात वाटली नव्हती. आणि ब्राह्मण म्हणून कोणाची गयही केली नव्हती.

समृद्ध सहजीवन, समानहित साधन, न्याय आणि समान उद्दिष्टपूर्ती, यांचे संघटित साधन म्हणजे राज्य. समान हितात धार्मिक, सामाजिक, राजकीय, वैचारिक इत्यादी सर्व संबंधांचा अंतर्भाव होतो. परंतु तेवढ्यानेच राज्याच्या अस्तित्वाची पूर्ती होत नाही. त्याकरिता सुरक्षितता आवश्यक असते. सुरक्षितता याचा अर्थ निरामय योग-क्षेम.

कित्येक वेळी, राज्याधिकार आणि दंडशक्ती हाती असलेली, सर्वश्रेष्ठपदी निवडणुकीने बसविलेली एखादी व्यक्ती, किंवा (चांडाळ) चौकडी यांच्या इच्छा आणि त्यांचे खासगी हितसंबंध, यांच्यात विरोध उत्पन्न होतो. फलस्वरूप लोक–क्षोभ होतो. या क्षोभात क्रांतीची बीजे असतात, आणि रुजतात. परंतु ती नेहमीच वृक्षरूपाने प्रकट होत नाहीत. अशा परिस्थितीत लोकांना त्यांची सावली मिळत नाही; आणि उद्दण्ड राज्यकर्त्यांच्या अकारण, अन्याय्य रोषातून सुटकाही मिळत नाही. क्रांतीचा वृक्ष फोफावला तरी क्रांती ही संकल्पनाच चिरंजीवी तर नाहीच, दीर्घायुषीही नाही. ती फक्त एक मधली, काही काळ टिकणारी स्थिती असते. क्रांतीचे परिणामही नेहमीच सुखकारक असतात असेही नाही.

देश, राज्य आणि राष्ट्र या राज्यशास्त्रीय संज्ञांचे निरनिराळे अर्थ असले तरी, साधारणपणे ते शब्द समानार्थी भावानेच उपयोगात आणले जातात. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात या संज्ञांचे अर्थ आणि त्यांची व्याप्ती समजणे उपयुक्त होईल.

भूपृष्ठाच्या एखाद्या सलग भागाला देश हे नाव दिले जाते. राज्य या संज्ञेने विशिष्ट भूप्रदेशाच्या तुकड्यावरील–देशावरील सत्ता, अधिकार आणि मालकी व्यक्तविली जाते. एखादा देश हे नाव मिळालेला जमिनीचा तुकडा, दुसऱ्या एखाद्या देशाच्या अधिसत्तेखाली गेला की, तो परतंत्र देश होतो. ही अधिसत्ता प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष असू शकते. अमेरिका जेव्हा शोधून काढली गेली, तेव्हा तिकडे जाणाऱ्यांनी स्टेकिंगच्या (Staking) पद्धतीने तेथील भूपृष्ठावर आपआपली मालकी बसवली. ठिकठिकाणी खुंट्या ठोकायच्या आणि त्या खुंट्यांच्या परिघातली जमीन 'आपली' म्हणायची आणि अशी मालकी दुसऱ्यांनी मान्य करायची; ही स्टेकिंगची पद्धत होती. थोड्याच दिवसांत या निरनिराळ्या जमिनीच्या तुकड्यांच्या मालकांनी एक तुकड्यांच्या समूहाची व्यवस्था मान्य केली. त्यांना राज्य हे नाव दिले आणि सर्व राज्यांचे एक संयुक्त मंडळ मान्य करून त्याला अमेरिकेची संयुक्त राज्ये United States of America हे नाव दिले.

आता अज्ञात असलेला आणि मालकी नसलेला जमिनीचा आणि तिच्यावरील

मातीचा एकही कण शिल्लक उरलेला नाही. समुद्रकिनारा असलेल्या देशांची काही विशिष्ट मर्यादेपर्यंतची समुद्रावरची मालकी आणि सर्व देशांच्या जमिनीवरील आकाशाचाही मालकी ('Territorial Waters ' and ' Air Space ') मान्य झालेली आहे. राजवंशांचीही काही खासगी मालकीची भूमी असते. (Crown Lands) 'सब भूमी गोपालकी ' हे खरे नाही. प्रत्येक गोपाळ कोणत्या तरी देशाचा नागरिक असतोच. त्याची म्हटलेली भूमी त्याच्या देशाच्या राज्यशासनाला त्याच्याकडून हिसकावून घेण्याचा (Aquire) अधिकार असतो. याचा अर्थ हा की, राज्याकडे देशाची मालकी असते. आता लोकशाहीत नागरिकाचा जमिनीवरील–स्थावरावरील हक्क (Property Rights) रद्द केला जात आहे. " असुनि खास मालक घरचा चोर म्हणती त्याला." मालकाने निवडून देऊन सन्मानाने खुर्ची दिलेला त्याच्या दारी येऊन मताची भीक मागणारा, त्याचा खुर्चीपदस्थ प्रतिनिधीच त्याला आता चोर ठरवतो आहे.

युद्धात समोरासमोर लढाऊ पवित्र्यात उभे असणाऱ्यांच्यामधील जमीन कोणाचीही नसते. (No man's land) हा समज चुकीचा आहे. ती अशी बे-वारशी नसते. कोणाची तरी असतेच. परंतु ती त्याने युद्धाच्या डावपेचासाठी आणि शत्रूला दोन हात दूर ठेवण्यासाठी सोडलेली असते. युद्धसमाप्तीनंतर उभय देशांच्या सीमांची नवी आखणी होते; किंवा जुनीच कायम राहते. परंतु जमिनीचा एकही कण मालकीतून मोकळा सुटत नाही.

देशाच्या मर्यादासीमा नैसर्गिक तशाच कृत्रिमही असतात. देश जन्माला येतात, किंवा मरतात–नष्ट होतात, असे म्हटले जाते. परंतु ते बरोबर नाही. जे जन्मतात किंवा मरतात ते लोक आणि त्यांची राज्ये देशाला (जल, स्थल, वायू, आकाश) कोणी जन्माला घालू शकत नाही आणि मारूही शकत नाही. फार तर त्याचे बाह्य स्वरूप बदलू शकते. ते निसर्गाने किंवा कोठे मानव प्रयत्नाने इतकेच. राज्ये जन्माला घालता येतात. याची दोन ताजी उदाहरणे इस्रायल आणि पाकिस्तान ही आहेत. यहुदी लोकांची ' वचनदत्त भूमी ' The Promised Land कोणती ? ते आधी ठरविले गेले. तेच पाकिस्तानाबाबत केले गेले. नंतर त्या सीमांच्या आत सत्ता असलेली दोन नवीन राज्ये–देश नव्हेत–जन्मास घातले गेले. त्यांपैकी पाकिस्तान नवे, कोरे करकरीत राज्य आहे. चीनही हिंदुस्थानसारखेच एक प्राचीन राज्य आहे. त्याच्या व भारताच्या पारंपरिक सीमा आहेत. परंतु ही राज्ये विस्तारवादी आणि असंतुष्ट असल्याकारणाने, त्यांनी शेजाऱ्यावर युद्धे लादली आहेत.

भूमी हा जड पदार्थ आहे. तिच्यावरील जन्माने, निवासाने आणि तेथे भोगलेल्या हर्षामर्ष सुखदुःखाच्या अनुभवाने त्या भूमिखंडावरील वस्तुनिष्ठेचे, भाव–निष्ठेत पर्यवसान होऊन, त्या भूमीपुढे स्वर्गही तुच्छ वाटू लागतो. तिच्याविषयी

कठोर कर्तव्य-निष्ठा उत्पन्न होते. तिच्याकरिता म्हणजे ती आपलीच फक्त, असण्याकरिता—राखण्याकरिता, सर्वस्वाचा होम करण्यास तिच्यावर राहणारा, तिचा उपभोग घेणारा, तयार असतो. जान की जमीन? या प्रश्नाचे उत्तर "जान, जमीन कभी भी नहीं !" हे दिले जाते. देश या शब्दाला राज्य शास्त्रीय गुण-विशेष लावून तसेच त्यातून भाव निष्ठा, उत्पन्न होऊन 'राज्य' आणि 'राष्ट्र'या संज्ञा आणि संकल्पना निर्माण झाल्या. देश म्हणजे मनुष्याला त्याच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान गरजा उपलब्ध करून देणारा भूमीचा—पृथ्वीचा एक तुकडा, हा देश या शब्दाचा निर्विकार अर्थ आहे.

राज्य म्हणजे किमान गरजा भागून क्षेमकर, सुरक्षित दैनंदिन व्यवहार आणि कालक्रमणाकरिता उपयुक्त होणारी व्यवस्था. सहजीवनामुळे हित-संबंधांची गुंता-गुंत झाली. दुष्ट, स्वार्थी अंतःप्रेरणांमुळे परस्परात अंतराय आणि विरोध उत्पन्न झाला. कुरापतखोर आणि भांडकुदळपणाने तो अनिवार झाला; आणि संघर्ष सुरू झाला. ही परिस्थिती कोणालाही मानवण्यासारखी नव्हती. त्यामुळे एका नियंत्रक, मार्गदर्शक आणि शक्ति-युक्त व्यवस्थेची गरज उत्पन्न झाली. अशी सर्व संमत व्यवस्था किंवा संघटना म्हणजे राज्य.

राज्यसंस्थेच्या स्थापनेच्या आरंभीच्या काळात, भारतवर्षात प्राचीन आर्यांची 'गणराज्ये' स्थापन झाली. नंतर तशाच तऱ्हेची ग्रीकांची 'नगरराज्ये' अस्तित्वात आली. गणराज्ये आजही शिल्लक असली तरी त्यांचे स्वरूप बदललेले आहे. आजची गणराज्ये स्वतंत्र नसून ती एका मोठ्या राज्याचे घटक आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात या गौणत्व प्राप्त झालेल्या राज्यांना स्थान नाही. ख्रिस्ती धर्माच्या रोमन कॅथॉलिक पंथाच्या सर्व श्रेष्ठ धर्मगुरूच्या **व्हॉटिकन** या नगरराज्याशिवाय दुसरे एकही स्वतंत्र नगरराज्य शिल्लक नाही. पोपच्या या राज्याची स्वतःची वेगळी प्रशासनव्यवस्था आहे. सैन्य आहे. राजदरबारही आहे. त्या दरबारात दुसऱ्या स्वतंत्र देशांचे वकील—प्रतिनिधी आहेत परंतु ते धर्मराज्य आहे. स्वतंत्र आहे. परंतु ते राजकीय राज्य नसल्याकारणाने त्याला आंतर-राष्ट्रीय स्थान नाही.

धर्मशाही, उमरावशाही, राजेशाही, लोकशाही असे राज्याचे अनेक प्रकार आहेत. आज धर्म-शाही पूर्वीच्या अर्थाने अस्तित्वात नाही. आज धर्मपीठ अथवा धर्माध्यक्ष, प्रशासनात प्रत्यक्ष भाग घेत नाहीत. परंतु राज्ये त्या त्या धर्मावर अधिष्ठित असून त्यानुसार प्रशासनव्यवस्था असणारी राज्ये आहेत. उदा० पाकिस्तान, अरब राज्ये. ग्रेट ब्रिटनमध्ये धर्मशाही नसूनही विशिष्ट पद्धतीची राज-पद कायम असलेली लोकशाही आहे. इतरत्र राज-सत्तेवर असलेला धर्मसत्तेचा प्रभाव अथवा अधिकार नष्ट झाला असला तरी, तो ग्रेट ब्रिटनमध्ये आजही कायम आहे. त्या देशात राजसत्ता, धर्मसत्ता आणि लोकसत्ता या तीन्ही सत्ता आहेत.

परंतु जी धर्मसत्ता आहे, ती राजवंशावर आहे; लोकांवर नाही. घटस्फोटित स्त्री पुर्नविवाह करून त्या देशाची राणी होऊ शकत नाही. या त्या देशातील धर्म-गुरूच्या (Arch Bishop of Cauterbury) फतव्यामुळे **युवराज एडवर्ड**, पुढे सिंहासन की प्रेम हा प्रश्न उभा राहिला होता. त्या प्रेमवीराने सिंहासन ठोक-रून दिले.

आता उमरावशाही कोठेही नाही. राजेशाही जरी अस्तित्वात असली तरी ती पूर्वीसारखी निरंकुश किंवा अमर्याद नाही. राजपद आता बरेचसे लाक्षणिक झालेले आहे. राज्याची प्रशासनयंत्रणा राजाच्या अनुज्ञेशिवाय चालत नाही. याचा अर्थ ती अनुज्ञा त्याची स्वतःची त्याने आपल्या एकट्याच्या निर्णयानुसार दिलेली असते असे नसून, तिचा बोलविता धनी निराळाच असतो. तो राजाच्या नावाने आणि त्याच्याकडून प्रशासन करवितो. तो धनी म्हणजे त्या राज्याचा प्रधान मंत्री किंवा राष्ट्रपती. राजा जरी नुसता उत्सवमूर्तीच असला तरी त्याचा धाक नसतो. धाक असतो प्रधानमंत्र्याचा आणि सर्वाधिकारही त्याचाच चालतो.

राज्याच्या प्रशासनात हुकुमशाही आणि लष्करशाही असेही प्रसंग उद्भव-तात. परंतु ते तसे फार काळ टिकू शकत नाहीत. आणि अशा प्रकारच्या प्रशासन-परंपरा निर्माण होऊ शकत नाहीत. हे धूमकेतू असतात.

प्रत्येक मनुष्याला व्यक्तिगत सामाजिक आणि राजकीय जीवन असते. धार्मिक जीवन असणे नसणे हा खासगी पूर्णपणे व्यक्तिगत प्रश्न आहे. त्याचा समाज-जीवनाशी कमी–अधिक संबंध असला तरी राजकीय जीवनाशी मुळीच नसतो. राजकीय बंधने, यम–नियम, प्रत्येकाला पाळावेच लागतात. नागरिक कर्तव्यात धर्माचा संबंध येत नाही. व्यक्तीला तसेच प्रशासनाला निधर्मी राहता येते. निधर्मी प्रशासन याचा अर्थ कायद्याचे राज्य Rule of law. त्या राज्याच्या कायद्याचे राज्य. ' शरियत ' किंवा मनुस्मृतीच्या कायद्याचे नव्हे.

प्राचीन वैदिक आर्यांनी " ॐ स्वस्ति, " सर्वांचे कल्याण असो ! अशी इच्छा प्रारंभीच व्यक्त करून समुद्रापर्यंत पसरलेल्या या पृथ्वीचा–भूमीचा एकच राजा असो, हा राजा साम्राज्य, भोज्य, (उपभोगास योग्य–सुखी, समृद्ध) स्वाराज्य, सर्वश्रेष्ठ परमेष्ठीचे राज्य, महाराज्य, सर्वांचे आधिपत्य, या सर्वांचा एकमेव स्वामी, तसेच वैराज्य इत्यादी अनेक प्रकारची राज्य म्हणजे प्रशासन संस्था सांगि-तल्या आहेत. या संबंधात **डॉ. जयस्वल** आपल्या (Hindu Polity) या ग्रंथात विस्तृत विवरण करतात. त्यातल्या 'स्वराज्य' या प्रकाराविषयी ते लिहितात, " स्वराज्य नामकी एक शासनपद्धति थी। इसमें जो शासक था वह **स्वराट्** कहलाता था। इसका अर्थ है स्वयंशासन करनेवाला। समान लोकोंमें से कोई 'स्वराट्' शासक चुना जाता था। उसको अपनी योग्यता सिद्ध करना आवश्यक होता था। वैराज्य का अर्थ है बिना राजाकी अर्थात् प्रजातंत्र शासन प्रणाली।" ते

आणखी आधुनिक पक्षपद्धतीची शासनसंस्था पूर्वीही क्वचित असल्याचे सांगतात, " विरुद्ध–रज्जाणी–अथवा दलों (पक्ष) द्वारा शासित राज्य।"

कित्येक वेळी जुन्या प्रथा, परंपरा नष्ट होऊन त्यांची जागा नव्या निराळ्या जीवन-निष्ठा व प्रथा घेतात व त्यांची प्रशासनपद्धती सुरू होते. प्रशासनाची पद्धत कोणतीही असली तरी घटना असतेच, असली पाहिजे. (लिखित घटना नसलेला ग्रेटब्रिटन हा एकच देश आहे.) घटनेतील उद्दिष्टे तिने ठरविलेल्या तत्त्वानुसार साध्य करण्याच्या यंत्रणेला राज्याचे प्रशासन–सरकार हे नाव दिले गेले आहे. राज्याच्या घटनेला **न. चिं. केळकर** " राज्याचे व्याकरण " हे नाव देतात. घटनेनुसार नियमबद्धपद्धतीने राज्याचे सर्व व्यवहार सुरळित चालण्यावर प्रशासनाची कार्यक्षमता आणि स्थैर्य अवलंबून असते.

प्रशासन हा राज्याचा आवश्यक घटक असतो. राज्य आणि प्रशासन एक नव्हत. राज्य बदलत नाही. प्रशासन–सरकार बदलते. प्रशासन एक-मुखी असू शकते. परंतु एक व्यक्ती एकटीच सर्व सत्ता आणि अधिकार स्वतःच चालवू शकत नाही. म्हणून, प्रशासनाचा प्रकार कोणताही असला तरी, 'नोकर–शाहीची' आवश्यकता असतेच. त्यालाच साधारणतः सरकार म्हटले जाते. राजेशाही आणि हुकूमशाही यांच्याव्यतिरिक्त इतर सर्व राज्यांचे संकल्प त्या त्या राज्यातील लोकांचे असतात आणि ते प्रशासनाने पार पाडावयाचे असतात. प्रशासनाचे-सरकारचे-नोकरशाहीचे असे स्वतंत्र संकल्प असू शकत नाहीत आणि असे काही झाले; लोकांच्या संकल्पात आणि सरकारच्या संकल्पात विरोध उत्पन्न झाला किंवा कार्यपद्धतीत विरोध उत्पन्न झाला तर सरकार बदलते, प्रशासन बदलते, राज्य बदलत नाही.

प्रशासनाचे वर्गीकरण तीन दृष्टींनी करता येते. सर्व सत्तेचा उगम एकच असेल तर ती राजेशाही. मोजक्या बलदंड व्यक्ती असतील तर ती उमरावशाही आणि लोक असतील तर लोकशाही. लोकशाहीत ही सरळ Direct आणि अपरोक्ष, प्रातिनिधिक Representative असे भेद आहेत. विधिमंडळापासून कार्यकारी यंत्रणेला अधिकार प्राप्त होत असतील तर ते ते प्रशासन सांसदीय Parliamentary पद्धतीचे असते. ते स्वतंत्र असतील तर अध्यक्षीय पद्धतीचे Presidential पद्धतीचे ठरते. राज्याचा प्रमुख जर लोकांनी निवडून दिलेला असला (प्रत्यक्ष वा अपरोक्ष) तर त्या राज्याला Republic लोकशाही म्हटले जाते. (अशा राज्यांचे इंग्रजी भाषेत Democracy आणि Republic या दोन शब्दांनी निर्देशन–नामांकन केले जाते. मराठीत हा सुक्ष्म भेद दाखविणारे वेगळे शब्द नाहीत–मला माहीत नाहीत.) ग्रेटब्रिटनमध्ये सांसदीय Parliamentary पद्धतीची लोकशाही Democracy असून राजाही आहे. अमेरिकेतली लोकशाही अध्यक्षीय Presidential आहे. राज्यात अधिकारांचा उगम असलेली घटक राज्ये

(गणराज्ये) असून केंद्रालाही काही, सर्व घटकांवर अधिकार असतील तर अशा राज्याला एकात्मराज्य Unitary राज्य हे नाव दिले जाते. अधिकारांचे निखळ वाटप असेल तर त्या राज्याला संघ राज्य Federal म्हणतात. भारत संघ-राज्याची लक्षणे असलेला एकात्म राज्य किंवा एकात्म राज्याची लक्षणे असलेला संघराज्य आहे.

विशिष्ट विचारधारा आणि जीवननिष्ठा असणारीही राज्ये असतात. आता नाझीझम, फॅसीझम असे 'इझम' नसले तरी साम्यवादाच्या दोन छटा असलेला इझम प्रबळ झालेला आहे. त्याला साम्राज्यवाद म्हणावे लागते परंतु हा साम्राज्यवाद निराळ्या प्रकारचा आहे. आता जुनी साम्राज्ये कोसळून पडलेली असली तरी, निराळी साम्राज्ये उदयास आलेली आहेत. ती तसे कबूल करीत नाहीत, हा भाग वेगळा. विश्वराज्य ही त्याच्या पुढची पायरी आणि अ-राज्य ही शेवटची. परंतु इतक्या प्रगत (!) मानवाला अ-राज्य मानवणारे नाही; आणि विश्व राज्य अशक्य इच्छा चिंतन ठरेल.

प्रदेशविस्तार, लोकसंख्या, आर्थिक समृद्धी, नैसर्गिक अथवा अन्य साधन-संपत्ती इत्यादीवरून प्रबळ आणि दुर्बळ असेही राज्यांचे वर्गीकरण करता येते. परंतु आंतरराष्ट्रीय कायद्याने असे वर्गीकरण अमान्य केले आहे. राज्यांची, प्रतिष्ठेच्या आणि अधिकारांच्या व हक्कांच्या संबंधात अशी प्रतवारी लावणे न्यायसंगत नाही. हे झाले तत्त्व ! परंतु प्रत्यक्ष व्यवहार तसा नाही. दुर्बळाला प्रबळाच्या कलानेच चालावे लागते, किंवा त्याच्या सावलीत वावरावे लागते. यूनोत सर्व स्वतंत्र सार्वभौम राज्यांना तत्त्वतः समान स्थान असले तरी तेथेही 'बडे' आहेतच.

देश म्हणजे राज्य नव्हे. तसेच राष्ट्र म्हणजेही राज्य नव्हे. भूमी, लोक, राज्य यांच्याशिवाय राष्ट्राला 'आणखी पुष्कळ' आवश्यक असते. भाषा, परंपरा, वंश, धर्म, संस्कृती, इतिहास, समान आकांक्षा, आत्मीयता, एकात्मभाव इत्यादींच्या प्रभावामुळे 'राष्ट्र' निर्माण होते आणि टिकतेही. मनुष्य नुसत्या अन्नावरच केवळ जगत नाही. आणि नुसताच अन्नावर जगणारा माणूस पूर्ण मानव असू शकत नाही. ज्याच्यासाठी जगावे आणि मरावे, नुसतेच निमूटपणे नव्हे; "मारिता मारिता मरावे" अशा जीवननिष्ठाही असाव्या लागतात. देश वस्तुनिष्ठ असतो. राज्य परिस्थितीनिष्ठ असते आणि राष्ट्र 'भावनिक' असते. राष्ट्राला आत्मशक्ती असते. ती विद्या, कला, संस्कृती, इतिहास इत्यादीतून निर्माण होते. राज्यात आणि शासनात बदल झाले तरी राष्ट्रात बदल होत नाहीत. ग्रीक आणि रोमन ही प्राचीन राष्ट्रे नष्ट झाली; असे म्हणतात. त्याचा अर्थ ती भूमी किंवा त्या वंशांचे लोक नष्ट झाले असा नाही, तर त्यांच्या परंपरांचा जीवननिष्ठांचा स्रोत आटला. त्यांचा माग-मूस उरला नाही हा आहे. हा समान इतिहास, त्यात उद्‌भवलेले अनुभवलेले

सुखदु:खांचे प्रसंग आणि त्यांच्या स्मृती यांच्यातून राष्ट्र निर्माण होते, असे **मिल्ल** म्हणतो. भाषा, भूप्रदेश, आर्थिक जीवन आणि सांस्कृतिक समानता यांच्या द्वारे प्रकट होणाऱ्या मनोभूमिकेची उत्क्रांत झालेली आणि स्थिर एकता असलेली समाज-स्थिती म्हणजे राष्ट्र. अशी **स्टॅलिनची** व्याख्या आहे.

एनसायक्लोपीडिया अमेरिकॅना या विश्वकोषात दिलेली राष्ट्राची व्याख्या भारताच्या स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीशी जुळणारी आहे.– " Nation and State may be the same. But an entity may be classified as a nation because it has attained a high degree of cultural homogeneity although it is under the domain of another power." राष्ट्र आणि राज्य एकच असू शकते. श्रेष्ठ प्रतीची सांस्कृतिक एकात्मता असलेल्या परतंत्र संकल्पनेला राष्ट्र म्हणता येते. भारत परतंत्र असला तरी राष्ट्र होतेच. राष्ट्राला स्वातंत्र्य असलेच पाहिजे असे नाही. भारत हा एक देशही होता. त्याचे हिंदुस्थान सरकार–Government of India–हे परतंत्र सरकार होते, तरीही तो राष्ट्र होता. कारण ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भावनात्मक ऐक्य होते. यहूद्दी लोकांचेही राष्ट्र होते. परंतु त्यांचा देश नव्हता; आणि स्वतंत्र अथवा परतंत्र सरकारही नव्हते. ते जगभर पसरलेले असून त्या त्या देशाचे नागरिक होते. त्यांना नागरिक व्हायला त्यांची स्वत:ची अशी भूमी–देश नव्हता. हा भारतीय आणि यहूदी राष्ट्रातला आणि राष्ट्रीयत्वातला फरक होता. आता त्यांना देश मिळाला आहे आणि त्यांचे प्रबळ राज्यही झाले आहे आणि ते अधिक विस्तृत होऊ पाहते आहे. त्यांनी जेव्हा देशाची मागणी सुरू केली तेव्हा **थियोडोर हरझेलने** " The people without land demand a land without people "– जमीन नसलेले लोक, लोक नसलेली जमीन मागतात, असे त्या मागणीचे मार्मिक वर्णन केले होते.

सारांश हा की, राज्य आणि राष्ट्र एकच नव्हेत. राष्ट्राला दण्डशक्तियुक्त स्वतंत्र सार्वभौम राज्याशिवाय पूर्णत्व येत नाही. राज्याला दण्डशक्ती असलीच पाहिजे. राष्ट्र दण्डशक्ति विरहित असू शकते, परंतु ते स्वतंत्र असेल असे नाही. देशाशिवाय राज्य असू शकत नाही. देश, राज्य आणि राष्ट्र यांच्या आपल्या वैशिष्टयांसह होणाऱ्या संगमाला राष्ट्र–राज्य (Nation–State) ही राज्यशास्त्रीय संज्ञा दिली गेली आहे.

राष्ट्र या संज्ञेतून राष्ट्रीयत्व (Nationality) आणि राष्ट्रवाद (Nationalism) या दोन संकल्पना उत्पन्न झाल्या. राष्ट्रीयत्व याचा अर्थ नागरिकत्व-Citizenship हा होतो. नागरिकत्व हे वस्तुनिष्ठ असते. तुमचे राष्ट्रीयत्व Nationality कोणते या प्रश्नाचा अर्थ तुम्ही कोणत्या देशाचे (राज्याचे नव्हे) नागरिक आहात ? हे राष्ट्रीयत्व वस्तुनिष्ठ असते. राष्ट्राभिमान (Nationalism) ही भावना आहे. ती विशिष्ट मूल्याधिष्ठित अव्यभिचारी जाज्वल्य निष्ठेला जन्म

देणारी असते. राष्ट्रभावना नष्ट झाली की विशाल प्रेरणा नष्ट होऊन, आत्मकेंद्रित संकुचित वृत्ती बळावते. राष्ट्रनिष्ठा, देशनिष्ठा आणि राज्यनिष्ठा हा **त्रिवेणी संगम** मणिकांचन योग होय.

निरीश्वरवादी धर्माला अफू समजणारे कोणी असले तरी त्यांनाही एक सामान्य नीति-तत्त्वांचे अधिष्ठान मान्य करावे लागते. प्रत्येक मनुष्य आपल्या जीवननिष्ठेच्या मान्यताप्राप्त विविध निषेधांनी स्वतःला बांधून घेत असतो. आणि तो लोकांपैकी एक असल्याने सगळ्या प्रयत्नांना, धडपडीला 'लोक' हे सर्व-समावेशक सोयीस्कर सुटसुटीत नाव देतो. तो जे करतो ते लोकांकरिता आणि लोक जे काही करतो म्हणतात, तेही लोकांकरिताच. व्यक्ति-निष्ठा, राज-निष्ठा, धर्म-निष्ठा तर कधीच संपल्या. आता राष्ट्रनिष्ठाही अनावश्यक ठरली आहे. आता युग आहे लोकनिष्ठेचे. निष्ठेची खुंटी जरी फेकून दिली तरी निष्ठा उपटून फेकून घेता येणार नाही आणि तसे झाले तर पशुपक्षी आणि मनुष्य यांच्यात भेद राहणार नाही. परंतु हे शक्य आहे काय ?

व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या हिताची जपणूक करण्याकरिता, त्यांच्या उद्दिष्टांची पूर्ती करण्याकरिता, त्यांच्या योगक्षेमाची आणि उत्कर्षाची कार्ये पार पाडण्याकरिता निर्माण केलेली, स्थापन केलेली, व्यवस्था म्हणजे त्या विशिष्ट भूखंडा-वरील लोकांच्या देशाचे राज्य. त्यात व्यक्तीला आणि समाजाला मान्य असलेली बंधने आणि नियम आणि विधिनिषेधांचे तत्पर सानंद पालन हे मुख्य सूत्र असते. हे सूत्र अबाधित आणि अखंड राहावे म्हणून, काही अधिकार दिलेले असतात. देशातली कोणीही व्यक्ती त्या देशाच्या 'राज्याबाहेर' असू शकत नाही. मध्ययुगीन युरो-पात 'राजकीय वाळीत' टाकण्याची (Ex–communication) प्रथा होती. त्याचा अर्थ त्या व्यक्तीचे नागरिक या नात्याने सर्व हक्क रद्द केले जात असत. त्या व्यक्तीला राज्याकडून संरक्षण मिळत नसे. आता प्रत्येक राज्याच्या प्रत्येक नागरिकाला त्या राज्याच्या कायदेकानूप्रमाणे वर्तन करावे लागते किंवा अवमानाबद्दल शिक्षेस सादर व्हावे लागते. राज्यात अपवाद असू शकत नाही, दया असू शकते.

राज्याचे चार घटक असतात– (१) भूमी, (२) लोक, (३) शासनसंस्था आणि (४) सार्वभौमत्व. राज्य म्हणजे विशिष्ट भू–प्रदेशावरील निवासी मानव-समाजावर सर्वाधिकार असणारी, परंतु त्याच्या हितसंबंधांना जपणारी, त्याचा उत्कर्ष साध्य करण्यास तत्पर असणारी, त्याच्या सुरक्षिततेची निश्चिती करणारी सर्वश्रेष्ठ व्यवस्था. परंतु फक्त तीनच घटक असलेली व्यवस्था सार्वभौमत्व या चवथ्या घटकाच्या अस्तित्वाशिवाय पूर्णराज्य होऊ शकत नाही. अपूर्ण राज्यांना Protectorate-संरक्षित, Mandatory-आज्ञाधारक, Vassal-मांडलिक अशी इंग्रजी नावे दिलेली आहेत. राज्यांच्या अशा अपूर्ण प्रकाराविषयी **एन्सायक्लो-**

पीडिया अमेरिकॅना म्हणतो, " In Inter–National Law the political control exercised by one state over another in relation to which it is sovereign and analogous to the relationship between Lord and Vessal while possessing a considerable degree of autonomy yet acknowledges the over–Lordship of another power." याचा अर्थ हा की एखाद्या राज्याला कितीही 'स्वायत्तता' असली तरी त्याने दुसऱ्या एखाद्या अधिसत्तेचे लाक्षणिक, नाममात्र, नावापुरते जरी प्रभुत्व अथवा श्रेष्ठत्व मान्य केले तरी, तो देश आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने मांडलिकच ठरतो. 'वसाहतीचे–स्वराज्य,' 'स्वराज्य' आणि 'पूर्ण स्वराज्य' यांच्यातील फरक असे स्पष्ट होतात.

याचे उत्तम उदाहरण तिबेटवर असलेले ब्रिटिशांचे प्रभुत्व हे होय. तिबेट स्वतंत्र असला तरी त्याच्या ब्रिटिशांशी झालेल्या तहामुळे; मान्य केलेल्या विशिष्ट प्रकारच्या प्रभुत्वामुळे अथवा श्रेष्ठत्वामुळे तो देश 'पूर्ण राज्य' नसून तत्त्वत: ब्रिटिशांचा मांडलिकच होता. हे विशिष्ट संबंध स्वतंत्र भारताला वारसा हक्काने मिळालेले होते. परंतु उदार भारताने Soverignty आणि Suzereignty या संकल्पनांचा घोळ घालून तिबेटवरचे सर्व हक्क सोडून दिले आणि ते तबकात ठेवून भाई चीनला देऊन गरीब बिचाऱ्या निरुपद्रवी तिबेटला त्याच्या वैऱ्याच्या दावणीला बांधले आणि आपल्या स्वत:च्या संरक्षणाचा प्रश्न बिकट करून ठेवला.

पाश्चात्य राज्य-शास्त्रपंडितानी सार्वभौमत्वाच्या निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत. त्यातील मुख्य पुढे उद्धृत केल्या आहेत. 1. " Authority which gives orders to all and receives orders from none. 2. The unified power of the State. 3. the sole arbiter of the policy it will persue, the making of peace and war, the scale of its armaments, its financial and economic policies, its attitude to colonial expantion–all these matters which it (the State) recognizes no will superior to its own. "–१. जी दुसऱ्या सर्वांना आदेश देऊ शकते परंतु जिला दुसऱ्या कोणाचेही आदेश मिळत नाहीत (कोणीही आदेश देऊ शकत नाही.) अशी सत्ता. २. राज्याचा एकत्रित एक–संघ अधिकार. ३. आपले सर्व प्रकारचे धोरण ठरविण्याचे, संधी अथवा–विग्रहाचे–युद्धाचे, सामरिक सामर्थ्याच्या प्रमाणाचे, आर्थिक तसेच वसाहती, विस्तार इत्यादी सर्व बाबतीत अंतिम निर्णय घेणारी एकमेव अधिकारी अशी सत्ता.

सार्वभौमत्व निरंकुश आणि स्वयंपूर्ण असते. तसेच ते अविभाज्य असते. अपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे सार्वभौमत्व नव्हे. **लास्की** म्हणतो, " Sovereignty is

as absolute as man can make it. " मानव जितके निरपवाद करू शकतो तितके सार्वभौमत्व निरपवाद असते.

आंतरराष्ट्रीय कायद्याने राज्यांचे तीन हक्क मान्य केले आहेत. पहिला स्वातंत्र्य, दुसरा सार्वभौमत्व आणि तिसरा युद्ध. स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व जरी एकच समजले जाते, तरी त्यातही भेद आहेत. एखादे राज्य स्वतंत्र असूनही सार्वभौम नसते. त्याला Non sovereign State म्हणतात. उदा. ब्रिटिश वसाहती म्हणून स्वतंत्र सार्वभौमराज्य असा वेगळा उल्लेख आणि प्रकार झालेला आहे. अशा राज्यांनाच स्वतंत्रपणे युद्ध करण्याचा अधिकार असतो. राज्याच्या संरक्षणाची आणि युद्धाची सर्व सूत्रे आणि अधिकार हातात असणे, हे सार्वभौमत्वाचे मुख्य लक्षण आहे. युद्धाशिवाय संरक्षण शक्य नसते. म्हणून आंतरराष्ट्रीय कायद्याने हा अधिकार मान्य केला आहे. सामरिक सामर्थ्याशिवाय यशस्वी युद्ध शक्य नसते. म्हणून प्रत्येक जागरूक सार्वभौम राज्य, शक्तिसंपन्न होण्याचा प्रयत्न करतो. म्हणून राज्यशास्त्राला (Political Science) आता Science of Power शक्तीचे शास्त्र हे नाव मिळाले आहे. युद्ध सार्वभौमत्वाचे अत्युत्कट प्रकटीकरण आहे. " War is the highest expression of sovereignty " असे लास्की म्हणतो.

देशाच्या, राज्याच्या आणि राष्ट्राच्या संरक्षणाचा भार आणि अधिकार सार्वभौमत्वाच्या आधीन असतो. नव्हे ते त्याचे कर्तव्य असते. भारत इ. स. १९४७ च्या आगस्ट महिन्याच्या १४–१५ तारखेच्या मध्यरात्री स्वतंत्र आणि सार्वभौम झाला. (नंतर घटना तयार झाल्यावर त्याने तिच्या सरनाम्यात तसा उल्लेख केला.) आणि त्याक्षणी।च भारताच्या संरक्षणाचा अधिकार स्वतंत्र सार्वभौम भारताला प्राप्त झाला आणि त्याचा भार त्याच्या राज्यकर्त्या सरकारवर पडला.

राज्यशास्त्र सांगणे सोपे असते. राज्य करणे फार कठीण !

४

सार्वभौम भारत

" We the people of India having solemnly resolved to constitute India into a sovereign Democratic Republic .... give to ourselves this constitution. " आम्ही हिंदुस्थानी लोकांनी हिंदुस्थानचे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक राज्य संघटित करण्याचे गंभीर प्रतिज्ञापूर्वक ठरविले असून ही राज्यघटना आम्ही आपल्यास देत आहोत. ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने स्वतंत्र सार्वभौम भ रताची राज्यघटना तयार केली आणि ती ता. २६ जानेवारी १९५० पासून अमलात आली. प्रस्तुत अवतरण घटनेच्या सरनाम्याचा अंश आहे.

ता. १४–१५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री हिंदुस्थान स्वतंत्र झाला. त्याच्या बरोबर २४ तास आधी हिंदुस्थानातला काही भाग कोरून खरवडून काढून त्याचा पाकिस्तान नावाचा एक नवा कोरा करकरीत स्वतंत्र सार्वभौम देश निर्माण करण्यात आला होता. १५ ऑगस्टच्या उगवत्या सूर्याचे, प्रत्येक स्वतंत्र हिंदी माणसाने मोठ्या हर्षाने आणि अभिमानाने स्वागत केले. परदास्याच्या शृंखला, संपलेल्या मध्यरात्री निखळून गळून पडल्या होत्या. अपमानित हिंदी माना ताठ झाल्या. आक्रसलेल्या छात्या फुगल्या. काळवंडलेले चेहरे तेजाळले. प्रत्येक स्वतंत्र हिंदी माणसाच्या चेह-

त्याला एक विजयाचे वलय मिळाले आणि सर्वजग हिंदुस्थानाकडे पाहू लागले–कोणी द्वेषाने, कोणी उत्सुकतेने कोणी कुतूहलाने.

परंतु त्याचबरोबर मातृभूमीच्या विच्छेदनाच्या दुःखाचे उमाळे, शोकाचे कढ आणि वेदनांचे सुस्कारे तितक्याच उत्कटतेने सर्व आनंदावर विरजण घालीत होते. विभाजन न होऊ देण्याची गांधीजींची प्रतिज्ञा त्यांच्याच–मानस पुत्र, वारस, शिष्यवर इत्यादी महाभागांनी दप्तरदाखल (file) करून निकालात काढली आणि गांधींनीही त्याविषयी 'मुगांची मूठ' गिळून त्याची वासलात लावली. India got freedom at midnight. जखम भरून आणणारे 'काळ' हे एक उत्तम औषध आहे. Time is a good healer असे म्हणतात. परंतु ही नुसती जखम नाही, हे तुकडे आहेत. 'काळ' हे उत्तम (?) औषध येथे लागू पडणार नाही.

हिंदुस्थानचे स्वातंत्र्य जगातील पददलित आणि परतंत्र देशांना आणि त्या देशांतील लोकांना स्फूर्तिदायक झाले. अनेक सम्राटांची सिंहासने हादरून गेली, साम्राज्ये खिळखिळी झाली. सूर्य न मावळणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याचा नूर साफ उतरून गेला. ब्रिटिश राजवंशाचे सम्राटपदाचे बिरुद गळून पडले. ब्रिटिश राजवंश आणि इंग्रज हा धक्का कधीच विसरणार नाहीत आणि त्यांची मने हिंदुस्थानाविषयी कधीच 'साफ' होणार नाहीत. हे मनुष्यस्वभावाला धरूनच आहे.

घटनादत्त हक्क आणि अधिकारान्वये हिंदुस्थानी लोक आता कोणाचीही प्रजा नाहीत. प्रजा राजाची असते. आता हिंदी लोक सर्वहक्क असणारे नागरिक आहेत आणि नागरिका–नागरिकात भेद असू शकत नाहीत. त्यांना आपले राज्यकर्ते प्रशासक नोकरशाही निवडण्याचा व नेमण्याचा हक्क आहे. त्यांच्या कारभाराचा जाब मागण्याचा आणि जरूर पडल्यास त्यांना अपदस्थ करण्याचा हिंदी लोकांना अधिकार मिळालेला आहे. हिंदुस्थानचे सार्वभौमत्व नागरिकांचे–लोकांचे आहे. ते परिपूर्ण आणि निरपवाद आहे.

हिंदी मुसलमानांनी स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यात भाग घेतला नव्हता (अपवाद वगळून) म्हणून स्वातंत्र्यवीर **सावरकरांनी** त्यांना बजावले होते, "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून." स्वातंत्र्याचे प्रयत्न आम्ही चालू ठेवू. परक्या इंग्रजांच्या उत्तेजनाने आणि अंतस्थ मदतीने त्यांनी हिंदूंना जितके अडथळे आणता येतील तितके अडथळे आणले; आणि त्यांचे प्रयत्न कठीण केले. परंतु दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या यशाचे परिणाम इतके भयंकर होते की, ब्रिटिशांना हिंदुस्थानवर पूर्वीसारखी हुकुमत चालवणे शक्य नव्हते. हिंदुस्थान स्वतंत्र झाला तो मुसलमानांचा एक वेगळा, हिंदुस्थानसारखाच स्वतंत्र सार्वभौम देश जन्माला घालून ! आळशावर गंगा आली. त्यांना काहीही श्रम, साहस न करता फुकटात एक देश आणि स्वतंत्र सार्वभौम राज्य मिळाले; आणि राज्याच्या

संरक्षणाचा अधिकार मिळाला. **संरक्षणाचा, आक्रमणाचा नव्हे.** आंतरराष्ट्रीय कायदा प्रत्येक सार्वभौम राज्याचा युद्धाचा हक्क मान्य करतो, परंतु वाटेल त्या युद्धाचा नव्हे! फक्त संरक्षणाकरिताच करावयाच्या–कराव्या लागणाऱ्या युद्धाचा! प्रामाणिकपणाने आत्मसंरक्षण करताना, जर कोणाचा दुसऱ्याचा प्राण गेला, तर 'पिनल कोड' त्या आत्मरक्षण करणाऱ्याला 'खुनी' म्हणत नाही.

'स्वराज्य,' 'सार्वभौमत्व' भारताला नवीन नाही. ते उपभोगण्याची त्याची ही पहिलीच वेळ नाही. त्याच्या या गौरवशाली हक्काची आणि अधिकाराची पाच हजार वर्षांपूर्वीची परंपरा आणि इतिहास आहे. स्वराज्य, सार्वभौमत्व हा राजनीतीचा, राज्यशास्त्राचा विषय आहे. राज्यशास्त्राचा मागोवा घेण्यासाठी इतिहासाचे अवगाहन आवश्यक असते. श्री. तर्कतीर्थ **लक्ष्मणशास्त्री जोशी** 'प्राचीन भारत' या आपल्या ग्रंथात म्हणतात–" इतिहासाशिवाय राजनीती आणि अर्थशास्त्र आंधळे आहे. नैतिक आणि भौतिक सामर्थ्य मिळून राजकीय शक्ती बनलेली असते आणि संस्कृतीच्या स्वरूपात इतिहासाला मुख्य स्थान असते." संपन्न सुसंरक्षित राज्य हा प्राचीन अर्थशास्त्राचा परिपोष होता. ही संपन्नता आधुनिक अर्थशास्त्रासारखी, प्रधानतः वित्तविषयक नसून, तिच्यात न्याय, नीती आणि समर्थ राजनीती यांचाही अंतर्भाव होतो. नैतिक सामर्थ्य आणि भौतिक समृद्धी मिळून राजकीय शक्ती तयार होत असते.

भारताच्या सार्वभौमत्वाचा इतिहास वैदिक आर्यांच्या या खंडप्राय महाविशाल देशातल्या आगमनापासून सुरू होतो. (काही विद्वानांच्या आणि संशोधकांच्या सिद्धांतानुसार, वैदिक आर्य बाहेरून आलेले नसून एतद्देशीयच आहेत.) ते काहीही असले तरी आर्य आणि 'दक्षिण पथातले' द्रविड यांच्यातील सुरुवातीची वांशिक भिन्नता जरी मान्य केली, तरी कालांतराने ते एकजीव झाले. याविषयी **के. एम्. पणिक्कर** Making of India या ग्रंथात म्हणतात," The unity of India is a concious achievement of Hinduism after the Aryo–Dravidian synthesis had taken place." आर्य द्रविड संयोगाने घडवून आणलेले हिंदुस्थानचे ऐक्य हा हिंदुधर्माचा हेतुपुरस्सर पराक्रम आहे.

या भारतवर्षात अनेक प्रकारच्या राज्यशासनसंस्था होऊन गेलेल्या आहेत. कुबेराला प्रत्येक पूजाविधीनंतर करावयाच्या प्रार्थनेत (मंत्र पुष्पांजली) त्यांची यादी आहे. त्यात सार्वभौम राज्याचा स्पष्ट उल्लेख आहे. अशी राज्ये धनधान्य समृद्ध राज्ये व्हावीत, ती आर्थिकदृष्टचा सुदृढ असावीत म्हणून मंत्र पुष्पांजलीद्वारा समृद्धीची देवता कुबेर याची प्रार्थना केली जाते. प्राचीन आर्यांची अनेक सार्वभौम राज्ये होती. देशाच्या अतिविशाल विस्तारामुळे, नद, नद्या, पर्वत, अरण्ये इत्यादी, त्या काळात अनुल्लंघनीय आणि अप्रवेश्य असल्या कारणाने आणि दळणवळणाची साधने आणि संपर्क व्यवस्था इत्यादींचा अभाव असल्याकारणाने, अनेक लहानमोठी

स्वयंपूर्ण राज्ये होती आणि ती सार्वभौम होती. एखादा महत्त्वाकांक्षी राजा अश्वमेध यज्ञाच्या साधनाने सम्राट चक्रवर्ती झाला, ठरला तरी, त्यामुळे ते सम्राटपद मान्य करणाऱ्या राज्याच्या सार्वभौमत्वाला किंचितही उणेपणा येत नसे. याविषयी **डॉ. जयस्वाल** यांच्या (Hindu Polity) या ग्रंथातले हे एक उदाहरण पुरे होईल. डॉ. जयस्वाल म्हणतात, " पराजित राज्य का अपहरण (Annexation) या उसके शासन में हस्तक्षेप नहीं होता था। विजित प्रदेश विजेता के राज्य में नहीं मिलाया जाता था। राज्य वापस किये जाते थे। "

अनेक शतके स्वत:ची संपन्न अर्थव्यवस्था, सार्वभौम राज्ये, वीर पुरुष आणि युद्धे इत्यादींनी परिपूर्ण गजबजलेली, वैचारिक प्रगल्भता; उच्च संस्कृती आणि उदार सहिष्णू धर्म असलेली **भारतवर्ष** ही प्राचीन भूमी आहे. तिच्या प्रचंड विस्तारामुळे, तिच्यातील भिन्नभिन्न प्रकारच्या भौगोलिक आणि प्राकृतिक परिस्थितीमुळे आणि दळणवळण व परस्पर संपर्क सुलभ नसल्या कारणाने, निरनिराळ्या चालीरीती, प्रघात, प्रथा आणि परंपरा तयार होणे स्वाभाविक होते आणि प्रदीर्घ निवासामुळे स्थानिक–निष्ठा आणि गौरवाच्या व अभिमानाच्या भावना निर्माण झाल्या. त्यामुळे राज्ये–स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे हक्क असलेली अनेक राज्ये–निर्माण झाली आणि ती राज्ये त्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी लढाया करू लागली.

राज्ये अनेक झाली तरी राष्ट्र एकच होते. राष्ट्रीयत्वाचा जन्म संस्कृती आणि धर्म यांच्यापासून होतो. संस्कृती आणि धर्म परस्परावलंबी असतात आणि त्यातून जो एक शक्तिमान स्रोत उत्पन्न होतो तोच राष्ट्ररूपाने म्हणजे त्या विशिष्ट अमर संकल्पनेत प्रकट होत असतो. वैदिक हिंदुधर्माने आणि संस्कृतीने भारताचे ' राष्ट्र ' निर्माण केले आणि त्याचे संरक्षणही केले. ते कसे ? हे **पारिव्हल ग्रिफिथ** British impact on India या ग्रंथात सांगतो– " Hinduism has protected itself throughout centuries by its flexibility and absorptive capacity." हिंदू धर्माने आपल्या लवचिकपणामुळे आणि जिरवून घेण्याच्या औदार्याने शतकानुशतके आपले स्वत:चे संरक्षण केले आहे. आपल्या A Survey of Indian History या पुस्तकात **पणिक्करही** तेच सांगतात. " Admission of Non-Aryans into the fold of Aryans finds clear Vedic sanction." " Huns could bacome Hindus and Greeks could be accepted into the Hindu fold." अनार्यांना आर्यात ' जमा ' करून घेण्याला वैदिक मंजुरी असल्याचे स्पष्ट पुरावे आढळतात. **हूण** हिंदू होऊ शकत होते आणि ग्रीकांना मज्जाव नव्हता.

निरनिराळ्या प्रकारच्या शासनयंत्रणा आणि राज्ये, त्यांच्यातल्या विशिष्ट प्रादेशिक भावना आणि अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य इत्यादी कारणांमुळे संपूर्ण भारतवर्षाची अशी एक राजकीय एकात्मता उत्पन्न होऊ शकली नाही आणि

भारत एकच सार्वभौम राष्ट्र आणि राज्य बनला नाही. परंतु हा एकट्या भारताचा दोष नाही आणि त्याला याबाबतीत हिणवण्याचे कारण नाही. फ्रान्स आणि जर्मनी यांच्यात भाषेशिवाय कसलाच फरक नाही. तरी दोन मिळून त्यांचे एकच राज्य झाले नादी. उलट त्यांच्या हाडवैराला तोड नाही. बेल्जम आणि नेदरलँडमधील राज्ये मिळून एकच राज्य का नाही? पोर्तुगाल आणि स्पेन एक का नाही? इंग्लंड, स्कॉटलंड आणि आयरलंड यांचा इतिहास काय सांगतो?

अगदी पहिल्या दाशराज्ञ महायुद्धाच्या वेळी, जे राजे सुदासाविरुद्ध उभे राहिले, ते प्रत्येकी स्वतंत्र सार्वभौम होते. कुरु–पांचाल युद्धाचे वेळी जे राजे उभय पक्षाला येऊन मिळाले, ते युधिष्ठिराचे, धृतराष्ट्राचे (किंवा दुर्योधनाचे) मांडलिक नसून, आपआपल्या मर्जीनुरूप त्या त्या पक्षाला जाऊन मिळाले; ते स्वतंत्र सार्वभौम म्हणून. पांडवांचे तर राज्यच नव्हते! तेव्हा युधिष्ठिराला मांडलिक कोठून असणार? हे युद्ध झाले ते पांडवांना एक स्वतंत्र सार्वभौम राज्य मिळावे म्हणून. या परिस्थितीचा एक दुष्परिणाम झाला, तो मान्य करावा लागतो. भारतात राजकीय विभक्तता आणि अलिप्तपणा उत्पन्न झाल्याकारणाने आत्मनिष्ठ आणि आत्मसंतुष्टवृत्ती वज्रलेप झाली. त्यातही वर्णव्यवस्था पक्की झाल्याकारणाने, युद्ध करण्याची कामगिरी, फक्त एकट्या क्षत्रियांवर सोपविली गेली.

वर्ण चारच झाले असले तरी, त्यांची संख्यावार विभागणी विषमच होती. ब्राह्मण सगळ्यात कमी, क्षत्रिय त्यांच्याइतके किंवा थोडे अधिक, परंतु एक चतुर्थांशापेक्षा कमीच, त्यांच्याशिवाय इतरांनी युद्ध करणे, हाती शस्त्र धरणे हे पाप! (शस्त्राची हिंसेची कल्पनादेखील सर्वांनाच पापप्रद) अशा स्थितीत राज्यातली तीन चतुर्थांशापेक्षाही अधिक युद्ध–क्षमता वाया गेली, किंवा त्यांच्यात धैर्य, शौर्य, साहस इत्यादी सामरिक गुण निर्माण झाले नाहीत–निर्माण होऊ दिले गेले नाहीत. 'शापादपि शरादपि' हे दुहेरी सामर्थ्य गतार्थ होऊन तर शतके उलटून गेली होती. भारतातले राजकीय सार्वभौमत्वाचे सामरिक सामर्थ्य, एकलकोंडे आणि तेही लुळेपांगळे झालेले होते. ज्या क्षणी पहिल्या परकीय आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठी एखाद्या राज्यातला एखादा एकटा एकुलता एक क्षत्रियच फक्त आपले जुने पुराणे शस्त्र सरसावून, कसाबसा उभा राहिला, तो क्षण भारतातील सार्वभौमत्वाच्या नाशाचा आणि पारतंत्र्याचा दुष्ट मुहूर्त ठरला. हे होईपर्यंत वैदिक हिंदूंच्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाचा, सर्व समावेशक उदार धर्माचा आणि सांस्कृतिक श्रेष्ठत्वाचा फार मोठा काळ उलटून गेला होता.

भारताच्या समृद्धीची आणि त्याच्या राज्यांच्या एकमेकापासून अलिप्त आणि तटस्थ राहण्याच्या वृत्तीचीही 'ख्याती', भारताबाहेरील देशात पोहोचली होती. ही भारतातली अंतस्थ परिस्थिती भारतावरील आक्रमणांना आमंत्रणे देणारी होती "A defence–less neighbour is the best inducement for

attack." असंरक्षित शेजारी–आक्रमणाचे उत्तम प्रलोभन असतो हा युद्धशास्त्राचा (आणि राज्यशास्त्राचाही) सिद्धांत आहे. भारत संघटितपणे आपले संरक्षण करीत नाही; याचाच अर्थ तो अ-संरक्षित आहे, अशी खूणगाठ बांधून, परकीयांनी भारतावर इतकी आणि इतकी एका पाठोपाठ आक्रमणे केली. इतकी आक्रमणे झालेला जगात दुसरा एकही देश नाही आणि असे असूनसुद्धा, भारतातल्या सर्वच राज्यांचे स्वातंत्र्य नष्ट झाले नाही. सिकंदराच्या स्वारीचे वेळी भारताच्या उत्तर भागातच १६/१७ स्वतंत्र सार्वभौम राज्ये होती. पौरव (पोरस) जरी सिकंदराला गवसला, तरी तेवढ्याने त्याने भारत जिंकला असे नाही. तो पराभूत होऊनच परत गेला.

आर्य चाणक्याने चंद्रगुप्ताकरवी नंदांचा नायनाट करवून, मौर्यसाम्राज्य उभे केले. चंद्रगुप्ताने **ग्रीक सेल्यूकसचा** पराभव करून **काबूल, कंदहार, हिरात** इतका मोठा भारतवर्षाच्या बाहेरील प्रदेश आपल्या साम्राज्यास जोडला होता. **सेल्यूकसने** आपली बहीण चंद्रगुप्ताला देऊन काबूलच्या पश्चिमेचा फार मोठा प्रदेश त्याला 'आंदण' दिला होता. पौराणिक काळातही इतक्या मोठ्या साम्राज्याचा एक सम्राट नव्हता. त्याचे साम्राज्य अलीकडील इंग्रजी साम्राज्यापेक्षा विस्तीर्ण होते. त्याची सेनाही युयुत्सुवृत्तीची असून अजिंक्य होती.

त्यानंतरचा दुसरा थोर सम्राट अशोक हा होता. तरीही दुसरी सार्वभौम राज्ये त्याच्याही काळात होतीच. यांच्या साम्राज्यकाळात आणि नंतरच्या गुप्त–हर्षवर्धन या साम्राज्यकाळातही पालव, चोल, चालुक्य, पांड्य इत्यादी स्वतंत्र सार्वभौम राज्ये होतीच. एवढ्या मोठ्या विस्ताराचे एकच एक राज्य असणे त्या काळातील परिस्थितीत शक्य नव्हते. विखुरलेली स्वतंत्र राज्ये यादवी युद्धामुळे क्षीण होत गेली, तरी त्यांचे सार्वभौमत्व कायम होते. इ. स. ६४७ साली हिंदुस्थानचा शेवटचा मोठा सार्वभौम सम्राट कालवश झाला. त्यानंतर परकीय मुसलमानांचे पहिले सार्वभौम राज्य ता. २४ जून १२०६ रोजी गझनीच्या महमूदाने दिल्लीत स्थापन केले. नंतर सुमारे तीनशे वर्षांच्या काळात इस्लामी सुलतान्या स्थापन झाल्या. त्या सार्वभौम होत्या आणि काही भारतीय राज्येही सार्वभौमच होती. हे आक्रमण करणारे भारतीय मुसलमान बनले. ते परत गेले नाहीत.

इ. स. १५२६ ची **बाबूराशी** इब्राहीम लोदीने दिलेली पानिपतची पहिली लढाई, एका अर्थाने भारतातली पहिली 'राष्ट्रीय लढाई' होती. कारण ती भारतीय बनलेल्या मुसलमान सुलतानाने ग्वाल्हेरच्या हिंदुराणा विक्रमाजिताच्या मदतीने सर्वस्वी परक्या मुघल बाबुराशी दिली होती. ही भारतातली पहिली हिंदु-मुसलमान युती होती. दुर्दैवाने या युतीला यश मिळाले नाही; आणि मुघलांचा पाय पक्का रोवला गेला. तेही परत गेले नाहीत. तेही कालांतराने भारतीय बनले. आपसातील वैमनस्यामुळे, एकसंघ राजकीय एकात्मभावाच्या अभावामुळेच मुसल-

मानांना आणि मुघलांना भारतीय बनता आले; आणि सार्वभौम राज्ये स्थापन करता आली. हिंदू राजांनी आक्रमकांना संघटित प्रतिकार केला नाही. प्रत्येक राजा फक्त आपल्यापुरतेच पाहू लागला. इतकेच नव्हे तर स्वार्थाकरिता आणि द्वेषभावनेमुळे स्वकीयांविरुद्ध, परकीयांना मदतही करू लागला. यथा राजा तथा प्रजा. लोकांत 'मला काय त्याचे ?' ही वृत्ती बळावली. "कोई नृप होय । हमें का हानी ?' कोणी का राजा असेना ! त्यात माझे काय नुकसान ? असे लोक समजू लागले. त्या कारणाने युद्ध प्रयत्न (War Efforts) झाले नाहीत. Organisation of Defence in Indian Constitutional history या ग्रंथात **नागेंद्रसिंह** म्हणतात "The passive subjects help foreign invasious by their complete indifference." निष्क्रिय लोक आपल्या संपूर्ण औदासिन्याने परकीय आक्रमणांना मदतच करीत असतात. याही परिस्थितीत भारतातली सार्वभौम राज्ये लहान असली तरी जिवंत होती.

अशी काही दुर्बळ (काही प्रबळ) सार्वभौम राज्ये जिवंत असतानाच आणि त्यांच्या आपसातल्या जीवघेण्या लढाया चालू असतानाच काही युरोपियन व्यापारी कंपन्यांनी भारतातील सार्वभौम राज्यांच्या परवानगीनेच आपआपल्या पेढ्या येथे उघडल्या आणि त्यांच्याही आपसात लढाया सुरू झाल्या. त्यात इंग्रजांची 'जॉन कंपनी' टिकली आणि प्रबळ झाली. तिने १८५७ पर्यंत भारतात एकही स्वतंत्र सार्वभौम राज्य शिल्लक उरू दिले नाही. कंपनीने सर्व हिंदुस्थानभर आपला अम्मल बसविला. परंतु तेवढ्याने कंपनीचा कारभार सार्वभौम राज्य ठरू शकत नाही. त्या कारभाराला राज्यशास्त्रानुसार अर्थ नाही आणि अधिकारही नाही. ज्या दिवशी कंपनीने शेवटले हिंदी राज्य खालसा केले, त्या दिवसापासून ग्रेट ब्रिटनच्या राणीने कंपनी बरखास्त करून भारताच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेऊन आपले साम्राज्ञीपद जाहीर केले, त्या दिवसापर्यंत भारतात एकही 'राज्य' नव्हते. राज्यशास्त्राला मान्य असलेली एकही प्रशासनयंत्रणा–व्यवस्था नव्हती. राज्यच नव्हते तर सार्वभौमत्व कोठून असणार ! हा काळ १८१८ ते १८५८ हा सुमारे ४० वर्षांचा काळ होता. असा अ–राजकाचा एकच राजा राज्यकर्ता नसलेला इतका प्रदीर्घ काळ जगातल्या कोणत्याही देशातल्या इतिहासात आढळून येत नाही. १८५७ च्या मे महिन्यात इस्ट इंडिया कंपनीच्या 'बंगाल इलाखा फौजेतल्या' (Bengal Army) हिंदी नेटिव्ह काळ्या, शिपायांनी कंपनीने पदच्युत केलेल्या दिल्लीच्या मुघल वंशाच्या **बहादुरशहाला** दिल्लीच्या तख्तावर बसवून भारतातल्या सार्वभौमत्वाचे पुनरुज्जीवन करण्याचा एक प्रयत्न केला होता. तो फसला; आणि सर्वस्वी परकीय राजवंशाच्या सार्वभौमत्वाचे भूत भारताच्या मानगुटीवर स्वार झाले. 'कंपनीचा कारभार' हे राज्य नसण्याचे कारण कंपनीला दलेली हिंदुस्थानात **व्यापार करण्याची सनद** इंग्रजांच्या **इलिझाबेथ राणीने** ब्रिटिश

पार्लमेंटच्या मंजुरीने दिली होती. (तिच्या विनंतीवरून भारतातल्या तत्कालीन मुघल बादशहाने कंपनीला व्यापाराचा परवाना दिला होता.) ती **व्हिक्टोरिया राणीने** ब्रिटिश पार्लमेंटात कायदा पास करून रद्द केली. म्हणून कंपनीचा भारतातील काळ हा ब्रिटिशांचा राज्य करण्याचा काळ नव्हे. तो काळ १ नोव्हेंबर १९५८ रोजी सुरू होऊन तारीख १५ आगस्ट १९४७ रोजी संपला आणि भारत पुन्हा स्वतंत्र सार्वभौम झाला.

परंतु त्याच्या सार्वभौमत्वाचे स्वरूप आता बदलले होते. आता मूळच्या भारतात दोन स्वतंत्र सार्वभौमराज्ये असून त्यांच्या लढायाही, ही दोन राज्ये होता क्षणीच सुरू झाल्या. सुमारे ९० वर्षेच फक्त इंग्रजांचे संपूर्ण भारतावर एकच सार्वभौम राज्ये होते.

या काळाविषयी **के. एम्. पणिक्कर** A survey of Indian History या ग्रंथात म्हणतात, " The only time when India was ruled from a foreign country was during the hundred and fifty years of British authority. It is therefore legitimate to speak of a British Period i. e. of a period when the policies relating to India were determined by interests of another country situated for away." ब्रिटिश वर्चस्वाच्या दीडशे वर्षांच्या काळातच फक्त भारतावर परकीयांची सत्ता होती. **पणिक्कर** कंपनी भारतात प्रबळ झाली तेव्हापासून हा काळ मोजतात. परंतु ते बरोबर नाही. भारताविषयीच्या धोरणांचे निर्णय त्या काळात दूर असलेल्या दुसऱ्या देशाच्या हित संबंधानुरूप घेतले जात असत. म्हणून या काळाला ब्रिटिश काळ असे म्हणता येणार नाही. कंपनी म्हणजे राज्य नव्हे. भारतातील स्वतंत्र सार्वभौम राजांनी कंपनीचा कारभार किंवा तिचा हस्तक्षेप मान्य केल्याने कंपनीला राजकीय मान्यता प्राप्त होऊ शकत नाही. सारांश हा की, काही थोडा काळ माझ्या मते सुमारे ९० वर्षे भारतातील सार्वभौमत्व लुप्त झाले होते.

या ९० वर्षांच्या काळात भारत निरपवाद निरंकुश अशा सार्वभौमत्व भोगणाऱ्या परकीय ब्रिटिश राज्यसत्तेखाली एकछत्री राज्य म्हणून आपले परतंत्र लाजिरवाणे जिणे जगत असला तरी, त्याचे राष्ट्रीयत्व कायम होते आणि त्याची प्राचीन संस्कृतीही काही प्रमाणात भ्रष्ट झाली असली तरी नष्ट झाली नव्हती. इतिहासाची पुनरावृत्ती होते म्हणतात, तशी परिस्थिती भारतीय लोक, राणीचे प्रजाजन होताच झाली होती. 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' ही जुनी वृत्ती पुन्हा अवतरली. राणीचे राज्य हे ईश्वरी वरदान असल्याचा काही महाभागांना साक्षात्कार झाला होता. परंतु हा कलंक नष्ट करून टाकण्याची, पुसून टाकण्याची ईर्षा असणारे आणि त्याकरिता सर्वस्वाचे बलिदान करणारे निधड्या छातीचेही लोक होतेच.

या काळाविषयी **पर्सिव्हल ग्रिफिथ** British impact on India या ग्रंथात लिहिते " The most important illustration of that fact (influence of European Civilisation) is to be found in the devolopment of Indian nationality and growth of Indian–Nationalism. India for Centuries possessed a marked cultural unity. But some dynamic force was required. That force was provided by British Rule." हिंदुस्थानावरील युरोपियन प्रभावाचे महत्त्वाचे उदाहरण हिंदुस्थानात झालेल्या राष्ट्रीयत्वाचा विकास आणि राष्ट्राभिमानाची जोपासना हे आहे. शतकानुशतके हिंदुस्थानात सांस्कृतिक ऐक्य होते. परंतु त्याला प्रोत्साहक शक्तीची गरज होती. ती शक्ती ब्रिटिश प्रशासनाने पुरविली. **ग्रिफिथ साहेबाने** लिहिलेल्या Rule या शब्दाच्या आधी M I S ही तीन अक्षरे जोडली म्हणजे त्याचे हे विधान खरे ठरेल. कारण Adversity is the cement of unity आपत्काल ऐक्य निर्माण करतो असे एक सिद्ध झालेले सुभाषित आहे. ब्रिटिशांचे राज्य जर सु-राज्य असते तर इतक्या लवकर आणि इतक्या तीव्रतेने भारतीयांचा राष्ट्राभिमान चवताळून उठला नसता. **लोकमान्यांनी** " राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे " या शीर्षकाच्या **केसरीच्या** एका अग्रलेखात ब्रिटिशसरकारला असे ठणकावून सांगितले होते.

इंग्रजी राज्याचा परिणाम राष्ट्राभिमान जागृत करणारा झाला तसाच स्वत्व विसरायला लावणाराही झाला. **मायकेल एडवर्ड** Last days of British in India या ग्रंथात लिहितो, " Western education has produced a new-class, Indian in blood and colour but English in tastes, opinions, moral and interests. A well intentioned Ma Bap government *sapped the selfrespect* and *manlyness* of *the Indian people."* पाश्चिमात्य शिक्षणाने, रक्ताने आणि वर्णाने हिंदी, परंतु आवडी, मते, नीती आणि स्पृहा यांनी इंग्रज, असा एक नवा वर्ग निर्माण केला आहे. सद्हेतू असलेल्या **मायबाप सरकारने हिंदी लोकांचा स्वाभिमान आणि पौरुष निःसत्त्व करून टाकले.** (भारत स्वतंत्र झाल्यावर गेल्या तीस वर्षांत हा वर्ग भयंकरच फोफावला आहे. आता शुद्ध भारतीय असे काहीच कोठे दिसत नाही. आता ममी, डॅडी, डिम्पी, पिंकी, हे विलायती प्राणी घरोघरी धुडघूस घालीत आहेत. माय, मा, आई, बाबा, बाळ, बेटा, बेटी घरात असणे हा भयंकर मागासलेपणा आणि असंस्कृतपणा ठरला आहे. इंग्रज गेला परंतु कवित्व मागे ठेवून गेला. आता त्याची महाकाव्ये बनली आहेत.)

' मायकेल एडवर्ड साहेबाचे ' हे वर्णन जितके पूर्ण सत्य आहे तितकेच ते मर्मभेदी आहे. ज्यांनी राज्ये स्थापन केली; युद्धात रणनेतृत्व केले; मोठमोठी सैन्ये ज्यांच्या पदरी होती; कित्येक गोऱ्या फौजी अधिकाऱ्यांना ज्यांनी आपल्या

सैन्यात नोकऱ्या दिल्या; ज्यांनी इंग्रजांना अनेक लढायांत धूळ चारली; त्या स्वतंत्र राजा, महाराजांच्या वंशजांना इंग्रजांच्या **' ऑनररी कॅप्टन, मेजर '** या सामान्य पोकळ पदव्या, भूषणास्पद वाटू लागल्या. त्या पदव्यांत बढती मिळावी म्हणून, काही 'मा बाप सरकारची' हाजी हाजी करू लागले. तोफांच्या फुसक्या बारांच्या एखादे वेळच्या (आणि तीही आपल्याच राज्यात (?) फक्त) सलामीकरिता, लांगूलचालन करू लागले. त्यांना पेंनशनांच्या खैरातीची खंत वाटेनाशी झाली. आणि पेंनशन मिळावे म्हणून किंवा ते अधिक व्हावे म्हणून भिकेचा पदर पसरण्याची लाज वाटेनाशी झाली. हिंदू, शीख, मुसलमान राजे महाराजे, नबाब सुलतान झाडून सारे भारताच्या परक्या सार्वभौम सरकारच्या दावणीला बांधले गेले. यापेक्षा अधःपात तो दुसरा कोणता ?

राजनीतीच्या सिद्धांतानुसार परतंत्र भारताच्या संरक्षणाचा भार सार्वभौम ब्रिटिश सरकारवर पडला आणि तो अधिकार फक्त त्यालाच मिळाला आणि तो अधिकार त्याने चोख बजावला. भारताच्या परतंत्र भूमीवर त्याने दुसऱ्या कोणाचे पाऊल पडू दिले नाही. इंग्रजांनी भारताचे रक्षण केले. याचा अर्थ त्यांनी आपल्या साम्राज्याचे रक्षण केले. भारत त्या साम्राज्यात होताच. (नव्हे त्यात भारत गवसला म्हणूनच ते साम्राज्य झाले.) त्याचे वेगळे रक्षण करावयाचे प्रयोजनही नव्हते. इंग्रजांच्या रणनीतीचा एक विशेष आहे. त्याविषयी त्याचाच एक सेनापती जनरल पर्सिव्हल अभिमानाने म्हणतो, " Great Britain always defended itself on lands except their own. " ग्रेट ब्रिटनने स्वतःचे संरक्षण केले ते नेहमीच दुसऱ्यांच्या भूमीवर लढाया करून, स्वतःच्या कधीच नाही. नार्मंडीचा ' डयूक विल्यम दि कांकरर ' नंतर दुसऱ्या कोणाचेही आक्रमक पाऊल ब्रिटिश बेटांच्या मातीवर उमटले नाही. परंतु ही रणनीती भारताच्या महाराष्ट्रातील ' डोंगरी ' राहणाऱ्या एका ब्रह्मचारी गोसाव्यालाही माहीत होती. तो सांगून गेला आहे. " युद्ध करावे खणखणाटे । सीमा सांडोनी ॥ " आपल्या भूमीवर नव्हे.

५

संरक्षणाचे अधिकार ग्रहण

युद्ध हाच संरक्षणाचा एकमेव प्रभावी उपाय असतो. तो प्रत्येक स्वतंत्र सार्वभौम राज्याचा हक्क आणि अधिकार असतो. युद्ध हे राज्याच्या सार्वभौमत्वाचे सर्वोच्च प्रकटीकरण असते. हे जरी खरे असले तरी हिंदुस्थानाला हे हक्क तो परतंत्र असतानाच मिळाले होते आणि त्याने ते जाहीरपणे प्रकटही केले होते आणि त्यावर दुसऱ्या एकाही सार्वभौम राज्याने आक्षेप घेतलेला नव्हता. हा भारताच्या अत्याधुनिक सार्वभौमत्वाच्या प्राप्तीचा एक खास विशेष आहे. हा विशेष त्याच्या हक्काच्या सार्वभौमत्वाचे प्रसाद–चिन्ह ठरला.

ता. १ आक्टोबर १८६८ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने एक कायदा पास करून इस्ट इंडिया कंपनी बरखास्त केली. हिंदुस्थानच्या प्रशासन–व्यवस्थेला ' हिंदुस्थान सरकार ' Government of India हे नाव दिले. हे नाव नावापुरतेच सरकार होते. ते ब्रिटिश साम्राज्य प्रशासनाचे एक ' खाते ' होते. या तथाकथित सरकारचा एक सचिव Secretary of State for India नेमला. या पदनामात ' For–करिता ' हा शब्द लक्षणीय आहे. कंपनीच्या गव्हर्नर जनरल या पदनामाला ' आणि प्रति–उप राजा /राणी Vice Roy ' हे पद जोडले. कंपनीची काळी नेटिव्ह फौज आपल्या चाकरीत घेतली. कंपनीच्या वेळी, ब्रिटिशांची ' शाही फौज ' कंपनीच्या मदतीसाठी हिंदुस्थानात होती, ती तशीच चालू राहिली.

या इंग्रज फौजेचे नाव होते Army in India-हिंदुस्थानात असलेली फौज. हिंदुस्थानी फौजेचा उल्लेख दोन नावांनी केला जात असे. एक Indian Army-हिंदी फौज आणि दुसरा Army in India-हिंदुस्थानातील फौज. इंग्रजांची काळी गोरी सर्वच फौज वस्तुतः Army in Indian होती. ती फौज Army of Occupation होती. पराभूत राज्यात आपल्या अधिसत्तेचे प्रदर्शन करण्याकरिता, ते राज्य ताब्यात ठेवण्याकरिता, तेथील लोकांवर आपला दरारा आणि वचक बसविण्याकरिता, जी फौज जेते त्या राज्यात ठेवीत असतात, त्या फौजेला Army of Occupation म्हणतात. Army in India या नावाचा हा खरा अर्थ आहे. Indian Army या नावाला अर्थच नाही आणि जो काही अर्थ असेल त्याचा अर्थ इतकाच, की त्या फौजेत हिंदी–काळे सैनिक आणि काही कनिष्ठ हिंदी अधिकारी हिंदी होते.

या फौजेच्याच बळावर ग्रेट ब्रिटनने हिंदुस्थानचे आणि आपल्या साम्राज्याचे रक्षण केले आणि ते वाढविलेही. ही फौज ब्रिटिशांकरिता अनेक देशांत जाऊन लढली आणि तिने त्यांच्याकरिता अनेक नेत्रदीपक विजयही मिळविले. १९१४ साली सुरू झालेल्या पहिल्या जागतिक महायुद्धात, अर्थातच हिंदुस्थानी फौज लढली होती. ब्रिटिश साम्राज्याच्या कोणत्याही युद्धाच्या वेळी **हिंदुस्थान सरकारने** आधी युद्ध पुकारून नंतर सैन्य आघाडीवर पाठविले नव्हते. कारण हिंदुस्थान सरकारला स्वतंत्र वेगळे असे अस्तित्वच नव्हते. म्हणून त्याला संधि–विग्रहाचा अधिकारही नव्हता. तथा कथित हिंदुस्थान सरकारला, प्रत्येक गोष्ट 'सम्राट सेवार्थ' On His Majesty's Service करावी लागत होती. हिंदुस्थान सरकारला आंतर–राष्ट्रीय स्थान नव्हते. कारण ते सरकार एखाद्या स्वतंत्र सार्वभौम राज्याचे सरकार नव्हते.

परंतु दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या वेळी, त्या वेळचे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल आणि व्हाईसरॉय लॉर्ड **लिनलिथगो** यांनी ग्रेट ब्रिटनने जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर करताच, हिंदुस्थानच्या वतीने वेगळे स्वतंत्रपणे जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केले. (हिंदुस्थान स्वतंत्र नव्हता. त्याचे पोलंडशी किंवा दुसऱ्या कोणत्याही देशाशी कसलेच राजकीय संबंध किंवा करारमदार नव्हते आणि हिंदुस्थानला कोणत्याही सुखदुःखाविषयी सोयरसूतक नव्हते!) परंतु ते त्यांनी हिंदुस्थानातील कायदे मंडळाच्या सल्ला–मसलती–अनुमतीशिवाय, इतकेच नव्हे तर कोणासही कसलाच सुगावा न लागू देता, कोणालाही विश्वासात न घेता, जाहीर केले. (येथूनच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चाके अतिशय वेगाने फिरू लागली.) अर्थात त्यांना तसा ब्रिटिश पार्लमेंट म्हणजे प्रधान मंत्री यांचा आदेश मिळाल्यावरून त्यांनी तसे केले हे उघड आहे. परंतु ती युद्धघोषणा, युद्ध करण्याचा अधिकार असलेल्या स्वतंत्र देशाच्या प्रतिनिधीने केलेली नसल्याकारणाने, निरर्थक आणि हास्यास्पद होती. हिंदुस्थानपेक्षा किती तरी पटींनी, नव्हे जवळजवळ स्वतंत्र अस-

लेल्या ब्रिटिशांच्या ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलन्ड किंवा आफ्रिका यांतील एकाही वसाहतीने वेगळचा युद्धघोषणा केल्या नव्हत्या. असे असताना हिंदुस्थानकडून ब्रिटिश सरकारने अशी युद्धघोषणा करविली आणि फक्त आठ वर्षांनी हिंदुस्थान स्वतंत्र झाला. हा त्याच्या सार्वभौमत्वाच्या पहिल्या विशेषाचा इतिहास आहे. यात परमधूर्त दूरदर्शी ब्रिटिश मुत्सद्देगिरी कोणती असेल ती असो ! परंतु भारताला एक शुभशकुन झाला; यात संशय नाही. नंतरच्या १९४२ च्या 'चले जाव'च्या मागणीत हिंदुस्थानकडून न विचारता युद्ध पुकारले गेले हाही एक मुद्दा होता.

हे दुसरे जागतिक महायुद्ध चालू असतानाच ग्रेट ब्रिटन, रशिया, अमेरिका आणि **चांग काय शेकचा चीन** या बडचा चौकडीने एक जाहीरनामा (Mosco Declaration). काढला होता. त्यात म्हटले होते–"They (ती बडी चौकडी) recognised the necessity of establishing at the earliest practicable date, a general international organisation based on the principles of sovereign equality of all peace-loving States, and open to membership of all such States large or small for maintenance of peace and security." शांतताप्रिय छोटचाबडचा समान सार्वभौमत्व असणाऱ्या राज्यांना सभासदत्व खुले असणारी, समान सार्वभौमत्वाच्या तत्त्वावर आधारलेली, शांतता आणि सुरक्षितता कायम राखण्यासाठी, व्यवहारत: शक्य होईल तितक्या लवकर, एक खुली आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याची आवश्यकता **त्यांना** जाणवली. **याल्टा परिषदेत** या संघटनेचा तपशील ठरविण्यात आला व United Nations Organisation–'संयुक्त राष्ट्र संघटना' स्थापन झाल्याचे जाहीर झाले. ज्या **स्वतंत्र राज्यांनी** ता. १ मार्च १९४५ च्या आधी 'अक्षपक्षा'विरुद्ध (जर्मनी आणि त्याचे दोस्त मंडळ) युद्ध पुकारले असेल, त्या राज्याला या संस्थेचे संस्थापक आणि मूळ–सदस्यत्व (Founder and Original membership) देण्यात आले. हिंदुस्थानने दिलेल्या तारखेच्या आत (कारण आणि अधिकार नसूनही) जर्मनीविरूद्ध युद्ध पुकारलेले होते. परंतु भारत स्वतंत्र राज्य नव्हते. तरीही त्याला यूनोचे संस्थापक आणि मूळ सदस्यत्व बहाल करण्यात आले होते. हिंदुस्थानने युद्ध पुकारणे हा एक आगाऊपणाच होता. तसे करण्याचा त्याला यत्किंचितही अधिकार नव्हता. ता. २५ एप्रिल १९४५ रोजी सान्फ्रान्सिस्को येथे यूनोची पहिली बैठक भरली होती. त्या बैठकीला ५१ सभासद–प्रतिनिधी हजर होते. ते स्वतंत्र सार्वभौम राज्यांचे (छोटचाबडचा प्रबळदुर्बळ) प्रतिनिधी होते. त्यात आंतरराष्ट्रीय स्थान नसलेल्या, ब्रिटिशांचा गुलाम असलेल्या, तथाकथित हिंदुस्थान सरकारचा प्रतिनिधी (?) होता–अनधिकृतपणे परंतु बडचांच्या औदार्याने आणि त्यांनी केलेल्या नियमभंगामुळे–हजर होता. हा भारताच्या सार्वभौमत्वाच्या इतिहासातला दुसरा खास विशेष आहे आणि ही घटना घडली ती

"मी ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे फुंकण्याकरिता पंतप्रधान झालो नाही" ही दर्पोक्ती उच्चारणाऱ्या **चर्चिलच्या** कार्यकालात ! उद्दाम चर्चिलला भारताचे असे विपरीत आणि अर्थहीन का असेना, स्वातंत्र्य (?) सहन होणे, हे एक राजकीय कोडे आहे.

दुसरे महायुद्ध संपले. दोस्त विजयी झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे ब्रिटिश सरकारने कबूल केले होते. त्याप्रमाणे त्यांनी लॉर्ड मौंटबेटन यांना व्हाईसरॉय नेमून स्वातंत्र्याचे दान पूर्ण करण्यास हिंदुस्थानात पाठविले. या शेवटल्या व्हॉईसरॉयने आल्याआल्याच घोषणा केली, "मी हिंदुस्थान स्वतंत्र करण्याकरिताच व्हॉईसरॉय झालो आहे."

त्याच्या आधीच्या–उपान्त्य व्हॉइसरॉयने हिंदुस्थानातली युद्ध काळात 'चले जाव' चळवळीने बंद पडलेली प्रांतिक स्वायत्तता पुन्हा सुरु करावयाचे ठरवून 'बंद' केलेल्या काँग्रेस वर्किंग कमेटीच्या सभासदांस आणि दुसऱ्या पुढाऱ्यांस मुक्त केले. तिकडे ग्रेट ब्रिटनमध्ये निवडणुकी होऊन मजूर पक्षाचे सरकार स्थापन झाले आणि चर्चिलचा उपयोग संपला असल्याने, त्याला 'रूखसत–ई–पानदान' मिळाले. त्याच्या पक्षाचे तूर्तास दिवाळे फुंकले गेले आणि भारताची स्वातंत्र्याकडे वाटचाल सुरू झाली. त्यातले पहिले संरक्षणविषयक भरीव पाऊल म्हणजे, नवीन मध्यंतर-कालीन सरकारात (Interium Government) **बलदेवसिंग** पारतंत्र्याच्या काळातले पहिले हिंदी संरक्षण मंत्री झाले आणि त्यांच्या वॉर डिपार्टमेंट या **खात्याच्या** नावातल्या वॉर या शब्दाला हिंसेचा वास येत होता म्हणून, तो बदलून त्याच्याऐवजी **डिफेन्स** हा सोवळा शब्द घातला गेला. हा भारताच्या सार्व-भौमत्वाचा तिसरा विशेष होता. शेवटल्या क्रिप्स मिशननेही संरक्षण आणि सैन्य हा विषय इंग्रजांच्याच फक्त खास अखत्यारीतच असलेला 'राखीव'–Reserved विषय ठेवला होता. आता ते पर्व संपून हिंदुस्थानाच्या संरक्षणाचा नवा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला होता; आणि हिंदुस्थानी सैन्याचे केवळ ताब्यात ठेवणारे सैन्य Army of Occupation हे स्वरूप बदलणे सुरू झाले होते.

इंग्रजांनी हिंदुस्थानातील आपला राज्यकारभार गुंडाळण्याची शेवटची तारीख १ जून १९४८ ही ठरविली होती. परंतु अनेकांना घाई सुटल्याकारणाने ती अलीकडे ओढून १५ ऑगस्ट १९४७ ही ठरविण्यात आली. ता. ३ जून १९४७ रोजी जवाहरलाल नेहरूंनी हिंदुस्थानचे विभाजन करण्यास संमती दिली आणि विभाजनाच्या कामाला भयंकर वेगाने सुरुवात झाली. रात्र थोडी होती आणि सोंगे फार होती. फक्त तीनच दिवसांनी 'विभाजन मंडळ'–Partition Council स्थापन झाले. आता देशाचे दोन स्वतंत्र (तीन) तुकडे होणार होते. त्या दोन्ही देशांची अर्थातच सेनादले सिद्ध व्हावयाची होती. त्या सेनादलाची नवी स्वतंत्र दोन सेनादले हिंदुस्थानी सेनादलातूनच वेगळी काढावयाची होती. म्हणून हे काम

करण्याकरिता एक' सेनादल–पुनर्रचना समिती– Armed forces Reconstitution Committee तशीच घाईघाईने स्थापन करण्यात आली. या समितीने विभाजनाची जी योजना आणि जो कार्यक्रम ठरविला होता तो पुढीलप्रमाणे होता––

(१) हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन राज्यांनी आपआपल्या देशाच्या–ज्या वाटणीत येतील त्या–फौजा, ता. १५ आगस्ट १९४७ च्या आत, आपआपल्या देशात आणि आपआपल्या अधिकारात घेतल्या पाहिजेत. एकसंध हिंदुस्थानच्या फौजा सर्व देशभर विखुरलेल्या होत्या. त्यातला बराच मोठा भाग उत्तर भारतातच होता. बरेचसे पाकिस्तानही उत्तर भारतातूनच कोरून काढलेले होते. त्याभागात हिंदुस्थानच्या वाट्याला आलेल्या बऱ्याच मोठ्या फौजा होत्या. त्या परत आणणे, हे त्यावेळी सबंध हिंदुस्थानात पेटलेल्या हिंदुमुसलमानांच्या अक्राळ विक्राळ भयंकर दंगलीच्या नाजूक वेळी परत आणणे, हे अतिशय किचकट, कठीण आणि जोखमीचे काम होते. परंतु ते करणे भाग होते. दुसऱ्या परक्या (!) देशात आपल्या फौजा ठेवता येत नाहीत. तो देश त्या राहू देत नाही. ही परिस्थिती पाकिस्तान आणि हिंदुस्थान या दोघांनाही सारखीच लागू होती. हिंदुस्थानने पाकिस्तानला काही काळाकरिता ही सवलत खात्रीने दिली असती. शेवटली इंग्रज गोरी पलटण भारत स्वतंत्र होऊन दीड वर्षानंतर भारताबाहेर गेली. भारताने तिला जाताना प्रेमाच्या भेटी दिल्या आणि तिला सन्मानाने निरोप दिला. भारताच्या लष्करी बँडने त्यांचे राष्ट्रगीत God save the king आणि Olde Lang Sang हे प्रेमगीत वाजवून निरोप दिला. पाकिस्तानकडून हे कालांतरीही होणे शक्य नाही. भारताचा एक जवान जरी थोडा उशिराने परत आला असता तर पाकिस्तानने तेव्हाच भारताविरुद्ध युद्ध सुरू केले असते.

(२) दोन्ही देशांच्या जल, स्थल आणि वायू या तीन्ही दलांची आपआपली स्वतंत्र मुख्यालये-Head Quarters १५ ऑगस्ट १९४७ रोजी कार्यान्वित झाली पाहिजेत व त्याच दिवसापासून त्या त्या देशाच्या संरक्षण मंत्र्याच्या अथवा तो देश नामांकन करील त्या अधिकाऱ्याच्या हुकुमतीखाली गेली पाहिजेत.

(३) दोन्ही राज्यांनी आपआपले सरसेनापती ता. १५ ऑगस्ट १९४७ या तारखेपर्यंत नियुक्त केले पाहिजेत. हे दोन्ही सरसेनापती दोन्ही राज्यांच्या संयुक्त संरक्षण मंडळाच्या (Joint Defence Council) अधिकाराखाली त्याच दिवसापासून येतील.

यातला तिसरा संयुक्त संरक्षण मंडळ (Joint Defence Council) हा भाग अनावश्यक होता आणि लगेच घडून आलेल्या घटनांवरून भारताच्या शरीरात प्रवेश करणाऱ्या कर्क रोगाचे (Cancer) तो मूळ ठरला; हे सिद्ध झाले. इंग्रजांचे एक असो ! आता त्यांना भारतात स्वारस्य नव्हते आणि जे होते ते विरोधी होते. परंतु जवाहरलाल नेहरूंनी या तिसऱ्या भागाला मान्यता

द्यावयास नको होती ! ती का दिली हे आश्चर्य आहे, परंतु त्यात आश्चर्य ते कसले ? त्यांनी मातृभूमीचे तुकडे मान्य केले होते. आता हे कलम मान्य करून ज्याच्यापासून संरक्षण करावयाचे होते, त्याच्याच गळचात नेहरूंनी हिंदुस्थानाचा गळा गोवला. हे त्यांच्या स्वप्नरंजनाला शोभणारे सौजन्य होते, तसेच ते आपला मित्र मौंटबेटन आणि त्याच्यामार्फत इंग्रज, यांच्याविषयीच्या सुहृद्भावाचे प्रदर्शन आणि पुरावा होते; असा निष्कर्ष काढता येतो. हे संयुक्त संरक्षण मंडळ १५ ऑगस्ट १९४७ रोजीच स्थापन झाले होते. या मंडळाची शेवटली बैठक ता. १९ मार्च १९४८ रोजी भरली होती. या मंडळाच्या कार्यकालातच, पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या नावाने भारतात विलीन झालेल्या भारताच्या काश्मीरवर हल्ला चढवून या संयुक्त संरक्षण मंडळाचा भयंकर फजीतवाडा केला आणि नेहरु यूनोत पाकिस्तानविरुद्ध भारताचे गाऱ्हाणे घेऊन गेले होते.

हे संयुक्त संरक्षण मंडळ स्थापन होण्याच्यापूर्वी संरक्षण मंत्री **बलदेवसिंग** यांनी ३० नोव्हेंबर १९४६ रोजी **गोपालस्वामी अय्यंगार** यांच्या अध्यक्षतेखाली एक 'सशस्त्र सेनादल राष्ट्रीयकरण समिती' " Armed forces Nationalization Commitee " स्थापन केली होती. या समितीने 'राष्ट्रीयीकरणाची' काय कामगिरी केली अथवा ती करू शकली हे उजेडात आलेले नाही. त्यावेळी विभाजन झालेले नव्हते. नुसती 'आशय दर्शक' नावे आतून किती पोकळ असतात, त्याचा हा एक मासला होता आणि त्यात **गोपालस्वामी अय्यंगार** हा एक मोठा मोहरा खर्ची घातला होता.

द्विखंड भारताच्या राज्यकारभाराच्याविषयी नेहरूंनी दोन अंतरिम सूचना मांडल्या होत्या. **पहिली** सूचना ही होती की दोन्ही राज्यांच्या आपआपल्या घटना तयार होऊन त्यांची अंमलबजावणी सुरू होईपर्यंत दोन्ही देशांचा एकच गव्हर्नर जनरल असावा, (स्वातंत्र्यानंतर व्हॉइसरॉय पद गतार्थ होणार होते.)आणि तो त्यांचा मित्र लॉर्ड मॉउंटबेटन हाच असावा. परंतु धूर्त आणि कायदेपंडित जिनांनी ही सूचना अमान्य केली. त्यांना एकतर आपल्या देशाच्या राज्यकारभाराचा कोण्या परक्याला वाससुद्धा लागू द्यावयाचा नव्हता; किंवा त्याच्यावर कोणा परक्याची सावलीही पडू द्यावयाची नव्हती. तसेच त्यांना हट्टाने मिळविलेल्या स्वतंत्र राज्याचा पहिला सर्वोच्च प्रशासक होण्याची इच्छा असावी (ती योग्यच म्हटली पाहिजे). नेहरूंची **दुसरी** सूचना ही होती की दोन्ही राज्यांचा एकच सर्वोच्च सरसेनापती असावा आणि तो चालू सरसेनापती जनरल ऑकिन्लेक हा असावा. ही सूचना दोन्ही देशांच्या 'संयुक्त संरक्षण मंडळाच्या नियुक्तीला' अनुसरूनच होती. (येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सरसेनापती कितीही मोठा असला तरी तो श्रेष्ठ आणि ज्येष्ठतेत गव्हर्नर जनरलपेक्षा खालीच असतो. त्याचा सल्ला गव्हर्नर जनरलने मानला पाहिजे असे नाही. त्याशिवाय युद्धा-

संबंधी सर्व अंतिम निर्णय घेणे हे गव्हर्नर जनरलच्या एकटयाच्याच अधिकारात असते. **किचनेर** सरसेनापती आणि **कर्झन** गव्हर्नर जनरल (व्हाईसरॉय) यांच्यातील विवाद दुसऱ्या एका बाबतीतला असला तरी त्यात सर्व प्रश्नोपप्रश्नांची छाननी होऊन अंतिम निर्णय सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया याने किचनेरविरुद्ध दिला होता. तेव्हापासून गव्हर्नर जनरलला **बडेलाट** आणि सरसेनापतीला **जंगीलाट** ही हिंदुस्थानी नावे मिळाली होती. सरसेनापती लाट खरा; परंतु तो फक्त 'जंग' युद्धापुरताच. 'जंगी' म्हणजे 'मोठा' 'बडा' हा अर्थ नाही). सर्वोच्च सरसेनापतीशिवाय दोन्ही राज्यांचे आपआपले वेगळे सरसेनापती असावे, ही सूचना जीनांनी सहर्ष मान्य केली. त्यात त्यांचा एक दूरदृष्टीचा धूर्त डाव होता, हे पुढील घटनांवरून स्पष्ट झाले.

नेहरूंच्या या सूचनांचे फलित हे होते की **जीना** पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले. **मौंटबेटन** हिंदुस्थानचे जी. जी. झाले. **ऑकिन्लेक** उभय राज्यांचे पहिले सर्वोच्च संयुक्त सरसेनापती झाले. **लॉकहार्ट** हे हिंदुस्थानचे आणि **मेसव्हीं** पाकिस्तानचे सरसेनापती झाले.

आता जुन्या हिंदुस्थानच्या सशस्त्र सेनादलांच्या हिस्सेरशीच्या प्रमाणात (Ratio and Proportion) वाटण्या करण्यास सुरुवात झाली. या हिस्सेरसीच्या वाटण्यात पाकिस्तानने कित्येक बाबतीत चांगलीच रस्सीखेच केली. त्यामुळे प्रकरणे लवादाकडे न्यावी लागली. शेवटी सेनादलांची वाटणी झाली. ही वाटणी लॉर्ड मौंटबेटन यांचा अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या विभाजन समितीने (Partition Council) केली. प्रत्यक्ष वाटणीचे काम संयुक्त सर्वोच्च सरसेनापती जनरल ऑकिन्लेक यांनी केले.

सेनादलांच्या मनुष्यबळाच्या वाटणीत दोन्ही राज्यांच्या लोकसंख्यांच्या व सेनादलातील निरनिराळ्या धर्मांच्या सैनिक आणि अधिकारी यांच्या प्रमाणात वाटणी करण्यात आली. तसेच त्यांच्या इच्छांचाही विचार करण्यात आला. पाकिस्तानी सैन्यात जाण्यास एकही हिंदू तयार झाला नाही आणि यदाकदाचित कोणी झाला असता तर पाकिस्तानाने त्याला घेतले नसते आणि घेतले असते तर त्याचे काय झाले असते हे उघडच होते. पाकिस्तानने **गुरखा** पलटणी घेतल्या नाहीत; आणि कडवे हिंदू गुरखे पाकिस्तानची नोकरी करणे शक्य नव्हते. ब्रिटिशांनी गुरखा पलटणी घेतल्या आणि गुरखेही खुषीने इंग्रजांच्या नोकरीत गेले. गुरख्यांच्या हिंदुस्थानी आणि ब्रिटिश फौजेत असण्याला **नेपाळ** या स्वतंत्र राज्याची इंग्रज नेपाळ यांच्यातील एका तहाने अनुमती आहे. दुसरी गोष्ट सर्वच गुरखे नेपाळी नाहीत. बरेचसे हिंदी नागरिक आहेत. **तेनसिंग** भारताचा नागरिक आहे, नेपाळचा नाही. याच्या उलट कित्येक मुसलमानांनी भारताच्या सैन्यातच राहणे पसंत केले. भारताने त्यांचे स्वागत केले. नंतर हैद्राबाद संस्थान मोडून टाकल्यावर, निजामाच्या

मुसलमान पलटणीचा भारताच्या पलटणीत समावेश करण्यात आला. त्यात मराठा लाईट इन्फन्ट्रीमध्ये हैद्राबादी मुसलमानांची एक पलटण आली. जे कोणाचीच चाकरी करू इच्छित नव्हते त्यांना उरलेल्या नोकरीच्या काळाबद्दल आणि निवृत्ति-वेतनाऐवजी रोख रकमा देऊन मुक्त करण्यात आले.

स्थावर–इमारती वगैरे–हलविणे शक्य नसल्याकारणाने ते सर्व 'होते तेथे आणि तसे' As and where is या तत्त्वानुसार त्या त्या राज्याकडे गेले. त्यांच्या किंमती ठरविण्यात येऊन त्या रोकड देण्याघेण्यात, वळत्या करून घेण्याचे ठरविण्यात आले. भारताने जो जंगममाल पाकिस्तानच्या वाटणीत घ्यावयाचा होता तो सर्व त्याने दिलेल्या मुदतीच्या आत पाकिस्तानला पोहोचता केला. परंतु पाकिस्तानने भयंकर खळखळ केली. अनेक वेळा मुदती वाढवून द्याव्या लागल्या.

रोकडीच्या हिशेबात पाकिस्तानकडून २४·३८ कोटी रुपये घेणे निघत होते. ती रकम भारताने पाकिस्तानाला ५५ कोटी रुपये (दुसऱ्या हिशेबात) द्यावयाचे होते तिच्यात 'वळती' करून घेऊन बाकी पाकिस्तानला द्यावी असा भारत-सरकारने बेत केला होता. परंतु भारताच्या प्रशासनात कोणतेही स्थान नसलेल्या आणि ज्या पक्षाचे प्रशासन होते, त्या पक्षाचा 'चार आण्याचा' **प्राथमिक–सभासदही** नसलेल्या आणि भारताचे विभाजन (तोंडाने) मान्य नसलेल्या गांधींनी प्राणांतिक उपोषणाचा (अहिंसक) धाक दाखवून ही पंचावन कोटींची पूर्ण रकम एकमुस्त भारतसरकारकडून पाकिस्तानला देवविली. ता. २६ जानेवारी १९५० पर्यंत पाकिस्तानने भारताला द्यावयाची संरक्षणाविषयीची वर उल्लेखिलेली येणे रकम दिली नव्हती.

अशा रीतीने दोन स्वतंत्र सार्वभौम राज्यांच्या सशस्त्र सेना वेगळ्या झाल्या. या सेनांना आता आपआपल्या राज्यांच्या लढाया लढावयाच्या होत्या. पाकिस्तानाने ते काम ताबडतोब सुरू केले. कारण तो विस्तारवादी; त्याला मिळालेले स्वतंत्र्य फुकटात मिळालेले आहे. त्यामुळे त्याची जातीची आक्रमक वृत्ती अधिकच चेकाळून उठली आहे. त्याला भारताशी तणावाची स्थिती-Confrontation कायम ठेवावयाची आहे. हा पाकिस्तानचा भारताच्या संबंधातला संरक्षणाचा पवित्रा आहे. **भुत्तो** आपल्या Independence a myth या पुस्तकात लिहितो : " Confrontation which means neither war nor peace, must be continued as a means of *self defence.*" धड युद्ध नाही आणि शांतीही नाही अशी तणावाची परिस्थिती **स्वसंरक्षणाकरिता** पाकिस्तानने कायम राखली पाहिजे. Friends not Masters या पुस्तकात अयूबखान लिहितो, " पाकिस्तानचे दहा कोटी मुसलमान, आपल्या हृदयातील 'लाइला इल्लिल्लाह महम्मद रसूल इल्लाह' या पवित्र श्रद्धेशी इमान राखून, नापाक हिंदूंच्या तोफांची तोंडे कायमची बंद पाडीपर्यंत प्राणपणाने लढत राहतील." बांगला देशाबाबतच्या युद्धात लाजीरवाणा पराभव होऊनही

याह्याखान वदले " आम्ही हिंदुस्थानशी हजार वर्षे लढू. बांगला देशाची निर्मिती म्हणजे हिंदुस्थानचा अस्त." पाकिस्तानचे आत्मसंरक्षण असे आहे.

त्याला आता भारत लढाई करून घ्यायचा आहे. परंतु सैन्याच्या वाटणी-पासूनच भारत आपल्यावर केव्हा चढाई करील याचा नेम नाही. अशा ' उलटचा बोंबा, त्याने सुरू केल्या. वाटणीपासूनच तो आपली सेनादले वाढवू लागला. त्यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज करू लागला. ग्रेट ब्रिटन आणि बलाढ्य अमेरिका यांची मैत्री संपादन करण्याच्या कार्याला लागला. **सियाटो**-SEATO, **सेंटो**-CENTO यांच्यासारख्या गटात सामील होण्याच्या खटपटीस लागला. पाकिस्तानने सर्वंकष आक्रमक पवित्रा घेतला. कारण त्याला त्याच्या सार्वभौमत्वाने प्राप्त झालेला, आंतरराष्ट्रीय कायद्याने मान्य केलेला आणि सार्वभौमत्वाचे सर्वोच्च प्रकटीकरण असलेला युद्ध करण्याचा अधिकार आणि हक्क क्षणाचाही विलंब न करता बजवावयाचा होता. परंतु तो हे सोईस्करपणे विसरला होता की, फक्त न्याय्य युद्धालाच ही सर्वमान्यता आहे, दुसऱ्या कशाला नाही.

भारताची धारणा याच्या एकदम विरुद्ध होती. भारताच्या काँग्रेसी राज्य-कर्त्यांची आणि पुढाऱ्यांची अशी समजूत होती की भारताला जे स्वातंत्र्य मिळाले ते सूत काढावयाच्या टकळीने आणि ' चले जाव'च्या तोंडाच्या टकळीने **फक्त**. आणि त्यांची ही समजूत त्यांनी हर प्रयत्नांनी लोकांच्या, भल्याभल्यांच्याही गळी उतरविली. अहिंसेनेच फक्त मिळालेल्या स्वातंत्र्यात हिंसक आणि सशस्त्र सेना-दलांची गरज काय ? भारतावर उगीचच कोण कशाला आक्रमण करील ? आणि यदाकदाचित तसे काही झालेच तर भारत आपल्या सत्य–अहिंसेच्या पुण्य–प्रतापाने त्या आक्रमकांचे सहज हृदयपरिवर्तन करील अशाही मनोधारणा असणारे काही महाभाग होते. ते म्हणत होते, फक्त ' समारंभात सलामी ' एवढाच जर सेना-दलांचा उपयोग तर एवढे संरक्षण मंत्रालय असण्याचे प्रयोजनच काय ? हा वाया जात असलेला प्रचंड पैसा काँग्रेसप्रणीत रचनात्मक कार्यक्रमाकरिता (Con-structivc programme) खर्च केला जावा ! ते हे विसरले होते की, बौद्ध धर्माने प्रभावित झालेल्या सम्राट अशोकाने आपली प्रतापी चतुरंग सेना जशीची तशीच कायम ठेवली होती. भारताच्या भाग्याने, स्वातंत्र्योत्तरकालीन प्रशासकांना, सेना बरखास्त करण्याची बुद्धी झाली नाही. खरे पाहिले असता पाकिस्तानने तसे काही करू देण्यास वेळच मिळू दिला नाही, नाही तर काय झाले असते कोण जाणे ! दुसरी गोष्ट पाकिस्तानने जेव्हा लढाई सुरू केली, तेव्हा कोणी त्याचे हृदयपरिवर्तन करण्यास्तव पुढे सरसावला नाही. परंतु नंतर काही दिवसांनी चीनने जेव्हा हल्ला चढवला तेव्हा **तो युद्ध बंद करण्याचा उपाय** काही मानवतावादी श्रेष्ठींनी करून पाहिला. परंतु आडदांड चिनी सैनिकांनी त्यांना दूरच रोखले. मग काय करणार ? परतले बिचारे ! तेथे सत्याग्रह केला नाही कारण प्राणाशी

गाठ होती. नुसतीच जेलयात्रा नव्हती.

सार्वभौमत्वाचा युद्धाचा हक्क आणि अधिकार बजावण्याचे एकमेव साधन त्या राज्याची संशस्त्र सेनादले हेच फक्त असते. ती सेनादले सज्ज आणि युद्ध-क्षम असल्याशिवाय देशाच्या सार्वभौमत्वाला अर्थच नसतो. तुकडे होऊन का असेना भारत स्वतंत्र होताच इंग्रजांच्या हुकुमतीखाली असलेली हिंदी सेनादले स्वतंत्र झाली. इंग्रजांना भारत स्वतंत्र झाल्याच्या दुःखापेक्षा हिंदी सेनादले आपल्या हातातून गेल्याचे अधिक दुःख झाले.

भारताचे स्वातंत्र्य सहन न होणाऱ्या क्षुद्रांना हिंदी सेनादलाविषयी एका रात्रीत काय वाटू लागले ते **जनरल पलित** यांनी The Lightening campaign या पुस्तकात उद्धृत केले आहे. " The Watching world formed an image of our military machine : the verdict a good second class British left over, steadity declining in operational potential." टपून बसलेल्या (विघ्नसंतोषी) जगाने भारताच्या लष्करी यंत्रणेचे एक चित्र तयार केले. युद्धक्षमता एकसारखी क्षीण होत असलेल्या ब्रिटिशांनी टाकून दिलेला साधारण बऱ्यापैकी दुय्यम दर्जाचा गाळ !

१९४७ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या १४ तारखेस सूर्य न मावळणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणाची आधारशिला असलेली संयुक्त भारताची सेनादले (" The key stone of the arch of our commonwealth and our defence ... ... " Field marshall Lord Allen Brook) फक्त २४ तासांत एक दुर्बल, दुय्यम दर्जाचा ब्रिटिशांचा गाळ ठरविण्यात आली.

या गाळाचे (!) दोन भाग केले गेले. एक भारताच्या वाट्याला आला. आता स्वतंत्र भारताला आपल्या वाटणीत आलेल्या भागाच्या मदतीने, युद्ध करण्याचा आपला हक्क आणि अधिकार सिद्ध करावयाचा होता. स्वतंत्र भारताच्या सेनादलांनी तो सिद्ध केला, युद्ध हाच सैन्याचा अस्तित्व हेतू असतो. सार्वभौम भारताचे सैन्य होते. जगातल्या लहानात लहान स्वतंत्र देशाच्या त्याच्या लोकसंख्येच्या आणि देश विस्ताराच्या प्रमाणातल्यापेक्षा किती तरी कमी प्रमाणातील सशस्त्र मनुष्यबळ, शस्त्रास्त्रे, युद्धसाहित्य आणि सज्जा (Equipment) यांच्यातल्या उणिवा व परावलंबित्व आणि मागासलेपणा या तुटपुंज्या सामर्थ्यानिशी सज्ज (?) होऊन स्वतंत्र भारताने आपल्या देशातल्या संरक्षणाचे " अधिकारग्रहण " केले.

पंच-शील, पंचशीला आणि संरक्षण

पंच आणि शील या दोन शब्दांनी व्यक्त झालेल्या संकल्पनांना फार प्राचीन इतिहास आहे. पंच हा शब्द अनेक विषयांच्या संबंधात वापरला गेला आहे. जसे पंचेंद्रिये, पंचमहाभूते, पंचप्राण, पंचत्व, शिखांचे 'पंच-प्यारे' आणि पाच 'ककार', इस्लामचे पाच विधी अथवा पाच व्रते, वैदिक आर्यांचे पंच महायज्ञ आणि पंच यम, जैनांच्या पंच शिक्षा, बौद्धांचे पंचशील इत्यादी.

शील म्हणजे नैतिक आचार–विचार, व्यवहार आणि चारित्र्य. जगातील दुःखाचे मूळ शोधून काढण्यासाठी सर्व राजवैभव आणि सुखसंपन्न जीवनाचा त्याग करून, कठोर कष्टमय साधना सिद्ध करणाऱ्या राजपुत्र **सिद्धार्थाला** एका अश्वत्थ वृक्षाखाली ध्यानमग्नअवस्थेत असताना 'धम्मचक्क परिवत्तनसुत्त' स्फुरले आणि त्याने आपला 'अट्ठांगिक मग्ग' लोकांना समजावून सांगणे सुरू केले.

बुद्धाने शीलसंपन्नतेवर सर्वात अधिक जोर दिलेला आहे. शीलसंपन्न, ज्ञानवान, एकाग्रचित्त, अध्यात्म चिंतनात रत, असा मनुष्य तृष्णारूपी महाप्रवाहातून तरून जाऊ शकतो, असे सुत्तनिपातात सांगितले आहे–

१. प्राणातिपाता वेरमणी ... अहिंसा
२. अदिन्ना दाना वेरमणी ... चोरी न करणे
३. अब्रम्हचरिया वेरमणी ... व्यभिचार न करणे
४. मुसावादा वेरमणी ...असत्य भाषण न करणे

५. सुरामेरय मद्यमादट्ठाना वेरमणी...

मादक पदार्थांचे सेवन न करणे

हे बुद्धाने सांगितलेले पंचशील आहे. "सब्ब पापस्स अकरणम् कुसलस्स उपसंपदा । सचित्त परियोदपनम् एतम् बुद्धस्स सासनम् ।। हे बौद्ध धर्माचे सार असल्याचे 'धम्मपदात' सांगितले आहे. या सर्वांचा इत्यर्थ सदाचार हा आहे. **लोकमान्य टिळकांनी गीतारहस्याच्या** सहाव्या भागात गौतम बुद्धाचे सासनम्—त्याने सांगितलेला सदाचारप्रधान धर्म, वैदिक धर्माच्या धर्मसूत्रांतून आणि स्मृतीतून घेतले असल्याचे प्रतिपादन केले आहे.

अशोकापर्यंत एकही भारतीय सम्राट बौद्धधर्मी झाला नव्हता. **कलिंग** देशाशी त्याच्या झालेल्या युद्धातल्या भयंकर रक्तपातामुळे त्याचे मन बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाले. त्याने बुद्धाने सांगितलेले पंचशील आपल्या प्रशासनाचा आणि न्यायदानाचा आधार ठरवून, त्यानुसार आज्ञा प्रसृत केल्या परंतु आपली प्रचंड चतुरंग सेना जशीची तशीच कायम ठेवली. या सेनेला कोणतेच काम न मिळाल्यामुळे त्यांची शस्त्रे गंजून गेली आणि जयिष्णू वृत्ती क्षीण होत गेली. त्याचा भारतावर विपरीत परिणाम झाला. कौरवपांडवयुद्धात जखमी होऊन शरशय्येवर पहुडलेल्या पितामह भीष्मांनी सांगितलेल्या 'युद्ध धर्माचा' विसर पडणे सुरू झाले.

भीष्माचार्यांनी युधिष्ठिरास सांगोपांग रीतीने राजधर्म समजावून सांगितला होता आणि सर्व धर्मांत राजधर्म श्रेष्ठ असल्याचे त्याला पटवून दिले होते (सर्वे धर्माः राजधर्मप्रधानाः). त्यानंतर चाणक्यनीती (अर्थशास्त्र) आणि शुक्रनीती यांनीही राजधर्माचे वर्णन करून तो श्रेष्ठ धर्म असल्याचे सांगितले. त्यानंतर पंत अमात्यांनी आपल्या आज्ञापत्रात राजधर्माचे विवेचन केले. वैदिक आर्यांची राज्यसंस्था सुदृढपायावर उभारलेली आहे. "इहराष्ट्रमुधारय" या राष्ट्राची धारणा कर असे राजाला बजावीत असताच "श्रीर्वै राष्ट्रस्य भारः" राष्ट्राची श्रीलक्ष्मी सांभाळण्याची, तिच्या संरक्षणाची जबाबदारी राजावर आणि लोकांवरही असल्याचे सांगितलेले आहे. "आ राष्ट्रे राजन्यः शूरइषव्योऽतिव्याधी महारथो जायताम्" आपल्या राष्ट्रात पराक्रमी वीर निपजले पाहिजेत अशी त्यांची आंतरिक इच्छा होती. कारण सामरिक—सामर्थ्यसंपन्न राष्ट्रच आपला योगक्षेम निरामय करू शकते. जे आमचा द्वेष करतील अथवा आमच्याशी शत्रुत्व करतील त्यांचा आम्ही प्रतिकार करू आणि जे मित्र भावाने वागतील त्यांच्याशी आम्ही सख्यत्वाने वागू ("सा सह्याम मृतन्यतोवनयाम वनुष्यतः") अशी त्यांची परराष्ट्र नीती होती. हीच आजची "शांत सहअस्तित्व नीती-Peaceful Coexistence होय. शत्रूवर जय मिळविणे न्याय्य आहे. "जयेम संयुधिस्पृहः" हे आजकालच्या आंतरराष्ट्रीय कायद्यालाही (International Law) मान्य आहे. संरक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत

हक्क आहे. आत्मरक्षणात झालेला मनुष्यवध Penal Code मध्येही गुन्हा ठरविला गेलेला नाही.

आधुनिक परदेशी पंडित पंचशीलचे दोन अर्थ करतात. काही त्याला नैतिक पुनरसुसज्जतेचे सूत्र- The formula of moral rearmament म्हणतात. काही राष्ट्रांच्या परस्पर संपर्काची पाच मार्गदर्शक आधार सूत्रे-five norms of conduct for guiding nations in their international intercourse म्हणतात. गौतम बुद्धाला स्वत:ला अभिप्रेत असलेला पंचशीलचा अर्थ, आजच्या अधिकाधिक स्फोटक होत असलेल्या असंतुलित, शंकाकुल, अस्थिर अवस्थेत 'पंचत्व' पावलेला असल्याचे पावलोपावली प्रत्ययास येते आहे.

राजनीतीत बौद्ध पंचशीलची प्रस्थापना करण्याचा पहिला उपक्रम इंडोनेशिया देशाचे राष्ट्रपती **डॉ. (सुकर्ण) सोकार्नो** यांनी केला. दुसऱ्या महायुद्धाच्या सरत्या काळात, इंडोनेशियाने आपले स्वातंत्र्य मिळवून प्रजासत्ताक राज्य जाहीर केले. (तारीख १ जून १९४५). डॉ. सोकार्नो यांनी–

१. ईश्वरावर विश्वास faith in God,

२. मानव्यावर विश्वास faith in Humanity,

३. स्वातंत्र्यावर विश्वास faith in Freedom,

४. सामाजिक न्यायावर विश्वास faith in Social Justice,

५. लोकांवर विश्वास faith in People.

हे आपल्या देशाचे धार्मिक, नैतिक, सामाजिक आणि राजकीय पंच–विश्वासात्मक पंचशील जाहीर केले. त्या भाषणात ते म्हणाले, " हे स्वतंत्र इंडोनेशियाचे पंचशील आहे. धर्माचा मी 'कर्तव्य' हा अर्थ करतो. हे पंचशील म्हणजे कर्तव्य–धर्माची पाच अधिष्ठाने आहेत. त्यांच्या आधारावर आपण स्वतंत्र इंडोनेशिया निर्माण करीत आहोत.

जवाहरलाल नेहरु आपल्या एका भाषणात म्हणाले होते, " When I heard this phrase in Indonesia, it struck me as a happy phrase which I thought was of great importance to the world to day." मी जेव्हा इंडोनेशियात पंचशील हा शब्द ऐकला तेव्हा आजच्या जगाला तो अतिशय महत्त्वाचा असल्याचे मला प्रतीत झाले.

त्यानंतर (ता. २९ जून १९५४) स्वतंत्र तिबेटविषयी हिंद–चीन करार झाला. त्याच्यात पंचशीलचा अंतर्भाव करण्यात आला होता. **नेहरु–चौ** यांच्या संयुक्त जाहीर निवेदनात–

1. Mutual respect for each others territorial integrity and sovereignty – परस्परांच्या प्रादेशिक अभंगत्वाचा आणि सार्वभौमत्वाचा आदर.

२. Non Aggression परस्पर **अनाक्रमण**.

३. Non interference in each others international affairs परस्परांच्या अंतर्गत व्यवहारात अलिप्तता.

४. Equality and mutual benifit समानता आणि परस्पर–हित.

५. Peaceful co–existence शांत सह-अस्तित्व. हे राजकीय पंचशील मान्य करून जाहीर करण्यात आले होते. नंतर नेहरूंनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे आणि संबंधांचे हेच पंचशील असल्याचे आपल्या स्वदेशातील आणि परदेशातील सर्व जाहीर भाषणांतून सांगितले होते.

त्यावरून एका इंग्रज लेखकाने, 'शील'मधील 'ल'ला एक काना जोडून शीलची 'शिला' बनविली; आणि म्हणाला " Panch Shil means five fundamental *stones* or pillars of Indias foreign policy." पंचशील म्हणजे भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचे पाच मूल **प्रस्तर** अथवा आधारस्तंभ.

केवळ एका वर्षाच्या आत हे राजकीय पंचशील (या राजकीय पंचशीला) जगभर पसरले. ग्रेट ब्रिटन, रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, पूर्वेकडील आणि मध्य युरोपातील लहानमोठ्या देशांनी आणि काही इस्लामी देशांनी त्याचे स्वागत केले. ता. १३ डिसेंबर १९५५ रोजी प्रसृत झालेल्या **नेहरु–बुलगॅनिन–क्रुश्चेव्ह** संयुक्त निवेदनाच्यापर्यंतच्या काळात, जगातल्या एकूण एक देशांनी या 'पंचशील–लांचे' कौतुक केले.

परंतु हे पंचशील जाहीर होण्याच्यापूर्वीच १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या पहिल्या स्वातंत्र्य दिनाच्या जाहीर भाषणात जवाहरलाल नेहरूंनी या पंचशील–लाचा आधार असलेली भारताच्या भावी आंतरराष्ट्रीय राजकारणाची दोन निश्चित तत्त्वे असल्याचे स्पष्ट केले होते. (१) Guarantee of International Peace and Amity आंतरराष्ट्रीय शांतीची आणि मैत्रीची हमी. (२) Code of conduct for International problems-आंतरराष्ट्रीय आचारसंहिता.

पहिले जागतिक महायुद्ध (१९१४–१८) चालू असताना आंतरराष्ट्रीय शांती आणि आचार–संहिता यांचा एक प्रयत्न झाला होता. त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष **विड्रो विल्सन** यांच्या पुढाकाराने आणि त्यांच्या १४ कलमांना अनुसरून 'लीग ऑफ नेशन्स'ही संस्था स्थापन झाली होती. त्याच्यापूर्वी काही 'हेग परिषदा' भरविल्या गेल्या होत्या. परंतु त्या निष्फळ झाल्याकारणाने, ही नवी संस्था स्थापन करण्यात आली होती. या नव्या संस्थेचा " The object was prevention of war by putting teeth in the Hague system." हेग परिषदांना युद्ध बंद करण्यासाठी चावणारी दातांची कवळी बसविणे हा उद्देश होता. Putting the Teeth या शब्दसमुच्चयाचा अर्थ त्या संस्थेला गुन्हेगार सभासदांना शिक्षा करण्याचा अधिकार देणे आणि शिक्षेची अम्मलबजावणी करण्याची शक्ती उपलब्ध करून देणे हा होता. त्याशिवाय त्या शक्तीने सर्व लहानमोठ्या देशांना राजकीय

स्वातंत्र्य आणि प्रादेशिक अभंगत्वाची शाश्वती मिळवून देणे हाही होता. "for the purpose of affording mutual guarantees of political independence and territorial integrity of great and small nations alike." या संस्थेचे मूळचे ४९ आणि नंतरचे १३ असे एकूण ६२ सभासद होते. ही संस्था युद्धविरोधी होती. सोव्हियट रशियाने जेव्हा फिनलंडवर आक्रमण केले. तेव्हा शिक्षा म्हणून रशियाला संस्थेतून काढून टाकण्यात आले. लीग ऑफ नेशन्सच्या कृत्रिम दातांच्या कवळीला गुन्हेगार रशियाला यापेक्षा अधिक कडक चावा घेता आला नाही आणि हा मिळमिळीत दंतव्रण रशियाच्या तनावर किंवा मनावर उमटलाही नाही. मग परिणाम कुठला ? शेवटी ही संस्था आपल्या मरणाने मेली. त्या तिच्या अपमृत्यूत पराभूत झालेला, व्हर्सायिच्या तहाने जखडून टाकलेला परंतु शिरजोरीने मुक्त झालेल्या जर्मनीचा महत्त्वाचा वाटा होता.

नंतर जन्मली यूनो (U. N. O.), तीही (दुसरे) जागतिक महायुद्ध चालू असतानाच आणि तिच्या स्थापनेतही अमेरिकेचाच पुढाकार होता. त्या जाहीरनाम्यात युद्धाचा उल्लेख नाही. त्याऐवजी शांती आणि सुरक्षितता ही उद्दिष्टे जाहीर करण्यात आली. याचा अर्थ शांततायुक्त सहजीवन (Peaceful co-existance) हाच आहे. त्यात सर्व लहानमोठ्या देशांचे समान–सार्वभौमत्व मान्य केलेले आहे आणि सर्व शांतता–प्रिय देशांना या संस्थेचे सभासदत्व खुले ठेवलेले आहे. या संस्थेला सभासद देशांचे फक्त अस्तित्व (existance–Being) अपेक्षित आहे. त्यांचे सुखमय अस्तित्व–जीवन (Wel–being) त्या त्या राष्ट्राच्या स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून असल्याकारणाने, ती स्थिती या संस्थेच्या कार्यकक्षेबाहेर असणे क्रमप्राप्तच आहे.

ही नवी जागतिक शांती प्रस्थापित करून सुरक्षित ठेवण्याकरिता स्थापन झालेली संस्था, फक्त जर्मनीच्या–हिटलरच्या शत्रूंचीच होती. एका देशाविरुद्ध सर्व जगाने संघटित होणे म्हणजे हिटलरची (बरी वाईट) थोरवी सर्व जगाने मान्य करणे हा होतो. **मिल्टनचे** पॅराडाईज **'लॉस्ट'** हे महाकाव्य वाचीत असताना, कुठे कुठे ईश्वरापेक्षा सैतानच अधिक थोर वाटू लागतो. जर्मनीच्या हिटलरला जगाने सैतान ठरवून टाकले होते आणि त्याची धास्तीही घेतली होती.

हिंदुस्थानला स्वतंत्र सार्वभौमअस्तित्व नसल्याकारणाने तो जर्मनीचाच नव्हे तर कोणाचाही शत्रू नव्हता आणि मित्रही नव्हता. राज्यकर्त्यांचे–मालकांचे जे शत्रू किंवा मित्र तेच परावलंबी आणि गुलाम असणाऱ्याचेही शत्रू अथवा मित्र असतात. पहिल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदुस्थानकडून अशी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा वदवली नव्हती. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ती वदवली आणि हिंदुस्थानातील एकाही माणसाला न सांगता न विचारता वदवली. यात कोणती ब्रिटिश– मुत्सद्देगिरी असेल ती असो! परंतु हिंदुस्थानकडून त्याच्या

व्हाईसरॉयच्या मुखाने वदवलेली ही युद्ध–घोषणा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे प्रसाद चिन्ह ठरली. जर्मनीच्या आणि जपानच्या पराभवाने आपल्या स्वातंत्र्याची कपाटे सताड उघडून दिली.

" अनर्जितस्य अर्जनं योग: "- जे मिळवावयाचे आहे ते मिळविणे म्हणजे ' योग.' हा योगक्षेम या शब्दातील योग या शब्दाचा अर्थ सिद्ध झाला. " अर्जितस्य रक्षणं क्षेम: " जे मिळविले आहे त्याचे रक्षण करणे म्हणजे ' क्षेम ' या दुसऱ्या महत्त्वाच्या भागाची परिपूर्ती करण्याची जबाबदारी देशाच्या प्रशासकांच्या शिरावर कोसळली. क्षेमाची म्हणजे शांती, पुष्टी आणि तुष्टी या तीन्हीची विवंचना आणि योजना सुरू व्हावयास पाहिज होत्या. मातृभूमी छिन्नविछिन्न झाल्याकारणाने कोणीही भारतीय ' संतुष्ट ' नव्हता आणि दारिद्र्य बरोबर घेऊनच स्वातंत्र्य आल्याकारणाने कोणी ' पुष्ट 'ही नव्हता. रक्षण करावयाचे ते फक्त एकट्या शांतीचे. त्यावेळी प्रादेशिक संरक्षणाची कल्पनाही कोणाच्या मनात आली नाही. 'Military in the third World' या पुस्तकात **गेव्हिन केनेडी** म्हणतात " India's military strategy was based on the assumption that it would not be attacked by its neighbours. India also regarded itself as being above the use of force. India's prestige as a neutral country dedicated to world peace was supposed to ensure invalnerability." शेजारी आक्रमण करणार नाहीत हे गृहीत धरूनच हिंदुस्थानाने आपले लष्करी धोरण आखले होते. म्हणजे भारताला लष्करी धोरणच नव्हते. बलप्रयोग अनावश्यक असल्याच्या उच्च भूमिकेवर तो स्वत:ला समजत होता. जागतिक शांतीला वाहिलेली आपली प्रतिष्ठा आपल्या अभेद्यपणाची हमी असेल, असे त्याला वाटत होते. वर नेहरूंनी पहिल्या स्वातंत्र्य दिनी केलेल्या भाषणातील Guarantee of International peace and aminity-आंतरराष्ट्रीय शांतीची हमी आणि मैत्रीचीही हमी, या आशेचा उल्लेख केलेला आहे. परंतु ती हमी मिळाली नाही. आशा फोल ठरली. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतीयांची मन:स्थिती मोठी विचित्र होती. त्यांच्या एका डोळ्यातून दु:खाश्रूंच्या धारा वाहत होत्या. देशाची चीरफाड होऊ देणार नाही ही गांधीजींची घोषणा व्यर्थ झाल्याचे ते दु:ख होते आणि दुसऱ्या डोळ्यात स्वातंत्र्याचे आनंदाश्रू तरळत होते. अहिंसा, चरखा, सत्याग्रह, ' चले जाव ' यांच्यामुळेच स्वातंत्र्य मिळाले, या मायाजाळात गुरफटून गेलेला भारत आणि त्याचे नवे अननुभवी राज्यकर्ते बेसावध–आत्मसंतुष्ट झालेले होते.

दुनियादारीच्या " इस हाथ दे इस हाथ ले " या व्यवहारात " असे असे होवो ! अमूक अमूक असो !" असे इच्छाचिंतन उधारीचा सौदा ठरत असते. " प्राणातिपातावेरमणी " एवढेच बुद्धाचे पंचशील सांगते. परंतु एखाद्याने दुष्ट बुद्धीने प्राण घेतला तर काय करावे हे ' स्मृती ' सांगते. खुन्याला प्राणदंडाची शिक्षा

सुनावणारा न्यायाधीश खूनी, मनुष्यवध करणारा ठरत नसतो, कारण ते त्याचे कर्तव्यच असते.

भारत असा इच्छाचिंतनाच्या मायाजालात गुरफटलेला असताना आणि तो स्वतंत्र होऊन अडीच महिनेही उलटले नाहीत तोच पाकिस्तानने त्याच्यावर काश्मीरमध्ये हल्ला चढवला. भारताचे जवान ते आक्रमण निपटून काढीत असतानाच त्याला 'युनोच्या चावडीवर' तक्रार गुदरण्याचा मिळालेला सल्ला ऐकण्याची दुर्बुद्धी झाली आणि तेव्हापासून भारताचे संरक्षण विलक्षण घोटाळ्यात पडले. यूनो पाकिस्तानला समज देईल; या अपराधाबद्दल त्याचा कडकडून चावा घेईल, असे त्याला त्याच्या राज्यकर्त्यांच्या स्वप्निल स्वभावाने वाटले होते. परंतु युनोने तसे काहीच केले नाही. उलट कालहरण करून पाकिस्तानलाच झुकते माप दिले. युनोच्या कार्यपद्धतीविषयी डॉ. साल्व्हा डी मँडेरियन म्हणतो, "If a dispute before the U.N.O. is between two small countries the dispute disappears. If the dispute is between a small country and a big power the small country disappears. If the dispute is between two big powers the U.N.O. disappears." दोन लहान देशातला विवाद जेव्हा निर्णयाकरिता यूनोपुढे जातो, तेव्हा विवाद नाहीसा होतो. विवाद जेव्हा एका लहान आणि दुसऱ्या मोठ्या देशातला असतो, तेव्हा लहान देश नाहीसा होतो, आणि दोन मोठे देश जेव्हा दोन्ही बाजूला असतात, तेव्हा यूनो स्वतःच नाहीशी होते. भारताने यूनोपुढे नेलेल्या विवादात पाकिस्तान भारतापेक्षा लहान होता तेव्हा पाकिस्तान नाहीसा व्हायला पाहिजे होता. परंतु दुसरे अनेक लहान आणि मोठे देश पाकिस्तानला मोठा बनवीत असल्याकारणाने तो स्वतःला मोठा समजू लागला आणि त्याचा मग्रूरपणाही सारखा वाढत गेला. तेव्हा युनोलाच नाहीसे व्हावे लागले. म्हणजे यूनोने पाकिस्तानाला त्याच्या अपराधाबद्दल कसलीच अद्दल घडविली नाही.

प्रत्येक स्वतंत्र देश आपली अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उद्दिष्टे आणि ती साध्य करण्याचे मार्ग निश्चित करीत असतो. 'कल्याणकारी रामराज्य' आणि 'शांती' ही उद्दिष्टे भारत स्वतंत्र होण्याच्या आधीपासूनच ठरली होती आणि घोषितही झाली होती. परंतु त्यांचे मार्ग आणि योजना निश्चित झाल्या नव्हत्या. परंतु स्वातंत्र्य मिळताच फक्त २४ तासच आधी भारतातून कोरून खरवडून काढलेल्या स्वतंत्र पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला करून भारताला क्षणाचीही फुरसत मिळू दिली नाही. (अलिप्तता हे उद्दिष्ट आणि धोरण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ठरले.)

प्रत्येक स्वतंत्र देशाला अंतर्गत शांती आणि सुरक्षितता ही एक आणि परकीय आक्रमण ही दुसरी अशा दोन आघाड्या लढविण्याची सुसज्जता ठेवावी

लागते. दुसरी आघाडी सुप्त ज्वालामुखीसारखी केव्हा धडधडू लागेल याचा नेम नसतो. कारण आता युद्ध जाहीर केले जातेच असे नाही. ते कोणत्याही क्षणी अचानक सुरू होते आणि नंतर ते संबंधित देशाला आणि इतरांना समजते. या दोन्ही आघाड्यांवर सुलतानी संकटे एकसाथ कोसळल्याकारणाने भारताच्या पंचशीलांना जबरदस्त धक्का बसला आणि त्याची काहीच तयारी नसल्याकारणाने किंवा भ्रमाने हेळसांड झाल्याकारणाने, ' दे दान तो छूटे गिऱ्हाण ' अशी केविलवाणी स्थिती झाली.

स्वातंत्र्य प्राप्त होताच जवाहरलाल नेहरूंनी भारताचे परराष्ट्रीय धोरण अलिप्तता असल्याचे जाहीर केले होते. भारताच्या सामरिक सामर्थ्याकडे जे दुर्लक्ष झाले त्याचे हेही एक कारण होते, यासंबंधी **विल्यम गटरिज** Military institutions and power in new States या ग्रंथात म्हणतो, " Neutralism and reasonable military provision arə not incompatible in the present situation. A neutral nation which neglets its own defence-Increases its reliance on foreign aid and at the same time diminishes its capacity to initiate international action by example. " प्रस्तुत परिस्थितीत अलिप्तता आणि उचित लष्करी तयारी विसंवादी नाहीत. संरक्षणाकडे दुर्लक्ष करणारे अलिप्त राष्ट्र, आपले परावलंबित्व वाढविते, आणि त्याचबरोबर स्वत: उदाहरणाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आपली उपक्रमशीलता क्षीण करते. भारताच्या या केविलवाण्या अवस्थेमुळे त्याच्यावरील ग्रहण सुटण्याकरिता मदत मिळावी म्हणून त्याला दारोदारी दाती तृण धरून उधार-उसनवार दान मागत हिंडावे लागले.

राष्ट्राची उच्चतम आंतरराष्ट्रीय योजना आणि धोरण (Grand Strategy) त्याच्या अंतिम उद्दिष्टानुरूप तयार केली गेली पाहिजेत. (ब्रिज नावाच्या पत्त्यांच्या एका खेळात Grand slam म्हणजे विरुद्ध पक्षाला एकही हात अथवा गुण न मिळू देणे. राष्ट्राची ग्रँड स्ट्रेटेजी म्हणजे लहान मोठी प्रस्तुत वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन–सर्वकालीन परिस्थिती द्रष्टेपणाने आपल्या राष्ट्राला हितकारक ठरण्याची खबरदारी घेणे.) राष्ट्र तटस्थ, अलिप्त, उदासीन कसेही असले तरी, त्याला शेजारी, पडशेजारी असतातच. विजिगीषु राजाने शेजारी देशांच्या भौगोलिक स्थानांचा विचार करून आपले परराष्ट्रीय धोरण आखले पाहिजे असे **कौटिल्य** म्हणतो. **डॉ. जयस्वाल** हिंदु पॉलिटी या ग्रंथात म्हणतात–" एक राज्य अपने पडोसीका शत्रु और उसके पडोसीका मित्र होता था। मित्रके पश्चात् अरि–मित्र (अपने शत्रुका मित्र) उसके आगे मित्र मित्र (अपने शत्रुके दोस्तों का मित्र) ऐसे राजा रहते थे। इस तरह परदेशनीती निर्धारित करते समय राजाको अपने सामने के पाच राजाओं का विचार करना पडता है।...अपने पिछाडीके

पडोसीका विचार करते समय चार राजाओं का विचार करना पडता था।" आता वायुसेनेच्या सामर्थ्यामुळे आणि नव्या प्रक्षेपण करता येणाऱ्या (शेकडो हजारो किलोमीटर दूरच्या अज्ञात केंद्रावरून) नव्या संहारकारी अस्त्रामुळे देशाच्या संरक्षणात आणि युद्धात आघाडी आणि पिछाडी हा फरक उरला नाही.

प्रभुत्वाचा–प्रभावाचा विस्तार आणि साम्राज्य अशा आक्रमक राक्षसी महत्त्वाकांक्षा नसलेले देश (१) यथास्थिती-Status quo (२) सर्व–संरक्षण-Total Defence, (३) परावृत्तीचे सामर्थ्य-Power of deterence या तीन दृष्टिकोनांतून आपले अंतिम परराष्ट्रीय धोरण-Grand strategy ठरवीत असतात. राष्ट्राच्या अंतिम उद्दिष्टांची यशस्विता त्याच्या सामरिक सामर्थ्यावर आणि साधनसमृद्धीवर असलंबून असते. परावृत्तीचे आणि संरक्षण करू शकणारे सामरिक सामर्थ्य, शत्रूला न सोसणारा तडाखा देऊन त्याची आक्रमक शक्ती आणि प्रवृत्ती नष्ट करू शकणारे असले पाहिजे. संरक्षणाचा हेतू शत्रू पूर्णपणे नष्ट करणे, त्याचे नावनिशाणदेखील न उरू देणे हा नसतो. त्याकरिता शस्त्रास्त्रे आणि सर्व प्रकारचे युद्ध आणि सज्जा यांत स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता असली पाहिजे. सर्व प्रकारच्या भौगोलिक आणि नैसर्गिक वातावरणीय परिस्थितीत लढण्यास सुसज्ज, प्रशिक्षित आणि उच्च मनोधैर्यमंडित अशी पुरेशी सेना तयार ठेवली पाहिजे. तसेच अल्पावकाशात जरुरीप्रमाणे सर्व प्रकारच्या सेनांचा विस्तार करण्याची कायमची योजना असली पाहिजे.

संरक्षणाची आपली सिद्धता आणि शक्ती शत्रूच्या सिद्धतेवर अवलंबून असते म्हणून आपली संरक्षणाची योजना लवचिक असली पाहिजे आणि ती ज्याला शांततेचा काळ म्हणतात त्या काळात तयार करून ठेवली असली पाहिजे. Defence in a changing world या ग्रंथाचा लेखक **जे. एल. मॉल्टन** म्हणतो, Defence is an activity in which there are many links of different shapes and material, the failure of any one of which could be fatal to the whole." संरक्षणही निरनिराळ्या आकारांच्या आणि पदार्थांच्या बनलेल्या कड्यांची एक साखळी आहे. तिच्या एका कडीचे तुकडे होण्याने किंवा निरुपयोगी होण्याने सबंध साखळीच बेकाम होऊन जाईल.

राष्ट्राची राजकारणातील तशीच रणकारणातील 'ग्रँड स्ट्रॅटेजी' गैर लष्करी मुलकी नागरिकातून निर्माण झालेल्या आणि त्यांनी निवडून दिलेल्या मुलकी–गैर-लष्करी राज्यकर्त्यांकडूनच ठरविली जात असते आणि तिला अंतिम स्वरूप देताना रणकारणतज्ज्ञांशी त्याबाबत विचार–विनिमय केला जातो असे नाही. कारण ते तज्ज्ञ लोक-नियुक्त नसतात. कित्येक वेळी ग्रँड स्ट्रॅटेजी नक्की ठरल्यानंतर ती सामरिक दृष्टीने यशस्वी होईल किंवा नाही याचेही भान राहत नाही आणि ती अपेशी ठरली तर त्या अपयशाचे खापर सेनापतीच्या मस्तकावर फोडून आपण

नामा–निराळे होण्यास राज्यकर्ते उजागर असतात.

याचे उत्तम उदाहरण दुसऱ्या महायुद्धात फील्ड मार्शल **लॉर्ड वेव्हेल** या रण-झुंझार कुशल सेनापतीच्या बाबतीत घडलेले आहे. पहिल्या सुरुवातीच्या आफ्रिकन मोहिमेचा सेनापती **वेव्हेल** होता. त्याला चर्चिलने साथ दिली नाही. इतकेच नव्हे तर त्याच्या हवाली केलेली काही हवाई फौजही तो नको नको म्हणत असता चर्चिलने काढून घेऊन दुसरीकडे पाठविली. वेव्हेलची बाजू लंगडी पडल्याकारणाने त्याची ती मोहीम अपेशी झाली आणि तो त्या अपयशाने बदनाम झाला. चर्चिलची दुसरी स्ट्रॅटेजीही यशस्वी झाली नाही. परंतु तो मात्र बदनाम झाला नाही कारण तो ' लोक-नियुक्त प्रधानमंत्री ' होता. वेव्हेल राज्याचा पब्लिक सव्हँट होता. चर्चिलच्या हातात ' युद्ध नेतृत्व ' होते. वेव्हेलच्या हाती ' रणनेतृत्व ' होते. युद्ध-नेतृत्व आणि रणनेतृत्व एकच नाहीत. लोकशाहीत ती एका हाती असत नाहीत. परंतु अनेक प्रसंगी रणनेतृत्वात युद्धनेतृत्व ढवळाढवळ करते आणि त्याचे परिणाम राष्ट्राला भोगावे लागतात. युद्धनेतृत्व आणि रणनेतृत्व यांचा सहकार आणि सम-न्वय राष्ट्राची ग्रँड स्ट्रटेजी यशस्वी करू शकतो.

राष्ट्राची ग्रँड स्ट्रटेजी ठरविणाऱ्या मुलकी राज्यकर्त्यांनी ती अनुभवजन्य ज्ञानावर आणि गतेतिहासाच्या ज्ञानावर; तसेच चालू परिस्थितीच्या मूलग्राही आणि सूक्ष्म अवलोकन आणि अभ्यास यांच्यावर ठरविली पाहिजे. मुलकी मूळ असलेल्या राज्यकर्त्यांत सामरिक दृष्टिकोन उत्पन्न होणे किंवा त्याची जाणीव उत्पन्न होणे अशक्यप्राय असते. म्हणून ती एकांगी होण्याची शक्यता असते. राष्ट्राची ग्रँड स्ट्रॅटेजी एकांगी होण्याचे मुख्य कारण ती ठरविणाऱ्या राज्यकर्त्यांची अविवेकी, अव्यवहारी, अतिरेकी विचारधारा आणि निष्ठा हे होय. भारताच्या आतापर्यंतच्या ग्रँड स्ट्रॅटेजीच्या बाबतीत असेच झालेले आहे.

राष्ट्राची ग्रँड स्ट्रॅटेजी यशस्वी होण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक मनुष्यबळ आणि दुसरी साधनसंपत्ती. भारतात मनुष्यबळाची वाण नाही (उलट ते नको तितके वाढते आहे. या मनुष्यबळात प्रत्यक्ष लढणारा आणि त्याचा पाठपुरावा करणारा असे दोन भाग पडतात. भारतात सक्तीची सैनिकी सेवा सुरू होण्याची शक्यता नाहीच. जागतिक परिस्थिती, आंतरराष्ट्रीय संबंध, विज्ञान उप-लब्ध करून देत असलेली अधिकाधिक संहारकारी आयुधे इत्यादी गोष्टींवर देशाच्या ' खड्या ' दलाचा आकार आणि प्रकार तज्ज्ञांच्या सल्लामसलतीने ठर-विला गेला पाहिजे. भारत कोणत्याही सत्तागटात सामील होणार नाही, त्याला प्रादेशिक आकांक्षा नाहीत आणि त्याला कोणावर आक्रमणही करावयाचे नाही म्हणून त्याला न झेपेल न परवडेल अशी प्रचंड फौज ' खडी ठेवण्याची ' आवश्यकता नाही. हेच भारताचे श्रेयस् आणि प्रेयस् असल्याकारणाने आणि तो **यूनोच्या** एक संस्थापक सदस्य असल्याकारणाने त्या संस्थेच्या विनंतीवरून **कांगोत** शांती

प्रस्थापित करण्याकरिता त्याने आपली थोडीशी फौज पाठविली होती. त्यात झालेल्या लढायांत भारतीय रक्त वाहिले. इतकेच नव्हे तर कटांगातील इलिझाबेथ व्हेलीच्या लढाईत कॅप्टन गुरुवचनसिंग या वीरश्रेष्ठाने आणि त्याच्या ९० जवानांच्या पथकापैकी ७४ भारतीय वीरांनी भारताच्या नावाने शांतीकरिता समरांगणावर आपले पृथ्वीमोलाचे प्राण भूमातेच्या अंकावर ठेवले. कॅप्टन गुरुवचनसिंगांना मरणोत्तर **परमवीरचक्र** प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांचे आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्यासारखेच शांतीकरिता प्राणार्पण करणाऱ्या ७४ वीरांचे पार्थीव अवशेष भारतात आणवून सर्व लष्करी सन्मानाने त्यांचे भारतात अंत्यविधी करण्यात आले आणि ज्या सोळा वीरांचा कार्यभाग शिल्लक उरला तो पूर्ण करण्यास्तव ते पुन्हा लढू लागले. भारत शांतीच्या वल्गना नुसत्या तोंडाने करीत नाही ! **शांतीकरिता युद्धच करावे लागते**, हे युद्ध नको म्हणणाऱ्या भारतानेच सिद्ध केले आहे.

मनुष्यबळाच्या दुसऱ्या सैनिकीभागाचा पाठपुरावा करणाऱ्या मुलकी गैर-लष्करी भागाचीही राष्ट्राच्या संरक्षण कार्यात महत्त्वाची कर्तव्ये असतात. " The public has to support defence by its taxes and other things." लोकांनी युद्धाच्या खर्चाकरिता सरकारने बसविलेले कर आणि दुसरी देयके आनंदाने पटवून युद्धाला मदत केली पाहिजे असे **जे. एल. मॉल्टन** Defence in a changing world या पुस्तकात सांगतो. खऱ्या राष्ट्रीय आणीबाणीच्या आणि संकटांच्या वेळी ' पोटाला चिमटा घ्या,' ' पट्टे आवळा,' ' कमरा कसा '-' Tighten your belts ' अशी आवाहने आणि मनधरणी करण्याचे प्रसंग सरकारवर येऊ नयेत. हाच लेखक पुढे म्हणतो, " The nation needs to understand what in a rapidly changing world it is reasonable to expect from its defence effort." या झपाट्याने बदलणाऱ्या जगात राष्ट्राला पुरेशा संरक्षण प्रयत्नांची जाणीव झाली पाहिजे. पुरेसे म्हणजे किती ? हा कठीण प्रश्न ! त्याची उत्तरे सापेक्ष असतील. पुरेसे म्हणजे पुरून उरेल तितके !

या अर्थामुळेच जगातली सामरिक शक्तिस्पर्धा बंद होणार नाही. ' तो करतो ' म्हणून, त्याला पुरून उरावे म्हणून, **मी करतो** असेच प्रत्येक स्पर्धक म्हणतो. हे समर्थन समजण्यासाठी युद्ध समजले पाहिजे. **लिडलहार्ट म्हणतो,**" If you want peace understand War " शांती हवी असेल तर युद्ध समजले पाहिजे. राज्यकर्त्या सरकारने फक्त कर आणि दुसऱ्या इतर मदतीचीच फक्त लोकांकडून अपेक्षा न करता, त्यांना विश्वासात घेऊन आपल्या देशाची युद्धे समजून दिली पाहिजेत आणि स्वतःही समजून घेतली पाहिजेत. इंडोनेशियाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारण **पंचविश्वासावर** अधिष्ठित आहे, हे आपण वर पाहिलेच आहे. भारताला जवानांचा, लोकांचा आणि सरकारचा असे तीन विश्वास त्याच्या

संरक्षणासाठी अत्यावश्यक आहेत.

परंतु संरक्षणाला पार्थिव गोष्टींचीही तितकीच आवश्यकता आहे. नेपोलियन म्हणतो सैनिकाची रायफल लढत नाही. त्या ' भरलेल्या ' रायफलीच्या चापावर जोर देणारे व गोळी सोडणारे सैनिकाचे बोट लढत नाही. लढते सैनिकाचे मन. हे जरी खरे असले आणि वर सांगितलेल्या त्रिविध विश्वासाने सैनिकाचे मन जरी मजबूत झाले असले तरी तेच एकटे लढू शकत नाही. त्याला रायफल पाहिजे आणि तिच्यात भरायला गोळीही पाहिजे. म्हणून देशाला शस्त्रास्त्रसंपन्नता आणि दुसरे सर्व प्रकारचे युद्धसाहित्य यांची गरज असते. त्याबाबतीत देश शक्य तितका स्वावलंबी आणि परिपूर्ण असला पाहिजे. भूपृष्ठावरील तसाच भूगर्भातील सर्व प्रकारचा कच्चामाल, धान्य, जळण, वाहतूक, अद्ययावत यंत्र, तंत्र आणि विज्ञान, आर्थिक सुदृढता आणि औद्योगिक समृद्धी इत्यादींची नितांत आवश्यकता असते. देशातील कारखाने आणि औद्योगिक प्रतिष्ठानांची स्थापना, संरक्षण सामग्रीही निर्माण करू शकतील अशी दुहेरी उपयोगाच्या दृष्टीने झाली पाहिजे.

International Relations Peace and War या ग्रंथाचा लेखक म्हणतो– " Security depends on how the war began, who took the offencive. States therefore have to be ready to make War at all times. If a nation is unable to take offencive it might loose. " युद्ध कसे आणि कोण सुरू करतो यावर सुरक्षितता अवलंबून असते. म्हणून देशांनी युद्धासाठी नेहमीच तयार असले पाहिजे. आक्रमक पवित्रा न घेणाऱ्या देशाला जय मिळणार नाही.

राष्ट्राची अंतिम उद्दिष्टे साध्य करण्याच्या ग्रँड स्ट्रॅटेजीचे दोन प्रकार असतात. (१) भावनिष्ठ-Subjective आणि (२) वस्तुनिष्ठ Objective. पहिल्या प्रकारात अहिंसक मुत्सद्देगिरी लढवावयाची असते. त्याच्यात थंड्या युद्धाचा अंतर्भाव होत असतो. दुसऱ्या प्रकारात ' गरम युद्ध ' येते. या युद्धाच्या संरक्षण व आक्रमण ह्या दोन ' रणरीती ' असतात आणि त्या प्रत्येकीत निरनिराळे पवित्रे-Postures असतात.

भारताची अंतिम उद्दिष्टे प्रादेशिक अभंगत्व आणि यथास्थिती–जैसेथे ही आहेत आणि ती उद्दिष्टे त्याला अलिप्ततेने साध्य करावयाची आहेत, गरम युद्धाने नव्हे. परंतु गेल्या पंचवीस वर्षांत अनिच्छेने, मजबुरीने त्याला लढावे लागले (आणि लागणार आहे). त्यामुळे त्याच्या भावनिष्ठ–पंचशीलालाच जबरदस्त धक्के बसले, याचे त्याला मनस्वी दु:ख होते आहे. **विल्यम गॅटेरिज** Military Institutions and Power in New States या ग्रंथात म्हणतो," A neutral which neglects its own defences increases its reliance on foreign aid and diminishes its capacity to initiate international action."

संरक्षणाकडे दुर्लक्ष करणारे अलिप्तपणे आपले परावलंबित्व वाढविते आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातली स्वतःची उपक्रम–शीलता क्षीण करते. श्री. समर्थ रामदास म्हणतात, " आधी गाजवावे तडाखे। मग भूमंडळ धाके। ऐसे न होता; धक्के राज्यास होती." भारताचे (राज्यकर्त्यांचे आणि लोकांचेही) संरक्षणाकडे दुर्लक्ष होण्याचे दुसरे कारण भारताला युद्ध समजलेच नाही. " ऐ कमबख्त तूने पीईही नही."

संरक्षणाची यंत्रणा

ता. २६ जानेवारी १९५० पासून भारताची राज्य-घटना अमलात आली. घटनेने **राष्ट्रपती** हे भारतातील सर्वश्रेष्ठ पद निर्माण करून त्यालाच सर्व सशस्त्र सेना-दलांच्या **पदसिद्ध** सर्वोच्च सरसेनापती पदावर नियुक्त केले आहे आणि सेनादलांच्या सरसेनापतींना त्या त्या दलाचा **कार्यकारी प्रमुख** chief of the staff हे नाव दिले आहे. संरक्षण हा सर्वात महत्त्वाचा आणि सर्वात अधिक जिव्हाळ्याचा विषय असल्याकारणाने, तो राज्यातल्या सर्वश्रेष्ठ पदाच्या खास अधिकारात असणे उचित आहे. परंतु भारताच्या या व्यवस्थेने सर्वोच्च सरसेनापती हा सेनादलाविषयी आणि युद्धविद्येविषयी नुसता अतज्ज्ञच नसून अजाणही राहणार आहे. कारण या विषयाचा जाणकार, राष्ट्रपती म्हणून निवडला जाणे ही गोष्ट भारतात असंभवनीय आहे. राज्य-शास्त्र अधिकारी व्यक्तीही नेहमीच राष्ट्रपती म्हणून निवडली जाईल असेही नाही.

देशाच्या राज्यकारभारात संरक्षण हा विषय सर्वात महत्त्वाचा असला तरी, भारताचा सर्वोच्च सर-सेनापती हा **न खेळणारा चमूपती** (Non–playing Captain) असल्याकारणाने तो सेनादलांचे नेतृत्व करू शकणार नाही. तो अ-तज्ज्ञच असणार ! क्रीडात न खेळणारा चमूपती एखादेवेळी असला तरी, तो तज्ज्ञ असतो. काही कारणाने तो त्या विशिष्ट सामन्यात

एखादे वेळी खेळत नाही इतकेच.

भारताच्या सेनादलांच्या सर्वोच्च सरसेनापतीचा पहिल्या २७ वर्षात आणखीही एक विशेष होता. त्याला २६ जानेवारीच्या 'गणराज्य' आनंदोत्सवाच्या समारंभात आपल्या सेनादलांची सलामी स्वीकारू दिली नव्हती. २६ जाने. १९७८ रोजी पहिल्यांदा त्याने सलामी स्वीकारली. आपल्या सर्वोच्च सरसेनापतीचे समारंभपूर्वक **प्रथम दर्शन** घडल्याचा सेनादलांच्या प्रतिनिधींना अतिशय आनंद झाला. अशा आपल्या राष्ट्रपतीला संरक्षणयंत्रणेत कसलेच स्थान नाही. ते **राष्ट्रपती म्हणून नाही आणि पद–सिद्ध सर्वोच्च सरसेनापती म्हणूनही नाही.**

देशाचे–राज्यांचे प्रशासन हा अनेक शाखा आणि पारंब्या असलेला प्रचंड वटवृक्ष आहे. त्या त्या शाखांचे मंत्री आणि त्यांची मंत्रालये आहेत. त्यात परराष्ट्र मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि गृहमंत्रालय ही तीन मुख्य आहेत. परराष्ट्र मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालय यांचे परस्परसंबंध 'राजा बोले दल हाले' या म्हणीने उत्तम प्रकारे व्यक्त होतात. येथे परराष्ट्र मंत्रालय लाक्षणिक अर्थाने राजा असते. आंतरराष्ट्रीय संबंध आणि धोरणे ठरविणे हा परराष्ट्रीय मंत्रालयाचा प्रांत असतो. परराष्ट्रीय मंत्रालयाने ठरविलेले धोरण यशस्वी करण्याची जबाबदारी संरक्षण मंत्रालयाच्या शिरावर असते. आणि हे मंत्रालय ती जबाबदारी सेनादलाच्या द्वारे पार पाडीत असते; म्हणून सेनादले परराराष्ट्रीय मंत्रालयाची धोरणे सिद्धीस नेण्याची साधने असतात. संरक्षण मंत्रालयालाही सेनादलांच्या संबंधात आपली धोरणे, योजना इत्यादी निश्चित करावयाच्या असतात. ते सर्व स्वतंत्रपणे नसून परराष्ट्र मंत्रालयाच्या धोरणानुसारच करावे लागत असते.

संरक्षणाची दोन क्षेत्रे असतात. एका क्षेत्राचा संबंध देशाच्या सीमाबाहेरील सीमाबाहेरून होणाऱ्या उपद्रवापासून देशाचे संरक्षण करणे हे असते. दुसरे देशाच्या सीमांच्या आत असते. त्याला संरक्षण न म्हणता 'अंतर्गत सुरक्षितता' हे नाव आहे. **शांतीचे संरक्षण** असेही या कार्याला म्हणता येते. परंतु त्याची जबाबदारी गृहमंत्रालयाकडे असते आणि गृहमंत्रालयानेही त्याकरिता आपली सेनादल–सदृश दले उभारली आहेत, त्याशिवाय प्रत्येक घटक राज्याचेही गृहमंत्री असून त्याची सुरक्षा दले आहेत. त्यांना आरक्षादल-Police force हे नाव आहे. प्रसंग विशेषी, घटक राज्यांना सुरक्षिततेकरिता, राज्यातल्या शांतीचे संरक्षण करण्याकरिता, मदतीची आवश्यकता असल्यास केंद्रीय सेनादलांची मागणी करता येते. घटक राज्यात गृहमंत्री आहेत. परंतु संरक्षण मंत्री नाही. सबंध भारताचे एकच संरक्षण मंत्रालय आहे आणि सेनादले आहेत. **तो सर्व अखिल भारताची आहेत.** बहुतेक घटक राज्यांत नागरिक रक्षक–गृह रक्षक दले (Home Guards) आहेत. कित्येक वेळी विनोदाने असो अथवा कुत्सितपणाने असो, त्या त्या मुख्य मंत्र्याची फौज (Chief minister's Private Army) हे नाव गृह–रक्षक दलांना (Home

Guards) दिले जाते.

यावरून असे स्पष्ट होईल की, केंद्रीय प्रशासनातला एक घटक असलेले संरक्षण मंत्रालय देशाच्या संरक्षणाचे धोरण ठरविते, हे विधान मर्यादित अर्थाने लक्षात घ्यावे लागते. संरक्षण मंत्रालयाचे राज्याच्या संरक्षणाचे धोरण याचा मर्यादित अर्थ, परराष्ट्र मंत्रालयाच्या सूचना आणि शिफारशी यांच्या अनुसंधानाने संपूर्ण केंद्रीय प्रशासनाने निश्चित केलेले धोरण यशस्वी करण्याकरिता, सेनादलांच्या घटना, रचना इत्यादी अंतर्गत बाबतीतले धोरण आणि योजना हा आहे.

आपल्या संरक्षण मंत्रालयाच्या कार्यात पुढील बाबींचा अंतर्भाव होतो– (अ) जल, स्थल आणि वायू या तीन्ही सेनादलांचे आणि आंतर–सेनासंबंधी सर्वविषय आणि सेनादलांची संघटना. (आ) संरक्षणाला उपयुक्त आणि आवश्यक अशा सर्व गोष्टींचे (१) उत्पादन, (२) संशोधन, आणि (३) विकास यांचे खाते. (इ) (१) स्वदेशी साधनसंपत्तीचे एकत्रीकरण. (२) सर्व साधनांची स्वतंत्र राष्ट्रीय पुरवठाव्यवस्था. (३) संरक्षणास उपयुक्त आणि आवश्यक अशा सर्व प्रकारच्या वस्तू, त्यांचे घटक आणि सुटे भाग याचा पुरवठा करणारे खाते. (ई) संरक्षणाकरिता जरूर त्या धनराशीचे वित्त मंत्रालयाकडून अर्जन. त्या धनाचे सेनादलात योग्य वितरण आणि व्ययाचे पर्यवेक्षण.

संरक्षण मंत्री हा संरक्षण मंत्रालयाचा मुख्य आहे. त्याच्या मदतीकरिता एक साहाय्यक-Deputy संरक्षण मंत्री आणि संरक्षण उत्पादनाचा राज्यमंत्री आहेत. तसेच वित्तीय सल्लागाराच्या अधिकाराखाली संरक्षण मंत्रालय (वित्त) हा एक भाग आहे.

संरक्षण मंत्रालयाच्या जबाबदाऱ्या पुढील आहेत–(१) (अ) भारताचे आणि त्याच्या प्रत्येक भागाचे संरक्षण करणे. (आ) युद्धकाळात युद्धाकरिता जरूर, योग्य आणि उपयुक्त असेल, असे सर्व काही करणे. (इ) युद्धसमाप्तीनंतर युद्धाकरिता उभारलेल्या यंत्रणांचे आणि व्यवस्थेचे यथायोग्य विसर्जन करणे. (२) जल, स्थल आणि वायू ही तीन्ही सेनादले. (३) या सेनादलांचे राखीव विभाग. (४) प्रादेशिक सेना आणि साहाय्यक वायुसेना. (५) छात्र सेना. (६) सशस्त्र सेनादलाकरिता व संरक्षण–उत्पादनाकरिता, लष्करी स्थापत्य विभागाकडे (Military Engineering Service) सोपविलेली भवन आणि वास्तुनिर्माण–रचना ही कार्ये. (७) लष्करी कृषिक्षेत्रे, दुग्धशाला. (८) वस्तुभांडारे (Canteen Stores). (९) संरक्षण निधीतून खर्च भागविल्या जाणाऱ्या मुलकी सेवा. (१०) जलशक्तीचे सर्वेक्षण (Hydro–graphic Survey) आणि नौकानयन तक्ते (Navigation Charts). (११) सैनिक शिबिरे-छावण्या (Cantounments) यांच्या परिसरातले ' स्थानिक स्वराज्य ' (भाडे नियंत्रण, परिवास नियंत्रण इत्यादी).

भारताच्या घटनेनुसार राज्याचा सर्व कारभार प्रधानमंत्री आणि त्याचे वरिष्ठ मंत्रिमंडळ (Cabinet) यांच्या अखत्यारीत चालतो. भारताचे परराष्ट्रीय

धोरण आणि संरक्षणविषयक धोरण हे अविभाज्य विषय आहेत. संरक्षणाचे धोरण ठरविण्याकरिता आणि त्या धोरणानुसार कार्यवाही होण्याच्या–केली जाण्याच्या निश्चित व्यवस्थेवर देखरेख ठेवण्याकरिता, **मंत्रिमंडळाची संरक्षण समिती-** Defence committee of the cabinet या नावाची एक समिती आहे. ही समिती सर्वोच्च आणि सर्वाधिकारसंपन्न आहे. आपले पंतप्रधान या समितीचे अध्यक्ष आहेत. संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री हे फक्त चार केंद्रीय मंत्री या समितीचे सभासद आहेत. तीन्ही सेनादलांचे कार्यकारी प्रमुख-Chiefs of the Staff आणि संरक्षण मंत्रालयाचे सचिव आणि आर्थिक सल्लागार या समितीच्या बैठकीस हजर राहू शकतात. परंतु त्यांना या समितीत कार्यकारी स्थान नाही. समितीला (सभासदांना) काही गोष्टींची तत्काल माहिती हवी असल्यास यांची उपस्थिती उपयुक्त ठरते. प्रसंगविशेषी हे प्रेक्षक–वजा लोक, आपले विचार समितीपुढे परवानगीने मांडू शकतात. या **समितीत सर्वोच्च सरसेनापती असूनही राष्ट्रपतीला स्थान नाही.**

एका दृष्टिक्षेपात मंत्रिमंडळाची सर्वश्रेष्ठ समिती–

अध्यक्ष पंतप्रधान

सभासद ४–(१) संरक्षणमंत्री, (२) गृहमंत्री, (३) अर्थमंत्री,
(४) परराष्ट्रमंत्री.

उपस्थित ५–१, २, ३, जल, स्थल, वायुसेना प्रमुख (४) संरक्षण मंत्रालय सचिव, (५) आर्थिक सल्लागार.

संरक्षणमंत्र्याला मदत करण्याकरिता (१) संरक्षणमंत्र्याची समिती, (२) संरक्षणमंत्र्याची उत्पादन आणि पुरवठा समिती अशा दोन समित्या आहेत.

संरक्षणमंत्र्याच्या समितीत, (अ) संरक्षणमंत्र्याची स्थलसेना समिती, (आ) संरक्षणमंत्र्याची जलसेना समिती, (इ) संरक्षणमंत्र्याची वायुसेना समिती, (ई) आणि सेना कार्यकारी प्रमुख समिती यांचा अंतर्भाव होतो. त्याशिवाय संरक्षणमंत्र्याचे **संशोधन आणि विकास** प्रस्थान आहे.

संरक्षणमंत्र्याच्या समितीचे अध्यक्ष संरक्षणमंत्री असून सभासद हे आहेत–(१) संरक्षण उत्पादन राज्यमंत्री, (२) साहाय्यक संरक्षणमंत्री, (३) मुख्य संरक्षण सचिव, (४, ५, ६,) तीन सेनादलांचे कार्यकारी प्रमुख, (७) संरक्षण वित्त सल्लागार, (८) संरक्षण वैज्ञानिक सल्लागार. या समितीने संरक्षणाची योजना तयार करावयाची असते; आणि तीन्ही शस्त्र सेनादलांच्या वेगळ्या आणि आंतर-सेनादलांच्या (Interservices) सर्व प्रश्नांवर निर्णय घ्यावयाचे असतात.

संरक्षणमंत्र्याच्या उत्पादन आणि पुरवठा समितीचे अध्यक्ष संरक्षणमंत्रीच आहेत. सभासद (१) संरक्षण उत्पादन राज्यमंत्री, (२) साहाय्यक संरक्षणमंत्री, (३) मुख्य संरक्षण सचिव (४, ५, ६,) तीन्ही सेवादलांचे कार्यकारी प्रमुख,

(७) संरक्षण उत्पादन सचिव, (८) संरक्षण पुरवठा सचिव, (९) सरक्षण वित्त-सल्लागार, (१०) अतिरिक्त सचिव, (११) शस्त्र सज्जा आयुध निर्माण प्रस्थानांचे महासंचालक, (१२) निरीक्षण महासंचालक आणि (१३) संशोधन आणि विकास मुख्य नियंत्रक हे तेरा आहेत.

ही समिती संरक्षण उत्पादनाचे नियमन करते. मुलकी औद्योगिक उत्पादन-क्षमतेशी संपर्क ठेवून उभय उत्पादनांचा (लष्करी आणि गैरलष्करी) समन्वय साधून सेनादलांना शांतताकालीन आणि युद्धकालीन स्वयंपूर्णता आणण्याची दक्षता बाळगते. उत्पादन प्रकल्पांची वेळोवेळी तपासणी करून मंत्रिमंडळाच्या समितीला आपले अभिप्राय सादर करते. युद्धोपयोगी आणि सेनादलांना लागणाऱ्या उपकरणांच्या परदेशातून कराव्या लागणाऱ्या आयातीचे धोरण, आणि 'ऐवजी वस्तूंचे' (Substitutes) संयोजन, जहाज बांधणी आणि पुरवठा व साठा यावर निर्णय घेते.

संरक्षण मंत्र्याच्या संशोधन आणि विकास प्रस्थानाने सेनादलांच्या सर्व गरजा पूर्ण करण्याकरिता, जरूर असलेल्या साधनात सुधारणा करावयाची असते. त्यांचा विकास करावयाचा असतो; आणि त्यांच्यावर संशोधन करावयाचे असते. या प्रस्थानाच्या प्रशासन आणि कार्यकारी मंडळात उत्पादन आणि पुरवठा समितीचे सर्व सभासद असून त्यांच्याशिवाय (१) सेनादलांच्या वैद्यकीय विभागाचे संचालक, (२) वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन मंडळाचे संचालक, (३) विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष, (४) बंगलोरच्या शास्त्रीय संशोधन मंडळाचे अध्यक्ष, (५) पुण्याच्या वायुमंडळ प्रयोगशाळेचे अध्यक्ष, (६) मुंबईच्या टाटा मूलभूत (Fundamental) संशोधन संस्थेचे संचालक, हे सहा अधिक असे एकूण १९ सभासद आहेत.

याशिवाय एक 'युद्ध–साहित्य–आयुध–निर्माण–मंडळ' आणि एक 'अंतराळ-वैमानिक' (Aeronautics) उत्पादन–मंडळ अशी दोन मंडळे आहेत. या मंडळांनी विमाने, अंतराळ उपकरणे आणि अग्निबाण इत्यादी आयुधे आणि शस्त्रास्त्र–सज्जा यांची निर्मिती, उपलब्ध साहित्य आणि साधनांचा अधिकाधिक उपयोग, नवीन संशोधने आणि सज्जा यांचा विकास आणि निर्मिती करून, राज्याला आणि सेवादलांना स्वयंपूर्ण करावयाचे आहे. तसेच त्यांचे साठे आणि त्यांच्या उत्पादनाला–निर्मितीला आवश्यक त्या सर्व वस्तूंचे साठे करून ठेवावयाचे आहेत.

संरक्षण मंत्रालयाचे मुख्य विभाग चार आहेत : (१) स्थलसेना केंद्र (Head Quarters), (२) जलसेना केंद्र, (३) वायुसेना केंद्र, (४) आंतर–सेना संघटना (Organisation), या चवथ्या विभागाचे पुढील उपविभाग आहेत : (१) मुख्य व्यवस्था विभाग, (२) सेनादल वैद्यकीय संचालन विभाग, (३) छात्रसेना संचालन विभाग, (४) सैनिक पुनर्वसन संचालन विभाग, (५) भारतीय जल–स्थल–

वायु सैनिक मंडळ, (६) शिक्षण–प्रशिक्षण विभाग–राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालय–संरक्षण प्रबोधिनी इ., (७) सुरक्षा विभाग (security)), (८) संयुक्त गुप्तलिपी सांकेतिक विभाग, (९) लष्करी भूमी शिबिरे छावण्या विभाग, (१०) जनसंपर्क विभाग, (११) सेनादल क्रीडा–स्पर्धा नियंत्रण मंडळ, (१२) सेनादल छायाचित्रपट विभाग, (१३) सेनादल इतिहास विभाग, (१४) परदेशी भाषा विभाग, (१५) अर्थ, पगार, निवृत्तिवेतन हिशेब इत्यादीचा विभाग. या विभागांपैकी दहावा जनसंपर्क हा सर्व गैरलष्करी लोकांना एक अतिशय उपयुक्त विभाग आहे. लष्करी आणि गैरलष्करी लोकांचा तो एक दुवा आहे. जी माहिती गुप्त, गोपनीय, प्रतिबंधित, सुरक्षित, वर्गीकृत नसेल, जिची परिस्फुटता देशाला हानिकारक असेल, अशी माहिती वगळून, बाकी सर्व माहिती हा विभाग अतिशय तत्परतेने पुरवतो. या विभागामार्फत छायाचित्रे इत्यादी आणि गैरलष्करी लोकांना संरक्षणविषयात ' रस ' वाटू शकेल असे सर्व साहित्य या विभागाकडून प्राप्त होऊ शकते. दुसरा उपयुक्त विभाग तेरावा इतिहासविभाग हा आहे. हा विभाग देशाच्या संरक्षणाची अधिकृत ऐतिहासिक माहिती गोळा करून ती वेळोवेळी पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध करीत असतो. त्यात मोहिमांचा इतिहास, सशस्त्रदलांचा इतिहास इत्यादीचा समावेश होतो. त्याशिवाय संशोधक आणि जिज्ञासूंना संरक्षण आणि संरक्षकदले यांच्याविषयी अधिकृत माहिती पुरवतो.

संरक्षणमंत्र्याची दुसरी जी उत्पादन आणि पुरवठा समिती आहे, त्या समितीचा अध्यक्ष त्या समितीत सभासद असलेला राज्यमंत्री हा आहे. त्याच्या मदतीला आणि त्याच्या अधिकाराखाली, मुख्य कार्यपालन अधिकारी, साहाय्यक संरक्षण मंत्री, संरक्षण सचिव, अतिरिक्त सचिव असे अधिकारी आहेत. त्या प्रत्येकाला विषय वाटून दिलेले आहेत. त्या प्रत्येकाचे वर्णन क्लिष्ट होईल आणि तितकी जागाही येथे नाही. तेव्हा त्यातले मुख्यविषय आणि त्यांचे फक्त नाम-निर्देश साधारण समजुतीकरिता पुरेसे व्हावेत. ते विषय असे–संरक्षणाचे भौतिक, नाविक आणि वैमानिक प्रकल्प आणि योजना, तिन्ही दलांचे यांत्रिक आणि तांत्रिक सेवा विभाग, तिन्ही दलांचे शिक्षण–प्रशिक्षण प्रकल्प आणि व्यवस्था विभाग, परदेशात प्रतिनिधित्व करणारे तिन्ही दलांचे चमू आणि मंडळे, पशू आणि यांत्रिक परिवहन व्यवस्था, पुरवठा, दुरुस्ती आणि सामग्री (पेट्रोल अवजारे इत्यादी), तिन्ही दलांना आवश्यक असणारी आयुधे, शस्त्रास्त्रे, उपकरणे इत्यादी त्यांचे सुटे भाग, दुरुस्ती आणि देखभाल, तिन्ही दलांना लागणाऱ्या इतर सर्व वस्तूंचे अर्जन, साठा आणि पुरवठा, तिन्ही दलांची वास–आवास–निवासव्यवस्था, रसद शिधा–दाणा–गोटा, वस्त्रप्रावरणे आणि आवश्यक वस्तू–बूट इत्यादी, चर्म–रबर–रेशीम–वस्तू, आयुध निर्माण प्रकल्प, ' भारत अर्थ मूव्हर्स, ' ' भारत इलेक्ट्रॉनिक्स्, ' ' गार्डन रीच वर्कशॉप, ' ' माझगाव जहाज बांधणी ' आणि ' गोवा–गोद्या, ' ' भारत डायना-

मिक्स्,' भारी मध्यम आणि हलकी वाहने निर्माण प्रकल्प, तांत्रिक विकास प्रकल्प, रणगाडे, रायफली वगैरे आणि दारुगोळा निर्माण प्रकल्प आणि सर्वात महत्त्वाचा विभाग **प्रमाणीकरण**-Standardisation विभाग हे आहेत. यावरून या विभागांचा व्याप किती प्रचंड आहे आणि यातला प्रत्येक भाग–विभाग आपल्या परीने किती आवश्यक आहे, याची कल्पना येईल. या विभागांच्या कार्याला लष्करी परिभाषेत Logistics लॉजिस्टिक्स् म्हणतात आणि त्याच्या विस्ताराला Tooth to Tail-' दात ते शेपूट ' म्हणतात.

यातील **दात** म्हणजे चावणारा–लढणारा सैनिक, आणि **शेपूट** म्हणजे त्याला एकसारखे सर्व शक्तीनिशी, निश्चितपणे लढत ठेवणारे, त्याला आधार देणारे, त्याची युद्ध–क्षमता शाबूत राखणारे आणि त्याची शारीरिक शक्ती आणि मनोधैर्य मजबूत करणारे, त्याच्या पाठीशी जय्यत तयार असलेले सर्व विभाग आणि उपविभाग.

शस्त्रास्त्रे, आयुधे, त्यांचा दारुगोळा आणि ती शस्त्रे चालविण्यास आवश्यक असलेली मनुष्य-शक्ती या युद्धाच्या न्यूनतम गरजा असतात. 'सैन्य पोटावर लढते '-Army fights on its belly असा एक लष्करी वाक्प्रचार आहे. त्याचे अनेक अर्थ होऊ शकतात. एक अर्थ सैनिक पोटावर भार देऊन सरपटत, शत्रूला शक्य तितके कमी दिसण्याचा प्रयत्न करीत, शक्य तितके त्याच्याजवळ जाऊन, शक्य तितका अचानक आणि शक्य तितक्या शक्तीने प्रहार करतो. प्रहार जितका जवळून तितका तो अचूक आणि तितकी अधिक आघात शक्ती त्यांच्यात असते. दुसरा अर्थ पोटावर म्हणजे रिकाम्या पोटाने, पोटात काहीही नसताना, त्याच्यात काही असण्याची फिकीर न करता लढतो. हाच या वाक्प्रचाराचा खरा अर्थ आहे. परंतु हा मर्यादित अर्थाने घेतला पाहिजे. कारण सैनिक एक मनुष्यच आहे. त्याच्या उपाशी–पोटी लढण्याला सीमा आहेत. तो साधारण माणसापेक्षा सरावाने आणि अनुशासनाने अधिक काटक बनतो इतकाच त्याचा अर्थ. पोटात काही ढकलण्यास तो अधिक काळ नेटाने दम धरू शकतो इतकेच. त्याच्या पोटात जर अन्नांश गेला नाही तर शत्रूचा तो समाचार घेऊ शकणार नाही आणि त्याला मारणे शत्रूलाही फारसे कठीण जाणार नाही. कदाचित तो भुकेने व्याकूळ होऊन आपल्याच मरणाने मरेल ! सैनिक **पोटाकरिता** लढतो. हाही एक अर्थ निघू शकतो. परंतु हा अर्थ नेहमीच बरोबर ठरू शकत नाही. भाडोत्री सैनिक जरी पोटाकरिता–मिळणाऱ्या पगाराकरिता (आणि पूर्वी लुटीच्या हिश्श्याच्या 'वर' कमाईकरिता)-लढत असला, तरी राष्ट्राभिमानी सैनिक असा पोटाकरिता कधीच लढत नाही. तो तत्त्वाकरिता, स्वातंत्र्याकरिता लढतो. परंतु त्यालाही पोट असतेच. भावनेचा कोरडा फराळ त्याचा उत्साह आणि शक्ती कायमची द्विगुणित करू शकत नाही, शेवटपर्यंत पुरत नाही. परंतु कोणतीही खरी लढाई 'शेवटची गोळी आणि शेवटला माणूस'-Last round and Last man या कठोर निर्धाराने

लढावयाची असते. म्हणून भावना–विवश सैनिक त्या चिकाटीने–जिद्दीने लढतो–तो बेभान होऊन लढतो. तेव्हा त्याला पोटाचाच नव्हे तर सर्वच इतर गोष्टींचा विसर पडत असतो. असा वज्रकठोर निर्धार असलेला सैनिकही चिरकाल-कायमचा-उपाशी पोटी लढू शकत नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सैनिकाने पोटावर लढण्याचा विषय नेपोलियनने एका दुर्दम्य युयुत्सू वृत्तीने निकालात काढला आहे. तो म्हणाला होता, माझ्यासमोर पोटाचे नाव काढू नका. "Do not mention hunger in my presence." हे सर्व ठीक आहे. नाव काढले नाही म्हणून प्रश्न सुटत नाही आणि वस्तुस्थितीही बदलत नाही. सैन्याचे पोट हा युद्धाचा अनिवार्य भाग आहे. हे कार्य सैन्याच्या ज्या भागाला करावयाचे असते, तो भाग म्हणजे 'शेपूट.' हे शेपूट दातांना चावण्याची शक्ती देते. सैनिकाला जसे पोट असते तसेच त्याच्या हत्यारांनाही पोट असते. सैनिक रिकाम्या पोटावर काही काळ तरी लढू शकतो. परंतु त्याची पोटात काहीच नसलेली रायफल निकामी ठरते. तिला तर पोटाची आणि देशभक्तीची, तिच्या उपयोगकर्त्यापेक्षा किती तरी अधिक गरज असते.

लढाई म्हणजे बिनहत्यारी भारतीय कुस्ती नव्हे. भारतीय कुस्तीत प्रतिस्पर्ध्याच्या एका मोंढयाला लागलेला मातीचा एक कण विजय मिळवून देण्यास पुरेसा होतो. लढाई शस्त्राने होते. बंदुका, तोफा, उखळी तोफा, यांत्रिक तोफा हे पोटात गेल्याशिवाय उपाशी, रिकाम्या पोटी काम करीत नाहीत आणि आधुनिक युद्धात यांचाच प्रामुख्याने उपयोग होत असतो. म्हणून सैनिकाच्या पोटाला जशी रसद–शिधा, आटा जरूर असतो तसाच या प्रकारच्या शस्त्रांना दारुगोळा, स्फोटके इत्यादींची आवश्यकता असते.

सैनिकाच्या तन्दुरुस्तीकरिता वैद्यकीय आणि सुश्रूषा यांची गरज असते, तशीच शस्त्रांच्या दुरुस्तीची, घटक भाग, पुर्जे बदलण्याची आवश्यकता असते. याची योजना आणि व्यवस्था करणे हे शेपटीचे काम असते. आधुनिक युग हे वेग युग आहे (Speed Age). या युगातील युद्धात सैनिकाने तेथे शक्य तितके सुसज्ज, ताजेतवाने आणि त्याच्या शत्रूच्या आधी पोहोचावयाचे असते (To get there first with the utmost). त्याशिवाय शत्रूवर पहिला घाव घालता येणार नाही. 'पहिला घाव जय पाव' अशी एक सार्थ म्हण आहे. "ग्यानी गणिती पंडित हारे। सो जीते जो पहिले मारे ॥" ज्ञानवान, गणित, शास्त्रज्ञ, पंडित–विद्वान हे सगळे हारतात–पराजित होतात. जो पहिला मार मारतो तो विजयी होतो. असे हे राष्ट्रभाषेतले सुभाषित सांगते. नुसते युद्धातच नव्हे, इतर व्यवहारातसुद्धा 'प्रथमोपक्रमाला' विशेष महत्त्व आहे. ज्याच्या हातात प्रथमोपक्रम येतो त्याच्या हातात लढाईची सूत्रे येतात. तो शत्रूला आपल्या योजनेप्रमाणे कृती करायला भाग पाडू शकतो. कारण प्रथमोपक्रमाच्या योगाने जितके आपल्याला कृतिस्वातंत्र्य मिळते,

तितके शत्रूचे कमी होते. म्हणून शत्रूच्या आधी तेथे म्हणजे, आपल्याला हितकारी आणि उपयुक्त असणाऱ्या परंतु शत्रूला अडचणीच्या असणाऱ्या जागी, त्याच्या आधी जाऊन हजर झाले पाहिजे. शत्रूला आपण निवडलेल्या जागी लढाई देणे भाग पाडले पाहिजे. हे युद्धशास्त्राचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. तेथे जे पोहोचवावयाचे ते सर्व-शक्तीसहित पोहोचले पाहिजे. कारण नंतर युद्धसाहित्य गोळा करणे कित्येक प्रसंगी कठीण होते. मागाहून धावाधाव न करता सर्व तयारीनिशी जाणे, हे सूज्ञपणाचे असते. तेथे पोहोचल्यावर किती शक्तीचा उपयोग करावयाचा, किती शक्ती खर्च करावयाची हे प्रसंगानुरूप, शत्रूच्या तयारीप्रमाणे आणि आपल्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीच्या गरजेप्रमाणे ठरवावयाचे असते. शक्तीचा मितव्यय हे युद्धशास्त्राचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे.

तेथे आधी जाऊन पोहोचण्यासाठी वेगवान परिवहन व्यवस्थेची आवश्यकता असते. विमानातूनही तेथे सैन्य, हत्यारे, दारुगोळा, रसद इत्यादी सर्व उतरविता येते. त्याशिवाय प्रत्यक्ष हाणामारी सुरू होण्याच्या जागी सैनिकांना जितके ताजेतवाने, शरीराने आणि मनाने जाता येईल तितकी त्यांची युद्ध-क्षमता अधिक असते आणि अधिक काळ टिकून राहू शकते. म्हणून सैनिकांनी आता पूर्वीसारखे जंगल, काटे, चिखल, मरुभूमी इत्यादी पायी तुडवीत न जाता, त्यांना ' तेथे ' शक्य तितक्या जलद आणि शक्य तितक्या जवळ, मोटार वाहनातून पोहोचविले जात असते. अशा पायदळ पलटणींना यांत्रिक पायदळ-Mechanised Infantry म्हणतात. (हे जर्मनीने प्रथम सुरू केले. दुसऱ्या महायुद्धातल्या जर्मनीच्या प्रख्यात पँझर डिव्हिजन्समध्ये यांत्रिकी पायदळ होते.) परिवहन व्यवस्था ही शेपटीची तिसरी मुख्य महत्त्वाची कामगिरी असते. शेपटीने करावयाच्या कामाचा व्याप किती प्रचंड आहे हे वर दिलेल्या उत्पादन आणि पुरवठा खात्याच्या साधारण माहितीवरून समजू शकेल.

पूर्वी युद्धसाहित्य कमी लागत होते. कारण शस्त्रे सोपी होती आणि सैनिकांच्या इतर गरजाही कमी होत्या. तसेच युद्धाची पद्धतही निराळ्या प्रकारची होती. पहिल्या महायुद्धाच्या काळात दात ते शेपूट हे प्रमाण एकास वीस झाले होते. आता ते एकास चाळीसपर्यंत पोहोचले आहे असे तज्ज्ञ म्हणतात. ही जी तफावत वाढत गेली आहे आणि वाढते आहे त्याचे मुख्य कारण विज्ञानाची घोडदौड हे आहे. शस्त्राच्या प्रकारात, युद्धसाहित्यात आणि युद्धोपयोगी वस्तूंत सारखी आणि विविध प्रकारची भर पडत असल्याकारणाने शेपटीची जाडी आणि लांबी वाढते आहे. त्याला युद्ध-क्षेत्राचा विस्तार हेही एक कारण आहे.

परंतु हे मुळीच नवे नाही. त्या अवस्थेला आणि व्यवस्थेला असे एखादे नाव दिले गेले नव्हते इतकेच. अगदी प्राचीन काळची धनुष्यबाण आणि खड्ग ही दोन आयुधे जरी विचारात घेतली तरी ती वापरणारे योद्धे ती तयार करीत नसत आणि ते शक्यही नव्हते. वस्तू बनविणारे वेगळे आणि तिचा उपयोग करणारे वेगळे असेच

असते. तलवार बनविणे हे शिकलगाराचे काम. ती बोथट झाली, खंडली म्हणजे ती दुरुस्त करणे हेही दुसऱ्याचेच काम. तलवारीला ' दात ते शेपूट ' हे प्रमाण एकास एक आहे असे दिसते. परंतु ते बरोबर नाही. शिकलगार, लोहार पोलाद तयार करीत नाहीत. लोखंडावर विशिष्ट प्रक्रिया करून त्याचे पोलाद बनविणारा निराळाच असतो. हे एकच उदाहरण ' दात ते शेपूट ' यांच्या प्रमाणाचे प्राचीन अस्तित्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे. तरी आणखीही एक उदाहरण घेता येते. ऐतिहासिक काळातल्या सैन्याबरोबर नालबंद असत. सैनिकांना सरकारी शिधा–आटा किंवा त्यांची भोजनव्यवस्था नसल्याकारणाने सैन्याच्या तळाजवळ डाळपिठाची दुकाने–बाजार असत. हे नालबंद आणि वाणी–उदमी शेपटीचा भाग होते.

अलीकडे बटन दाबून युद्धे सुरू झाली असल्याचे लिहिलेबोलले जाते (Push Button Warfare). त्यानेही गैरसमज होऊ शकेल. फक्त एखादे बटन दाबून किंवा एखादा खटका खालीवर करून नुसते युद्धच नव्हे प्रलय करता येईल, हे जरी खरे असले तरी ती शक्ती किंवा ती साधने निर्माण करण्यासाठी किती मनुष्यबळ लागलेले असेल त्याची मोजदाद करता येणार नाही. किती प्रयोगशाळा, किती कारखाने, किती प्रकारची द्रव्ये आणि रसायने आणि शक्ती आणि हे सर्व साहित्य निर्माण करण्यास लागलेले मनुष्यबळ आणि ते एक बटन दाबणारी व्यक्ती यांच्यातले प्रमाण कल्पनातीत व्यस्त आहे हे उघड आहे. यावरून हे उघड होते की, उत्पादन आणि पुरवठा हे काम प्रचंड आहे आणि या कामात मनुष्यबळही प्रचंड लागते. त्याच्या या शेपटीच्या कामगिरीवरच पुढचे देशाचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होते आणि ते उद्दिष्ट साध्य करणारे सेनाबळच विरुद्ध पक्षाला चावू शकते.

शेपटीचे मुख्य घटक गैरलष्करी मुलकी लोक असतात. व्हेल या अजस्र माशाची शक्ती त्याच्या शेपटीत असते. तिच्या तडाख्याने मोठमोठी प्रासादतुल्य जलयाने नष्ट होऊ शकतात. दातापेक्षा शेपटीचे सामर्थ्य कित्येकवेळी अधिक ठरते. म्हणून देशाचे संरक्षण हा फक्त दातांचा–सैनिकांचाच विषय नाही.

लॉजिस्टिक्स्-Logistics हा एक नवीन शब्द आधुनिक युद्धांच्या संबंधात उपयोगात आणला जात असतो. या शब्दाला देशीभाषांत समर्पक, पूर्ण अर्थवाही असा प्रतिशब्द तयार झालेला नाही. या शब्दाची वर्णने केली गेली आहेत परंतु एक अधिकृत व्याख्याही तयार झालेली नाही. एक ढोबळ व्याख्या अशी करता येईल. " राज्याची सामरिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाच्या सर्व सेनादलांना आवश्यक आणि उपयुक्त अशा देशाच्या सर्व साधनसंपत्तीची मदत आणि अखंड पुरवठा." साधन संपत्तीची यादी फार मोठी होईल. तिच्यातून एकही वस्तू वगळता येणार नाही. साधन संपत्ती, जी सेनादलांना पुरवावयाची असते ती अर्थातच कच्च्या Raw स्वरूपात नसून पूर्ण तयार स्वरूपात (Finished Product) द्यावयाची असते. तिला औद्योगिक प्रक्रियेतून जावे लागत असते आणि हे सर्व वित्त आणि

अर्थ यांच्यावर अवलंबून असते. यावरून Logistics ची सर्वभक्षता दिसून येईल.

आर्मड् फोर्सेस ईयर बुक ७४–७५ या ग्रंथात **लॉजिस्टिक्स्** असे वर्णिले आहे : " A link between the war front and the Home Front–The Military element in nations economy and economic element in its military operations." युद्धाची आघाडी आणि घरची आघाडी यांच्यातील दुवा. देशाच्या अर्थव्यवस्थेतले लष्करी घटकतत्त्व आणि लष्करी मोहिमातली अर्थव्यवस्था. अगदी सोपे करून सांगावयाचे तर असे सांगता येईल की, युद्धात गुंतलेल्या आघाडीवरील लढवैय्यांना जरूर असलेली भरवशाची भरभक्कम पिछाडी म्हणजे लॉजिस्टीक्स्. ' संरक्षण मंत्रालयाच्या उत्पादन आणि पुरवठा समितीला ' दात ते शेपूट यांच्या वाढत्या प्रमाणाला अनुलक्षून मजबूत भरवशाची पिछाडी सांभाळण्याचे, कित्येक प्रसंगी प्रत्यक्ष लढण्यापेक्षाही अधिक कठीण-किचकट आणि महत्त्वाचे काम करावे लागते.

आपल्या संरक्षण मंत्रालयातल्या वर वर्णन केलेल्या समितीची कार्यवाही अतिशय गुंतागुंतीची तर आहेच; त्याशिवाय ती कित्येक बाबतीत व्यावृत्त-Overlaping आहे. तेच विषय एकापेक्षा अधिक समितीच्या कक्षेत घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे सर्व कार्यवाही दिरंगाईची होते किंवा एखादी बाब नक्की कोणाची याचा निर्णय न लागल्याने ' बेवारशी ' ठरून दप्तरदाखल होते. एकाच बाबीवर दोन समित्यांकडून वेगळेवेगळे, क्वचित परस्परविरोधी निर्णय घेणेही शक्य होते. ही परिस्थिती अतिशय महाग पडण्याचे प्रसंग युद्धात हरघडी येत असतात. लढाईत वेळकाढूपणा, दप्तरदिरंगाई कधीच खपणार नाही. तेथे पळानिपळाचा आणि तत्काल निर्णयाचा प्रसंग असतो. एक क्षण देशाच्या भविष्याचा निर्णय ठरवायला पुरे असतो. म्हणून आपल्या संरक्षण मंत्रालयाची Logistics ची बाजू, जितकी सुटसुटीत, निर्णायक आणि कमी वेळ खाणारी असेल, तितकी प्रत्यक्ष लढणाऱ्या सेनापतींना ती उपयुक्त होईल. त्या दृष्टीने या महत्त्वाच्या गोष्टीचा विचार व्हावा ! ब्रिटिशांच्या वेळी हा प्रश्न स्वतंत्र नव्हता आणि भारताचे संरक्षण मंत्रालयही नव्हते. ब्रिटिश साम्राज्याला आणि मुख्यत्वेकरून ब्रिटिश बेटांच्या राज्याला जे हितकर होईल तेच त्या वेळेचे इंग्रजांचे Logistics चे धोरण होते आणि मुख्य गोष्ट हिंदुस्थान पक्का माल पुरवीत नव्हता. आज परिस्थिती सर्वस्वी निराळी आहे. भारताला आपल्या कच्च्या मालातूनच मुख्यत्वेकरून पक्का माल बनवावयाचा आहे आणि स्वातंत्र्य व परिपूर्णता साध्य करावयाची आहे. त्या दृष्टीने भारताच्या Logistics ची, त्याकरिता नियुक्त करावयाच्या समितीची आणि योजनांची आखणी करावी लागेल.

एका दृष्टिक्षेपात आपले संरक्षण मंत्रालय

(१) संरक्षणमंत्र्याची समिती

अध्यक्ष– संरक्षणमंत्री

सभासद ८ – (१) संरक्षण उत्पादन राज्यमंत्री, (२) साहाय्यक संरक्षण मंत्री, (३) मुख्य संरक्षण सचिव ४, ५, ६, तिन्ही सेनादलांचे कार्यकारी प्रमुख (Chiefs of Staff), (७) संरक्षण वित्त सल्लागार आणि (८) वैज्ञानिक सल्लागार.

(२) संरक्षणमंत्र्याची उत्पादन आणि पुरवठा समिती

अध्यक्ष– संरक्षणमंत्री

सभासद १३–१ ते ६ पहिल्या समितीतलेच, (७) संरक्षण उत्पादन सचिव, (८) संरक्षण पुरवठा सचिव, (९) संरक्षण वित्त सल्लागार, (१०) अतिरिक्त सचिव, (११) शस्त्र–सज्जा आयुध निर्माण प्रस्थानांचे महासंचालक, (१२) निरीक्षण महासंचालक आणि (१३) संशोधन आणि विकास मुख्य नियंत्रक.

या समितीचा गैरलष्करी आयोग आणि प्रतिष्ठाने यांच्याशी आणि अशाच खासगी व्यक्ती आणि प्रतिष्ठाने यांचा संबंध येतो. "दातांच्या माराच्या **शेपटीत**" लष्करी आणि गैरलष्करी असे मिश्रण असते.

(३) संरक्षणाच्या दातांची कवळी

(१) स्थल सेना मुख्य केंद्र आणि कार्यकारी प्रमुख-**Army Head Quarters and Chief of Army Staff.**

(२) जल सेना मुख्य केंद्र आणि कार्यकारी प्रमुख-**Naval Head Quarters and Chief of the Naval Staff.**

(३) वायुसेना मुख्य केंद्र आणि कार्यकारी प्रमुख-**Air Head Quarters and Chief of the Air Staff.**

(४) आंतर सेना संघटना-Inter-Services Qrqanisation

सेना-रचना-परिचय

हरिदास, पुराणिक कौरव–पांडवांच्या युद्धाची माहिती सांगत असताना उभय पक्षांची मिळून एकंदर अठरा अक्षौहिणी एवढी प्रचंड चतुरंग सेना असल्याचे व त्यातून शेवटी फक्त आठच योद्धे जिवंत राहिल्याचे रसभरित वर्णन करीत असतात. परंतु अक्षौहिणी म्हणजे एकूण संख्या किती, त्यात घोडे किती, रथ किती, हत्ती किती, पदाती किती, हे सांगत नाही. हीच परिस्थिती आधुनिक सेनादलाविषयीच्या माहिती–संबंधात आहे. युद्ध सुरू झाले म्हणजे रेडियो, वर्तमानपत्रे इत्यादींवरून आघाड्यांवरच्या बातम्या समजतात. त्यांत अनेक वेळा 'डिव्हिजन' हा शब्द येतो.

धरमपाल The Indian Army या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात, " The majority of the people of India lack interest in military matters. Many a highly educated university teacher would be hard put to it if asked to explain the difference between a Battalion, a corps and an army. A lawyer or a business man is quite likely to be at a loss to distinguish between a General, a Lieutenant General and a Lieutenant ......How can the people take an active & intelligent interest in the defence

of the country if they are ignorant of even the elementary facts about the organisation of the army ?" बहुसंख्य भारतीयांना लष्कराविषयी कसलेच स्वारस्य वाटत नाही. विद्यापीठातल्या कित्येक विद्वान प्राध्यापकांना बटालियन, कोअर आणि आर्मी यांच्यातला फरक सांगता येणार नाही. विधिज्ञ आणि उद्योगपतींना जनरल, लेफ्टनंट जनरल आणि लेफ्टनंट यांच्यातला भेद सांगणे कठीण जाईल. सैन्याच्या संघटनेविषयी इतके अज्ञान असताना देशाच्या संरक्षणात जाणतेपणाने रस घेणे कसे शक्य होईल ? राजकारणात आकंठ बुडून गेलेल्या राजकीय नेतेगणाचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही.

चालू युगात प्रत्येक देशाच्या जल, स्थल आणि वायू या तीन प्रकारच्या सेना असतात. भारताच्याही तीन प्रकारच्या सेना आहेत. त्यांपैकी आपली स्थलसेना सर्वात ज्येष्ठ आणि आकाराने मोठी आहे. दुसरा क्रमांक जलसेनेचा असून सगळ्यांत धाकटी वायुसेना आहे. प्राचीन आर्यांना नौकानयनाचे ज्ञान असले तरी त्या काळात जलसेना नव्हती. तीच गोष्ट विमानांची. पुराणांत विमाने असल्याचे सांगितलेले आहे. परंतु जगातल्या पहिल्या दाशराज्ञ 'महायुद्धात' विमानांचा उपयोग केला गेला नव्हता. आपल्या देशात विमाने यदाकदाचित असलीच तर ती देवगंधर्वादी स्वर्गवासी लोकांचीच असतील. एकाही विमानाचा मालक माणूस नव्हता आणि कोणतेही विमान लढाईकरिता वापरले गेले असल्याचे पुराणातही सांगितलेले नाही.

आपली तिन्ही सेनादले संरक्षणमंत्र्याच्या अधिकाराखाली असून त्या प्रत्येक दलाची एक एक वेगळी समिती असून त्याशिवाय तिन्ही दलांच्या कार्यकारी प्रमुखांची एक समिती आहे. या समिती पुढीलप्रमाणे आहेत—

(१) संरक्षणमंत्र्याची स्थलसेना समिती— Defence Ministers Army Committee.

(२) संरक्षण मंत्र्याची जलसेना समिती— Defence Ministers Navy Committee,

(३) संरक्षण मंत्र्याची वायुसेना समिती— Defence Ministers Air Force Committee.

(४) कार्यकारी प्रमुख समिती– Chiefs of Staff Committee.

आपली घटना अमलात आल्यापासून तिन्ही दलांच्या सरसेनापतीचे पदनाम कार्यकारी प्रमुख-Chief of Staff असे ठेवण्यात आलेले आहे.

सर्वोच्चमंत्रिमंडळाच्या संरक्षण समितीने (Defence Committee of the Cabinet) ठरविलेल्या धोरणानुसार प्रत्यक्ष कामगिरी पार पाडणे ही संरक्षण मंत्रालयाची (Ministry of Defence) जबाबदारी आहे. संरक्षणमंत्री ही जबाबदारी पार पाडण्याची कार्यवाही सशस्त्र सेनादलाकडून करून घेत असतो. संरक्षणमंत्री त्या त्या सेनेच्या कार्यकारी प्रमुखाशी ज्या संघटनेद्वारा संपर्क ठेवतो,

त्या संघटनेला त्या त्या दलाची समिती हे नाव दिलेले असून तिन्ही दलांच्या कार्यांत सहकार्य आणि संपर्क राहून देशाचे संरक्षण आणि संरक्षणविषयक धोरण सुसूत्र असणे अत्यावश्यक असल्याकारणाने, तिन्ही दलांच्या कार्यकारी प्रमुखांची समिती अशा या चार समित्या आहेत. यापैकी दलांच्या समितीचा अध्यक्ष संरक्षण मंत्री असतो आणि चवथ्या कार्यकारी प्रमुखांच्या समितीचा अध्यक्ष तिन्ही दलांच्या कार्यकारी प्रमुखांपैकी जो ज्येष्ठ असेल तो असतो.

तिन्ही सेनादलांच्या समितीत–– (१) त्या त्या दलाचा कार्यकारी प्रमुख, (२) उपसंरक्षण मंत्री, (३) संरक्षण उत्पादन मंत्री, (४) संरक्षण मंत्रालयाचा सचिव आणि (५) आर्थिक सल्लागार हे सभासद आहेत. चवथ्या कार्यकारी प्रमुखांच्या समितीत कोणीही मुलकी सभासद नाही. कारण या समितीने प्रत्यक्ष युद्धसंचालनाचे निर्णय घ्यावयाचे असतात. हे विशेष तज्ज्ञांचे काम आहे आणि त्याचा सेनादलाशी प्रत्यक्ष संबंध आहे या समितीव्यतिरिक्त १९६२ साली चीन-विरुद्ध झालेल्या युद्धात अपयश आल्यामुळे आणि त्यानंतर देशातील परिस्थिती बेचैन झाल्याकारणाने एक 'राष्ट्रीय संरक्षण मंडळ'-National Defence Council हे आकर्षक नाव दिलेले एक मंडळ नियुक्त केले गेले. त्या वेळचे पंत-प्रधान जवाहरलाल नेहरू हे अर्थातच त्याचे अध्यक्ष होते.

त्याचे असे झाले होते– तिबेटवरचे हक्क सोडून देणे, चीनने इतका मोठा प्रदेश बळकावला असल्याचे दडवून ठेवणे, बळकावलेल्या प्रदेशात गवताचे पाते-देखील उगवत नाही (Not a blade of grass) (म्हणून तो प्रदेश गेल्याचे दुःख वाटण्याचे कारणच काय ?) असे लोकसभेत विधान करणे, युद्ध चालू असताना परदेशाच्या वाऱ्या करणे, तत्कालीन संरक्षण मंत्री यांनीही तेच करणे आणि सेनादल प्रमुखांशी असौजन्ययुक्त आणि अपमानकारक वर्तन करणे इत्यादी अनेक कारणांमुळे, नेहरूंच्या पूजकांव्यतिरिक्त इतर सर्व, अस्वस्थ झालेले होते. त्यांचा राग शमविण्याकरिता आणि लोकांना विश्वासात घेतले जाते असे दाख-विण्याकरिता हे मंडळ स्थापन करण्यात आले होते. प्रत्येक राज्याचा मुख्यमंत्री (पदसिद्ध) आणि दुसरे काही लोक या मंडळाचे सभासद नियुक्त केले गेले होते. परंतु या मंडळाने पुढे काय केले किंवा हे मंडळ अस्तित्वात आहे किंवा नाही याची माहिती मिळत नाही. संरक्षण मंत्रालयाच्या वार्षिक इतिवृत्तात या मंडळाचा उल्लेख नसतो. १९६५ च्या युद्धाच्या काळात या मंडळाचे नाव ऐकू आले होते. त्यानंतर ते अंतर्धान पावले असे दिसते.

स्थलसेना

भारताच्या स्थलसेनेच्या दोन गोष्टींविषयी नेहमी उल्लेख केला जात असतो. पहिली गोष्ट भारताची (सर्वच सेनादले) सेना ही जगातली सर्वात मोठी स्वयं-सेवक सेना (The Largest Volunteer Army in the World) आहे.

परंतु यात गौरवास्पद असे काही नाही. याची कारणे दोन आहेत. पहिले कारण देशाकरिता सर्वस्वाचे बलिदान करण्यासाठी कोणतेही प्रलोभन, प्रचार किंवा जबरदस्ती करावी लागू नये, ही भारताची ऋग्वेदकालापासूनची प्राचीन परंपरा आहे. प्राचीन भारतीय 'राजन्य' हा पगारी सैनिक नव्हता. ती सहस्रावधी वर्षांची परंपरा भारतीयांच्या रक्तात आणि मनात भिनलेली आहे. त्या श्रेष्ठ, उदात्त देह–स्वभावाचे इतरांनी वाटल्यास कौतुक करावे. भारतीयांनी या प्रशंसेमुळे हुरळून जाण्याचे काहीच कारण नाही. त्या परंपरेला अनुसरूनच पारतंत्र्यातही भारतात विपुल 'भरती' होत होती. **लोकमान्य टिळक** आणि **स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखे** महापुरुष सैन्यभरतीला उत्तेजन देत होते. दुसरी गोष्ट मात्र गंभीर विचार करण्यासारखी आहे.

संख्येने भारताची स्थलसेना जगातल्या देशांच्या सेनांत चवथ्या क्रमांकावर आहे. हे विधान भारत किती दुबळा आहे हेच जगाला जाहीर करीत असते. खंडित भारताचे एकंदर क्षेत्रफळ, त्याच्या भूमिसीमांची एकंदर लांबी, त्या सीमा ज्या भागातून जातात त्या भागांची भौगोलिक आणि नैसर्गिक अत्यंत बिकट परिस्थिती, त्याचा लांब समुद्र किनारा आणि सर्व बाजूंनी वेढलेल्या उघड आणि गुप्त शत्रू आणि हित–शत्रूंच्या सर्व प्रकारच्या तयारीची अवस्था, याबरोबरच त्याच्या साठ कोटीच्या वर सारखी वाढत असलेली लोकसंख्या या सर्वांचा विचार करता, त्याची ८.२८ लक्ष स्थलसेना, ४५ स्क्वॉड्रनची वायुसेना आणि एकही अणुशक्ति युक्त लढाऊ जहाज नसणारी, फक्त एकच–एकुलते एक जुन्या बाजारात विकत घेतलेले '**विक्रांत**' नाव दिलेले विमानवाहू जहाज, नाममात्रही भारी आरमारी नौका नसलेली किरकोळ फ्रिगेटस् कारव्हेटस जातीची जहाजे असलेली जलसेना, हा सर्व सेनासंभार किती केविलवाणा आहे याचा विचार केला गेला पाहिजे.

मोठ्या देशांच्या तुलनेत तर दर्यामें खसखसच आहे. कुठे ३५ लाख फक्त स्थलसेना असलेला कानामागून येऊन तिखट झालेला पहिल्या क्रमांकावरचा चीन, २२ लाखांचा रशिया आणि १० लाखांची अमेरिका ! (पाकिस्तानची स्थलसेना २½ लाख आहे. परंतु त्याच्या पाठीशी चीन आणि अमेरिका आहेतच.) त्याशिवाय तो सीयान्टो, सेंटो इत्यादी लष्करी गटांतही आहे. जगातल्या सर्वच देशांत (भारत वगळून) सैनिकी सेवा सक्तीची असल्याकारणाने, वर दिलेल्या सेनांच्या, खड्या बराकीत राहणाऱ्या योद्ध्याशिवाय, खासगी घरात राहणारे सारेचेसारे लोक, त्या त्या देशाचे शिकून तयार असलेले योद्धे आहेत. एक शिट्टी फुंकून सगळा देश रायफलीच्या ट्रिगरवर बोट ठेवून तयार करता येतो. भारतात 'प्रादेशिक सेना' आहे. परंतु ती फक्त शपथ घेण्यापुरतीच आहे. त्या सेनेच्या पलटणी पूर्ण भरलेल्या नाहीत. छात्रसेनेची म्हणे 'दुसरी आघाडी' आहे ! तिच्यात सुधारणा होत आहे हे मान्य करूनही, तिची या घडीची उपयुक्तता बॉय स्काउटस्‌पेक्षा अधिक नाही.

भारताच्या संरक्षणाची ही अशी केविलवाणी स्थिती आहे. " A defenceless neighbour is a good inducement for attack " या सुभाषिताचे मर्म सांगायला कोणी तत्त्ववेत्ता महापंडित वेठीला धरण्याची आवश्यकता असू नये.

स्थलसेनेची एक वर्गवार विभागणी केलेली आहे. हे वर्गीकरण जल आणि वायू या सेनाप्रकारांनाही लागू पडते. परंतु ते त्या सेनात स्थलसेनेइतके सुस्पष्ट नाही. कारण स्थलसेनेच्या आयुधांचे प्रकार जल आणि वायुसेनांच्या आयुधांच्या प्रकारांपेक्षा अधिक आहेत आणि त्या त्या प्रकाराची युद्धपद्धती, कार्यक्षमता आणि सहकार्य निराळ्या प्रकारचे आहे. ते सर्व जल आणि वायुसेनांच्या युद्धपद्धतीपेक्षा भिन्न प्रकारचे आहे. म्हणून जल आणि वायू या सेनांत तसे स्पष्ट वर्गीकरण केलेले नाही. तरी ते अध्याहृत आहे.

स्थलसेनेतला Arms म्हणजे प्रत्यक्ष लढणारा हा एक वर्ग आहे. शत्रूला चावणारा हाच तो दंत (Teeth) वर्ग. दुसरा जो सैनिकाला सतत लढत ठेवणारा पुच्छ (Tail) हा विभाग आहे त्याचा ' वर्ग 'सेवा Services हा आहे. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की या सेवा वर्गातला किंवा पुच्छ विभागातला घटक हा लढवय्या जवानच असतो. सैन्यात लढाऊ, बिनलढाऊ असा जातिभेद असूच शकत नाही. त्यातला प्रत्येक घटक शिक्षित आणि दीक्षित जवान असतो. काही आघाडीवर जाणाऱ्या पलटणी, त्यांच्यातल्या लांगरी (स्वयंपाकी), भिस्ती, न्हावी अशा लोकांनाही कवाईत आणि प्राथमिक चांदमारीत (Elementary Musketry) तयार करतात. हे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे–

(१) Arms शस्त्रवर्ग–

पायदळ, तोफखाना, चिलखती दळ. इंजिनियर्स, मशीनगन्स, सिग्नल्स, पॅराट्रुप्स इत्यादी.

(२) Services-सेवावर्ग–

आर्मी सर्व्हिस कोअर, आर्मी ऑर्डनस् कोअर, ट्रान्सपोर्ट एटी–एमटी, इंटेलिजन्स् कोअर इत्यादी.

स्थलसेनेच्या सर्वोच्च केंद्राचा (Army Head Quarters) मुख्य कार्यकारी (Executive) प्रमुख स्थलसेना प्रमुख (Chief of the Army Staff) हा असून (१) उपस्थलसेना प्रमुख (Vice chief of the Army Staff), (२) साहाय्यक स्थलसेना प्रमुख (Deputy chief of Army Staff), (३) अॅडजूटंट जनरल, (४) क्वार्टर मास्टर जनरल, (५) मास्टर जनरल ऑफ ऑर्डेनन्स, (६) लष्करी सचिव, (७) इंजिनियर इन चीफ, हे सात अधिकारी असून स्थलसेनेचा सर्व कारभार त्यांच्यात वाटून दिलेला आहे. त्यांची एकूण सहा शाखांत विभागणी केलेली आहे. शाखावार जबाबदारी आणि कामगिरी पुढीलप्रमाणे आहे––

(१) **जनरल स्टाफ शाखा–** या शाखेचे दोन भाग आहेत. एक उप (Vice) सेना प्रमुखाकडे असून दुसरा साहाय्यक (Deputy) सेना प्रमुखाकडे आहे. **पहिल्या उपसेनाप्रमुखाकडे** असलेल्या भागातील विषय पुढीलप्रमाणे आहेत– स्थलसेनेची संघटना आणि विकास, लष्करी मोहिमा-Operations, माहिती (हेरगिरी), लष्करी शिक्षण आणि साधारण शिक्षण, युद्धविकास, लष्करी पर्यवेक्षण, नकाशेनिर्मिती आणि पुरवठा आणि लष्करी इंजीनियर–अधिकाऱ्याच्या समस्या. दुसऱ्या साहाय्यक सेनाप्रमुखाकडे हे विषय आहेत–कार्यकारी अधिकाऱ्यांची कामे (Staff duties); शस्त्रे, आयुधे आणि सज्जा (Equipment) यांची निवड आणि प्रमाण, शाखांत अंतःसंपर्क, चिलखती दल, प्रादेशिक सेना, संरक्षण-सुरक्षा दल यांच्यातील समन्वय, त्यांना करावयाचा सर्व प्रकारच्या साहित्याचा पुरवठा, त्यांची ' आयुध-सज्जता ' आणि शिक्षण.

याशिवाय आणि ही कार्ये पार पाडण्यासाठी संचालन विभाग (Directorates) आहेत. त्यांची वाटणी पुढीलप्रमाणे आहे–

(१) उपसेनाप्रमुखाच्या अधिकारात– (अ) लष्करी माहिती संचालक, (आ) लष्करी पर्यवेक्षण संचालक, (इ) लष्करी माहिती (हेरगिरी) संचालक, (ई) संदेश संचालक, (३) लष्करी शिक्षण संचालक व (ऊ) लढाई (Combat) विकास संचालक.

(२) साहाय्यक प्रमुखाच्या अधिकारात– (अ) अधिकाऱ्यांच्या कार्यांचा संचालक, (आ) शस्त्रे आणि सज्जा संचालक, (इ) चिलखतीदल संचालक, (ई) तोफखाना संचालक व (उ) प्रमुख संदेश अधिकारी.

(३) अॅडजूटंटजनरल शाखा– या शाखेचा मुख्य लेफ्टनंट जनरलचा हुद्दा असलेला अधिकारी असतो. त्याला एक साहाय्यक-Deputy असतो. या शाखेकडे मनुष्यबळ, भरती, रजा, पगार व भत्ते, निवृत्तिवेतन, लष्करी नोकरीच्या अटी, अनुशासन आणि समारंभ ही कामे आहेत. तसेच सैनिक कल्याण, स्वास्थ्य आणि लष्करी कायदा हीही कामे आहेत. त्याचे–(अ) संघटना संचालनालय, (आ) मनुष्यबळ–सेवा सचालनालय, (इ) लष्कर भरती संचालनालय, (ई) शुश्रूषा सेवा संचालनालय, (उ) लष्करी कायदा विधिज्ञ, (ऊ) लष्करी पोलीस आणि (ए) लष्करी आकडेशास्त्रीय संघटना (Directorate of Army Statistical Organisation) ही कार्यालये आहेत.

(४) क्वार्टर मास्टर जनरल शाखा–याही शाखेचा मुख्य लेफ्टनंट जनरल असतो. त्याला एक साहाय्यक-Deputy असतो. या शाखेकडे सैनिक, साहित्य, सज्जा, शिधाआटा रसद, यांची ने–आण, पुरवठा, साठा, तपासणी, जळण, खाद्यान्न, दाणागोटाचारा, लष्करीक्षेत्रे, पशुसंवर्धन, पशुपुरवठा, पशुवैद्यक शुश्रूषा, लष्करी टपाल, कॅन्टीन, अग्निशामक व्यवस्था, लष्करी स्थापत्य–इमारती वगैरेंची तपा-

सणी आणि त्यांची देयके इत्यादी कामे आहेत. त्याकरिता पुढील संचालनालये (Directorates) आहेत– (अ) लष्करी मोहिमांच्या योजना आणि खर्डे, (आ) लष्करी हालचाली, (इ) आवास–निवास, (ई) पुरवठा आणि परिवहन, (उ) पशुपुरवठा आणि पशुवैद्यक सेवा. (ऊ) लष्करी क्षेत्रे, लष्करी डाक, (ऐ) लष्करी मजूर (Pioneers), (ओ) कॅन्टीन–भांडार, (औ) मुख्य तांत्रिक तपासनीस.

स्थलसेनेचे मुख्य कार्यालय (Army Head Quarter) राजधानीत-दिल्ली येथे आहे. भारताचे पाच विभाग पाडले असून त्यांना ' कमांड–हुकुमत ' हे नाव दिले आहे.

१. दक्षिण हुकुमत		Southern command	कार्यालय		पुणे
२. उत्तर	,,	Northern	,,	,,	उधमपूर
३. पूर्व	,,	Eastern	,,	,,	कलकत्ता
४. पश्चिम	,,	Western	,,	,,	सिमला
५. मध्य	,,	Central	,,	,,	लखनौ

(१) **दक्षिण हुकुमतीत–** राजस्थान, गुजराथ, महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्रप्रदेश, तामिळनाडु, केरळ आणि लखदिव बेट.

(२) **उत्तर हुकुमतीत–** जम्मू आणि काश्मीर राज्य.

(३) **पूर्व हुकुमतीत–** बिहार, बंगाल, आसाम, नागालॅंड, अरुणाचल, मेघालय, मिझोराम, मणिपूर व त्रिपुरा आणि अंदमान बेट.

(४) **पश्चिम हुकुमतीत–** पंजाब, हिमाचल प्रदेश व हरियाना.

(५) **मध्य हुकुमतीत–** उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश.

या प्रत्येक हुकुमतीत एरिया, सबएरिया, स्वतंत्र सबएरिया आणि स्टेशन अशी विभागणी केलेली आहे. ती मुलकी विभागणीसारखी आहे. जसे, राज्य–कमिशनऱ्या-जिल्हे-तहसिली-पंचायती इ. हुकुमतीच्या आकारानुसार एरिया, सबएरिया इत्यादींची संख्या आहे. स्टेशन (कॅन्टोनमेन्ट) ते कमांड हुकुमत ही रचना कायम आहे आणि त्यांच्या कार्यालयांची केंद्रेही कायम आहेत. यांना स्थिर-Static, घटना-Formation हे नाव दिलेले आहे. या रचनेला दळणवळणाची–संपर्काची रेषा–साखळी Line of Communication–L of c हे नाव आहे. ही शांतताकालीन सर्वकालीन भारताची स्थल–सेनाविषयक विभागणी आणि कार्यकारी रचना आहे.

युद्धकाळात सेनाविभागांना निराळी नावे दिलेली आहेत. त्यांची केंद्रीय कार्यालये एके ठिकाणी कायम असू शकत नाहीत. ती निरनिराळ्या आघाड्यांवरील युद्धक्षेत्रे आणि मोहिमांचे स्वरूप यावर अवलंबून असतात.

सर्वांत मोठ्या युद्धकालीन सेनाविभागालाही हुकुमत-Command हेच नाव असून त्याच्या केंद्रीय कार्यालयाला कमांड हेड क्वार्टर हे नाव आहे. तेथून खाली

युद्धकालीन सेनाविभागांची वेगळी नावे आहेत. **आर्मी–आर्मीकोअर** जसे १४ वी, ३३ वी इत्यादी, हा सर्वात मोठा स्वयंपूर्ण स्थलसेनेचा विभाग आहे. त्यात आवश्यकतेनुसार त्याच्या खालच्या **डिव्हिजन** या विभागाची संख्या साधारणपणे तीन असते. **डिव्हीजन** हाही स्वयंपूर्ण विभाग आहे. डिव्हिजनमध्येही प्रकार आहेत. ते युद्धाच्या आवश्यकतेनुसार असतात. त्यांची संख्या निश्चित नसली तरी साधारणत: एका डिव्हिजनमध्ये तीन **ब्रिगेड्स** असतात. ब्रिगेड स्वयंपूर्ण असत नाही, त्यांचेही पायदळ ब्रिगेड, चिलखती दळ ब्रिगेड असे प्रकार आहेत. प्रत्येक ब्रिगेडमध्ये तीन बटालियन्स/रेजिमेंटस असतात. ही संख्या निश्चित आहे. त्यांना सर्वसाधारण हिंदी नाव पलटण हे आहे.

संख्येवरून खालून वर गेले असता **एका पलटणीत** ८०० ते १,००० सैनिक असतात. **ब्रिगेडमध्ये** ३,००० ते ४,०००, **डिव्हिजनमध्ये** १५ ते २० हजार, कोअर-मध्ये ७५ हजारापर्यंत सैनिक असतात. पलटणीचा मुख्य लेफ्टनंट कर्नल असतो. ब्रिगेडचा मुख्य ब्रिगेडियर असतो. डिव्हिजनचा मुख्य (डिव्हिजनल कमांडर) मेजर जनरल असतो आणि आर्मीकोअरचा मुख्य लेफ्टनंट जनरल असतो.

स्थिर संघटनेत कमांडचा हुकुमतीचा मुख्य लेफ्टनंट जनरल असतो. एरियाचा मुख्य मेजर जनरल असतो. इंडिपेंडेन्ट सब एरियाचा मुख्य मेजर जनरल किंवा ब्रिगेडियर असतो. सब एरियाचा मुख्य ब्रिगेडियर असतो आणि स्टेशन–कँटोनमेंटचा मुख्य, तेथे असलेला सर्वात ज्येष्ठ सेनाधिकारी असतो (त्यात पद नक्की नाही). प्रत्येक स्टेशनचा एक विशेष असतो. तेथे नियुक्त असलेल्या सेनापथकावर मुलकी शासनाला मदत-Aid to civil power करण्याची जबाब-दारी असते. त्याकरिता पाळीपाळीने सैनिक पथक निर्देशित केलेले असते. अंतर्गत सुरक्षा हेही सेनादलांचे कर्तव्य आहे. म्हणून स्टेशन, सबएरिया, एरिया, कमांड या क्रमाने त्या अधिकाऱ्याने मुलकी प्रशासनाला करावयाच्या मदतीच्या योजना तयार ठेवावयाच्या असतात. विशिष्ट ठिकाणचे नेहमीचे पोलिस, त्या राज्याचे सशस्त्र पोलिस, केंद्रीय सशस्त्र पोलिस आणि सेना यांनी अंतर्गत शांती सुरक्षित ठेवावयाची असते.

स्थल सेनेतील आर्मस् लढणाऱ्या प्रकारांपैकी काही मुख्य प्रकारांची अंतर्रचना अशी आहे––

(१) **पायदळ**– सर्वात लहान पथक–सेक्शन आहे. त्याची जवानांची संख्या ११ आहे. ३ सेक्शनचे १ प्लॅटून असते. एका प्लॅटूनमध्ये ३७ जवान आहेत. प्लॅटूनचा अधिकारी नायब सुभेदार/सुभेदार हा आहे. ३ प्लॅटूनची एक कंपनी होते. तिचा अधिकारी कंपनी कमांडर कॅप्टन / मेजर हा असतो. २ लेफ्टनंट. लेफ्टनंट यांना स्वतंत्र अधिकार नाहीत. ते कंपनी कमांडरचे साहाय्यक असतात.) एका कंपनीत १२३ जवान आहेत. ६ कंपन्या मिळून एक बटालियन /पलटण बनते,

तिचा मुख्य लेफ्टनंट कर्नल असतो. त्याचा साहाय्यक एक मेजर असतो. एक कॅप्टन अॅडजुटट आणि एक क्वार्टर मास्टर असतो. एक लेफ्टनंट माहिती अधिकारी असतो. त्याशिवाय परिवहनवगैरे किरकोळ कामावर लेफ्टनंटची नेमणूक असते. ६ कंपन्यांपैकी ४ रायफल कंपनी असून १ अॅडमिन कंपनी म्हणजे–पलटणीची व्यवस्थापना करणारी आणि १ सपोर्ट कंपनी म्हणजे बटालियनला मारगिरीची (Fire power) मदत करणारी कंपनी असते. बटालियनची एकूण संख्या ९३८ ही आहे.

मदत-Support या संज्ञेचा अर्थ युद्धशास्त्र दृष्टीने समजणे उपयुक्त होईल. सेनेच्या पथकाच्या लढाऊ सामर्थ्याची (१)आघात करणारी Striking, (२)मदतगार-Support आणि (३) निर्वाह–योग क्षेम-Maintainance अशी विभागणी केली गेलेली आहे. पायदळ जवानाची रायफल ही मूळ आघात करणारी शक्ती (Striking force) आहे. प्रत्येक पायदळ सेक्शनमध्ये एक हलकी मशीनगन (L. M. G.) असते. तिची मारगिरी रायफलपेक्षा अधिक द्रुतगतीने होते व त्याशिवाय तिची आघातशक्ती (Striking power/fire power) रायफलपेक्षा अधिक असते. ही अधिक शक्तीने मदतीचे काम (Support) करते. सेक्शनमध्ये चढाई करणारा/मारणारा (Assault / Striking) एक भाग ७ जवान आणि दुसरा मदत करणारा (Support) ३ जवान असे भाग असतात. याच पद्धतीनुसार त्याच्यावर प्लॅटून आणि कंपनी यांची रचना असते. पलटणीत एक मदतगार (Support) कंपनी असते. या प्रत्येक सपोर्ट ग्रुपमध्ये हलक्या मशीनगनव्यतिरिक्त हलक्या मॉरटर उखळी तोफा असतात. त्याशिवाय मदतगार कंपनीत (Support–coy) भारतीय बनावटीच्या इषापूर कारखान्यात तयार झालेल्या नव्या (Recoil-Less–automatic–self loading) रायफल्सनी सुसज्ज असे पथक असते. पलटणीतली ही पाचवी मदतगार कंपनी (Support coy) दुसऱ्या चार रायफल कंपन्यांना मशीनगन, मॉर्टर आणि R.L.P. रायफल यांच्या आग ओकण्याच्या अधिक वेगाच्या आघातशक्तीने मदत करते.

सहाव्या अॅडमीन व्यवस्थापन कंपनीचे काम पलटणीचा रसद–शिधा, वस्त्र, दारुगोळा, हत्यारदुरुस्ती, तंबू परिवहन व्यवस्था (Transport), कार्यालय, पाणी इत्यादी प्रकारचे असते. त्यात लांगरी, भिस्ती, धोबी, न्हावी, वस्तुभांडार इत्यादी बाजारबुणगे यांचा समावेश असतो. हे काम पलटणीच्या क्वार्टर मास्तरच्या कार्यक्षेत्रात येते. त्याशिवाय पलटणीत एक डॉक्टरही असतो.

पायदळाला समर–सम्राज्ञी (The Queen of Battle) हे नाव दिले गेले आहे. कितीही नवी स्वयंचलित आयुधे, हत्यारे निघाली तरी, पायदळाचे महत्त्व किंचितही कमी होणार नाही. पायदळाच्या जवानाच्या आग ओकणाऱ्या रायफलीच्या टोकावरील संगिनीने तलवारीचे काम करावयाचे असते. संगीन भाल्याचेही

काम करते.Six inches of steel in the enemy's tummy wins the war. शत्रूच्या पोटात सहा इंच घुसलेले पोलाद युद्धात जय मिळवून देते, हे विधान आजच्या अणु–युगाच्या काळातही अतिशयोक्त नाही. कारण एखाद्या लक्ष्यावर अणुबाँब टाकून ते लक्ष नष्ट करता आले तरी, त्याचा प्रत्यक्ष ताबा घ्यायला त्या ठिकाणी पायदळ जवानालाच जावे लागते. परमेश्वराने निर्माण केलेले पाय आणि हात विज्ञानाने तयार केलेल्या कोणत्याही कृत्रिम यंत्रापेक्षा अधिक श्रेष्ठ आणि अधिक कार्यक्षम आहेत. कारण ते यंत्र सुरू करायला मानवाचे हात (एखादे बोट) किंवा पाय लागतातच. अलीकडे यांत्रिक पायदळ(Mechanised Infantry) ही एक नवीन लष्करी संज्ञा उपयोगात आणली जाते. तिचा अर्थ इतकाच मर्यादित आहे की, पायदळाला आता पूर्वीइतकी पायपिटी करावी लागत नाही. मोटारवगैरे परिवहनसाधनांच्या उपयोगाने शक्य तितके ताजेतवाने आणि प्रत्यक्ष लढण्याच्या शक्य तितके नजीक पायदळाला पोहोचविले जाते. वेग-युगात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

आपल्या स्थल सैन्यात पायदळ पलटणीसारखीच आर्मी सर्व्हिस कोअर, ऑर्मी ऑर्डनन्स कोअर, मेडिकल कोअर, इमीई (इलेक्ट्रीकल अँड मेक्यानिकल इंजिनियर्स), सिग्नल्स् इत्यादींच्या पलटणी-बटालियन्स आहेत. त्यांच्या अंतर्रचना वेगवेगळ्या आहेत. त्या त्यांना करावयाच्या कार्यानुसार बनविलेल्या आहेत.

येथे एक गोष्ट लक्षात घ्यावयाची आहे ती ही की, प्रत्येक पलटणीची रचना एक शांतताकालीन आणि दुसरी युद्धकालीन-Peace and War Establishment असते. युद्धाचे वारे वाहू लागले म्हणजे सेनादले युद्धकालीन रचनांना अनुसरून सिद्ध होतात.

(२) **चिलखती दल रणगाडा रेजिमेंट–** १ रेजिमेंटला हेड क्वार्टर आणि ३ स्काड्रन्स आहेत. रेजिमेंटल हेड क्वार्टरमध्ये ४ ट्रुप्स् असून प्रत्येक स्क्वाड्रनमध्ये ४ ट्रुप्स आहेत. एकंदर रणगाड्यांची संख्या एका रेजिमेंटमध्ये ४८ आहे.

(३) **तोफखाना–** भारी, मध्यम, हलका, फील्ड आणि किनाऱ्यावरील असे तोफखान्याचे तीन प्रकार आहेत. तोफांचेही २५ पौंडी, १८ पौंडी, हॉरित्सर असे निरनिराळे प्रकार आहेत. एका तोफ खाना–रेजिमेंटमध्ये रेजिमेंटल हेड क्वार्टर आणि ३ बॅटरीज आहेत. प्रत्येक बॅटरीत २ ट्रुप्स् आहेत. एकूण तोफांची संख्या १८ ही आहे.

(४) **रणगाडा विरोधी रेजिमेंट–** (अँटिटँक रेजिमेंट)मध्ये एक हेडक्वार्टर आणि ३ बॅटरीज् आहेत. एका बॅटरीत तीन ट्रुप्स् आहेत.

(५) **मशिनगन रेजिमेंटमध्ये** पायदळ पलटणीसारख्या ६ कंपनीज् आहेत. त्यातल्या ५ पायदळ पलटणीसारख्या आहेत. प्रत्येक कंपनीत ४ प्लॅटून आणि प्रत्येक प्लॅटूनमध्ये २ सेक्शन्स आहेत. रेजिमेंटमध्ये मशीनगन्स्ची संख्या ४८ ही आहे.

आपली एकूण स्थलसेना ८ लक्ष ३७ हजार आहे. तिच्यात १ चिलखती डिव्हिजन, २ चिलखती ब्रिगेडस्, १३ पायदळ डिव्हिजन्स, १० डोंगरी डिव्हिजन्स, ६ पायदळ ब्रिगेडस् आणि २ छत्रीधारी (Para) ब्रिगेडस् आहेत. हे आर्म्स-Arms प्रकारातील आकडे आहेत. त्याशिवाय सेवा-Services मधील प्रकार आणि त्यांची अंतर्गत रचना वेगळ्या प्रकारची आहे.

आर्मीकोअर आणि डिव्हिजनमध्ये कोणते प्रकार आणि त्यांची संख्या किती हे युद्ध भूमीवर, मोहिमेच्या उद्दिष्टावर, शत्रूच्या शक्तीवर आणि युद्धपद्धतीवर अवलंबून असते. हा सेनापतीचा तज्ज्ञविषय आहे. सेनापती जरुरीप्रमाणे त्या त्या प्रकाराची योजना करतो. त्याच्याजवळ त्या वेळी तो प्रकार तितक्या संख्येने उपलब्ध नसला तर त्याच्यापेक्षा श्रेष्ठ सेनापतीने आणि युद्धनेतृत्व करणाऱ्याने त्याला पुरविला पाहिजे. तसेच स्थलसेनेला वायुसेनेच्या आणि जलसेनेच्या मदतीचीही आवश्यकता असते. अशा सहकार्याने लढविलेल्या मोहिमेला संयुक्त मोहीम– Combined Operation म्हणतात.

जलसेना

ज्येष्ठतेत भारताची जलसेना दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत स्वतंत्र होईपर्यंत भारताचे संरक्षण भारताच्या अधिकारात नव्हते. ग्रेट ब्रिटनला सागर सम्राज्ञीचे महत्पद प्राप्त झालेले होते, परंतु त्या पदाला धक्के बसणेही सुरू झालेले होते. अशा स्थितीत ग्रेट ब्रिटनने भारताच्या जलसेनेकडे लक्ष दिले नसल्याकारणाने आणि भारताला समुद्रमार्गे कोणताही धोका नसल्याकारणाने परकीयांच्या राज्यकारभारात भारताच्या जलसेनेला वेगळे असे स्थान नव्हते.

भारत स्वतंत्र होताक्षणीच सुरू झालेली भारत–पाकिस्तानयुद्धे आणि भारत–चीनयुद्ध यात जलसेनेला कामगिरी नसल्याकारणाने भारताची जलसेना उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिली. परंतु नंतर भारत–पाकिस्तानच्या १९७१ च्या युद्धात जलसेनेला कामगिरी मिळाली आणि या सेनेने ती कामगिरी अतिशय कौशल्याने, शौर्याने आणि धैर्याने पार पाडून आपली जलयुद्ध–क्षमता सिद्ध केली.

१९४७ ते १९६७ हा संपूर्ण २० वर्षांचा प्रदीर्घ काळ अक्षरशः फुकट गेला. याचे कारण राज्यकर्त्यांचे शांतीचे मनोराज्य आणि संरक्षणाविषयी औदासीन्य हे होते परंतु १९७१ नंतर राज्यकर्त्यांना जाग आली आणि ती येण्याचे मुख्य कारण बांगला मुक्तियुद्धाच्या वेळी बंगालच्या उपसागरातील अमेरिकेच्या अणुशक्तियुक्त प्रचंड आरमारी जहाज **एंटरप्राईज** आणि सातवे जबरदस्त आरमार यांची कलकत्त्यापासून फक्त ७२ तासांच्या टप्प्यातली उपस्थिती हे होते. तोपर्यंत हिंदी महासागर हा शांत सागर म्हणून सुरक्षित ठेवावा, समुद्र किनारा असलेल्या राज्यांच्या जलमर्यादा (Territorial Waters) आणि खुला समुद्र (High Seas) इत्यादी विषयांचा विचार करणाऱ्या सागरी आंतरराष्ट्रीय परिषदांना भारताचा प्रतिनिधी

हजर राहत आलेला होता. इतकेच त्या परिषदा आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि ग्रेट ब्रिटनची सागरसम्राज्ञी पदावरून 'खुषीची निवृत्ती' (हिंदी महासागरात–सुवेझ पूर्वेकडील आपली आरमारी ठाणो सोडून देण्याची ग्रेट ब्रिटनची घोषणा) या महत्त्वाच्या घटनांकडे राज्यकर्त्यांनी मुळीसुद्धा लक्ष दिले नव्हते. इतका मोठा समुद्र किनारा असूनसुद्धा !

हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरील देश आपआपले नाविक सामर्थ्य वाढवीत असल्याचे, जलसेनांचा विकास करीत असल्याचे, आणि त्यांची आपसात चढाओढ चालू असल्याचे, वाळूत तोंड खुपसून बसलेल्या आपल्या सरकारला समजलेच नाही, तर उमजेल कोठून ? परंतु जलसेनेने १९७१ च्या आपल्या पराक्रमाने राज्यकर्त्यांचे लक्ष आपल्याकडे ओढून घेतले. तेव्हापासून भारताच्या जहाज बांधणीला आणि सामुद्री तंत्र आणि विज्ञान यांच्या विकासाला आणि स्वदेशीकरणाला चालना मिळाली आणि जलसेनेच्या संघटनेची नवी व्यवस्था झाली.

आपल्या जलसेनेचा कार्यप्रमुख-Chief of the Naval Staff हा तिचा सर्वोच्च अधिकारी असून त्याच्या मदतीला (१) उपकार्यप्रमुख (Vice–Chief), (२) साहाय्यक कार्य प्रमुख (Deputy Chief), (३) मनुष्य बल प्रमुख (Chief of Parsonnels), (४) साधन–प्रमुख (Chiel of material) आणि (५) पुरवठा–प्रमुख (Chief of Logistics) हे पाच अधिकारी आहेत.

(१) उपकार्य प्रमुखाकडे सागरी मोहिमांची आखणी करणे, त्यांच्या योजना तयार करणे, त्यांच्याकरिता शस्त्रे आणि आयुधे यांची व्यवस्था करणे, सागरी धोरण, सागरी युद्धाचे डावपेच, जलसेनेची माहिती आणि हेरगिरी, (Naval Intellegence), सागरी दळणवळण, जल परीक्षण (Hydrography), जलसेनेच्या सचिवालयाचे कार्यवेक्षण इत्यादी जबाबदाऱ्या आहेत.

(२) साहाय्यक प्रमुखाकडे– सामुद्री हवाई कार्य (Naval Aviation), जलसेनेचा विमान विभाग (Fleet Air Arm), पानबुड्याविषयीचे धोरण, त्यांची योजना व उपयोग आणि सामुद्री दळणवळण हे विषय आहेत. त्याच्या हाताखाली त्या त्या विभागाची संचालनालये (Directorates) आहेत.

(३) मनुष्यबळ प्रमुखाकडे– जलसेनेतील भरती, सेवाशर्ती, शिक्षण–प्रशिक्षण, साधारण शिक्षण, अनुशासन, कल्याण आणि जलसेनाविषयक कायदा हे विषय आहेत. त्यांच्याकरिता त्या त्या विषयाची संचालनालये असून नाविक स्वास्थ्य शुश्रूषा या विषयाचे संचालनालय आहे.

(४) साधनप्रमुखाकडे– जहाज बांधणी, दुरुस्ती आणि देखभाल, नाविक आणि वीज इंजिनिअरिंग, नाविक आयुधे देखभाल, दुरुस्ती आणि पुरवठा, जलसेनेच्या गोद्या (Naval Dock–Yards), जलसेनेस उपयुक्त असे जलयानांचे नवीन प्रकार आणि नमूने हे विषय आहेत आणि त्यांच्याकरिता त्या त्या विषयाची संचालना-

लये (Directorates) आहेत.

(५) पुरवठा (Logistics) **प्रमुखाकडे**– पुरवठ्याची सर्व तपशीलवार कामे, जलसेनेच्या सर्व वास्तू आणि नवीन प्रकल्प रचना उभारणी, वेतन आणि निवृत्ति-वेतन, जलसेनेला लागणारी सर्व आयुधे आणि युद्धसाहित्य यांचा पुरवठा, साठा, तपासणी आणि दुरुस्ती, जलसेनेची रसद आणि अन्न–धान्य पुरवठा, साठा, वस्त्र-प्रावरणे आणि इतर सर्व आवश्यक वस्तूंचा (Necessaries) पुरवठा ही कामे आहेत. त्याकरिता वेगवेगळी कार्यालये आहेत.

याशिवाय संरक्षण मंत्रालयाच्या उत्पादन आणि पुरवठा या केंद्रीय विभागात एक लढाऊजहाज प्रतिष्ठानाचा (Warship Project) संचालक आहे. संरक्षण, संशोधन आणि विकास विभागात जलसेनेला उपयुक्त आवश्यक बाबींवर संशोधन चालू असते. तो Naval Research and Technology हा भाग होय.

जलसेनेला उपयुक्त असे फार मोठे आणि महत्त्वाचे काम माझगाव डॉक्स लिमिटेड या सरकारी प्रतिष्ठानात होते आहे. या कारखान्यात निरनिराळ्या जातींची लढाऊ जहाजे बांधली जातात. त्यात डिस्ट्रॉयर्स, फ्रिगेटस्, माईन लेअर्स हे मुख्य प्रकार आहेत. ता. ३ जून १९७२ हा दिवस भारताच्या जलसेनेच्या इतिहासातला एक अतिशय महत्त्वाचा दिवस होता. त्या दिवशी भारताचे स्वदेशी बनावटीचे पहिले लढाऊ जहाज **आय. एन. एस. नीलगिरी** समारंभपूर्वक नारळ फोडून–शांपेनची बाटली फोडून नव्हे–समुद्रात लोटले गेले. त्याच्या पाठोपाठ **हिमगिरी** आणि **उदयगिरी** ही लियांडर जातीची भारतीय जहाजे जलसेनेत आपली सेवा रुजू करण्याकरिता समुद्रात शिरली. हा आता माझगावचा एक नित्य क्रम झाला आहे. **गार्डन रीच वर्कशॉप लिमिटेड** हे प्रस्थानही तेच काम करते आहे. तेथून ' फायबर ग्लास पेट्रोल बोटस् ' या गस्त घालणाऱ्या वेगवान नावा बाहेर पडल्या आहेत व त्या सागरकिनाऱ्यावर गस्त घालत आहेत. तिसरे जलसेनेला उपयुक्त काम करणारे ' गोवा शिपयार्ड लिमिटेड ' हे प्रस्थान आहे.

जलसेनेचे (१) पूर्व हुकूमत-Command केंद्र **विशाखापट्टण**, (२) पश्चिम हुकुमत केंद्र **मुंबई** आणि (३) दक्षिण हुकूमत केंद्र **कोचीन** असे तीन विभाग असून **विक्रांत** ही विमानवाहू नौका भारताच्या जलसेनेची ध्वजनौका (Flagship) आहे. पश्चिम हुकुमतीचे केंद्र **मुंबई** केंद्र हे जलसेनेचे मुख्य केन्द्र आहे. जलसेनेचा सर्वोच्च सर दर्यासारंग-Chief of the Naval Staff हा आहे.

आपल्या जलसेनेत पुढील प्रकारच्या युद्ध नौका असून त्यांची नावे त्या त्या प्रकारासमोर दिलेली आहेत–

(१) **क्रूझर**– म्हैसूर, दिल्ली, एचिलीस् इत्यादी.

(२) **डिस्ट्रॉयर्स–विनाशिका**– राजपूत, राणा, रणजीत, गोमती, गोदावरी इत्यादी.

(३) **फ्रिगेटस्–** जमना, सतलज्, कृष्णा, तीर, कावेरी, बेटवा बियास, किरपाण, कुठार इत्यादी

(४) **माईन स्वीपर–आणि माईन लेअर्स–** समुद्रातले पाणसुरुंग काढून टाकणाऱ्या आणि पेरणाऱ्या बोटी.

(५) **टग्ज–** जहाजे ओढून आणणाऱ्या बोटी.

(६) **एस्कॉर्टस–** सोबत आणि संरक्षण करणाऱ्या बोटी.

(७) **अन्वेक्षण–** सर्व्हे बोटी.

(८) **पेट्रोल–** गस्त घालणाऱ्या बोटी.

(९) इतर प्रकारच्या मोटार बोटी

(१०) शिक्षण शाळा (Shore Establishment) शिवाजी-लोणावळा, वेंडुरथी–कोचीन, सरकार–विशाखापट्टण.

आपल्या जलसैनिकांची एकूण संख्या ३०,००० आहे. आपल्या जलसेनेत १ सोळा हजार टनी विमानवाहू (जुनी ब्रिटिश) विक्रांत नावाची युद्धनौका आहे. ६ पाणबुड्या आहेत. २ क्रुझर्स, २ डिस्ट्रायर्स, २२ फ्रिगेटस्, ८ ओसा जातीच्या बोटी, ९ गस्तीच्या बोटी, ९ समुद्राभिमुखसंरक्षक (seaward defence) बोटी, ८ पाणसुरुंग काढणाऱ्या, ३ सैनिकांना जमिनीवर उतरविणाऱ्या-Landing Craft बोटी असून जलसेनेच्या विमान शाखेत (Naval Air Arm) १,५०० सैनिक आहेत. ३३ सीहॉक हमला विमाने, १० अलाइझ, ६ सीकिंग, १४ आलौटी इतकी नौसेना विमाने आहेत. आपल्या विमानवाहू ध्वजनौका विक्रांतवर १० सीहॉक, ५ अलाईझ आणि २ आलौटी जातीची अशी एकूण १७ विमाने आहेत.

वायुसेना

भारताच्या वायुसेनेचा जन्म ता. १ एप्रिल १९३३ या दिवशी झाला. ती सर्वात धाकटी (वयाने आणि सैनिकांच्या संख्येनेही) आहे. परंतु शक्तीने, तिच्या-पेक्षा ज्येष्ठ असलेल्या दोन्ही सेनांपेक्षा किंचित्‌ही कमी नाही. भारत स्वतंत्र झाला त्या दिवशी स्वतंत्रभारताचे फक्त ९ स्क्वॉड्रन्स होते. आज ४५ आहेत. तीस वर्षां-तली ही संख्यात्मक प्रगती मुळीच स्पृहणीय नाही. ज्या वेळी भारताचे तुकडे पाडण्यात आले त्यावेळी हिंदुस्थानच्या इंडियन एअर फोर्सची बहुतेक कायम ठाणी (Permanant Bases) पश्चिम पंजाब आणि सिंधमध्ये होती. तुकडे पाडण्याचा परिणाम असा झाला की स्वतंत्रभारताच्या विमानदलाची घरदार जाणाऱ्या निर्वा-सितासारखी स्थिती झाली. परंतु हेही दिवस पार पडले आणि देशाच्या संरक्षणा-करिता तयार असलेल्या वायुसेनेला आसरानिवारा मिळाला.

विज्ञानाच्या विकासाचा वेग आणि परिणाम जितका वायुसेनेवर झाला तितका दुसऱ्या दोन सेनादलांवर झाला नाही. कारण वैज्ञानिकांना नवीन नवीन शोध लावण्यास अनंत आकाश उपलब्ध झाले. त्या कारणाने नवी संघटना, नवी

रचना, नवी विमाने आणि वैमानिक आयुधे भराभर निर्माण होऊ लागली. त्या कारणाने वैज्ञानिक क्षेत्रात फार मागे असलेल्या भारताला प्रगत देशांची बरोबरी करणे अतिशय कठीण जात आहे. भारताची बरीच जुन्या प्रकारांची विमाने आता जुनी कालबाह्य झालेली आहेत. परंतु भारताच्या वायुसेनेने आपल्या जुन्या विमानांनी बांगला मुक्तियुद्धात नेत्रदीपक कामगिरी बजावलेली आहे. त्या आपल्या वैमानिकांनी आपल्या वैमानिक युद्धकौशल्याने, धडाडीने आणि साहसाने शत्रूच्या विमानांना जबरदस्त मार तर दिलाच, त्याशिवाय स्थलसेनेला अनेक प्रकारची मदतही दिली. ही मदत मिळाली नसती तर हे युद्ध इतक्या विद्युद्वेगाने संपले नसते. स्थल व वायू या सेनांचे सहकार्य काय करू शकते याचे हे युद्ध एक नमुनेदार प्रात्यक्षिक होते.

बांगला मुक्तियुद्धाच्या अनुभवाने आपल्या वायुसेनेची कार्यक्षमता वाढविण्याचे आणि विमानचालक आणि कर्णधार यांचे तज्ज्ञ ज्ञान अद्ययावत ठेवण्याचे नवे मार्ग शोधून काढून त्यांची अमलबजावणी करण्याचे अखंड प्रयत्न चालू आहेत. वायुसेनेच्या उपयुक्ततेचे आणि कार्यक्षमतेचे मर्म तळापासून ते लक्ष्यापर्यंतची वाढती मर्यादा आणि आघातशक्ती यांच्यात साठविलेले असते. त्या दृष्टीने नव्या बांधणीची, अधिक आघातशक्तीची आणि तळापासून लांबलांबची उड्डाणे करणारी विमानेही वायुसेनेची मुख्य गरज असते. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत आणि वैमानिकास उपयुक्त अशी रडार आणि अंतर्गत दळणवळण आणि संपर्क व्यवस्था करण्यात आलेली आहे. एका वाक्यात आपल्या वायुसेनेची सर्व प्रकारे अद्ययावत अवस्था आणणे चालू आहे.

आपल्या वायुसेनेचा सर सेनापती आणि सर्वोच्च कार्यकारी अधिकारी-Chief of the Airstaff हा आहे. त्याच्या मदतीला १. उपकार्यकारी प्रमुख, २. साहाय्यक कार्यकारी प्रमुख, ३. व्यवस्था आणि कारभार-Administration प्रमुख आणि ४. देखभाल दुरुस्ती-Maintenance प्रमुख हे चार ज्येष्ठ अधिकारी आहेत.

१. **उपप्रमुखाची** जबाबदारी (अ) योजना, (आ) शिक्षण, (इ) साधारण शिक्षण, (ई) सांख्यिकी, (उ) कार्यक्रमांची आखणी, (ऊ) प्रकल्प, (ए) आर्थिक योजना, (ऐ) हवाई दळणवळण आणि (ओ) वायुसेनेच्या आवश्यकतांची पूर्ती हे विषय असून त्या त्या विभागांची संचालनालये (Directorate) आहेत.

२. **साहाय्यक प्रमुखाकडे** (अ) हवाई हल्ले आणि संरक्षण, (आ) परिवहन आणि हवाई योजना (marytime operations), (इ) माहिती—हेरगिरी, (उ) हवाई सुरक्षितता, (ऊ) संदेश, (ए) हवामान हे विषय आहेत आणि त्या त्या विषयांची संचालनालये आहेत.

३. **व्यवस्था आणि कारभार** अधिकाऱ्याकडे (अ) भरती आणि सेवाशर्ती,

(आ) बदल्या आणि नियुक्ती व बढती, (इ) वेतन–निवृत्तिवेतन, (ई) कल्याण, (ए) हिशेब, (ऐ) कायदा, (ओ) वैद्यकीय आणि शुश्रूषा आणि (औ) वायुसेनेचे प्रकल्प हे विषय असून त्यांची संचालनालये आहेत.

४ **देखभाल आणि दुरुस्ती** प्रमुखाची जबाबदारी– (अ) सर्व वायुयाने दुरुस्त आणि तयार ठेवणे, (आ) वस्तुभांडार, (इ) यांत्रिक आणि तांत्रिक कार्ये, (ई) वाहतूक, (ए) आयुधे आणि युद्धसाहित्य, (ऐ) जमिनीवरील यांत्रिक आणि विद्युत (Electronic) व (ओ) तपासणी ही आहे. त्यालाही आवश्यक त्या संचालनालयांची मदत मिळण्याची योजना आणि व्यवस्था आहे.

वायुसेनेच्या कार्याचे १. सर्वसाधारण कार्य-General आणि २. विशेषकार्य असे दोन पोटविभाग आहेत.

१. सर्वसाधारण कार्यात उड्डाणे, कर्णधार, चालक, गोलंदाज, धावपट्टीचे आणि जमिनीवरील कार्य हे विषय येतात.

२. विशेष (special) कार्यात अंतर्गत व्यवस्था, सांकेतिक, हवाई छाया–चित्रण (Air–Photo), आणि वैद्यकीय हे विषय येतात. तसेच इंजिनियरिंग–इक्वीप-मेंटमध्ये इंधन–जळण-वंगण आणि तांत्रिक भाग येतात.

वायुसेनेच्या १. पश्चिम हुकुमत-Command, २. पूर्व हुकुमत, ३. मध्य हुकुमत, ४. शिक्षण हुकुमत आणि ५. दुरुस्ती तयार हुकुमत (Maintenance) अशा पाच हुकुमती आहेत. त्याशिवाय युद्ध-गट (Operational Group) आहेत. पश्चिम हुकुमतीचे केन्द्र **पालम**, पूर्व हुकुमतीचे **शिलांग**, मध्य हुकुमतीचे–**अलाहाबाद**, शिक्षण हुकुमत–**हैद्राबाद** आणि दुरुस्ती–तयारी हुकुमत–**नागपूर** ही केन्द्रे Head Quarters आहेत.

तीन (पश्चिम, पूर्व, मध्य) हुकुमती आणि युद्ध–गट यांच्या शिरावर भारताच्या हवाई संरक्षणाची आणि हवाई युद्धाची पूर्ण जबाबदारी आहे. त्या त्या विभागातली फायटर बांबर टेहळणी पथके त्यांच्या त्यांच्या अधिकाराखाली आहेत. त्यांनी स्थल आणि जलसेनांशी सहकार्य करणे आणि त्यांना मदत करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. ही लढाऊ असल्याकारणाने ती अष्टौप्रहर तयार आणि सुसज्ज असली पाहिजे. त्यांच्या हवाई कार्याच्या मदतीला आणि पूरक म्हणून १. सर्वसाधारण कार्य-General Duty आणि २. विशेष कार्य Special Duty तसेच ३. जमिनीवरील कार्य-Ground Duty, या तीन शाखा पूर्ण सज्ज असल्या तरच वायुसेना आपले कर्तव्य उत्तम प्रकारे करू शकेल.

खड्या वायुसेनेशिवाय तीनप्रकारचे राखीव वायुसेनादल आहे– १. वायुसेना राखीव (Regular Reserve) यात वायुसेनासेवा मुक्त आणि निवृत्त वायुसैनिक यांचा भरणा आहे. २. वायुसुरक्षाराखीव (Air Defence Reserve) यात मुलकी विमानवाहतुकीतले यांत्रिक व तांत्रिक वैमानिक स्वयंसेवक आहेत.

३. साहाय्यक राखीव (Auxilliary Reserve) यात विमानचालक आणि कर्णधार या विषयांचे शिक्षण घेतलेले नागरिक सामिल होऊ शकतात.

वायुसेनेची रचना पुढीलप्रमाणे आहे—सर्वात खालचे लहान पथक ३ विमानांचे आहे. त्याला **फ्लाईट** हे नाव आहे (एकएकटे विमान उड्डाण करते त्यालाही मुलकी वाहतुकीत फ्लाईट म्हणतात आणि त्याला आगगाडीसारखे क्रमांक दिले जातात. फ्लाईट या संज्ञेने असे दोन क्षेत्रांत दोन अर्थ होतात). विमानाच्या एका उड्डाणाला सॉर्टी-Sorty म्हणतात. फ्लाईटपेक्षा मोठा स्क्वॉड्रन, त्यावर विंग, त्यावर ग्रुप व सर्वात वर ऑपरेशन कमांड. भारताचे वायुसेनादल ४५ स्क्वॉड्रनचे आहे.

आपल्या विमानांची कामगिरीप्रमाणे १. फायटर, २. बांबर आणि ३. टेहळणी (Reconnaissance) ही तीन प्रकारची पथके आहेत. आपल्या वायुसेनेची हलक्या तोफा, मशीनगन, रॉकेट अग्निबाण, बाँब, स्वयंचलित शस्त्रे आणि हलकी प्रक्षेपणास्त्रे इत्यादी आयुधे आहेत.

आपल्या वायुसेनेने आकाशातून जमिनीवर जवान उतरविलेले आहेत, तोफा आणि रणगाडेही सोडलेले आहेत. आकाशातून रसदपुरवठा आणि सर्वप्रकारचे साहित्य जमिनीवर टाकणे हे नित्याचेच काम आहे. वायुसेनेमुळेच नजर बंदीची आवश्यकता (Camouflage) उत्पन्न झाली.

आपल्या वायुसेनेचे एकूण मनुष्यबळ (जमिनीवरील उड्डाणे न करणारे यांत्रिक, तांत्रिक, दुरुस्ती, विमानतळ, धावपट्टया इत्यादी आनुषंगिक कामे करणारे धरून) एक लक्ष आहे. आपल्याजवळ ७३१ लढाऊ Combat विमाने आहेत. ६० कॅनबेरा विमानांचे **३ हलकी** स्क्वॉड्रन्स, ७७ एसयू बीकेएल विमानांची **६ स्क्वॉड्रन्स**, ५० एच एफ–२४ मरुत विमानांची **३ फायटर**–बाँबर स्क्वॉड्रन्स, १३० हंटर विमानांची **६ फायटर**–बाँबर स्क्बॉड्रन्स, २२ मिग विमानांची **९ इंटरसेप्टर** स्क्वॉड्रन्स, १८० नॅट विमानांची, **८ इंटरसेप्टर** स्क्वॉड्रन्स, ८ कॅनबेरा विमानांचे **१ टेहळणी** स्क्वॉड्रन, ६ सुपर कॉन्स्टेलेशनचे, **१ एम आर स्क्वॉड्रन**, निरनिराळ्या जातीची विमाने असलेले **११ वाहतूक** परिवहन स्क्वॉड्रन्स आणि दुसरी निरनिराळी विमाने असलेली सुमारे **१२ स्क्वॉड्रन्स्** अशी आपली वायुसेना आहे. यातली लढाऊ स्क्वॉड्रन्स ४५ आहेत.

आपले तिन्ही दलांचे सामरिक सामर्थ्य आपल्या शेजारी विशेषत: ज्यांनी आपल्यावर युद्धे लादली त्या असंतुष्ट विस्तारवादी देशांच्या सामर्थ्याशी तोलून पाहणे उद्‌बोधक ठरेल, असे दोन देश आहेत : एक पाकिस्तान आणि दुसरा चीन. ज्यावेळी भारताचे तुकडे कापून काढून पाकिस्तान उभा केला गेला त्यावेळी हिंदुस्थानच्या ब्रिटिशांकडून वारसा हक्काने आलेल्या सेनादलांचेही तुकडे केले गेले. हे तुकडे नव्या पाकिस्तानचा प्रदेश विस्तार आणि लोकसंख्या यांच्या प्रमाणात पाडण्यात आले होते आणि त्याकरिता एक विभाजन मंडळ-Partition Council नियुक्त केले गेले होते.

वाटणीचा तपशील पुढील कोष्टकानुसार होता :–

जात प्रकार	एकूण	भारत	पाकिस्तान
१. स्थलसेना			
पायदळ पलटणी गुरखा धरून	१२१	८८	३३
चिलखती रेजिमेंटस्	१८	१२	६
तोफखाना रेजिमेंटस्	२७	$१८\frac{१}{२}$	$८\frac{१}{२}$
इंजिनियर कंपनीज्	९५	६१	३४
विद्युत यांत्रिक पथके	१४	१०	४
पशुपरिवहन पलटणी	७	४	३
मोटर पलटणी	५१	३४	१७
पहाडी पलटणी Mountain Rgts.	३	२	१
सीमा सुरक्षादल	१	$\frac{१}{२}$	$\frac{१}{२}$
यात वैद्यकीय पुरवठा साहित्य आणि सिग्नल यांचा समावेश नाही.			
२. जलसेना			
स्लूप्स्	६	४	२
फ्रिगेटस्	४	२	२
माईन स्वीपर बोटी छोटी	१६	१२	४
कार्व्हेट	१	१	—
सर्व्हेशिप	१	१	—
ट्रॉलर्स	६	४	२
मोटार माईन स्वीपर	६	४	२
मोटार लाँच	८	४	४
यात इतर किरकोळ नावा नाहीत			
३. वायुसेना			
फायटर स्क्वॉड्रन्स	९	७	२
परिवहन स्क्वॉड्रन्स	२	१	१
तिन्ही दलांतले लढाऊ विभागांचेच फक्त आकडे येथे दिले आहेत. वाटणीची ही पूर्ण यादी नाही.			

पाकिस्तान आंतरराष्ट्रीय प्रांगणात एक स्वतंत्र राज्य म्हणून उतरताच त्याने सर्वप्रथम राष्ट्रसंघाचे (U. N. O.) सभासदत्व मिळविले. ही सर्व कार्यवाही इतक्या वेगाने आणि तातडीने करण्यात आली की तिच्याबद्दल आश्चर्य आणि शंका वाटावी ! हिंदुस्थानची खांडोळी करण्याचा मनसुबा पक्का ठरताच आणि **पाकिस्तानचा कायदेशीर जन्म होण्याच्या २ दिवस आधी ता. १२ आगस्ट रोजी यूनोच्या कायदेखात्याने (U. N. Legal Dept.) एक खलिता पाठविला. त्यात संस्थापक सभासद असलेल्या हिंदुस्थानातून वेगळा काढण्यात येणार असणाऱ्या पाकिस्तानने स्वतंत्र सभासदत्वाचा अर्ज करावा असे आपणहून नमूद केले.** ही पहिली विचारात घेण्यासारखी बाब आहे. यावरून पाकिस्तानाची, होऊ घातलेल्या त्याच्या जन्माच्या आधीपासूनच यूनोला काळजी होती; हे स्पष्ट दिसते. या पार्श्वभूमीवर भारत–पाक पहिल्या युद्धात भारताने दाखल केलेल्या तक्रारीची सर्व पक्षपाती इमारत उभी आहे.

भारत १५ आगस्टला स्वतंत्र झाला. १६ आगस्ट रोजी पाकिस्तानने तारेने सभासदत्वाचा अर्ज केला. ता. १८ आगस्ट रोजी लेक सक्सेस येथे भरलेल्या राष्ट्रसंघाच्या सुरक्षा मंडळाच्या बैठकीत पाकिस्तानला एकमताने यूनोचे सभासदत्व मंजूर करण्यात आले– फक्त २ दिवसांत आणि तेही एकमताने. इतर दुसऱ्या देशांच्या अर्जात ज्या अडचणी आल्या आणि जो विलंब लागला त्याच्या तुलनेत पाकिस्तान दोन दिवसांत सभासद झाला, ही बाब अतिशय गंभीर असून ' यूनो ' ही सर्वश्रेष्ठ आणि जगत्कल्याण आणि मानवतेच्या हक्कांचे संरक्षण व जगत्शांती इत्यादी ब्रीदे बाळगणारी आंतरराष्ट्रीय संस्था भारताकडे कोणत्या दृष्टीने पाहते ते उघड होते. ती दृष्टी कोणती हे या तारखांवरून उघड होते. तत्कालीन गोरे गव्हर्नर जनरल जवाहरलाल नेहरू यांचे मित्र लॉर्ड लुई मौंटबेटन यांनी पाकिस्तानाविरुद्ध यूनोत तक्रार गुदरण्याचा सल्ला नेहरूंना कोणत्या तारखेला दिला ती तारीख जरी गुलदस्तात असली तरी नेहरूंनी तक्रार नेल्याची तारीख जाहीर आहे. ती तारीख होती– १ जानेवारी १९४८. त्या दिवशी नेहरूंनी एक १५ कलमी पत्र सुरक्षा मंडळाकडे रवाना केले.

त्यावर तब्बल २० दिवसांनी २० जानेवारी १९४८ रोजी सुरक्षा मंडळाने तीन सभासदांची एक चौकशी समिती नेमण्याचे ठरविले. १० जुलै रोजी ते कमिशन येथे येऊन दाखल झाले आणि त्याने उभय पक्षांना युद्धसदृश कृत्ये न करण्याची विनंती केली. त्याकरिता यूनो आणि सुरक्षा समिती यांनी सहा (६) महिन्यांचा काळ अक्षरश: खाल्ला. हेतू स्पष्ट होता. पाकिस्तानाला शक्य तितका वेळ देणे हा होता हे एखादे नेणते पाळण्यातले पोरही सांगू शकेल. समितीच्या विनंतीप्रमाणे भारताने जरी गोळी बंद केली; तरी पाकिस्तानी फौजा भारताच्या संयमी अनुशासनसंपन्न जवानांवर आग ओकीतच होत्या.

पाकिस्तानला यूनोत फक्त २ दिवसांत सभासदत्व मिळताक्षणीच त्याने सेंटो, सीयाटो, नाटो इत्यादी राष्ट्रगटांत लगबगीने प्रवेश केला. त्याचे पाठीराखे ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, चीन आणि अमेरिका हे त्याच्या पाठीशी उभे आहेत. त्याशिवाय अरब देशांचाही त्याला पूर्ण पाठिंबा आहे. हे सर्व देश त्याला नाना प्रकारची आयुधे आणि युद्धसाहित्य पुरविण्यास सज्ज आहेत. ती उधार–उसनवार, अनुदान, बक्षीस इत्यादी नानाप्रकारांनी पाकिस्तानला मिळत आहेत. पश्चिम पाकिस्तान हातातून गेल्या-कारणाने पाकिस्तानच्या सामरिक सामर्थ्यात यत्किंचितही उणेपणा आलेला नाही. भारताने त्याचे सुमारे एक लाख युद्धबंदी झालेले सैनिक परत केल्यामुळे त्याच्या मनुष्यबळात भरच पडलेली आहे. अशा सर्व बाजूंनी अभेद्य (?) चिलखतात असलेल्या पाकिस्तानचे स्वतःचे सामरिक सामर्थ्य पुढीलप्रमाणे आहे :–

(१) **स्थलसेना**– मनुष्यबळ सैनिक संख्या तीनलक्ष पासष्ट हजार, (३,६५,०००), त्यांत आझाद काश्मीर फौज हे नाव दिलेले पंचवीस हजार (२५,०००) सैनिक आहेत. २ चिलखती डिव्हिजन्स, १३ पायदळ डिव्हिजन्स, २ स्वतंत्र चिलखती ब्रिगेडस्, १ हवाई संरक्षण ब्रिगेड, ३ स्क्वॉड्रन्स स्थलसेना–वायुसेना विभाग-Army Air Arm. (भारताचा असा विभाग नाही.) सुमारे १,५०० निरनिराळ्या जातीचे रणगाडे, सुमारे १,००० निरनिराळ्या प्रकारच्या तोफा, सुमारे २ ते ३ शे हलक्या भारी उखळी तोफा-mortors, ५ लक्ष (५,००,०००) राखीव फौज. खड्या फौजेपेक्षा राखीव फौज इतक्या मोठ्या प्रमाणात अधिक असणे हा पाकिस्तानचा खास विशेष आहे. भारत त्याचे लक्ष्य आहेच. त्याशिवाय ४०,००० लष्करसदृश Para military, ३०,००० नागरी सशस्त्र दळ आणि सुमारे १०,००० नॅशनल गार्डस एवढी प्रचंड नागरिक सेना आहे.

(२) **जलसेना**– मनुष्यबळसंख्या १०,०००. ३ पाणबुड्या, १ क्रूझर, ४ डिस्ट्रॉयर, ४ फ्रिगेटस्, ७ सुरुंग काढणाऱ्या बोटी, ११ गस्ती बोटी आणि राखीव ५,००० सैनिक.

(३) **वायुसेना**– मनुष्यबळसंख्या १,७०००. लढाऊ विमाने २८३, बांबर स्क्वॉड्रन १, फायटर इंटरसेप्ट स्क्वॉड्रन्स २, फायटर बांबर स्क्वॉड्रन्स १, फायटर–बांबर–इंटरसेप्ट स्क्वॉड्रन १, मिग जातीच्या विमानांची एफजीए स्क्वॉड्रस ७, टेहेळणी स्क्वॉड्रन १, निरनिराळ्या जातीची विमाने असलेली परिवहन स्क्वॉड्रन्स ३, राखीव ८,०००. पाकिस्तानच्या वायुसेनेतील विमानांचे वैशिष्टय हे आहे की ती विमाने फायटर, बांबर आणि इंटरसेक्टर या तिन्ही कामगिऱ्या करू शकणारी आहेत. भारताची विमाने फक्त आपआपले एकच काम करू शकतात.

चीन

भारत–चीन यांच्या भाईभाईच्या आरोळ्या, पंचशील सनदेवरच्या सह्या आणि घोषणा, भारताने इंग्रजांकडून प्राप्त झालेले, वारसा म्हणून मिळालेले तिबेट-

वरचे सर्व हक्क चीन तिबेटचे सार्वभौमत्व मान्य करील या स्वप्न - रंजनाने सोडून देणे आणि लागलीच चीनने आपल्या फौजा तिबेटमध्ये घुसवून तिबेटवर कब्जा करणे, या घटना भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात अतिशय महत्त्वाच्या आणि कायमचे दुष्परिणाम घडवून आणणाऱ्या होत्या. चिनी फौजा तिबेटमध्ये शिरेपर्यंत चीनच्या सामरिक सामर्थ्याची कोणालाही कल्पना नव्हती आणि कोणीही त्याची दखल ही घेतलेली दिसत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी चांग कै शेकची चिनी फौज होती. चांग कै शेकला लष्करी सल्लागार म्हणून अमेरिकेने जनरल स्टिलवेल यांची नियुक्ती केली होती. परंतु ती चिनी सेना होती इतकेच. त्या सेनेच्या जमेच्या बाजूचे पान कोरेचे कोरेच होते. परंतु, युद्धसमाप्तीनंतर चांग कै शेक देशोधडीला लागला आणि चीन–कम्युनिस्टचीन रशियाशी बरोबरी करणारा देश म्हणून आंतरराष्ट्रीय पटावर झळकू लागला. तो आपले सर्वांगीण सामरिक सामर्थ्य वाढवू लागला आणि अल्पावकाशातच त्याने जगातल्या शक्तिसंपन्न देशाची बरोबरी गाठली.

चीनजवळ किती फौज तयार आहे याचा अंदाज चीनने १९६२ च्या भारताविरुद्ध उभ्या केलेल्या डिव्हिजडन्स्‌च्या संख्येवरून जगाला लागला. एके-काळी फार तर पीत संकट (The yellow peril) हे नाव मिळालेला चीन अणुशक्तीतही मागे राहिला नाही. आज चीनजवळ तीन ते चारशेपर्यंत (Fusion and fission) अणुसंघटन आणि अणुविभाजन प्रक्रियानुसार बनविलेल्या अण्वस्त्रांचा साठा (Stock Pile) असून त्यात नवी भर पडते आहे. त्यांच्या प्रक्षेपणाच्या पद्धती (Delivery systems) आणि साधने जय्यत तयार आहेत. त्यांच्या प्रक्षेपण स्थानकापासूनच्या त्रिजा २,००० मैल इतक्या विस्तृत आहेत. चीनच्या आंतरखंडीय–(Inter Continental) मारगिरीची मर्यादा ३,५०० मैल आहे. त्याशिवाय प्रक्षेपण सुसज्ज अशा पाणबुड्याही चिनी आरमारात आहेत. चीनची पीएलए फौज (People's Liberation Army) रशिया किंवा अमेरिका यांच्या रेसभरही मागे नाही.

चीनच्या स्थलसेनेचे मनुष्यबळ पंचवीस लक्ष (२५,०००,००) आहे. त्यात ११९ पायदळ डिव्हिजन, ७ चिखलती डिव्हिजन, ४ रिसाला डिव्हिजन, ६ हवाई छत्रीधारी डिव्हिजन, २० तोफखाना डिव्हिजन, ४१ इंजिनियर डिव्हिजन, (जवळजवळ) १,००० निरनिराळ्या हलक्याभारी मशीनगन्स्, काही विमान-विरोधी तोफा आणि जमिनीवर आणि पाण्यातूनही चालणाऱ्या (Amphibious) बोटी आणि रणगाडे आहेत. त्यांचीही बरीच मोठी संख्या आहे.

चीनच्या जलसेनेच्या मनुष्यबळाची संख्या दोन लक्ष तीस हजार (२,३०,००) आहे. ५० पाणबुड्या, १६ डिस्ट्रॉयर्स, २० पाणबुड्यांचा पाठलाग करणाऱ्या बोटी, १० डिस्ट्रॉयर्सना मदत देणाऱ्या बोटी, १०० एका विशिष्ट प्रकारच्या बोटी,

२७ पाणसुरुंग काढणाऱ्या बोटी, ४६ जमिनीवर फौज उतरविणाऱ्या बोटी (Landing craft), २२५ चिलखती मोटार बोटी, १८० पुरवठा बोटी आणि शेकडो इतर बोटी आहेत.

त्याशिवाय चीनची आरमारी वायुसेना (Naval Air force) आहे. तिची संख्या ३,०००० हजार आहे. त्यात एकंदर १,१०० लढाऊ बांबर आणि टॉरपेडो टाकणारी विमाने असून हजारो हेलिकॉप्टर्स आहेत.

चीनच्या वायुसेनेची मनुष्यसंख्या दोन लक्ष वीस हजार(२,२०,०००)आहे। आणि विमानांची संख्या तीन हजार आठशे, (३,८००) आहे. त्यात बॉंबर्स आणि फायटर्स आहेत. परिवहनाकरिता ४०० विमाने आणि ३०० हेलिकॉप्टर्स असून ४०० मुलकी विमाने इशाऱ्यासरशी मिळू शकतात. सुमारे ३,००० विमाने A. D. कामगिरीकरिता म्हणजे (Advance Defence) आघाड्यांच्या आगाऊ संरक्षणाकरिता तयार आहेत. त्यांच्यात जलसेनेतील, वायुसेनेतील आणि मुलकी विमाने व विमानविरोधी तोफांनी सुसज्ज विमाने आहेत.

सेनासदृश अशी (Para military) तीन लक्ष फौज आहे. तिच्यात २० पायदळसदृश डिव्हिजन आणि ४० स्वतंत्र पलटणी आहेत. त्याशिवाय प्रादेशिक आणि साहाय्यक सेनांसारखी मुलकी (Militia)फौज असून ती फौज विमानविरोधी तोफांनी सुसज्ज आहे. या फौजेची संख्या पन्नास लक्ष आहे.

भारताला वेढून बसलेली शत्रूंची फौज केवढी आहे, किती सुसज्ज आहे हे पाहिले असता त्याची स्थिती किती नाजूक आणि केविलवाणी आहे हे समजेल. **हे अद्ययावत् चित्र नाही.**

९

भारताच्या रक्षकाची ओळख

एखाद्या भूप्रदेशावर वंशपरंपरेने वस्ती करणाऱ्या आणि तो भूप्रदेश आपला म्हणणाऱ्या, त्या भूप्रदेशाविषयी आदराच्या, प्रेमाच्या विशिष्ट निष्ठा आणि भावना उरीपोटी बाळगणाऱ्या लोकांवर आणि लोकांच्या 'धारणे'करिता प्रस्थापित झालेल्या प्रशासन–व्यवस्थेवर (ती व्यवस्था कोणत्याही सदरात मोडत असो) दुसऱ्या कोणीही बाहेरच्या परकीयांचे नियंत्रण, प्रभुत्व अथवा प्रभाव यांचा पूर्ण अभाव, हे सार्वभौमत्वाचे मुख्य लक्षण असते हे आपण पाहिले आहे. त्या भूमीवरील लोकांना स्वातंत्र्याचे आणि स्वयंनिर्णयाचे संपूर्ण सर्वाधिकार असले पाहिजेत. त्यांना आपल्या मर्जीप्रमाणे आपले बरे-वाईट काहीही करण्याचे हक्क असले पाहिजेत. कोणी ढवळाढवळ करू पाहील तर, त्याचा प्रतिकार करण्याचा, त्याने पुन्हा असे काही करू नये म्हणून आणि करू धजेल तर, त्याला अद्दल घडविण्याचा, शिक्षा करण्याचा, त्या लोकांचा अधिकार कोणीही नाकारू शकत नाही. परंतु हे कार्य नुसत्या विनवण्या, हृदय-परिवर्तनाचे प्रयत्न इत्यादींनी नेहमीच होऊ शकत नाही. त्याला धमक्या देऊनही भागणार नाही. धमक्या खऱ्या करून दाखविण्याची शक्ती असल्याशिवाय धमकी देणे, कित्येक वेळी अंगलट येते. वायबाराची भीती फक्त एकदाच वाटते. या शक्तीचे राज्यशास्त्रीय नाव परावृत्तीची शक्ती Power of Deterence हे आहे. प्रत्येक स्वातंत्र्या-

भिमानी राज्य, जागरूकपणे या शक्तीने युक्त होण्याचे प्रयत्न करीत असते. म्हणून राज्य–शास्त्राला शक्तिशास्त्र-science of power हे नवे यथार्थ नाव मिळाले आहे आणि शक्तिसमतोल-Balance of Power या संज्ञेचा भयसमतोल-Balance of Fear हा अर्थ झाला आहे.

परावृत्तीची शक्ती-Power of Deterence हा शक्तीचा एक प्रकार आहे. या शक्तीच्या जाणिवेने एखादा बुजला नाही तर, त्याला प्रतिकारशक्तीचा-Power of Resistance प्रत्यय आणून देता आला पाहिजे. परंतु नुसत्या प्रतिकाराने दुष्ट प्रवृत्तींना कायमचे परावृत्त किंवा दुष्टतेपासून निवृत्त करता येत नाही. त्याकरिता शिक्षा करण्याची शक्ती-Power of Punishment असली पाहिजे. हे संरक्षणाचे चढत्या श्रेणीचे उपाय आहेत.

समर्थ राज्य म्हणजे, फक्त सामरिक सामर्थ्यसंपन्न राज्य नव्हे. सामर्थ्यात राष्ट्राच्या सर्व सुप्त, अर्ध–सुप्त, जागृत, गुप्त, प्रकट अप्रकट, भावनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ स्रोतांचे, नदनद्या, ओढे, जलाशय (आणि ज्वालामुखीही) इत्यादी सर्वांचा समावेश होतो. राज्याने समर्थ व्हावयाचे ते फक्त आपला राजकीय प्रभाव पाडण्याकरिता किंवा वर्चस्व प्रस्थापित करण्याकरिता नसून, आपले स्वातंत्र्य सुरक्षित राखण्याकरिता, आपली अस्मिता जपण्याकरिता, आपली संस्कृती शाबूत राखण्याकरिता, सर्व–प्रत्येक क्षेत्रातले सर्व प्रकारचे स्वाभिमानी जीवन जगण्याकरिता ! **जॉर्ज वाशिंग्टन** म्हणतो " If we decide to avoid insult, we must be able to repel it. If we desire peace it must be made known that we are at all times prepared for war." अपमान टाळावयाचा असेल तर त्याचा प्रतिशोध घेण्याची शक्ती असली पाहिजे. शांती हवी असेल तर आपण सर्वकाळ युद्धाला तयार असले पाहिजे आणि तयार असल्याची (सर्वांना) जाणीव करून दिली पाहिजे. भय समतोलाचे मर्म शक्ती हेच आहे. म्हणून समर्थ रामदास सांगतात. " ऐश्वर्य सर्व शक्तीचे तस्मात् शक्तीप्रमाण हे. "

राज्याची सशस्त्र सेनादले या सर्वंकष शक्तींचे चालतेबोलते, जिवंत, प्रत्याघाती प्रतीक असते. " जनकश्चोपनेता च यश्च विद्यां प्रयच्छति। अन्नदाता भयत्राता पंचैते पितरः स्मृताः ॥ " हे जे पाच ' पितर ' प्राचीन हिंदुधर्मशास्त्राने सांगितलेले आहेत, त्यांच्यात भयत्रात्याला म्हणजे सैनिकाला स्थान दिलेले आहे. परंतु असेही सांगितले आहे की, त्याच्याकरिता कोणी शोक करू नये, दाने देऊ नये आणि अशौच पाळू नये. कारण युद्धात जखमी होऊन शरशय्येवर मृत्यूच्या शुभक्षणाची वाट पाहणारे पितामह **भीष्म**, योगी आणि रणात देह अर्पण करणारा सैनिक, हे सारख्याच योग्यतेचे आहेत असे अधिकारवाणीने सांगतात. प्राचीन भारतीयांची सैनिकाविषयी आदराची भावना होती परंतु ती कालांतराने गेली. म्हणूनच परकीय आक्रमक यशस्वी होऊ शकले आणि भारत परतंत्र झाला.

स्वतंत्र देशाच्या फौजा आणि परतंत्र देशांच्या फौजा यांच्या मनोधारणेत फरक असतो. स्वतंत्र देशाचा सैनिक राष्ट्रनिष्ठेने लढतो. परतंत्र देशाचा सैनिक स्वामिनिष्ठेने लढतो. विशेषत: मुघल सम्राटांच्या काय, किंवा ब्रिटिशांच्या हिंदुस्थानी फौजा काय, एकदा इमान वाहिले म्हणून, राजनिष्ठेची शपथ घेतली म्हणूनच शेवटपर्यंत लढल्या आणि त्या काळात तशी सबंध देशावर एकछत्री अशी सत्ता फक्त ब्रिटिशांच्या काळातच काय ती होती. राष्ट्रीय एकात्मभाव निर्माण झालेला नव्हता. त्यामुळे संस्कृती एकच असली तरी ती प्रभावी ठरली नाही. एकदा एकाला निष्ठा वाहिली म्हणजे त्यात अंतराय न पडू देणे, हे भारतीयांच्या सेवाव्रताचे मुख्य लक्षण आहे. तसे नसते तर, शिवाजी राजांच्या सैन्यात, एकही मुसलमान दिसला नसता; आणि हिंदवी स्वराज्याकरिता लढला नसता. शिवाजीमहाराजांचे स्वराज्य हिंदवी–हिंदुस्थानचे होते. त्यांनी इस्लामी धर्माशी शत्रुत्व केले नाही. तसे असते तर स्वराज्यातल्या मशिदी पाडणे, दर्गे उखडून फेकून देणे त्यांना कठीण नव्हते. त्यांना जे हटवावयाचे होते ते मुसलमानी धर्माचा हटवाद आणि अत्याचार. **इमान** याच भावनेने हिंदुस्थानी वीरांनी इंग्रजांकरिता प्राण दिले. त्यांना देशद्रोही म्हणणे बरोबर होणार नाही. ते जर देशद्रोही तर इंग्रजांच्या आणि मिशनऱ्यांच्या कॉलेजात त्यांचा पगार घेणारे विद्वान प्रोफेसर देशद्रोही का नाहीत ?

स्वतंत्र देशाचा सैनिक निराळ्याच निष्ठेने लढतो. आपला देश बरोबर की चूक याचा विचार तो करीत नाही. My country ! Right or Wrong ही त्याची भावना असते. या दृष्टीने विचार केला असता, पाकिस्तानी सैनिकांना दोष देता येणार नाही. आक्रमण हे न्याय्य की अन्याय्य याची चिकित्सा करण्याचे त्यांना कारण नाही. द्वेष केला, आक्रमण केले ते त्यांच्या राज्यकर्त्यांनी. फक्त अत्याचार, अधर्म–युद्ध एवढ्यालाच सैनिक जबाबदार. अशा युद्धात न्याय, नीती यांचा विचार होऊनच जर युद्ध झाले आणि हे युद्ध कशाकरिता आहे, याचा खरा उद्देश काय आहे, हे जर सैनिकाला पटवून दिले, तर त्याचा उत्साह शतगुणित होतो व तो अधिक निकराने लढतो. म्हणूनच न्याय असो, अथवा नसो आक्रमक तो न्यायच आहे असे अट्टाहासाने आपल्या सैनिकाला सांगत असतो. कोणीही आपली बाजू असमर्थनीय आहे अशी कबुली देऊन, सैनिकांना लढाईवर जाण्याचे हुकूम देत नसतो. ते अस्वाभाविक आहे. प्रचाराचे काम असत्यास सत्य बनविणे हेच असते आणि सत्यालाही प्रचाराचा आश्रय घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत, विरुद्ध बाजूचे सैनिक फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवतात. ती ही की ही लढाई माझ्या देशाची आहे. Right or Wrong ? परतंत्र देशाच्या सैनिकालाही लढाई आपली नव्हे, याची जाण असते. ही लढाई हुकुमाची आहे; खाल्ल्या मिठाची आहे, हे तो विसरलेला नसतो.

फौज स्वतंत्र देशाची असो अथवा परतंत्र देशाची असो, तिची संमती घेऊन

लढायला पाठविली जात नसते. कोणत्याही देशाची लढाई असो, ती हुकुमानेच लढली जात असते. लोकशाही कोणत्याही रंगरूपाची असो, लढाईचा निर्णय घेताना सार्वमत (Referendum) किंवा घोडदौडीचे मत-Gallup Poll घेत नाहीत आणि प्रत्यक्ष लढाईतली हाणामारीही बहुमताने होत नाही. आता व्यक्तिनिष्ठा जाऊन तिच्या जागी देश-निष्ठा, राज्य-निष्ठा अशा निष्ठा आलेल्या आहेत. त्याशिवाय विचार-निष्ठा किंवा तत्त्व-निष्ठा हाही एक प्रभावी प्रकार सुरू झालेला आहे.

आता स्वतंत्र देशांच्या सेना, राष्ट्रपती, अध्यक्ष, प्रधान मंत्री, संतमहंत, लोकनायक, राष्ट्रपिता इत्यादींपैकी कोणाहीकरिता लढत नाहीत. त्या लढतात आपल्या स्वदेशाकरिता आणि आपल्या सेनापतीच्या हुकुमाने. सैनिक रक्तपिपासू नसतो. तो शत्रूचे आणि आपले स्वतःचे रक्त सांडतो ते कर्तव्य म्हणून; हुकुमाची तामिली म्हणून. **रस्किन** म्हणतो "It is not the occupation of a soldier to slay but be slain." प्राण घेणे हा सैनिकाचा व्यवसाय नसून प्राण देणे हा असतो. त्यातही रक्त सांडणे, प्राण घेणे हे उद्दिष्ट नसून शत्रूचे यशाचे प्रयत्न, आपल्या पराभवाची त्याची पराकाष्ठा नष्ट करणे, हा असतो. त्याच्या गोळीने कोणी गतप्राण झाला तर तो खून नसतो. त्याची संगीन किंवा कुकरी कोणाच्या छाताडातून आरपार गेली तर ती खाटकाचा सुरा ठरत नाही. ती त्याच्या कर्तव्यपालनाचे एक साधन असते. दोघेही आपआपल्या देशाच्या लढाया लढत असतात; म्हणून ते परस्परांचे शत्रू नसतात. आणि त्यातला एक जर गतप्राण झाला तर जो जिवंत असेल तो त्याच्या प्रेताला सॅल्यूट करतो ! त्याने केला पाहिजे.

'मरणांतानि वैराणि' ही प्राचीन भारतीय 'रणनीती' आहे. भारताच्या-सेनापतीचे एक धीरोदात्त उदाहरण 'बांगलामुक्ती' युद्धाचे वेळी घडलेले आहे. त्यावेळी शरण आलेले पाकिस्तानी अधिकारी अर्थातच युद्धबंदी झाले होते. प्रथेनुसार ते जेव्हा आपली पिस्तुले आणि पट्टे काढून ठेवू लागले, तेव्हा जनरल जगजीतसिंहांनी त्यांना तसे करू दिले नाही. सैनिकाला निःशस्त्र होण्याइतके दुसरे काहीही अपमानकारक नसते. जगजीतसिंहांनी त्यांना निःशस्त्र होऊ दिले नाही. बंदी असूनही त्यांचा मान राखला आणि वर त्यांना पाहुणचार म्हणून, मटनपुलावाची मेजवानी दिली. ही भारताची नीती आहे. परंतु दुर्दैव हे की भारतीयांना आपल्या जवानांची ओळखच नाही.

भारताची प्राचीन परंपरा असलेल्या सैनिकांची प्रथम आणि खरी ओळख झाली **स्वातंत्र्यवीर सावरकरांना.** त्याचे कारण १८५७ सालचे इस्ट इंडिया कंपनीच्या काळचा नेटिव्ह शिपायांचे इंग्रजांविरुद्ध झालेले बंड. त्यानंतर डलहौसी, कर्झन आणि किचनेर या दुष्ट त्रिकुटाच्या कृष्णकृत्यांची हिंदुस्थानातील अगदी मोजक्याच राष्ट्राभिमानी विचारवंतांना पूर्ण जाणीव झाली; आणि चीड उत्पन्न

झाली. आता कंपनी जाऊन राजमुकुटाची सत्ता सुरू झालेली होती; आणि नेटिव्ह फौजा ब्रिटिश साम्राज्याच्या फौजा बनल्या होत्या आणि त्या परकीयांकरिता प्राणपणाने आणि प्रामाणिकपणाने लढत होत्या. तरीही स्वातंत्र्यवीरांसारख्या विचारवंतांनी हिंदी शिपायाला क्षुद्र देशद्रोही कधीच लेखले नाही. उलट त्यांच्या मनात शिपायांविषयी गौरवाचीच भावना होती.

ता. १५ आगस्ट १९४७ पर्यंत हिंदी फौजा स्वतंत्र देशाच्या फौजा नव्हत्या. तोपर्यंत लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या पुरुषोत्तमांना खंत वाटत होती. "India has all the means of fighting for independence at its disposal save one vital ingredient and that was an army of its own." स्वातंत्र्य मिळविण्याची हिंदुस्थानजवळ इतर सर्व साधने आहेत; परंतु प्राणभूत अत्यंत महत्त्वाचे अंग जे स्वतःची फौज, ते नाही. लोकमान्यांनी सेनापती बापटांजवळ असे उद्‌गार काढले होते, " तुमच्यासारखे हातावर शिर घेऊन लढण्यास तयार असणारे एक हजार लोक मला मिळाले तर मी या क्षणी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंड करीन." १९१४–१८ च्या पहिल्या महायुद्धाचे वेळी, **लोकमान्यांनी** ' हिंदी तरुणांनी सैन्यात भरती व्हावे ' असे त्यांना सांगितले होते. इतकेच नव्हे तर " माझे वय आडवे आले नसते तर मी प्रथम भरती झालो असतो " असे ते म्हणाले होते. (त्यांना त्यावेळी वय जरी कदाचित अनुकूल असते, तरी त्यांची बिनलढाऊ ब्राह्मण जात. त्यातूनही चित्पावनपणा, त्यांच्या खात्रीनेच आड आला असता.) हे कशाकरिता ? " स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे." असे जाहीर करून तो हक्क जातीने मिळविण्याकरिता त्यावेळी इंग्रजांचे रिक्रूटिंग ऑफिसर अशी लोकमान्यांची टवाळी करण्यात आली होती. परंतु त्याचे नवल वाटण्याचे कारण नाही. " अपमान, उपहास हे भोग त्याचे " कोणाचे ? " जो लोककल्याण साधावया " कटिबद्ध असतो त्याचे !

स्वातंत्र्यवीरांनी तर सर्व हयातभर हाच ध्यास घेतला होता. रणावीण स्वातंत्र्य मिळत नसते, हा सिद्धांत त्यांनी सांगितला आणि रणावीण स्वातंत्र्य टिकतही नसते हा उपसिद्धांत (Corollary) भारत स्वतंत्र होताक्षणीच अनुभवास आला. इंग्रजांनी तर त्यांचा छळ केलाच, पण स्वकीयांनीही त्यांना तुच्छ लेखून त्यांचा उपमर्द केला; आणि स्वतंत्र भारताच्या सरकारने तर त्यांना खुनाच्या गुन्ह्यात गोवण्याची शिकस्त केली. स्वातंत्र्यवीरांनी आपली स्वतःची, स्वतंत्र भारताची सेनादले पाहिली आणि भारताची चीरफाड झालेलीही पाहिली !

नेताजी सुभाषचंद्र बोसांनी एक पाऊल पुढे टाकले. संधी मिळताच दुसरे महायुद्ध चालू असताना त्यांनी जर्मनीत भारताची सेना उभारली आणि नंतर जपानात जाऊन तिकडच्या आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्वीकारले आणि आदेश दिला ' चलो दिल्ली ' भारताला स्वतंत्र करण्याकरिता. परंतु इकडे गांधीजींचे वारस

पंडित जवाहरलाल नेहरू गरजले, "खबरदार ! मी तुमच्याशी लढेन." तुम्हाला भारताच्या भूमीवर आपले हिंसेने माखलेले आणि गांधींच्या अवमानाने दूषित झालेले पाऊल ठेवू देणार नाही."

१८५७ पासूनच हिंदी सैन्याच्या मनोवृत्तीत झालेला बदल शीघ्रगतीने वाढत चाललेला होता. पहिल्या महायुद्धाच्या वेळची हिंदी फौज निराळी होती. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ती त्यापेक्षा फार पुढे गेलेली होती. १८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेस स्थापन झाली. तेव्हापासून सैनिकांची मनोवृत्ती बदलण्यास जोराची सुरुवात झाली होती. या दोन्ही महायुद्धांच्या वेळच्या हिंदी सैन्याची खात्री झाली होती की, "A patriotic army would be supplementary force for helping the nonviolent struggle." राष्ट्राभिमानी फौज अहिंसक संघर्षाला पूरक होईल.

पहिले महायुद्ध संपले. लोकमान्य चालते झाले. नव्हे त्यांना ऐन रणधुमाळीत, अत्यंत निकडीचे वेळी, नियतीने दुर्दैवाने उचलून नेले. गांधीयुग सुरू झाले. एका वर्षात स्वराज्य मिळविण्याची त्यांनी घोषणा केली आणि तेव्हापासून हिंदुस्थानात **शांतीने जे बंड चालू केले** (Peace rose in revolt) ते या घटकेलाही चालू आहे. शांती आणि बंड हे दोन शब्द एका दमात उच्चारताना जीभ अडखळते; आणि तो संयुक्तध्वनी कानांच्या पडद्यावर विचित्र आघात करतो. **शाब्दिक बाचाबाची म्हणजे बंड नव्हे ! तो फक्त वावदूकपणा.** बंड म्हणजे प्रत्यक्ष संघर्ष–युद्ध. शांतीला आपल्या अस्तित्वाकरिता युद्ध करावे लागते. परंतु परक्यांशी करावयाच्या संघर्षालाच युद्ध म्हणता येते. आपसातील संघर्षाला यादवी अराजक म्हणतात. आपसात वैचारिक अराजक पेटवून शांती कधीच सिद्ध होऊ शकणार नाही. शांतीला आत्मसंरक्षणाची चिंता करण्याचे कारण नाही. शांतीच्या Being ची-अस्तित्वाची आणि Well–being ची-निरामय जीवनाची जबाबदारी, स्वतंत्र देशाच्या सैनिकावर सुरुवातीपासूनच सोपविलेली आहे. सैन्य त्याकरिता कमर कसून तयार असते. " True aim of war is Peace " युद्धाचा खरा हेतू शांती हाच असतो. शांती हवी असेल तर युद्ध समजून घेतले पाहिजे.– If you want peace understand War. युद्ध नाही तर शांतो नाही. शांतीचे उद्दिष्ट–सामाजिक सामंजस्य, निरामय योगक्षेम आणि संस्कृतीची जोपासना. हे सर्व युद्धानेच साध्य होते. "War belongs to the province of social life. It is part of the intercourse of human race." युद्ध हा सामाजिक जीवनाचा विषय आहे. तो मानवाच्या परस्पर संपर्काचा भाग आहे, असे योगी **अरविंद** म्हणतात. जर युद्ध नाही तर शांती नाही.-No War No Peace. आणि युद्ध नाही तर संस्कृती नाही.-No War No culture. म्हणून **हॅरोल्ड लास्की म्हणतो**, "War strengthens man's souls." मानवाचे आत्मे युद्धाने बलवान होतात.

परंतु शांती शांती म्हणून जे ऊर बडवीत सुटायचे, तसे काही आहे काय ? याचे उत्तर ' नाही ' हे आहे. ज्याला शांती म्हणतात ती दोन युद्धांच्या मधली स्थिती असते आणि निलंबित जीवितासारखी (Suspended Quimatlon) केसाने टांगलेल्या तलवारी सारखी लटकलेली असते. म्हणून एक विचारवंत म्हणतो– " Man created a desert and called it Peace "-मानवाने एक ओसाड अरण्य निर्माण केले आणि त्याला शांती हे नाव दिले. परंतु हे अरण्य ' अभय अरण्य ' नाही. या जंजाळाला वैतागून **आन्द्रे बीनफ्रे** म्हणतो– " War on the grand scale and peace in its true sense may be buried side by side." मोठ्या प्रमाणावरील युद्ध आणि खरी शांती यांचे शेजारी शेजारी दफन केले जावे. धड युद्ध नाही आणि धड शांतीही नाही हीच जगाची वास्तवता आहे.

भारत–चीन १९६२ च्या युद्धाच्या वेळी मेननंतर संरक्षण मंत्री झालेले यशवंतराव चव्हाण लोकसभेत म्हणाले होते, " भारत हा शांतताप्रिय देश आहे. परंतु जोपर्यंत युद्धाची भावना समूळ नष्ट होत नाही तोपर्यंत शांततेच्या पुरस्कर्त्यांनाही शांतीच्या रक्षणासाठी आणि आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी खंबीरपणाने उभे राहावे लागेल. म्हणूनच आम्ही आधुनिक सेना उभारीत आहोत. अनेक तरुण भारतमातेला आपले जीवनपुष्प अर्पण करण्यासाठी पुढे येत आहेत." हे सर्व ठीक आहे. परंतु आपण आपल्या जवानांची, त्यांच्या सेनांची ओळख करून घेत आहोत काय ? ती वाढवीत आहोत काय ? नाही ! स्वतंत्र भारतातही भारतीयांना आपल्या राष्ट्रीय सेनादलांची ओळख नाही !

एका विचारवंताने एका ठिकाणी म्हटले आहे, " It is a terrible thing to fall into the hands of a living God. " जिवंत ईश्वराच्या कचाटचात सापडणे महाभयंकर. भारतात राजकीय प्रांगणात कोणी चालताबोलता, रागावता रुसता, जिवंत ईश्वर नव्हता. ते स्थान गांधीजींना मिळाले होते. परंतु त्याचा परिणाम तो लेखक म्हणतो तसा झाला नाही. गांधीजींनी सर्व भारतीयांची मने जिंकली ती शांतीकरिता आणि अहिंसेकरिता. शांती आणि अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे आधार तसेच कळसही होते. तरीही त्यांनी निर्वाणीच्य वेळी **करा अथवा मरा-** Do or die हा संदेश दिला. त्यांच्याआधी समर्थ रामदासांनीही हेच सांगितले होते. परंतु प्रक्रियेत फरक होता. त्यांनी " मारिता मारिता मरा, " असे सांगितले. मार खाता खाता प्राण त्याग करा असे सांगितले नव्हते. गांधींनी **करा** असे सांगितले होते. परंतु काय करा याचा स्पष्ट खुलासा केला नसल्याकारणाने त्या सुमारास वाण्या–बामणांना पत्र्या मारणारे ' पत्री सरकार ' स्थापन झाले होते (संधी–साधूंनी त्याचे **प्रतिसरकार** बनविले.) शांतिब्रह्म अहिंसामय गांधींना अपमान भित्रेपणा आणि ' क्लैब्य ' सहन होणे शक्य नव्हते. तसे नसते, तर त्यांनी **करायला** सांगितले नसते.

गांधीतत्त्वज्ञानाचे कित्येक अभ्यासक म्हणतात, गांधी फारच थोड्यांना समजले. बहुतेक वेळी नेत्यापेक्षा अनुयायी, आचार्यापेक्षा शिष्य, आपल्या नेत्याचे-गुरूचे तत्त्वज्ञान त्यांच्या स्वत:पेक्षा आपल्याला अधिक समजते अशी हाकाटी करून आपली स्वत:चीच महती-वाढविण्याचा प्रयत्न करतात. गांधींनी सैनिकाला कधीही खाटिक म्हटलेले नाही आणि देशाचा दुश्मन म्हटले नाही. हे त्यांचे अंतेवासी आणि अनुयायी विसरतात. युद्ध करणे,–कर्तव्य म्हणून युद्ध करणे, हे जर खाटिक बनणे असेल तर अर्जुनासारखा भयंकर मोठा खाटिक नाही आणि एवढी १८ अक्षौहिणी सेना फक्त, १८ दिवसात कत्तल करावयाला लावणारा कृष्णासारखा दुसरा एकही–खाटकांचा परात्पर गुरू नाही. जे वेंगरूळ भित्रे असतात तेच सैनिकाला क्रूर खाटिक म्हणतात. सैनिक शूर असतो, क्रूर नसतो. क्रौर्य आणि शौर्य एक नव्हेत. क्रूर भित्रा असू शकतो. शूर निर्भीक असतो. कोणी आपला भित्रेपणा अहिंसेच्या आणि शांतीच्या पडद्याआड लपवू पाहतात. जैन आणि बौद्ध मतांमुळे लोकांच्या मनात सैनिकांविषयी दुरावा-दुजाभाव उत्पन्न झाला. इंग्रजांच्या काळात त्यांच्यात तुच्छता आणि क्वचित द्वेष यांची भर पडली. हिंदी सैनिक देशाचे दुश्मन ठरविले गेले. कारण हे की इंग्रजांनी स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळात ती दडपून टाकण्यासाठी सैन्याचा उपयोग केला होता. परंतु **जालियनवाला** बागेतील कत्तल नेटिव्ह शिपायांनी केली नव्हती. ती गोऱ्या सोल्जरांच्या शौर्याचे प्रदर्शन होते. त्यानंतर **गढवाल** पलटणीच्या काही शिपायांनी नि:शस्त्र बांधवांवर गोळी चालविण्यास नकार दिला होता. जे नेहरु नेताजीविरुद्ध लढाई करायला उभे राहिले होते तेच नेहरु जेव्हा **आझाद हिंद फौजेच्या** अधिकाऱ्यांविरुद्ध उभ्या केलेल्या मुकदम्यात आरोपीचे वकील म्हणून उभे होते. कारण आझाद हिंद फौजेविषयी त्यांना अभिमान वाटू लागण्याचा चमत्कार घडला नसून, ती एक लोकप्रियता मिळविण्याची चालून आलेली संधी होती. भारताच्या जलसेनेचे जज ॲडव्होकेट जनरल **ओ. पी. शर्मा** यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की सैनिकाची युद्धातली कामगिरी भयंकर धोक्याची असते आणि शांततेच्या काळातली कामगिरी अकृतज्ञतेची असते. "A dangerous role in war and thankless task in Peace."

भारतात क्षीण होत गेलेल्या क्षात्रवृत्ती, शौर्य, धैर्य, साहस आणि स्वाभिमान इत्यादी बहुमोल गुणांचा उत्तरोत्तर अधिकाधिक अपकर्ष होत गेल्याने आणि परकीय राज्यकर्त्यांनी तसे करण्याचे हेतुपूर्वक प्रयत्न केल्या कारणाने सैन्य आणि सैनिक यांच्याविषयी, लोकांत दुजाभाव, बेफिकीरी आणि घृणाही उत्पन्न झाली. "युद्धाच्या सिद्धतेमुळे लष्कराला अवास्तव महत्त्व येते. सैनिकांचे लाड करण्याचे काही एक कारण नाही. उद्या ते आमच्या डोक्यावर स्वार होतील. शांतताप्रिय भारताने अहिंसेने मिळविलेल्या स्वातंत्र्यात, सैन्य हे अनावश्यक पाप आहे. (Un-

necessary evil) त्याला चार हात दूरच ठेवले पाहिजे. अशा तऱ्हेचे उद्गार स्वतंत्र भारताचे पहिले आणि शेवटचे हिंदुस्थानी गव्हर्नर जनरल **चक्रवर्ती राजगोपालाचार्य** यांनी अनेक प्रसंगी काढलेले आहेत.

भारताने सैनिकांची ओळख का करून घेतली पाहिजे हे थोर थोर व्यक्तींच्या वक्तव्यात सांगितल्याने अधिक परिणामकारक होईल असा भरवसा वाटतो. **फील्ड-मार्शल लॉर्ड मॉंटगामेरी** म्हणतो, " War is not the concern of soldiers only. Throughout history civilian life has always been affected by warfare and in modern times the higher direction of war (युद्धनेतृत्व) has become the responsibility of politicians who are civilians themselves and not soldiers, sailors or airmen. Further more the total War–industry and civilian energies are absorbed into war effort." युद्ध हा फक्त सैनिकांचाच विषय नाही. नागरिक जीवनावर युद्धाचे परिणाम होत असतात; असे इतिहासावरून दिसून येईल. आधुनिक युगात बिगर–सैनिकी, मुलकी राजकारणी लोकनियुक्त लोकांच्याच हातात वरिष्ठ पातळीवरच्या युद्धनेतृत्वाचे अधिकार असतात. सर्वंकष युद्धात सर्व उद्योग आणि मुलकी शक्ती यांचा युद्धप्रयत्नात अंतर्भाव होतो.

मॉरिस जानोवित्झ म्हणतो, " The Civilian image of the professional soldiers remains firmly rooted in the past, out dated and obscure conception of the militory establishments persists, because civilian society incuding alert public prefer to remain uninformed. व्यावसायिक सैनिकांची मुलकी मनातली प्रतिमा सैनिकी प्रतिष्ठा-भूतपूर्व स्थितीवर आधारलेली आहे. म्हणून दक्ष आणि सावध राजकारणी लोकां-सकट, सर्वच्या सर्व गैरलष्करी समाज, सत्य परिस्थितीविषयी अजाणच राहू इच्छितो. हे विश्लेषण भारताइतके दुसऱ्या देशांना तंतोतंत लागू पडत नाही. भारतात आता अपरिपक्व राजकारणाचा जितका सुकाळ झालेला आहे तितका (भारतात निरक्षरतेचे प्रमाण सर्वात अधिक असूनही) जगातल्या दुसऱ्या एखादी देशात झालेला नाही असे वेधडक म्हणता येते. भारतात आता जिला राजकारण चांगले (च) समजत नाही अशी व्यक्ती औषधालाही सापडणार नाही. आजचा भारतीय जवान पूर्वीचा हिंदुस्थानी शिपाई नाही. आज त्याच्या जीवनात नवी प्रगत–सामुदायिक जाणीव (Group Consciousness) उत्पन्न झाली आहे. परंतु तो वाचाळ नाही आणि कठोर अनुशालनसंपन्न असल्याकारणाने, त्याची परिस्फुटता तो करीत नाही. त्याच्या जीवनात सघनता (Depth) आणि आशय (Meaning) उत्पन्न झालेला आहे. ' One commands and one obeys ' ही स्थिती आज नाही. याचा अर्थ जवान मनातून अस्वस्थ आहे. त्याच्या मनात

अनिष्ट देशघातकी विचार, अनुशासनाला विरोध, अशा भावना निर्माण झाल्या आहेत हा नाही.

भारताचे शेवटचे व्हाईस रॉय **लॉर्ड मौंटबॅटन म्हणतात,** " No educated man or woman should feel that they can allow the fate of their country to be decided without understanding their defence problems." कोणत्याही देशाच्या स्त्री अथवा पुरुष नागरिकाने आपल्या देशाच्या संरक्षणाचे प्रश्न न समजून घेताच त्याचे भवितव्य घडू देता कामा नये.

व्ही लॉंगर म्हणतो, " It is distressing to observe that ignorance about the armed forces in India is abysimal. There is an apathetic attitude which explains why any scholarship is not devoted to this subject." हिंदुस्थानात सशस्त्र सेनादलाविषयी अत्यंत गाढ अज्ञान आहे ही दुःखाची गोष्ट आहे. या उदासीन वृत्तीमुळे विद्वानांचे याविषयाकडे मुळीच लक्ष आकृष्ट झाले नाही. देशाची सेनादले समाजापासून वेगळी समजणे हितावह होणार नाही. ती देशाचा अविभाज्य भाग आहेत. सैनिक आणि नागरिक यांच्यामध्ये एखादी दुष्ट रेषा असूच शकत नाही. नागरिकांनी परस्परांना समजून घेणे जितके अगत्याचे त्यापेक्षाही आपल्यातूनच उभ्या राहिलेल्या भयत्रात्या जवानाला समजून घेणे अधिक अगत्याचे असते. सैनिकांवर दुहेरी जबाबदारी असते. तो सैनिक असतो तसाच नागरिकही असतो.

स्वतंत्र भारताचे पहिले हिंदुस्थानी सरसेनापती **जनरल करिआप्पा** हे देखील तेच म्हणतात, " One of the meny matters in which at least the intelle-gentsia of India has to be educated is the subject of its present day military organisation and administration." आपल्या देशातील बुद्धिमंतांनी तरी निदान आपल्या सैन्याचे संविधान आणि कारभार या विषयांत सुशिक्षित झाले पाहिजे.

आपल्या जलसेनेचे जज अॅडव्होकेट **जनरल शर्मा म्हणतात,** " The Indian society has been apathetic to the manner in which our Defence mechanism functions and the way of the life of a service man. The army has litterally been forgotten." आपल्या संरक्षण यंत्रणेचे कार्य आणि जवानाचे जीवन यांच्याविषयी हिंदी समाज उदासीन राहत आलेला आहे. सैन्याचा त्याच्या देशबांधवांना अक्षरशः विसर पडलेला आहे.

ही अशी वृत्ती निर्माण होण्याचे कारण आझाद हिंद फौजेचे संस्थापक कॅप्टन **(जनरल) मोहनसिंग** असे सांगतात, " What pained me most was the gradual unfolding of a diabolical plan for the deliberate falsification of history of our independence. All congress leaders

big or small began to shout from housetops that India won freedom by nonviolence alone, and that they were the great soldiers of that army. They suffered lot for their Jail–yatras. They seldom mentioned the names of the Mutiny, Bhagat Singh, the INA, The Royal Indian Navy and other martyrs." मला सगळ्यात अधिक दु:ख झाले ते हे होते की, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा खोटा इतिहास लिहिण्याचा एक दुष्ट कट हळूहळू रचला गेला. लहानापासून तो मोठ्यापर्यंत सर्व काँग्रेसवाले अट्टाहासाने ओरडून सांगत होते की, स्वातंत्र्य मिळाले ते फक्त अहिंसेनेच आणि त्यांच्या त्या सेनेला ' जेलयात्रांत ' अतोनात कष्ट सोसावे लागले. ' बंड, ' भगतसिंग, आझादहिंद फौज, भारताचे शाही आरमार आणि दुसरे हुतात्मे यांची नावे त्यांनी क्वचितच घेतली.

ता. २५ जून १९४४ रोजी सिंगापूरच्या नभोवाणी केन्द्रावरून केलेल्या एका भाषणात **नेताजी सुभाषचंद्र बोस** म्हणाले होते, " When due to misguided political whims and lack of vision all the leaders of the congress party are decrying all the soldiers of the Indian Army as mercenaries, it is heartening to know that Veer Sawarkar is fearlessly exhorting youths of India to enlist in the Armed Forces. The enlisted youths themselves provide us with trained men from which we draw the soldiers of our Indian National Army. चुकीच्या आणि अदूर–दृष्टी राजकीय लहरीमुळे काँग्रेस पक्षाचे जवळजवळ सर्वच पुढारी हिंदी सैन्याला भाडोत्री म्हणून हिणवीत असताना वीर सावरकर हिंदी तरुणांना बेधडकपणे सशस्त्र सेनादलात भरती होण्याचे आव्हान करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. अशा युद्ध–विद्याशिक्षित तरुणांतूनच आमच्या आझाद हिंद फौजेला सैनिकांचा पुरवठा होतो आहे.

१८५७ च्या रणकंदनाने भारत स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नांना प्रारंभ झाला. नंतरचा क्रांतिकारकांचा इतिहास सर्वश्रुत आहे. भारत स्वतंत्र झाला तो अहिंसेने किंवा ' चले जाव ' म्हटल्याने झाला नाही. तो स्वतंत्र केला हिंदी सैन्याने, याची कबुली ब्रिटिश सरकारच्या प्रधानमंत्र्याने आपल्या स्वमुखाने दिली आहे. दुसऱ्या जागतिक–महायुद्धात दोस्तांना जरी जय मिळाला तरी तो इंग्रजांना अतिशय महाग पडला. १९४७ च्या जुलै महिन्यात ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारताला स्वातंत्र्य देण्याच्या कायद्याचा मसुदा (Bill) जेव्हा चर्चा करण्यासाठी मांडला गेला, तेव्हा " मी ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे फुंकण्याकरिता प्रधानमंत्री झालो नाही " अशी दर्पोक्ती वदणाऱ्या पदच्युत प्रधानमंत्री चर्चिल याने त्याला कडाडून विरोध केला होता. त्याला तत्कालीन **प्रधानमंत्री मेजर अटेली** यांनी उत्तर देताना म्हटले,

" Britain is transfering power due to the fact that–one the Indian Mercenary Army is no longer loyal to Britain and two Britain can not aford to have a large Brittish Army to hold India Down." ग्रेट ब्रिटन जे सत्तेचे हस्तांतरण करीत आणि आहे त्याचे कारण १. हिंदुस्तानी भाडोत्री फौज आता राजनिष्ठ राहिली नाही. २. हिंदुस्थान ताब्यात ठेवण्याइतकी मोठी इंग्रज फौज आपण उभी करू शकत नाही. मसुदा मंजूर झाला. त्याचा कायदा बनला आणि भारत स्वतंत्र झाला. याच भाडोत्री हिंदुस्थानी फौजेच्या बळावर टिचभर ब्रिटिश बेटांची राणी/राजा जगातल्या सर्वात मोठ्या साम्राज्याची सम्राज्ञी/सम्राट झाली होती आणि हिंदी महासागर म्हणजे इंग्रजांच्या परसातले तळे (Brittish Lake) इतकी त्यांना मग्रुरी आली होती.

भारत स्वतंत्र होताच फील्डमार्शल लॉर्ड ॲलनब्रुक या थोर प्रामाणिक ब्रिटिश सेनापतीने मोठ्या व्यथित मनाने (Sadly reflected) आपले हृद्‌गत व्यक्त केले. " The Keystone of the arch of our Imperial Defence crashed. Without the strategic support of the Indian troops ready to operate either East or West we were left impotent and even the smallest of nations were at liberty to twist the lions tail. Surely the institution upon which so much of the British Empire depended for a longtime is worth its title of attention." आमच्या साम्राज्याची आधारशिला निखळून पडली आहे. पूर्व किंवा पश्चिम कोणत्याही दिशेला आमच्याकरिता लढणाऱ्या हिंदुस्थानी सैनिकांवाचून आम्ही क्लीबवत् झालो आहोत. आता एखादा छोटासा देशसुद्धा ब्रिटिश सिंहाची शेपटी खुशाल पिरगाळतो. ज्या संघटनेवर ब्रिटिश साम्राज्य इतका प्रदीर्घकाळ आणि इतके अवलंबून होते, ती संघटना (हिंदुस्थानी फौज) आपल्या (इंग्रजांच्या) करभाराची आणि आदराची अधिकारी आहे.

परतंत्र हिंदुस्थानचे शेवटले सर सेनापती आणि स्वतंत्र हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांचे काही काळपर्यंत असलेले सर्वोच्च संयुक्त सरसेनापती Joint Supreme commander फील्ड मार्शल सर आकिन्लेक म्हणतात, " The people of this country (Great Brittain) could learn what they owe to those soldiers who fought for them against the Germans, The Italians and the Japanes. Without their aid the war could not have been won. जे शिपाई जर्मन, इटालियन आणि जपानी यांच्याविरुद्ध लढले आणि ज्यांच्या मदतीशिवाय (दुसऱ्या महा) युद्धात जय मिळाला नसता त्यांच्या-(हिंदी शिपायांच्या) विषयी या देशातल्या (ग्रेट ब्रिटन) लोकांनी कृतज्ञ राहण्यास शिकले पाहिजे.

भारताच्या जवानाला प्रशस्तिपत्रे दाखवून आता कोणा दुसऱ्याकडे नोकरी मागायची नाही. परंतु स्वतंत्र भारताच्या जवानाला आज जे मिळते आहे ते फक्त तुच्छता आणि फारच फार झाले तर पूर्ण औदासीन्य ! एक सत्यवक्ता विचारवंत विचारतो, " Is there any other occupation which gives so much and expects so little ? " इतके अधिक देणारा आणि इतके कमी अपेक्षिणारा दुसरा एक तरी व्यवसाय आहे काय ?

सर्व जग आपल्या सैनिकाला त्याचे योग्य स्थान देते. भारत नव्हे. भारताने आपल्या जवानांची ओळख करून घेतलेली नाही. अमेरिका आपल्या सैनिकांची सर्वात जास्त कदर करते. एखाद्या युद्धाच्या काळात सैनिक पटावर नाव असणाऱ्याला देखील अमेरिका अनुभवसंपन्न योद्धा War Veteran म्हणते. आपला जवान तसे काहीच मागत नाही. तो " ओळख असू द्या " इतकेच म्हणतो.

येथे मुद्दा स्वातंत्र्य कोणी मिळवले हा नाही. ते स्पष्ट आहे मुद्दा आहे आणि निकडही आहे लोकांनी आपल्या जवानांची आपल्या सेनादलांच्या रचनेची आणि आपल्या संरक्षणाच्या व्यवस्थेची ओळख करून घेतली पाहिजे हा. Francis Quarles च्या काव्यपंक्ती सांगतात–

" God and Soldiers man alike adore
When at the brink of dangers; not before
The danger pasts alike are both requited
God is forgot and soldier is slighted."

फक्त संकटकालीच लोक देवाची आणि सैनिकाची पूजा करतात. संकट संपले की देव विसरला जातो आणि सैनिकही तुच्छ होतो.

१०

भारताचे तीन प्रधानमंत्री आणि संरक्षण

प्रत्येक देशाच्या संरक्षणाचा भार त्या देशाच्या प्रशासनयंत्रणेच्या–प्रशासकांच्या शिरावर असतो. देशाचे संरक्षण हे प्रशासनाचे प्रधान अंग असून ते प्रशासकाचे परमपवित्र आद्य कर्तव्य आहे. स्वयंसंरक्षण हा फक्त स्वतंत्र सार्वभौम देशाचा अधिकार आहे. या अधिकाराची सुयोग्य अंमलबजावणी त्या देशाच्या प्रशासकांनी–राज्यकर्त्यांनी केली पाहिजे. कारण ते राज्याचे विश्वस्त असतात. त्यांनी या बाबतीत केलेली हेळसांड, दुर्लक्ष किंवा अंगचोरपणा हा नुसता विश्वासघातच नव्हे तर देशद्रोहही ठरू शकतो.

दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले तेव्हा, हिंदुस्थानातल्या सात प्रांतांत कॉंग्रेस पक्षाची मंत्रिमंडळे होती. इंग्रज सरकारने, त्यावेळचे हिंदुस्थानचे व्हाईसरॉय आणि गव्हर्नर जनरल लॉर्ड लिनलिथगो यांच्याकडून, तशी काहीही आवश्यकता नसताना आणि तसे पूर्वी कधी झालेलेही नसताना, जर्मनीविरुद्ध स्वतंत्रपणे युद्ध जाहीर करवले. ते हिंदुस्थानातल्या कोणालाही न सांगता पुसता केले म्हणून त्याच्या निषेधार्थ त्या सात प्रांतांतल्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. गांधींनी ‘ जले जाव ’ ची चळवळ सुरू केली. तेव्हा सरकारने कॉंग्रेस वर्किंग कमेटीचे सभासद आणि दुसरे अनेक कॉंग्रेस कार्यकर्ते व पुढारी बंदीत टाकले.

युद्ध समाप्त झाल्यानंतर हिंदुस्थानाला स्वातंत्र्याचे

हक्क बहाल करण्यात येतील हे ब्रिटिश सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण करण्याचा उपक्रम म्हणून सरकारने सर्व काँग्रेस पुढारी, युद्ध समाप्त होताच मुक्त केले. कॅबिनेट मिशन हिंदुस्थानात पाठविले आणि ता. २ सप्टेंबर १९४६ रोजी एक मध्यंतरकालीन (Interim) सरकार उभे केले. त्या सरकारातील व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सीलचा संरक्षण सभासद (Defence Member) म्हणून बलदेवसिंगांना नियुक्त केले. त्यामुळे संरक्षण हा राखीव विषय (Reserved subject) राहिला नाही. १९ तारखेस बलदेवसिंग आपल्या कामावर रुजू झाले. त्यामुळे ता. २ सप्टेंबरपर्यंत त्या जागेवर असलेल्या हिंदुस्थानच्या सर सेनापतीचे (Commander-in-chief) उच्चाटन झाले आणि तो संरक्षण सभासदांचा सल्लागार (Adviser) बनला. ही इंग्रजांची पहिली पदावनती होती. दुसरी आणि त्याच्याहीपेक्षा मोठी आणि महत्त्वाची-पदावनती १५ आगस्ट १९४७ च्या मध्यरात्री झाली. लॉर्ड मौंटबेटन यांचे ' व्हाईसरॉय ' पद जाऊन ते फक्त गव्हर्नर जनरलच उरले आणि त्याच क्षणापासून बलदेवसिंग स्वतंत्र हिंदुस्थानचे पहिले हिंदुस्थानी संरक्षणमंत्री झाले आणि त्यांच्याकडे सर्व सशस्त्र सेनादलांची व्यवस्था, संरक्षणाचे अंदाजपत्रक आणि संरक्षणाचे धोरण हे विषय आले.

ब्रिटिश पार्लमेंटने हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्याचा कायदा पास करून सत्तांतराची एक तारीख ठरविली. परंतु तो दिवस जवळ ओढून घेऊन ता. १५ आगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाला. स्वतंत्र हिंदुस्थानची घटना तयार करण्यासाठी एक घटनासमिती नियुक्त झाली. समितीने तयार केलेली घटना २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आली. भारताचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू ता. ४ डिसेंबर १९४७ रोजी घटनासमितीसमोर केलेल्या भाषणात म्हणाले होते : " We have proclaimed during this past year that we will not attach ourselves to any particular group. That has nothing to do with neutrality or passivity or anything else. We are not going to join a war if we can help it and we are going to join the side which is to our interest. When the time comes to make choices." गेले सबंध वर्ष आम्ही जाहीरपणे सांगतो आहोत की आम्ही कोणत्याही एका विशिष्ट गटात सामील होणार नाही. त्याचा तटस्थता किंवा दुसऱ्या कशाशीही संबंध नाही. शक्यतोपर्यंत आम्ही युद्ध करणार नाही आणि जेव्हा निवड करण्याची वेळ येईल तेव्हा जी बाजू आमच्या हिताची असेल तिला मिळाल्याशिवाय राहणार नाही.

पाकिस्तानने ता. २२ आक्टोबर १९४७ रोजी आपल्या काश्मीरातील मुजफराबाद शहरावर हल्ला चढवून श्रीनगरच्या रोखाने पाकिस्तानी फौज निघाली होती. भारताच्या फौजा पाकिस्तानी फौजांशी लढाया करीत होत्या आणि पाकि-

स्तानी फौजांची तोंडे आता परत आपल्या घराकडे वळणे सुरू झालेले होते. त्यानंतरचे हे नेहरूंचे भाषण होते, हे लक्षात घेतले पाहिजे. नेहरूंनी जरी भारताची अलिप्तता उरीपोटी बाळगलेली असली तरी जरुरीनुसार तिच्यात बदल करण्याची त्यांची मन:स्थिती होती हे त्यांच्या भाषणात दिसून येत होते. नेहरूंच्या या मन:स्थितीचा मौंटबेटनने पूर्ण गैरफायदा घेतला. इंग्रजांनी भारताच्या गळ्यात (अर्थातच काँग्रेसच्या संमतीने) बांधलेले पाकिस्तान त्यांना शिरजोर करून ठेवावयाचे होते. म्हणून भारताने पाकिस्तानला काश्मीरातून असे हुसकावून लावणे धूर्त इंग्रजांना मानवणारे नव्हते. म्हणून मौंटबेटनने नेहरूंना यूनोत जाण्याचा हितोपदेश केला असे म्हणता येते. आणि अशा मन:स्थितीत नेहरूंनी तो मान्य केला. ता. ४ डिसेंबर ते ३१ डिसेंबर हा कालावधी तक्रारअर्ज तयार करण्यास लागला. काम फार झपाट्याने झाले.

त्याच भाषणात नेहरू पुढे म्हणाले, " Ultimately foreign policy is the outcome of economic policy and until India has properly evolved her economic policy, her foreign policy will *be rather vague, rather inchoate and will be groping.*" (Indias Foreign Policy : selected speeches– Jawaharlal Neharu) शेवटी परराष्ट्रीय धोरण आर्थिक धोरणाचाच परिपाक असते. भारताने आपले आर्थिक धोरण विकसित करीपर्यंत त्याचे परराष्ट्रीय धोरण अविकसित, अनिश्चित आणि आंधळेच असेल. एका परक्या देशाने हल्ला करून युद्ध मांडल्यावर आणि आपल्या सेनेला त्या आक्रमणाला तोंड देण्याची अनुज्ञा दिल्यानंतरही, देशाचा पहिला भाग्यविधाता आपण काय करतो आहो याची स्पष्ट जाणीव नसलेल्या मन:स्थितीत राज्य करायला सुरुवात करतो ! ही भारताच्या संरक्षणाची पहिली आणि जीवघेणी व्यथा होती. स्वतंत्र भारताच्या संरक्षणाचा ' श्री गणेशा ' असा झाला.

भारताला निश्चित (Positive) परराष्ट्रीय धोरण आणि संरक्षणाची काळजी करण्याची गरजच नाही; हेच निश्चित झाले आणि जर काही परराष्ट्रीय धोरण असलेच तर ते ' अलिप्तता ' हेच असेल ! आणि संरक्षणाचा विचार करण्याचे कारणच काय ? केवळ शांतीच्याच ' जालीम ' उपायांनी स्वातंत्र्य संपादन करणाऱ्या शांतिब्रह्म भारतावर कोण कशाला आक्रमण करील ? हे राज्यकर्त्यांचे स्वप्नरंजन होते. नेहरूंना ते राज्यकारभार हाकीत असणाऱ्या देशाने, प्रथम कुबेर व्हावे, नंतर इतर गोष्टी; हीच भूमिका साजेशी होती. श्रीमंतांपेक्षा गरिबांनाच अधिक स्वाभिमान असतो ! २६ जानेवारी १९५० पर्यंत भारताची घटनाच तयार झालेली नसल्याकारणाने नेहरूच भारताचे एकटे भाग्यविधाता होते. ते कोणालाही नाममात्रसुद्धा कागदावरही जबाबदार नव्हते. त्यांची हीच भूमिका शेवटपर्यंत कायम होती आणि आंधळ्या व्यक्तिपूजक भारताने ती जोजावून लाडावून ठेवली होती.

ते चांगले धट्टेकट्टे असतानाच नेहरूनंतर कोण या चिंतेने भारताला ग्रासून टाकलेले होते. १५ आगस्ट १९४७ ते २६ जानेवारी १९५० या काळात भारताचे दोन गव्हर्नर जनरल झाले. पहिले इंग्रजांच्या काळातलेच लॉर्ड मौंटबेटन नेहरूंच्या आग्रहाखातर चालू राहिले. त्यांनी नेहरूंना यूनोच्या खोडयात अडकावून ब्रिटिशांच्या धूर्त कूटनीतीचा शेवटचा डाव टाकला. नेहरूंनी पाक आणि भारत या दोन्ही देशांचे मौंटबेटन हेच संयुक्त गव्हर्नर जनरल असावे ही जिन्हांना सूचना केली होती. परंतु ती अमान्य करून जिन्हा स्वतःच पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल झाले. यात त्यांची मुत्सद्देगिरी स्पष्ट दिसते. जिन्हा एक कसलेले विधिज्ञ होते आणि व्यावहारिक दृष्टिकोन असलेले मुरलेले मुत्सद्दी होते आणि नेहरू लंडनहून नुसताच वकिलीचा काळा झगा घेऊन आलेले विधिज्ञ होते आणि कल्पना–विलासात गुरफटलेले, उत्तमोत्तम भाषणे करणारे राज्यशास्त्रज्ञ होते. मौंटबेटनचा कार्यभाग उरकताच ते चालते झाले. त्यांची जागा घेतली पाकिस्तान देऊन टाकावे असे प्रतिपादन करणारे चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांनी. भारताचे परराष्ट्रीय धोरण आणि संरक्षणाचे धोरण जे अव्याहतपणे ३० वर्षे भोवले त्याची पूर्वपीठिका ही अशी आहे.

प्रत्येक स्वतंत्र देशाला राजकीय म्हणजे परराष्ट्रीय धोरण असलेच पाहिजे. त्या धोरणाचा लष्करी धोरण हा महत्त्वाचा घटक असतो. याचाच अर्थ देशाच्या सामरिक सामर्थ्यावर त्याचे तत्कालीन परराष्ट्रीय धोरण अवलंबून असते. रिचर्ड रोजक्रान्स ' International relations : Peace or War ' या ग्रंथात म्हणतो, " Some States may not have international objectives of all. " भारताच्या स्वातंत्र्याची सुरुवातच आंतरराष्ट्रीय उद्दिष्टाविना झालेली आहे. नेहरूंनी हे स्वमुखानेच घटनासमितीला सांगितलेले आहे. असे धोरण असणे म्हणजे, कोणतेही धोरण नसणे ! जे कर्तव्य प्रथम करावयास पाहिजे होते ते नेहरूंनी केले नाही. हाच ग्रंथकार पुढे म्हणतो, " Such a State will prefer isolation in order to advance its domestic purposes. " असे राज्य आपल्या घरगुती हेतुपूर्तीकरिता एकलेपणा पसंत करील. नेहरूंनी अक्षरशः हेच केले. त्यांनी आपल्या एकलेपणाला (Isolation), अलिप्तता (Non-alignment), तटस्थता (Neutralism), न गुंतले जाणे (Non-involvement) अशी नावे दिली (या तिन्ही संज्ञांचे अर्थ आणि व्याप्ती एकच नाही.) आणि जागतिक व्यवहारात (World Affair's) आपले हे एकलेपण, अलिप्तता वगैरे वगैरे क्रियाशील (Active), निश्चित (Positive), ओजस्वी (Vigorous) इत्यादी प्रकारचे राहील, हे नेहरूंनी वेळोवेळी सांगितलेले आहे. असे असूनही नेहरूंनी भारताला तिसऱ्या जगात (Third world) खुशाल ढकलू दिले. इतकेच नव्हे तर ते स्वतः २५ अलिप्त देशांच्या ता. ६ सप्टेंबर, १९६१ साली भरलेल्या परिषदेला हजर राहिले आणि त्या परिषदेने प्रसृत केलेल्या पहिल्या प्रकटनावर

(Declaration) त्यांनी स्वाक्षरी केली. एकले, अलिप्त, तटस्थ वगैरेही एकत्र आले. त्यांनी एक परिषद भरवली ! यापेक्षा अलिप्ततेची आणखी विटंबना ती कोणती ? या शब्दांच्या बुडबुडयांना किती आणि काय अर्थ असतो हे सुज्ञांनीच मनाशी ठरवावे !

अलिप्त असूनही देशाचे लष्करी धोरण निश्चित करता येते. विल्यम गटरिज ' Military institutions and power in new States ' या ग्रंथात म्हणतो; " Neutralism and reasonable military provision are not incompatible in the present situation. A neutral nation which neglects its own defences increases its reliance on foreign aid at the same time diminishes its capacity to initiate international action by example." प्रस्तुत परिस्थितीत अलिप्तता आणि उचित लष्करी तयारी विसंवादी नाहीत. आत्मरक्षणाकडे दुर्लक्ष करणारे अलिप्त राष्ट्र, आपले परावलंबित्व वाढविते आणि त्याचबरोबर आंतर–राष्ट्रीय क्षेत्रातली आपली उपक्रमक्षमता, क्षीण करते. पाकिस्तानने जेव्हा काश्मीरवर पहिला हल्ला चढवला त्यावेळी, पाकिस्तानला सहज पिटाळून लावण्याइतकी ताकत भारताच्या तलवारीत होती; आणि ते काम सुरूही झाले होते. परंतु जेंव्हा १९६२ मध्ये चीनविरुद्ध लढण्याचा भारतावर प्रसंग आला तेव्हा भारताचे सामरिक दारिद्र्य आणि परावलंबित्व जगाच्या वेशीवर टांगले गेले.

स्वतंत्र भारताच्या लष्करी धोरणाविषयी गार्व्हिन केनेडी ' Military in the third world ' या ग्रंथात म्हणतो : " Indias military strategy was based on the assumption that it would not be attacked by its neighbours with a force of sufficient strength to create problems for the armed forces. India also regarded itself as being above the use of force in the settlement of differences between nations. Somehow India's prestige as a neutralist country dedicated to world peace was supposed to ensure its invulnerebility to aggressive designs of its Integrity." आपल्यावर आपल्या फौजेला न झेपणारे जोरदार आक्रमण आपल्या शेजाऱ्याकडून होणार नाही असे गृहीत धरलेले भारताचे परराष्ट्रीय धोरण होते. राष्ट्राराष्ट्रांतले मतभेद बलप्रयोगाने सोडवावे लागण्यापेक्षा वरच्या पातळीवर आपण असल्याचा भारताचा समज होता. जागतिक शांतीला वाहून घेणारी अलिप्ततेची प्रतिष्ठा भारताचे अभेद्यत्व आणि पूर्णत्व आक्रमकांच्या दुष्ट बेतापासून सुरक्षित राखू शकेल असे त्याला वाटत होते. भारताची शांतीची तळमळ कितीही हार्दिक असली तरी ते ' स्वप्नरंजनच ' आहे. त्याच्या उलट अमेरिकेची शांतीची योजना व्यवहारी आणि

रोखठोक आहे. ती रिचार्ड रोजक्रान्सने आपल्या International Relations : Peace or War ' या ग्रंथाच्या ४६ व्या पानावर दिली आहे. " The American prescription for peace has been commitment and deterence. Draw a line and then threaten to go to war if that line is crossed." तोंड खुपसणे आणि परावृत्तीची शक्ती खडी करणे ही अमेरिकेची शांतीकरिता औषधयोजना आहे. एक रेघ काढा आणि ती ओलांडणाऱ्यास युद्धाचे आव्हान द्या. लक्ष्मणरेषेची महती भारतीय हिंदूंना तरी निदान सांगण्याची गरज असू नये ! भारताचे तिन्ही प्रधानमंत्री हिंदूच होते. परंतु भारताचे अग्रगण्य राष्ट्रीय मुसलमान आणि एक शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद आपल्या India wins Freedom या पुस्तकात नेहरूंना घरचाच भरघोस अहेर करतात. त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ स्पष्ट आहे. भारताची फाळणी हे नेहरूंच्या चुकांचे फळ. ती फाळणी टाळता आली असती. आझादांचा हा स्पष्ट वक्तेपणा अभिनंदनीय आहे. नेहरूंनी थोडी कळ सोसली असती, थोडा दम धरला असता, थोडा व्यवहार पाहिला असता तर पाकिस्तानचे स्वातंत्र्य कायम ठेवून हिंद–भारताचे एक फेडरेशन होऊ शकले असते आणि तसे झाले असते तर पुढे अग्निदिव्य आणि सव्यापसव्य करीत बसण्याची आणि संरक्षणाची चिंता करण्याची पाळीच आली नसती. हिंदुस्थान जो एकाच राज्यछत्राखाली आला तो फक्त ब्रिटिश काळातच. त्यापूर्वी अगदी ऋग्वेदाच्या काळापर्यंत मागे गेले तरी या प्रचंड विस्तार असलेल्या देशात अनेक लहान मोठी स्वतंत्र राज्ये होती. त्यांच्या आपसात लढायाही होत होत्या आणि दिग्विजयाकरिता अश्वमेध यज्ञही होत होते. मुघलच काय अशोक, चंद्रगुप्त मौर्य हे सुद्धा अगदी झाडून साऱ्या कोपरान् कोपरा भारताचे एकमेव सम्राट नव्हते. हिंदुस्थानचे फेडरेशन जिनांना मान्य होणे अशक्य नव्हते, आणि तसे झाले असते तर या भूमीवर एकही लढाई झाली नसती आणि शांत हिंदुस्थानने जगालाही शांतीचा आदर्श घालून दिला असता. हिंदुस्थानची फाळणी ही पहिली भयंकर चूक. त्यानंतर भारताला परराष्ट्रीय धोरण आणि संरक्षणाचेही धोरण नसणे ही दुसरी चूक. नव्हे उःशाप नसणारा शाप !

शांती, अलिप्तता आणि लोकशाही समाजवाद (की समाजवादी लोकशाही ?) हा नेहरूंचा अहिंसक त्रिशूल होता. शांती आणि अलिप्तता यांची अशी वासलात लागल्यावर, उरलेल्या लोकशाही समाजवादाच्या ध्येयसिद्धीसाठी, सामाजिक विकास आणि औद्योगिक प्रगती ही जोडनळींची बंदूक (Double–Barreled Gun) नेहरूंनी सरसावली आणि पंचवार्षिक योजनांचे धडक कार्यक्रम युद्धपातळीवरून सुरू केले. अलिप्ततेमुळेच देशाची सुरक्षितता निश्चित होईल, परराष्ट्रीय धोरणात स्वातंत्र्य लाभेल आणि भारत शांतीचा अग्रदूत ठरेल असे नेहरूंना वाटत होते. परंतु दुनियादारी निराळीच होती.

भारताची अलिप्तता अमेरिकेला एकदम नापसंत होती. अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट जॉन फॉस्टर डल्लेस यांनी नेहरूंच्या अलिप्ततेला कालबाह्य, (Obsolete), अनैतिक (!) (Immoral), अदूरदर्शी (Short–Sighted) अशा शिव्या हासडून, यूनोच्या सनदेच्या कलम ३९ ते ५१ यांच्यातील सांघिक सुरक्षितता (Collective Security) या तत्त्वाचा भारताने भंग केल्याचा त्याच्यावर आरोप केला आणि त्याची शिक्षा म्हणून भारताचा मस्तवालपणा जिरविण्याकरिता पाकिस्तानला शस्त्रसमर्थ बनविण्याचे ठरविले. अमेरिकेने भारताच्या शत्रूला–पाकिस्तानला २० सुपर सॉनिक स्टार फाईटर्स, १२० सबसॉनिक सेबर्स आणि ३० बॉंबर्स अशी १७० अद्ययावत शक्तिशाली विमाने दिली. १,००० रणगाडे दिले, (त्यात अमेरिकेचा प्रसिद्ध सेनापती जनरल **पेटन** याचे नाव दिलेले अजिंक्य रणगाडे होते.) अनेक हलक्या व भारी तोफा दिल्या आणि त्याशिवाय कोटयवधी डॉलर्सचे इतर युद्धसाहित्य आणि मदत दिली. परंतु भारताला काहीही भरकिंमतीत विकत देण्यास साफ नकार दिला. नंतर फ्रान्स आणि इराण पाकिस्तानच्या सामरिक पाठपुराव्याकरिता धावून आले. त्यामुळे भारताचे संरक्षण पहिल्याइतके सोपे राहिले नाही. अशा रीतीने भारताच्या हितशत्रूंनी भारताचा एक उघड शत्रू सुसज्ज करून, त्याच्या शांतीचा तपोभंग करण्यास तयार करून ठेवला.

नेहरूप्रणीत भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध, संरक्षणाचा पवित्रा आणि राज्यकारभाराचे धोरण आणि त्यांनी घालून दिलेला कित्ता यांचे परिणाम आणि प्रतिक्रिया अमेरिका, चीन आणि रशिया या तिन्ही बडया देशांवर निरनिराळ्या झाल्या. त्यापैकी अमेरिका आणि चीन यांच्या नेहरूंच्या हयातीतच स्पष्ट झाल्या आणि त्यांचे परिणामही भारताला भोगावे लागलेले नेहरूंनी अनुभविले. रशियाची प्रतिक्रिया त्यांच्या मृत्यूनंतर अनुभवास आली आणि ती भारताला हितकारक ठरली. अमेरिका आणि चीन यांच्या प्रतिक्रिया शत्रुत्व या एकाच जातीच्या होत्या. परंतु अमेरिकेने 'मधुतिष्ठति जिव्हाग्रे' या पद्धतीने स्वतः शत्रुत्व न करता भारताच्या प्रच्छन्न शत्रूला प्रोत्साहन दिले आणि बलिष्ठही केले. चीनने असा आडपडदा न ठेवता सुरुवातीला बंधुत्वाच्या नजरबंदीचा (Camouflage) धूर (Smoke) उभा करून भारतावर सरळच जबरदस्त हल्लाच चढवला.

चीनच्या प्रतिक्रियेची दोन परस्पर विरोधी दृश्ये दिसतात. पहिले चीनच्या चढाईच्या पूर्वीचे आणि दुसरे त्यानंतरचे. या दोन्ही दृश्यांचे चित्रपट अजूनही भारतासमोर ताजेच आहेत. तो सगळा इतिहास येथे पुन्हा सांगण्याची आवश्यकता नसली तरी दोन महत्त्वाच्या गोष्टींची आठवण अपरिहार्य आहे. पहिली गोष्ट कम्युनिस्ट चीनला मान्यता देणारा भारत हाच पहिला स्वतंत्र देश होय आणि भारतानेच त्याला आंतरराष्ट्रीय प्रांगणातले संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासदत्व मिळवून देण्याकरिता अतिशय परिश्रम केले. दुसरी गोष्ट भारत आणि चीन यांचा तिबेट-

विषयीचा तह ही आहे. त्या सतरा कलमी तहनाम्याच्या सरनाम्यात '*Tibet Region of China*' चीनचा प्रांत तिबेट हा चीनने पुढे केलेल्या मसुद्यात तिबेटचा उल्लेख केला होता. तो भारताला मान्य नव्हता. " Antonomous region of Tibet under Chinese suzerointy " चीनच्या प्रभुत्वाखालील तिबेट हा स्वयंशासित प्रदेश असा तिबेटचा उल्लेख असावा असा भारताचा वस्तु-स्थितिदर्शक आग्रह होता. (हाही आग्रह सर्वार्थाने बरोबर नव्हता. कारण तिबेटात इंग्रजांकडून वारसा हक्काने भारताला काही अधिकार प्राप्त झाले होते. म्हणून तिबेटवर चीनचे निर्भेळ प्रभुत्व मान्य करणे बरोबर नव्हते. त्यात भारताचाही निर्देश असणे कायदेशीर होते.) भारताने आपला आग्रह मागे घेतला. (का ?) नेहरूंनी लोकसभेत या पिच्छेहाटीचे समर्थन केले. चीनने तिबेट पचवून टाकून भारताच्या उंबरठ्यावर तिबेट आणि अक्साई चीनच्या मार्गाने प्रचंड सुसज्ज फौज आणून उभी केली (चीनच्या क्षेपणास्त्रांच्या टप्प्याबाहेर भारतातले एकही गाव नाही.) आणि भारत चीन युद्ध सुरू झाले. चीनने हमला केला !

ता. १४ नोव्हेंबर १९६२ रोजी नेहरूंनी लोकसभेत गर्जना केली. " We will finish the war when we liberate our own territory which is in their possession." त्यांच्या ताब्यात असलेला आमचा प्रदेश मुक्त करूनच आम्ही युद्ध थांबवू. नंतर पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांत एक ठराव पास झाला. " The house affirms the firm resolve of the Indian people to drive out the aggressor from the sacred soil of India, however, hard and long the struggle may be." भारताच्या पवित्र भूमीवर आक्रमण करणाऱ्याला घालवून देण्याकरिता करावा लागणारा संघर्ष कितीही कष्टप्रद आणि प्रदीर्घ असला तरी, तो पूर्ण करण्याच्या भारतीयांच्या कठोर निर्धाराला हे सभागृह पुष्टी देत आहे. ठरावाने हृदयपरिवर्तन होत नसते आणि लढायाही लढल्या जात नसतात. हे कोणी कोणाला सांगण्याची जरूर असू नये ! झाले. ठराव पास झाला. आता प्रधानमंत्री आणि संरक्षणमंत्री या दोघांना फुरसतच फुरसत होती. लढणारे लढत होते. तेव्हा घरी रिकामे बसण्यापेक्षा पर-देशांत चक्कर टाकायला ते चालते झाले. त्यांना भारताच्या संरक्षणाचे जणू सोयर-सूतक असायचे कारणच नव्हते आणि चीननेच युद्ध थांबवले. सगळे बुचकळ्यात पडले ! परंतु ठरावाचा परिणाम झाला; असा चीनच्या स्वयं युद्धबंदीचा नेहरूंनी अर्थ केला किंवा काय, हे कळायला मार्ग नाही. कसेही का असेना ! युद्ध थांबले. शांती सुरू झाली आणि लवकरच दीड वर्षाने नेहरू कालवश झाले. स्वतंत्र भारताच्या पहिल्या प्रधानमंत्र्याच्या कारकिर्दीत भारताचे असे संरक्षण झाले. म्हणजे भारत इतका लहान झाला आणि भारत चीन युद्धामुळे त्याची सामरिक शक्ती (!) किती दुबळी आहे हे जगाला आणि खास करून त्याच्या शत्रूंना

समजून आले.

नेहरू गेले. समर्थ म्हणतात, "मरे एक त्याचा दुजा शोक वाहे." भारताने शोक केला. परंतु राज्यकारभार चालवावा लागतो. तो थांबू शकत नाही. ते जिवंत असतानाच नेहरू नंतर कोण ? ही विवंचना सुरू झालेली होती. नेहरूनंतर शास्त्री आले. त्यांनी नेहरूंचा कित्ता पुढे ठेवून पुस्ती गिरवणे सुरू केले. पक्षीय राज्य-कारभारात जुनाच कित्ता गिरवायाचा असतो. **पक्षीय अक्षराला निराळे वळण देता येत नाही.**

शास्त्रीजींनी पाकिस्तानला अर्धा कच्छ सुखासुखी देऊन टाकला. चीनने केलेल्या भारताच्या फजितीमुळे पाकिस्तानला जोर चढला. त्याने खुल्लमखुल्ला भारताशी दुसरे युद्ध सुरू केले. नव्हे पहिलेच थांबलेले युद्ध अधिक धाडसाने सुरू केले. परंतु भारताच्या जवानांनी पाकिस्तानचा डाव उधळून लावलेला पाहताच, युनोला पाकिस्तानविषयी चिंता वाटू लागली. १९६५ च्या सप्टेंबरच्या २ तारखेस युनोचे सेक्रेटरी जनरल **यू थांट** यांनी युद्ध थांबवा अशा भारत आणि पाकिस्तान यांना तारा धाडल्या. भारताने काहीही अटी न घालता आपल्या फौजांना ताबडतोब 'गोळी बंद' करण्याचा हुकूम दिला. १४ तारखेला स्वत: यू थांट भारतात आले. शेवटी २३ तारखेस पाकिस्तान गोळी बंद करण्यास राजी झाला. आगळीक पाकिस्ताननेच केली होती. हे युद्ध सुरू झाले तेव्हा अमूक तारखेच्या आत युद्ध थांबवा नाही तर पाकिस्तानला मदत करण्याकरिता चीन युद्धात उतरेल; अशी चीनने भारताला धमकी दिली होती. नंतर त्यानेही मुदत वाढवली होती. परंतु चीन मदतीला आला नाही म्हणून पाकिस्तानने गोळी बंद करण्यास मान्यता दिली.

त्याच्याआधी १० तारखेला संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोक-सभेत "आम्हाला पाकिस्तान नष्ट करावयाचे नाही. फक्त आमच्या सीमा सुरक्षित ठेवणे इतकाच आमचा हेतू आहे." असे भाषण केले होते. शेवटी १९६६ च्या जानेवारीच्या १० तारखेस **लालबहादुर शास्त्री** यांनी **ताश्कंद** येथे एका करारावर सही केली. या युद्धात भारताने पाकिस्तानचा १२,००० वर्ग मैल प्रदेश जिंकला होता, तो पाकिस्तानला परत केला. भारताने **३३५ मैल आपला प्रदेश गमावला होता, तो पाकिस्तानकडे राहू दिला.**

हा करार करण्यापूर्वी, शास्त्री म्हणाले होते. "आम्ही जसे स्वातंत्र्याचे, शांतीचे आणि लोकशाहीचे पूजक आहोत, तसा पाकिस्तान नाही." असे बोलूनही भारताचा ३३५ वर्ग मैल प्रदेश परत न मागता भारताने त्याची जिंकलेली सगळी जमीन खुशीने सोडून देऊनही पाकिस्तानला खुषीने देऊन टाकला, तो काय म्हणून ?

"जोपर्यंत अंतिम राजकीय उद्दिष्ट साध्य होत नाही, तोपर्यंत युद्धातल्या यशाला किंमत नाही" असा **माओचा** एक सिद्धांत आहे. शांती हेच भारताचे सर्व-

समावेशक उद्दिष्ट आहे. तेच त्याचे राजकीय उद्दिष्ट आहे. ते उद्दिष्ट साध्य होण्यासाठी भारताला त्याच्या शत्रूवर संपूर्ण विजय मिळविल्याशिवाय दुसरा उपाय नाही. हातातोंडाशी आलेली संपूर्ण विजयाची संधी वाया जाण्याची ही दुसरी खेप होती. भारताची फौज लाहोरच्या परिसरात पोहोचण्याच्या बेतात होती पण !!! दोन युद्धांच्या मधल्या काळाला रशिया शांती हे नाव देतो. परंतु भारताला तितकीसुद्धा शांती पाकिस्तान मिळू देत नाही. युद्धबंदी जाहीर झालेली असली तरी, पाकिस्तानची गोळी कधीच बंद होत नसते. **शास्त्रीजींच्या साधारण दीड वर्षाच्या प्रधानमंत्रिपदाच्या कार्यकाळात भारत आणखी लहान झाला.** मोठ्या भारताच्या 'छोट्या आदमीने' भारत आणखी छोटा होऊ दिला.

संरक्षण मंत्रालयाच्या १९६६–६७ सालच्या इतिवृत्तात शास्त्रीजींच्या ताश्कंद कराराविषयी म्हटले आहे " It would appear that the main anxiety of Pakistan in subscribing to the aggreement was to secure the withdrawal of Indias forces from Pakistan and the Pakistan side of the ceasefire line." पाकिस्तानने ताश्कंद कराराला मान्यता दिली ती पाकिस्तानात शिरलेल्या आणि युद्धबंदी रेषा ओलांडणाऱ्या भारताच्या फौजा माघारी घेतल्या जाव्या एवढ्याचकरिता होती. ही **होती अयूबखानाची मुत्सद्देगिरी आणि शास्त्रीजींची उदार गाफिलगिरी** ! कराराप्रमाणे भारताच्या फौजा मागे खेचल्या गेल्या मात्र, पाकिस्तानची आक्रमणे सुरू झाली. त्याच इतिवृत्ताच्या पहिल्या भागातल्या ३ व ४ पान्यात आकडे दिलेले आहेत ते स्थलाभावी येथे उद्धृत करता येत नाहीत. **तेथेच सरासरी दिलेली आहे– प्रतिमास १३० (एकशेतीस.)**

" Defence of India या ग्रंथात आर. जी. सी. टॉमस लिहितो, " By October 1962 Neheru's security system based on diplomacy had collapsed. " आक्टोबर १९६२ पर्यंत मुत्सद्देगिरीवर आधारलेली नेहरूंची (भारताच्या) सुरक्षिततेची योजना कोसळून पडली होती. या विधानावरून लेखक नेहरूंच्या शांतीला आणि अलिप्ततेला मुत्सद्देगिरी समजत असल्याची शंका येते. तसे असेल तर हा नेहरूंवर फार मोठा अन्याय होईल. नेहरूंची शांती आणि अलिप्तता या त्यांच्या हार्दिक श्रद्धा होत्या. ही राजकारणी प्रासंगिक मुत्सद्देगिरी खासच नव्हती. त्यांच्यानंतर शास्त्री यांचीही तीच श्रद्धा होती. हे थोर पुरुष खरोखरीच मुत्सद्दी असते, तर भारताची प्रतिमा आणि परिस्थिती अगदी निराळीच बनली असती. भारताचे परम दुर्भाग्य की हे दोन्ही प्रधानमंत्री सम्राट चंद्रगुप्ताच्या प्रधानमंत्र्याचे चाणक्याचे अंशमात्रही चेले नव्हते. समर्थ रामदास पुढे म्हणतात, " अकस्मात तोही पुढे जात आहे." शास्त्रीजींनी ताश्कंद करारावर सही केली; **आणि ते अकस्मात पुढे निघून गेले !**

भारत–पाक युद्धबंदीच्या ताश्कंदच्या करारात रशियाला काय साधावयाचे होते याचा स्पष्ट उलगडा होत नाही. हा करार एक ' नऊ कलमी इच्छाचिंतन ' आहे. त्यातील ५ आगस्ट १९६५ रोजी जेथे दोन्ही देशांच्या फौजा होत्या तेथे त्या जाव्या, हे दुसरे एकच कलम काय ते निश्चित असे आहे. युनोने दोन्ही देशांनी तेच करावे असे पूर्वीच सांगितले होते. ताश्कंदच्या मुक्कामात सौजन्यमूर्ती शास्त्रीवर मार्शल अयूबखानांच्या उद्दाम व्यक्तिमत्त्वाचा आणि रशियाच्या मुत्सद्देगिरीचा प्रभाव पडला हे उघड आहे. ' रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति ' हेच रशियाने भारताविषयीचे धोरण ता. १० जानेवारी १९६६ पर्यंत होते असे उघड दिसते.

भारताच्या अलिप्ततेच्या धोरणाविषयी सुरुवातीस रशिया साशंक होता. परंतु अलिप्त भारताने कोरियाविषयी घेतलेली भूमिका आणि भारताचे रशियातले राजदूत डॉ. राधाकृष्णन् यांच्याशी झालेल्या स्टॅलिनच्या मुलाखतीमुळे वातावरण निवळले. नंतर नेहरू, बुल्गेनिन व क्रुश्चेव्ह यांच्या गाठीभेटीमुळे, रशियाला भारताच्या कोणत्याही सत्तागटात सामील न होण्याच्या धोरणाची खात्री पटली. तरीही १० जानेवारी १९६६ पर्यंत रशिया भारताविषयी हात राखूनच होता. भावनाविवशतेच्या (एकतर्फी) उद्रेकातून उठलेल्या ' भाईभाईच्या ' दिखाऊ आरोळ्यांत काही अर्थ नसतो. हे रशियाला समजत होते आणि त्याने भारताची नुकतीच झालेली फटफजिती पाहिली होती. सावध मुत्सद्दी कधीच भावनांना बळी पडत नसतो ! ' इस हाथ दे, उस हाथ ले ' असा त्याचा नगद ' सौदा ' असतो.

(१९००) सत्तरीच्या छायेत भारताच्या संरक्षणाचा प्रश्न अधिकच बिकट झाला. कारण हिंदी महासागराला आपल्या परसातले सरोवर (Brittish lake) बनवून सोडणाऱ्या ब्रिटिशांनी, सुवेझच्या पूर्वेकडून काढता पाय घेतला. परंतु अमेरिका आणि रशिया यांची हिंदी महासागरात घुसून, तो घुसळून काढण्याची तयारी सुरू झाली. दुसरी गोष्ट चीन आणि रशिया यांचा बेबनाव वाढीस लागला. त्यामुळे भारताला निराळेच महत्त्व प्राप्त झाले. आपल्या अलिप्ततेच्या धोरणावर जरी भारत मजबूत होता तरी, त्याला पाकिस्तान आणि चीनच्या मुकाबल्यात शस्त्रास्त्रे आणि आयुधे यांची गरज होतीच. ती गरज (अंशतः) रशियाने भागविली. १९६७–७१ च्या दरम्यान फायटर बांबर विमाने, रणगाडे, जमिनीवर आणि पाण्यात चालणारे (amphibious) रणगाडे, टॉरपेडो बोटी, पेटचा जातीची फ्रिगेटस् वगैरे भारताला रुबेलसच्या उधारीवर दिली (अमेरिकेने नगदीलासुद्धा भारताला युद्धसाहित्य विकण्यास नकार दिलेला होता). त्याशिवाय हिंदुस्थान एअरोनॉटिक्स आणि मिग विमानांच्या प्रकल्पांना तांत्रिक मदत दिली. त्यानंतर १९७१ च्या आगस्ट महिन्याच्या ९ तारखेस भारत–रशिया तहावर उभय देशांच्या सह्या झाल्या. यातली ८, ९ आणि १० ही तीन कलमे उभय देशांना

अतिशय महत्त्वाची होती (आहेत– तो तह कायम आहे).

या तहाच्या ८ व्या कलमाचे रशियाला महत्त्व आहे. त्याने चीन आणि रशिया या परस्परांविरुद्ध असणाऱ्या देशांच्या कोणत्याही मित्र देशापासून अलग राहण्याचे भारतावर बंधन पडले (तसेच रशियानेही चीन किंवा भारत यांच्यापैकी कोणाहीकडे भारताविरुद्ध झुकू नये, अशीही व्यवस्था झाली).तसेच भारत, पश्चिम आणि विशेषतः अमेरिका यांच्या प्रभावाला न नमण्याची खात्री झाली. ९ व्या कलमाचे भारताला महत्त्व आहे. त्याच्या पहिल्या भागाने पाकिस्तानला लष्करी मदत न देण्यास रशिया बांधला गेला आणि दुसऱ्या भागाने रशियाने भारताला लष्करी आणि राजनैतिक मदत देण्याची, त्याच्याकडून कबुली मिळाली. १० व्या कलमाने अमेरिकेच्या 'मान ना मान मैं तेरा मेहेमान' या पद्धतीच्या आंतरराष्ट्रीय लुडबुडीला प्रत्युत्तर मिळाले. एकंदर परिणाम हा झाला की, त्यामुळे विकसनशील भारताचे आंतरराष्ट्रीय प्रांगणातले अलिप्त स्थान अधिक स्पष्ट आणि निश्चित झाले.

या तहाचा भारताला हितावह असा एक चांगला परिणाम झाला. त्याने भारताविरुद्ध कोणत्याही देशाशी पाकिस्तानशी उभ्या राहणाऱ्या पुढच्या युद्धात अमेरिका किंवा चीन यांच्या फौजा पाकिस्तानकरिता त्याच्या बाजूने लढाईत उतरण्याची शक्यता नाहीशी झाली. याचे प्रत्यंतर लवकरच झालेल्या बांगला मुक्ती युद्धाच्या वेळी आलो. पाच–सात अमेरिकन पाद्र्यांना पूर्वपाकिस्तानातून सुखरूप नेण्याच्या निमित्ताने, बंगालच्या उपसागरात येऊन धडकलेले अमेरिकन अणु–शक्तिसंपन्न महाबलाढ्य सातवे आरमार हात चोळीत 'तटस्थ' राहिले. १९६५ च्या युद्धात चीनने भारताला धमकी दिली होती. तसा काही प्रकार या युद्धाच्या वेळी चीन करू धजला नाही. हा तह करण्यास वस्तुतः रशियाच विशेष उत्सुक होता. तो मान्य करण्यात आणि त्याच्या कलमांची भाषा ठरविण्यात तत्कालीन प्रधान-मंत्री इंदिरा गांधी यांनी मुत्सद्देगिरी आणि चातुर्य दाखविले ते मान्य केलेच पाहिजे. त्यांचे पिता श्री जवाहरलाल नेहरू यांनी घालून दिलेल्या, अलिप्तता धोरणाशी हा तह विसंगत असल्याची त्यांना शंका आली नाही; हे भारताचे परमभाग्य ! कुटिल कारस्थानी दुष्टबुद्धी अमेरिकेने १९६५ साली एक आणि १९६८ साली एक अशी २ प्लूटोनियम शक्तियुक्त यंत्र हिमालयात गंगेच्या उगम स्थानाजवळ गुप्तपणे ठेवली असल्याचे आता १९७८ साली उघडकीस आल्यावर १९७१ सालच्या भारत रशिया कराराचे महत्त्व आणि भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने त्याची उपयुक्तता सिद्ध होते.

आपल्या संरक्षण मंत्रालयाचे १९७१-७२ चे सरकारी इतिवृत्त पुढील वाक्यांनी सुरू होते, " During the course of 1971, Indias national security came under the most severe threat it had to face since the dawn of independence. The year saw India engaged in a grim

struggle to protect its sovereignty, its integrity, and in fact, its way of life against aggression from without." भारत स्वतंत्र झाल्या-पासून त्याच्या राष्ट्रीय सुरक्षिततेस १९७१ साली सर्वात भयंकर धोका उत्पन्न झाला होता. आपले सार्वभौमत्व, अभंगत्व आणि जीवनमूल्ये यांच्यावरील बाह्य आक्रमणाविरुद्ध भारत वज्रकठोर निर्धाराने लढला. ही लढाई प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात लढली गेली.

परंतु ही लढाई जिंकली कोणी ? भारताने नव्हे ! पाकिस्तानचे दोन तुकडे पडले असले तरी त्याचे तसे फारसे नुकसान झाले नाही. थोडेसे आर्थिक नुकसान झाले असले तरी सामरिक फायदाच झाला. कारण आता त्याला आपली फौज पूर्वे-कडे खर्च करण्याचे कारण उरले नाही. सर्व फौज पश्चिम पाकिस्तानातच एकत्र ठेवणे सोईचे होते. कारण रक्त पाण्यापेक्षा घट्ट असते. बंगाली मुसलमान भारताला निश्चित राहू देणार नाहीत हे उर्वरित पाकिस्तानने हेरले होते. मुजीबुर्रहिमानची वासलात लागताच भारताला त्याचे प्रत्यंतर मिळाले.

बांगला देश मुक्त करताच त्याचे स्वातंत्र्य कायम ठेवून त्याला भारतामध्ये फेडरेशनच्या पद्धतीने सामील करून घेता आले असते. ती सोय भारताच्या घटनेत स्पष्टपणे कलमे घालून करून ठेवलेली आहे. कृतज्ञ आणि भारताशी जवळचे सांस्कृतिक संबंध असलेला 'सोनार बांगला' भारताशी अशा रीतीने संलग्न होण्यास सहज तयार झाला असता. त्यातच त्याचे सर्वतोपरी हित साधणार होते. परंतु एवढ्या दूरदृष्टीची मुत्सद्देगिरी सुचायला आणि पचायला जी दीर्घ तपश्चर्या लागते ती खुर्चीची घाई झालेल्यांकडून कशी पार पडणार आणि त्यांना कशी झेपणार ? दोनदा गाडी चुकली !

भारताने गजेंद्रमोक्ष केला. उत्तम झाले. परंतु पश्चिम आघाडीवर आपणहून युद्धबंदी का केली ? १९६२ च्या भारत-चीन युद्धात चीनने तसे केले होते म्हणून ? याचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. १९७२ च्या जुलै महिन्याच्या २ तारखेस भारताच्या प्रधानमंत्री आणि पाकिस्तानचे अध्यक्ष यांच्या सिमला करारावर सह्या झाल्या. परंतु आपले १९७२–७३ चे संरक्षण मंत्रालयाचे इतिवृत्त पहिल्या पानाच्या पहिल्या प्याऱ्यात म्हणते, " As the year closed, the outcome was far from clear." वर्ष संपले तरी फलित गढूळच होते.

सिमला कराराचा तपशील ठरविणाऱ्या पाच वांझ बैठकींनंतर भारतातर्फे फील्ड मार्शल माणेकशांनी कष्टाने आणि विचित्र परिस्थितीत आपली स्वाक्षरी केलेल्या बैठकीचा जमाखर्च असा होता– आपल्या जवानांनी जम्मू–काश्मीरच्या ४७९·९६ वर्ग मैल प्रदेश पाकिस्तानपासून परत घेतला होता. त्याशिवाय ३७३·९३ वर्ग मैल पंजाबातील व कच्छसिंधमधील ४७६५·१७ वर्ग मैल एवढा पाकिस्तानचा प्रदेश जिंकला होता. पाकिस्तानने जम्मू–काश्मीरमधील ५२·२७ वर्ग मैल प्रदेश,

६८·७० वर्ग मैल प्रदेश पंजाबातला आणि ०·५ वर्ग मैल प्रदेश राजस्थानातला घेतला होता. पाकिस्तानकडून घेतलेला सर्वच्यासर्व प्रदेश त्याला परत देऊन टाकला. पाकिस्तानने आपला घेतलेला प्रदेश परत देऊन टाकावयाचा होता ! परंतु त्याने तो परत केला किंवा नाही हे गुलदस्तात आहे. हे गुलदस्तात ठेवण्याचे नेहमीचे, ठराविक, साचेबंद, सोईस्कर, अब्रू बचावू पाहणारे कारण " सार्वजनिक सुरक्षितता " (Public security) आणि आंतरराष्ट्रीयसंबंध न बिघडावेत ही धीरोदात्त तळमळ !

भारताच्या या तीन प्रधानमंत्र्यांनी भारताचे ३० वर्षे असे संरक्षण केले— भारत लहान लहान होऊ दिला ! याचे कारण, भारताचा राज्यकारभार स्वतंत्र भारत सरकारने केला नसून प्रबळ काँग्रेस पक्षाने केला. जोपर्यंत पक्षीय दृष्टिकोनातून आणि पक्षीय तत्त्वज्ञानानुसार राज्यकारभार चालेल तोपर्यंत हे असेच चालणार. लोक-शाहीत बहुमतवाला पक्ष राज्य करतो हे जरी खरे असले तरी, राज्याच्या अंतिम राष्ट्रीय उद्दिष्टांना आणि हितांना पक्षाची पिसे खोवली जाता कामा नयेत आणि आपल्या राष्ट्रपतीने राष्ट्रपती आणि सर्व सशस्त्र सेनादलांचा सर्वोच्च सरसेनापती या दोन्हीही अधिकारपदावर असताना कोणत्या पक्षाची टोपी घालता कामा नये. इतर दुय्यम आणि अंतर्गत बाबीत तसे एक वेळ क्षम्य ठरू शकेल ! पक्षीय राज्यकर्त्यांना अंतिम राष्ट्रहित की पक्षाची श्रद्धा आणि मूल्यांची जोपासना हा प्रश्न पडता कामा नये ! इंग्लंड, अमेरिका या लोकशाही देशांत असे होत नाही. भारताची लोकशाही अजून अपरिपक्व आहे ! या अपरिपक्व लोकशाहीने भारताचा संकोच केला. त्याचे संरक्षण केले नाही. भारताच्या या लोकशाहीने आणखीही अनिष्ट गोष्ट केली. प्रधानमंत्र्याला सर्वाधिकार बहाल केले. त्याला एक विभूतिमत्त्व चिकटविले आणि त्याच्या आंधळ्या भक्तीत धन्यता मानली.

या परिस्थितीविषयी के. सुब्रम्हण्यम् आपल्या " Defence and Development या ग्रंथात म्हणतात, " Within the country the political leadership is looked upon in the spirit of ना विष्णु: पृथ्वीपति:; and not peers elected to discharge particular responsibilities." भारतात 'ना विष्णु: पृथ्वीपति:' या भावनेने राजकीय नेतृत्वाकडे पाहिले जाते. विशिष्ट जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या कर्तव्यास्तव निवडून दिलेल्या श्रेष्ठींच्या कर्तव्यपालनाच्या अपेक्षेने नव्हे !

११

लोकसभेत संरक्षण

देशाच्या संरक्षणाचा भार राज्यकर्त्यांवर असतो आणि राज्यकर्त्यांनी आपले पवित्र कर्तव्य या भावनेने हा अधिकार बजावला पाहिजे हे जरी खरे असले, तरी लोकशाहीत राज्यकर्ते लोकनियुक्त असतात आणि लोकच त्यांना हे अधिकार प्रदान करीत असतात. याचा अर्थ हाच की लोकच सार्वभौम असतात. आपले बरे–वाईट हित–अनहित पाहणे हे लोकांचेच काम असते. ' उद्धरेत् आत्मना आत्मानम् ' ज्याचा त्यानेच उद्धार करावयाचा असतो. लोकशाहीत हा उद्धार अथवा त्याच्या उलटची स्थिती ही सामुदायिक वर्तनाने उत्पन्न होत असते.

लोकशाहीचे मुख्य प्रकार दोन आहेत. एक **अध्यक्षीय** आणि दुसली **पार्लमेंटरी**. भारताच्या घटना-कारांनी या दोन्ही पद्धतींचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला असल्या कारणाने भारतात अध्यक्ष–राष्ट्रपती आहे आणि पार्लमेंटही आहे. आपल्या घटनेने संरक्षणासकट सर्वाधिकार एकटया राष्ट्रपतीला दिले नाहीत किंवा बहु-मतवाल्या पक्षाला–त्याच्या लोकनियुक्त मंत्रिमंडळाला-(Cabinet) दिले नाहीत; तर ते पार्लमेंटला दिले आहेत. राष्ट्रपती, लोकसभा आणि राज्यसभा यांचा त्रिवेणीसंगम म्हणजे पार्लमेंट. आपल्या घटनेने या तीन स्रोतांच्या अधिकारांची आणि प्रभावाचीही वेगवेगळी बांधणी केलेली आहे. परंतु प्रस्तुत विषयाकरिता त्या

तपशिलात शिरण्याची आवश्यकता नाही.

आपल्या घटनेच्या ७९ व्या कलमाने राष्ट्रपती, लोकसभा आणि राज्यसभा मिळून पार्लमेंट बनते असे ठरविले आहे. राष्ट्रपती पक्षातीत असला पाहिजे. दोन्ही सभांत पक्ष असू शकतात. परंतु पक्षहितापेक्षा राष्ट्रहित अधिक श्रेष्ठ आणि पवित्र हे त्यांनी विसरता कामा नये. दोन्ही सभांच्या संयुक्त मतानुसार देशाच्या संरक्षणाची जबाबदारी आणि कर्तव्ये मंत्रिमंडळ आणि राष्ट्रपती यांनी पार पाडावयाची असतात. राज्यकारभाराच्या या पद्धतीमुळे वैधानिक आणि कार्यकारी या दोन्ही अवस्थांचा संगम होतो.

संरक्षणाची हेळसांड झाली किंवा त्या बाबतीत निष्काळजीपणा झाला, तर देशात राजकीय स्थैर्य आणि विकास यांना धक्का लागेल, म्हणून घटनेच्या सातव्या परिशिष्टाने **(Schedule)** आपल्या पार्लमेंटला संरक्षणाच्या सर्व बाजूंवर निर्णय घेण्याचे आणि संरक्षण उत्पादनाचे (**Defence Production**) कायदे करण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच घटनेच्या ३५२ व्या कलमाने युद्धकाळात या अधिकारांची व्याप्ती वाढविली असून, राष्ट्रपतीला आणीबाणी जाहीर करण्याचे आणि संकटमोचनाकरिता, आवश्यक ते सर्व उपाय योजण्याचे अधिकार दिलेले आहेत. राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार या अधिकाराची आपल्या जाहीरनाम्याने अंमलबजावणी करू शकतो. यावरून हे दिसून येईल की, प्रस्थापित राज्यकर्ते आणि राज्ययंत्रणा यांच्या राज्यकारभाराच्या आणि संरक्षणाच्या सर्व धोरणांवर व त्यांच्या कार्यवाहीवर अंतिम अधिकार पार्लमेंटचा म्हणजे लोकांचा (लोकनियुक्त प्रतिनिधींच्यामार्फत) आहे.

भारताच्या राज्य घटनेने जरी राष्ट्रपतीला सर्वोच्च स्थानावर बसविले असले तरी, त्याने मंत्रिमंडळाच्या म्हणजे प्रधानमंत्र्याच्या सल्ल्यानुसार वागणे अपेक्षित आहे. तो सल्ला त्याने मानलाच पाहिजे असे मात्र नाही (इंदिरा गांधींच्या कार-किर्दीत राष्ट्रपतीचे स्वातंत्र्य अधिकार हिसकावून घेतला गेलेला होता); मंत्रिमंडळ पर्यायाने पार्लमेंट बरखास्त करण्याचा राष्ट्रपतीला अधिकार आहे. परंतु प्रधानमंत्र्याचा सल्ला झुगारून देणारा तितक्या स्वतंत्र्य बाण्याचा दमदार राष्ट्रपती अजूनपर्यंत भारताला लाभला नाही.

डॉ. राधाकृष्णन् वगळून आतापर्यंतचे सर्व राष्ट्रपती 'कॉंग्रेस-जनां'पैकीच होते. त्यातले कोणीच स्वतंत्र बाण्याचे नव्हते असे नाही परंतु त्यांना जागच्या जागी बसविण्यात आले किंवा ते बसले हे मात्र खरे. वास्तविक राष्ट्रपती जरी पूर्वी कोणत्याही पक्षाचा असला, तरी राष्ट्रपतीभवनाच्या उंबरठ्यावर त्याने आपली पूर्वीची सर्व वस्त्रे-लक्तरे उतरून ठेवून, त्यागाची, न्यायाची, अलिप्ततेची आणि निरपेक्षतेची (लाक्षणिक अर्थाने) काषाय वस्त्रे परिधान केली पाहिजेत. तो टोपी घालण्याच्या किंवा टोपी बदलण्याच्या प्रक्रियेतून जरी राष्ट्रपती बनला

असला तरी ते सर्व त्याने विसरले पाहिजे. गांधी टोपी घालणाऱ्या राष्ट्रपतीला कोणीही काँग्रेसवाला राष्ट्रपतीच म्हणेल ! अशी टोपी डोक्यावर असताना तिचा परिणाम म्हणून त्याच पक्षाच्या प्रधान मंत्र्याने पुढे ठेवलेल्या कागदावर सही करणे स्वाभाविकच ठरेल ! कारण तसे केले नाही तर तो काँग्रेसद्रोह ठरू शकेल.

१५ आगस्ट १९४७ पासून घटनेनुसार १९५२ साली निवडणुकी होऊन पहिले मंत्रिमंडळ बनेपर्यंतचा काळ एका दृष्टीने ब्रिटिशांच्या समाप्त झालेल्या राज्यकारभाराची 'पुरवणी' होती. फरक इतकाच होता की व्हाईस गेला होता, गव्हर्नर जनरल कायम होता. (पहिला मौंटबॅटन नंतर दुसरा राजाजी) संरक्षण-मंत्री हिंदी होता आणि 'राखीव' 'सोपीव' अशी वर्गवारी संपून सर्व अधिकार नेहरू प्रमुख असलेल्या मंडळाकडे आलेले होते आणि इंग्रजांच्या काळात जो लोकमताला मान होता तोच मान याही काळात होता. किंबहुना या काळात स्वतंत्र, निर्भीड असे लोकमत तयार झाले नव्हते–होऊ शकले नव्हते. कारण स्वराज्य मिळाले ते फक्त एकटचा काँग्रेसच्या चरख्याच्या किंवा जेल यात्रांच्याच प्रभावामुळे असा अट्टाहासपूर्वक अखंड प्रचार चालू होता. त्याचे लोकांवर एक मानसिक दडपण आलेले होते. त्यामुळे काँग्रेसश्रेष्ठी जे करतील तेच लोकमत. त्याची चिकित्सा करणे, त्याला विरोध करणे म्हणजे राष्ट्रद्रोह होय. येथपर्यंतचा पल्ला मानसिक गुलामगिरीने गाठला होता. " दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा " अशीच जवळ जवळ परिस्थिती होती आणि अगदी शेवटपर्यंत जवाहरलाल नेहरूच दिल्लीश्वर आणि म्हणून जगदीश्वर होते. विभूतिमत्त्व बहाल केले म्हणजे त्याचा भक्ती हा परिणाम होऊ शकतो. नवभारताच्या इतिहासाच्या पहिल्या ३० वर्षांच्या काळात संरक्षणासकट सर्व जिव्हाळ्याचे प्रश्न राजकीय नेतृत्वाच्या विभूतिमत्त्व प्रदान केलेल्या प्रधानमंत्र्यांच्या इच्छेनुसार आणि हुकुमी बहुमताच्या जोरावर हाताळले गेले आणि तेही (Ex post Facto) घटना घडून गेल्यावर त्यांना औपचारिक (Formal) मान्यता मिळविण्याच्या पद्धतीने !

१९६२ पर्यंतचे भारताच्या पार्लमेंटरी पद्धतीच्या राज्यकारभाराचे पहिले दशक लोकसभेतल्या लोकनियुक्त प्रतिनिधींनी हात वर करून Ex post Facto पद्धतीने देशाची मान्यता देण्याचे दशक होते. तोपर्यंत विरोधाला, काही विचार करण्या इतके वजन प्राप्त झालेला एकही विरोधी पक्ष संघटित झालेला नव्हता. जवाहरलाल नेहरू लोकनियुक्त प्रधानमंत्री तर होतेच; त्याशिवाय त्यांनी परराष्ट्र खातेही–आपल्याकडेच ठेवले होते. अशा दुहेरी अधिकाराने नेहरूंनी पहिला पर-राष्ट्रीय संबंध हाताळला तो–तिबेटबाबत चीनशी एक करार करून. (आक्टोबर १९४८ च्या पाकिस्तानच्या पहिल्या आक्रमणाची तक्रार नेहरूंनी युनोत गुदरली तेव्हा घटनात्मक राज्यकारभार सुरू झालेला नव्हता.)

१९५३पासून चौ एन लाय आणि नेहरू यांच्या तिबेटच्याबाबतीत वाटाघाटी

सुरू झालेल्या होत्या. शेवटी ता. २९ एप्रिल १९५४ रोजी त्या उभयतात तिबेट-बाबत एक करार झाला. त्या कराराचा सरनामा म्हणा अथवा आधार म्हणा जगप्रसिद्ध 'पंचशील' होते. त्या करारनाम्याने नेहरुंनी कोणाचाही विचार न घेता, कोणालाही विश्वासात न घेता तिबेटचे उदक **चौ एन लायच्या** हातावर सोडले. नंतर ५ महिन्यांनी Ex post Facto पद्धतीच्या राज्यकारभाराला धरून सप्टेंबरच्या लोकसभेच्या अधिवेशनात नेहरूंनी आपल्या कृत्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत चीनने तिबेटवर आपला करडा अंमल सुरू केलेला होता. त्यामुळे भारताच्या सुरक्षिततेला भयंकर धोका निर्माण झाला आहे, इंग्रजांनी उभे ठेवलेले आघात झेलणारे बफर (Buffer) नेहरूंनी आपल्या हाताने काढून घेतले. नेहरुंच्या या कृत्याचा प्रजा सोशालिस्ट पक्षाच्या (P.S.P.) आचार्य कृपलानींनी तेव्हाच जोरदार जाहीर निषेध केला होता. ज्याला काही वजन असावे असा नेहरुंच्या विरोधातला हाच पहिला आवाज होता. नंतर त्यांनी पंचशीलवर ही खरमरीत टीका केली होती. हिंद–चीन युद्धानंतर चीनने घेतलेला आपला प्रत्येक इंच भूभाग आपण परत घेतला पाहिजे अशी ह. वि. कामत यांनी लोकसभेत जोरदार मागणी केली. तीच मागणी **फक्त शब्दांनी** नेहरू, शास्त्री आणि इंदिरा गांधी या तिघांनीही अनेक सरकारी प्रसंगांत जाहीर घोषणांनी उचलून धरली. स्वतंत्र पक्षाचे संस्थापक सी. राजगोपालाचारी यांनी असा सल्ला दिला की, पश्चिमी देशांच्या मदतीने भारताने चीनपासून आपला गेलेला प्रदेश जिंकून घ्यावा. जनसंघानेही आपली तीव्र नापसंती वारंवार व्यक्त केली होती. परंतु हे सर्व बाहेर, आणि Post Facto. त्याचा नेहरूकारभारावर किंचितही परिणाम झाला नाही.

चीनने भारतावर आक्रमण करून लादलेल्या १९६२ च्या युद्धात, भारताची केविलवाणी आणि लाजिरवाणीही स्थिती करून सोडल्यानंतरच्या दशकात, लोकसभेत भारताच्या परराष्ट्रीय धोरणाविषयी आणि त्यातून उद्‌भवणाच्या संरक्षणाविषयी, लोक-प्रतिनिधींना काही 'रस' वाटू लागला. चीनने रस्ते बांधले; नवे नकाशे तयार केले आणि **मॅक महान रेषा** या आंतर–राष्ट्रीय सरहद्दीच्या अलीकडील भारताची दोन अडीच हजार वर्ग मैल जमीन बळकावली. या घटनांविषयी नेहरूंनी लोकांना अंधारात ठेवले; अशी नेहरूंवर टीका करण्यात आली. चीनने घेतलेल्या जमिनीवर गवताची काडीसुद्धा उगवत नव्हती. (तेव्हा ती गेली तर काय बिघडले ? असा नेहरूंच्या वक्तव्यातून अर्थ निघू शकतो.) हे नेहरूंचे बेपर्वाईचे समर्थन न आवडणारे काही तुरळक लोक-प्रतिनिधी लोकसभेत होते.–हाच नेहरूंच्या आयुष्यातला त्यांना दर्शविलेला नाक मुरडण्याचा पहिलाच प्रसंग होता.

१९६२ साली भारताच्या लोकसभेची जी तिसरी निवडणूक झाली, त्यावेळी विरोधी पक्षांच्या काही जाहीरघोषणांत (Election Manifesto) भारताला बाहेरून धोका असल्याची जाणीव दिसली. विशेष गोष्ट ही की कम्युनिस्ट पक्षानेही चीनला

आक्रमक म्हटले होते.

१९६३ पासून पुढे पार्लमेंटमधील परिस्थितीत आणि राज्यकर्त्यांच्या निर्धास्त मन:स्थितीत क्रमशः फरक पडू लागला. चीनने जरी गोळी बंद केली होती, तरी त्याची तलवार भारताच्या मानेवर लटकत होतीच. पुन्हा चीनचा हल्ला आला तर काय ? हा विचार सुदैवाने राज्यकर्त्यांच्या डोक्यात आला. परंतु चीनच्या हल्ल्याची पूर्व सूचना मिळण्याचे तांत्रिक व यांत्रिक असे एकही साधन भारताजवळ नव्हते. म्हणून अमेरिका आणि ग्रेट ब्रिटन यांच्याशी भारताने एक करार केला. त्याने त्या देशांनी भारताला 'राडार' पुरविण्याचे आणि त्याच्या उपयोगाचे तांत्रिक शिक्षण भारताच्या वायुसेनेतल्या जवानांना देण्याचे मान्य केले. हा करार भारताच्या सैन्याला आधुनिक करण्याचे पहिले पाऊल होते. त्याच्या आधी स्थल-सेनेत १० पर्वतीय डिव्हिजन्सची (Mountain Divisions) भर घालण्याची योजना जाहीर झाली होती. परंतु ते आधुनिकीकरण नव्हते. दोन्ही सभागृहांनी राडारचे स्वागत करून त्याबद्दल नेहरूंचे मन:पूर्वक अभिनंदन केले. लोकप्रतिनिधींनी पार्लमेंटमध्ये भारताच्या संरक्षणाविषयी आस्था प्रकट करण्याचा हा शुभारंभ होता. १९६४ च्या मे महिन्यात नेहरूंच्या देहावसानानंतरच दोन्ही सभागृहांत भारताच्या परराष्ट्रीयधोरणाविषयी आणि संरक्षणाबद्दल आपले विचार व्यक्त करण्याची **धिटाई** प्रतिनिधी दाखवू लागले.

१९६५ च्या भारत– पाकिस्तान युद्धाच्या वेळी चीनने भारताला दिलेली लष्करी धमकी (चीनने ती गिळून टाकली हा भाग वेगळा) एक इष्टापत्तीच ठरली. कारण तिच्यामुळे पाकिस्तान आणि चीन या दोन्ही शेजाऱ्यांकडून भारताला कायमचा धोका असल्याची संपूर्ण पार्लमेंटला जाण आली आणि ती व्यक्त करण्याची धिटाई-ही आली. निरनिराळे पक्ष भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर आणि संरक्षणावर निरनिराळे मतप्रदर्शन करू लागले. त्यातले कोणी भारताने दुसऱ्या समर्थ देशाशी लष्करी करार करावे, असे म्हणू लागले. कोणी उघडपणे भारताने अलिप्तता सोडून द्यावी असे प्रतिपादन करू लागले.

जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या कन्या इंदिरा गांधी यांच्या कार्यकाला-तील फरक इतकाच होता की, नेहरूंच्या काळात त्यांना कोणी प्रखर विरोध करू धजला नाही आणि कोणाच्या कुरबुरीकडे त्यांनी लक्षही दिले नाही. इंदिराबाईंच्या काळात विरोधी पक्ष अधिक धीट झाले, त्यांची टीकाटिप्पणी अधिक जोरदार झाली. परंतु हुकमी बहुमताच्या निर्धास्त जोरावर, त्यांनी आपले म्हणणे खरे केले. पिताजींनी घालून दिलेल्या अलिप्त धोरणापासून त्या ढळल्या नाहीत. बाकी काहीही असले तरी, इंदिराबाईंनी भारताचे अलिप्ततेचे धोरण लवचिक किंवा सैल केले नाही; हा भारतावर एक उपकारच केला; असे कबूल केले पाहिजे ! भारताची पहिली पंचविशी जरी 'संरक्षणाची गद्धे पंचविशी' ठरली असली तरी

भारत आपला सर्व प्रदेश सामरिक सामर्थ्याने परत घेऊ शकेल काय ? परंतु एखाद्या सत्तागटात सामील झाल्याने भारताची स्थिती **ना घरका ना घाटका** अशा गाढवासारखी दीनवाणी झाली असती, यात संशय नाही. म्हणून पुन्हा म्हणावेसे वाटते की **ईश्वर करो ! आणि भारत अलिप्तच राहो !** भारताच्या राज्यकर्त्यांना मग ते कोणत्याही पक्षाचे का असेनात, कोणत्याही सत्तागटात सामील होण्याची दुर्बुद्धी न सुचो !

पार्लमेंटमधल्या विरोधी पक्षाचे मत एकाही प्रधान मंत्र्याने सत्तारूढ पक्षाच्या निःसंशय बहुमताच्या जोरावर विचारात घेतले नाही, हे जितके खरे आहे, तितकेच विरुद्ध पक्षाच्याच नव्हे तर सत्तारूढ पक्षाच्या सभासदांनाही परराष्ट्रसंबंध आणि संरक्षण यांच्याविषयी उत्सुकता, रस किंवा जाण, केव्हाही नव्हती. यालाही दोन कारणे आहेत. एक पक्षनिष्ठा आणि पक्षाचा ' चाबूक ' (whip) आणि दुसरे जात्याच ' ती उंची नसलेल्या अपरिपक्व लोकप्रतिनिधींपासून देशाच्या संरक्षणाचा विषय ' गुप्त, ' ' गोपनीय ' इत्यादी सोईस्कर समर्थनाने प्रधानमंत्र्यांनी अलिप्त राखला. इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्या संपूर्ण मंत्रिमंडळालाही विश्वासात घेतले होते किंवा नाही याची शंका येऊ शकते. या एकंदर परिस्थितीचा परिणाम असा झाला की, कोणालाही परिस्थितीची आणि भारताच्या खऱ्या सामरिक सामर्थ्याची कल्पनाच आली नाही. पार्लमेंटात आणि बाहेरच्या भारतात स्थिती एकसारखीच होती. त्या कारणाने इंच इंच भूमी हिसकावून घेण्याच्या भावनाविवश घोषणांत किती अर्थ होता याचे भान कोणालाच नव्हते. भारत फक्त पाकिस्तानपासूनच त्याच्याविरुद्ध लढून—जरी त्याला दुसऱ्या देशांनी युद्धसाहित्य पुरवले तरीही—(मनुष्यबळ पुरवले तर नाही—तसे झालेच तर त्यातून जागतिक महायुद्ध उभे राहण्याची शक्यता आहे) आपल्या स्वतःच्या युद्धसामर्थ्याने आपली भूमी परत घेऊ शकेल. परंतु चीनपासून नव्हे ! हे मान्य केलेच पाहिजे. त्याच्या अनेक कारणांपैकी मुख्य कारणे दोन आहेत. पहिले तो अणुशक्तिसंपन्न देश आहे; (भारताजवळ युद्धोपयोगी अणुशक्ती नाही आणि असणारही नाही) आणि दुसरे त्याची प्रचंड फौज.

१९६६ ते १९७१ हा काळ भारताला काळजीचा गेला. परंतु लोकसभेत त्याविषयी चर्चा झाली नाही. १९६६ साली पाकिस्तान—चीन करारानुसार चीनने पाकिस्तानला युद्धसाहित्य पुरवले. १९६७ पासून अमेरिकेची पाकिस्तानशी अधिकाधिक जवळीक झाली. अमेरिकेने पाकिस्तानला नानाप्रकारचे युद्धसाहित्य पुरवणे सुरू केले. इराणनेही पाकिस्तानला रणगाडे दिले आणि १९६८ मध्ये रशियानेही पाकिस्तानला जीप्स्, ट्रक्स आणि हेलिकॅप्टर्स दिले. अशा रीतीने सर्व जगच पाकिस्तानला बलवंत करणाऱ्या प्रयत्नाला लागले. हे कशाकरिता ? जागतिक शाश्वत शांतीचा पुरस्कार करणाऱ्या आणि त्या उच्च ध्येयासाठी स्वतःच्या

संरक्षणाची चिंता आणि सुयोग्य व्यवस्था न करणाऱ्या, अलिप्त पंचशीलवादी देशाला शिक्षा (?) करण्याकरिता ! भारताचा असा कोणता गुन्हा होता ?

आपल्या संरक्षणमंत्रालयाचे १९६७–६८ चे इतिवृत्त या वाक्याने सुरू होते. " The Chines danger poses to be a long term one while the danger from Pakistan centres on certain problems and has certain elements which do not give it such a long term character." याचा अर्थ हा की पाकिस्तानपासून भारताला असलेला धोका तत्काळ निवारण होऊ शकेल; परंतु चीनचा धोका बराच मोठा काळ राहणारा आहे. म्हणूनच पाकिस्तानला नमविणे फारसे कठीण नाही, असे वर विधान केले आहे.

परंतु रशियाने आगस्ट १९७१ मध्ये जो भारताशी करार केला (त्याच्या विषयी इतरत्र विवरण केलेले आहे) त्याने परिस्थिती पालटली. परंतु भारताच्या हितशत्रूंनी त्या कराराचा अर्थ भारताने अलिप्तता सोडली असा केला. वस्तुतः तसे काहीच झाले नव्हते. चीनच्या अणुशक्तिसंपन्नतेमुळे, भारताला चीनचा वाढता धोका असूनही, भारत अलिप्त आहे; हे अभिमानास्पद आहे. भारत–रशिया कराराचा चीनवरही परिणाम झाला. तो बांगला मुक्तियुद्धात अलिप्त राहिला.

भारत स्वतंत्र होताच त्याच्यापुढे सहा प्रश्न उभे राहिले : (१) भारताचा राज्यकारभार कोणत्या पद्धतीने चालावा ? त्याकरिता घटनासमिती कामाला लागली. (२) भारताची राजकीय आकांक्षा काय असावी ? ती **शांती** ठरविण्यात आली. (३) भारताचे परराष्ट्रीय धोरण काय असावे ? ते **अलिप्ततेचे** असावे असे ठरविण्यात आले. (४) भारताचे संरक्षणाचे धोरण काय असावे ? ते 'जैसे थे,' 'यथा स्थिती' असावे असे ठरविण्यात आले. (५) भारताच्या संरक्षणाची यंत्रणा कशी असावी ? ती यंत्रणा तीन मजली असावी असे ठरविले गेले, (हे तीन मजले कोणते ते पाचव्या संरक्षणयंत्रणा या प्रकरणात सविस्तर सांगितले आहेत.) सर्वात वरचा मजला मंत्रिमंडळाची संरक्षणसमिती (Defence Committee of the Cabinet), मधला मजला संरक्षणमंत्र्याची समिती (Defence Ministers Committee) आणि तळमजला सेनादल कार्याध्यक्ष समिती (Chiefs of Staffs Committee). (६) पाकिस्तानचे आक्रमण ! या प्रश्नाची सोडवणूक यूनोत तक्रार गुदरून होईल असे प्रधानमंत्री नेहरू यांचे मनोराज्य होते. परंतु ते हवेत विरून गेले. (त्यानंतर नेहरूंनी तिबेटच्या प्रश्नावरून आणि पंचशीलच्या संयुक्त घोषणेने आणखी एक विशाल ' कल्पना–साम्राज्य ' आपल्या नजरेपुढे उभे केले होते. तोही फुगा फुटला.)

पाचव्या प्रश्नाच्या उत्तरापैकी मंत्रिमंडळाची संरक्षणसमिती (Defence Committee of the Cabinet) १९४७ च्या सप्टेंबरच्या ३० तारखेस स्थापन

झाली. (येथे हे लक्षात घेतले पाहिजे की सहावा पाकिस्तानचा प्रश्न सुमारे एक महिन्याने २६ आक्टोबर १९४७ रोजी उपस्थित झाला.) या समितीचे अध्यक्ष अर्थातच प्रधानमंत्री नेहरू होते. उपप्रधानमंत्री वल्लभभाई पटेल, संरक्षणमंत्री बलदेवसिंग आणि वित्तमंत्री षण्मुखम् चेट्टी हे सभासद होते. पाकिस्तानविषयीच्या धोरणात पटेलांचे त्यांच्या हयातभर नेहरूंशी पटले नाही. पटेलांच्या मृत्यूनंतर नेहरूंचीच त्यांच्या हयातभर मंत्रिमंडळाच्या संरक्षणसमितीवर (Defence Committee of the Cabinet) एकमुखी सत्ता होती. त्यांना कोणीही विरोध केला नाही; करू धजला नाही.

दुसरी मधल्या मजल्यावरील संरक्षणमंत्र्याची समिती (Defence Ministers Committee) फक्त एकच काम करीत होती. ते काम म्हणजे नेहरू म्हणतील त्याला मान तुकविणे. या समितीने एकही स्वतंत्र निर्णय घेतला नाही. तेव्हा नेहरूंकडून पुष्टी मिळण्या न मिळण्याचा कधी प्रश्नच उद्‌भवला नाही. या काळात संरक्षणमंत्री होते बलदेवसिंग, गोपालस्वामी अय्यंगार आणि डॉ. काटजू. त्यांत काटजूच काय ते आपले संरक्षणमंत्रिपदाचे अस्तित्व आणि अस्मिता बाळगणारे होते. परंतु एकतर त्यांच्या कार्यकालात संरक्षणाचा काही विशेष विचार करण्याजोगा प्रश्न उत्पन्न झाला नाही आणि त्यांचा कार्यकालही छोटासाच होता. नंतर आले कृष्ण मेनन.

मेननच्या कार्यकालाचा इतिहास सर्व-ज्ञात आहे. ते जरी नेहरूंना विरोध करीत नसले–करू शकत नसले तरी त्यांनी आपल्या संरक्षणमंत्रिपदाचा कार्यकाल 'गाजवला' यात संशय नाही. परंतु त्यांची संरक्षणसमिती ही निष्क्रियच राहिली. तिचे तसे अस्तित्व जाणवले नाही. मजले असलेल्या इमारतीतल्या जिन्यात जसे एक जिना बदलण्याचे स्थळ (Mid Landing) असते तसेच या मधल्या समितीचे स्वरूप होते.

परंतु १९६२ च्या भारतचीन युद्धामुळे मेननना हटवून नेहरूंनी जेव्हा चव्हाणांना संरक्षणमंत्री बनविले, तेव्हा त्यांनी कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली एक नवीनच मंत्रालय निर्माण करून त्याला नाव दिले **संरक्षण आणि आर्थिक समन्वय मंत्रालय** (Ministry of Defence and Economic Coordination). हे नवीन मंत्रालय निर्माण झाल्याकारणाने, एकाच महत्त्वाच्या विषयाची एकाच दर्जाची दोन दृष्टींनी पाहणारी द्विदल पद्धती सुरू झाली. चव्हाणांच्यापेक्षा कृष्णम्माचारी ज्येष्ठ असल्याकारणाने चव्हाणांची कुचंबणा झाली. या दोन मंत्रालयांचा कधीच समन्वय साधला गेला नाही आणि तो साधला गेला असता तरी त्याची दखल घेणे न घेणे हे मूर्धस्थानी असलेल्या नेहरूंच्या हाती होते. नंतर हे नवीन मंत्रालय अंतर्धान पावले. त्याला 'कामराज योजना' हेही कारण होते.

भारताच्या संरक्षणाच्या इमारतीच्या तळमजल्यावर एक सेनाकार्याध्यक्ष

समिती (Chiefs of Staffs Committee) होती. तिच्यात तिन्ही सेनादलांचे कार्याध्यक्ष हे सभासद असून अध्यक्षपद ज्येष्ठतेनुसार आणि आलटून पालटून भूषविले जात असते. वस्तुतः ही अशी तीन मजली इमारत (खालचे दोन मजले नुस्तेच सांगाडे होते) न ठरता; तो तीन पदरी सुंदर गोफ भारतमातेची तिपेडी वेणी, असायला पाहिजे होती ! परंतु काँग्रेसच्या ३० वर्षांच्या राज्यकारभारात तसे कधीच घडून आले नाही. सर्वांत वरच्या तिसऱ्या मजल्यावर आरूढ झालेल्या प्रधानमंत्र्याने वरून, फार वरून खालचे जिने दाणदाण चढत जाऊन–नव्हे विजेच्या पाळण्याने एकादमात शिखर गाठून तेथून भारताचे म्हणे संरक्षण केले ! याविषयी आर. जी. सी. टॉमस The Defence of India या ग्रंथात म्हणतात. "The System (ही तीन मजली पद्धत) was also often bypassed by Prime Minister Nehru and its necessity implicitly questioned." या पद्धतीच्या कारभाराला नेहरू नेहमी बगल देत असत आणि तिची त्यांना जरुरीही वाटत नव्हती. कारण उघड आहे, "राजा (म्हणजे ते स्वतः) बोले आणि दळ हाले" हीच त्यांची अंतःप्रवृत्ती होती.

मेनन यांच्या राजीनाम्यानंतर मंत्रिमंडळाच्या संरक्षण समितीचे (Defence Committee of the Cabinet) नाव बदलून ते मंत्रिमंडळाची आणीबाणीची समिती (Emergency Committee of the Cabinet) असे ठेवण्यात आले. या नव्या नावाच्या समितीने दुसऱ्या दोन्ही समित्या अडगळीत टाकल्या आणि विशेष विपरीत गोष्ट ही झाली की, त्या समितीच्या बैठकींना संरक्षण दलांचे कार्याध्यक्ष हजर राहू शकत नसल्याकारणाने " They had no formal access to the highest levels of defence policymaking and remained ignorant of the trend of discussions of this land." (तत्रैव). त्यांना देशाच्या संरक्षणाविषयीच्या सर्वोच्च विषयांच्या ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले आणि तत्संबंधी राज्यकर्त्यांच्या विचारप्रवाहाविषयी अज्ञानी राहावे लागले. लोकसत्तात्मक राज्यपद्धती असलेल्या जगातल्या एकाही देशात त्या देशाच्या सेनापतीची इतकी उपेक्षा होत नसेल ! १९६५ च्या आगस्टमधील पाकिस्तानच्या आक्रमणामुळे (आणि जवाहरलाल नेहरूंच्या परलोक–गमनानंतरच ही परिस्थिती पालटली.) पाकिस्तानी आक्रमण मोडून काढण्याचा निर्णय एका विशेष बैठकीत मध्यरात्री घेण्यात आला होता. त्या बैठकीला प्रधानमंत्री लालबहादुर शास्त्री, संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण, वित्तमंत्री आणि अर्थमंत्री हे तर हजर होतेच, त्याशिवाय खास निमंत्रणावरून तिन्ही सेनादलांचे कार्याध्यक्ष (Chiefs of the Staff) प्रत्यक्ष हजर होते. सेनाध्यक्षांना असे विश्वासात घेतले म्हणूनच १९६५ च्या भारत–पाक युद्धात भारताला उत्तम प्रकारचे यश मिळाले. परंतु त्या युद्धाच्या वेळी या आणीबाणीच्या समितीने (Emergency Committee of the cabi-

net) यूनोच्या युद्धबंदीच्या सूचनेला मान्यता देण्याचे (महत्कार्य ?) अवसान-घाताचे कार्य केले. युद्ध थांबले. नंतर ताश्कंद वगैरे वगैरे.

त्यानंतर सहा वर्षांनी बांगला मुक्तीतून निर्माण झालेले भारत–पाक युद्ध १९७१ मध्ये उभे राहिले, त्यावेळी एक 'मंत्रिमंडळाची राजकीय व्यवहार समिती' (Political Affairs Committee of the Cabinet) स्थापन करण्यात आली होती. त्याशिवाय 'मंत्रिमंडळाची संरक्षण समिती' होतीच. या दोन समित्यांनी परराष्ट्रीय धोरण आणि संरक्षण यांची अधिक जवळीक निर्माण केली. या दोन्ही समित्यांचा उत्तम समन्वय साधला गेला. त्यामुळे अंतिम निर्णयांचा घोळ पडला नाही आणि ते अरेरावी एकमुखी झाले नाहीत.

या युद्धात आपल्या तिन्ही सेनादलांना भरपूर काम होते आणि सर्व स्तरा-वर व सार्वत्रिक रीतीने त्यांचा आणि राजकीय निर्णय घेणाऱ्या यंत्रणांचा निकट संपर्क आणि समन्वय आवश्यक असतो; तो या युद्धाच्या वेळी साध्य झाल्याकारणाने वर वर्णन केलेली तीन मजली इमारत या युद्धाच्या वेळी 'तिपेडी वेणी' झाली. त्यामुळे Joint Planning Committeeची सर्व योजना सुसूत्र झाली. प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री, परदेश व्यवहार मंत्री, वित्तमंत्री आणि तिन्ही सेनादलांचे कार्याध्यक्ष या शीर्षस्थानी असलेल्यांचे संबंध आणि संपर्क निकट आणि सामंजस्यपूर्ण होते म्हणूनच भारताला हा विद्युद्‌वेगाचा अपूर्व जय मिळाला. "The war was over before the battles were fought" लढाया लढून व्हायच्या आधीच युद्ध संपले.

कृष्णा मेनन यांच्या पूर्वीचे संरक्षणमंत्री, संरक्षणमंत्री होते इतकेच. मेनन संरक्षणमंत्री झाल्यानंतरच लोकसभेत लोकांच्या प्रतिनिधींनी थोडे कान खाज-वायला सुरुवात केली. परंतु त्यात 'लक्ष्य' संरक्षण हे नसून मेनन हे होते. त्यांची आपले मंत्रालय 'हाकण्याची' पद्धती, एकमार्गी स्वाभिमानी सेनादलांच्या कार्य-ध्यक्षांना, मानवण्यासारखी नव्हती. त्याचा परिणाम शेवटी स्थलसेनाध्यक्ष जनरल थिमय्या यांच्या राजीनाम्यापर्यंत जाऊन पोहोचला होता. तो राजीनामा मंजूर झाला असता, तर जल आणि वायुसेनाध्यक्षांचेही राजीनामे पाठोपाठ आले असते. परंतु देशाच्या प्रतिष्ठेकरिता थिमय्यांनी नेहरूंच्या आग्रहाने तो मागे घेतला. त्यापूर्वी **दीनदयाल उपाध्याय**, **अशोक मेहता** आणि **मधू लिमये** या तीनच जागरूक लोकप्रतिनिधींनी आपले विरोधी आवाज उठविलेले होते. ते किंवा दुसरे कोणीही फार तर निषेध म्हणून सभागृहातून निघून जाण्याशिवाय दुसरे काहीच करू शकत नव्हते. नेहरूंच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव कल्पांतीही येणे शक्य नव्हते.

चीनने केलेल्या फटफजीतीचे खापर कोणाच्या तरी डोक्यावर फोडण्याची आवश्यकता उत्पन्न झाली होती. हे मात्र नेहरूंनी ओळखले होते. शेवटी त्यांनी मेननला राजीनामा देण्याचा सल्ला दिला. हेतू, देशातला गिल्ला बंद व्हावा हा

होता आणि चव्हाणांना संरक्षणमंत्री बनवून तो हेतू काही प्रमाणात साध्यही झाला. मराठी माणसाला फार आनंद झाला. मेनन यांची कारकीर्द कितीही नावडणारी असली तरी त्यांनी भारताच्या युद्धसाहित्याच्या स्वदेशी निर्मितीत फार मोठी भर घातली हे मान्य केलेच पाहिजे. इशापूरचा नव्या सेमिअॅटोमॅटिक–रिकॉइललेस रायफलचा' कारखाना, आवडीची 'विजयंता' रणगाड्यांची निर्मिती, जबलपूरची 'शक्तिमान' ट्रक्स आणि 'निशाण' जीप्सची बांधणी, ओझरचा 'मिग विमानांचा कारखाना' आणि माझगाव गोदीतली 'फ्रिगेटस् जातीच्या जहाजांची बांधणी' हे सर्व त्यांच्याच कारकिर्दीत झाले. त्याचवेळी युद्ध-साहित्य निर्मितीच्या कारखान्यात बिस्त-याचे होल्ड ऑल आणि कॉफी उकळण्याची भांडीही बनत असत. दाक्षिणात्य कॉफी प्रिय आहे म्हणून असेल कदाचित.

मेननला हटविल्यानंतर नेहरूंनी मेजर–जनरल हेंडरसन ब्रुक्स यांची एक-सदस्य समिती नेमली होती. तिला भारत–चीन युद्धाच्या अपयशाची चौकशी करावयाची होती असा सर्वांचा समज झालेला होता. समज म्हणण्याचे कारण चौकशीला दिलेले मुद्दे गुलदस्तात ठेवले होते. या समितीची नियुक्ती हीही नेहरूंची एक युक्तीच होती. तिच्यामुळे लोकप्रतिनिधींना सत्य परिस्थिती समजण्याची आशा वाटू लागली आणि बाहेरच्या लोकांना थोडा दिलासा दिल्यासारखे झाले. लोकांच्या मनातली नेहरूविषयीची भक्ती आणि आदरयुक्त प्रतिमा अधिक तेजाळली. परंतु हेंडरसन ब्रुक्सनी कोणते निष्कर्ष काढले हे शेवटपर्यंत गुप्तच ठेवण्यात आले. त्यांचा रिपोर्ट लोकप्रतिनिधींपासून लपवून ठेवण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की लोकप्रतिनिधींचे संरक्षणाच्या विषयीचे अज्ञान कायमच राहिले. ते आधीच किती होते ते थॉमस आपल्या Defence of India या ग्रंथात असे सांगतात. " Most M. P. S. then knew very little obout weapons systems, military aid being received, and the nature of military commands training and shifts." बहुतेक प्रतिनिधींना युद्धाची आयुधे आणि त्यांच्या पद्धती, भारताला मिळत असलेली परदेशी मदत, लष्करी हुकुमती, लष्करी शिक्षण इत्यादीविषयीची माहिती नसल्यासारखीच होती. त्यातूनही 'सुरक्षितता' आणि 'राष्ट्रहित' या बिनतोड आणि हुकमी सबबीवर, भारताला परदेशाकडून मिळालेले युद्धसाहित्य, ते मिळण्याविषयी झालेले करार, अधिक मिळण्याविषयी चाललेली बोलणी, तसेच देशांतर्गत युद्धसाहित्याची निर्मिती–स्थिती आणि पुरवठा याबाबतीतही पार्लमेंटला अंधारात ठेवण्यात आलेले होते. या स्थितीबद्दल नामनिर्देशित, (Nominated) लोकनियुक्त नव्हे–प्रतिनिधी **फ्रँक अँथनी** यांचे स्पष्टोद्गार विचार करण्यासारखे आहेत. ते म्हणाले होते, " It has become a tradition to keep the House ignorant of the elementary defence prepar-

ations. " संरक्षणाच्या प्राथमिक तयारीविषयीसुद्धा या सभागृहाला अज्ञानात ठेवणे ही एक परंपराच प्रस्थापित झाली आहे.

संरक्षणाच्या अंदाजी खर्चाचा आराखडा सेनादलांच्या कार्याध्यक्षांशी विचार-विनिमय करून संरक्षणमंत्र्याने वित्तमंत्र्याच्या हवाली करावयाचा असतो. त्यात देशांतर्गत उपलब्ध आणि बाहेरून प्राप्त करून घ्यावयाचे साहित्य आणि साधने यांचा तपशील द्यावयाचा असतो. हा अंदाजी खर्च मान्य करणे न करणे, त्याला कात्री लावणे या गोष्टी वित्तमंत्र्याच्या अधिकारात असताना आणि ते त्याच्या संरक्षणा-विषयीच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते. आपल्याला बरेच मोठे नानाप्रकारचे युद्धसाहित्य अजूनही परदेशातून आयात करावे लागते. वित्तमंत्री जर शांतीच्या आणि आक्रमकांच्या हृदयपरिवर्तनाच्या मृगजळात अवगाहन करणारा असेल, तर जरूर तितके परकीय चलन हाताशी नाही या सोईस्कर सबबीवर, संरक्षणावरील अंदाजी खर्चाचा गळा दाबीत असतो. भारतात असेच घडत आलेले आहे. (संरक्षणाकरिता जरी परकीय चलन उपलब्ध नसले (?) तरी कित्येक चैनीच्या आणि तशी निकड नसलेल्या वस्तूंची आयात करण्याकरिता, नटचांच्या परदेशातील सहलीकरिता वगैरे ती अडचण कधीच नसते.) वित्तमंत्री मर्जीनुरूप काटछाट करून संरक्षणाच्या अंदाजी खर्चाचा आकडा एकंदर 'वट अंदाज पत्रकात' घालतो व एक सर्वंकष (Total) अंदाजपत्रक पार्लमेंटला मंजुरीकरिता सादर करतो आणि गेली तीस वर्षे प्रचंड हुकमी एकपक्षीय बहुमताच्या जोरावर एकाही अंदाज-पत्रकाला एकही काट लागलेला नाही. त्यातही आणखी एखादा कोणी फाजील (!) चौकस लोकप्रतिनिधी विचारपूस करू लागला तर, 'सुरक्षितता' (Security), 'लोकहित' (Public interest) या शब्दोच्चाराने त्याचे तोंड सहज बंद करून संरक्षण अंदाजपत्रक संमत होते. आपल्या अंदाजपत्रकाचा आणखीही एक विशेष आहे. रेल्वेचे अंदाजपत्रक स्वतंत्र असे तयार केले जाते आणि त्यात प्रवासाच्या सुखसोयी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांना सवलती हाच मुख्य भाग असतो.

भारताची पहिली पंचविशी युद्धमय होती. त्याच्या गळ्याभोवती आक्रमणांचा सरकता गळफास पडलेला आहे. तो कोणत्या क्षणी आवळला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत स्वतंत्र वेगळे असे संरक्षणाचे अंदाजपत्रक तयार होणे अगत्याचे आहे. परंतु त्याचा विचार न करता, सब घोडे बारा टक्के, सर्वंकष अंदाजपत्रकातच ते कोंबले गेलेले आहे आणि त्या भागावर लोकप्रतिनिधींनी मनापासून चर्चा केल्याचेही कोठे आढळत नाही.

आपल्या संरक्षणाचे तीन वित्तीय कालखंड पडतात. पहिला १९४७ ते १९५७; दुसरा १९५७ ते १९६२ (याला आपण **मेनन खंड** म्हणू या) आणि तिसरा १९६२ ते १९७७. भारताच्या वटराष्ट्रीय उत्पादनाशी (Gross National Product–GNP) संरक्षणाच्या खर्चाचे प्रमाण पहिल्या कालखंडात फक्त १.९ टक्के इतकेच

होते. १९६२ च्या भारत–चीन युद्धानंतर एक दोन वर्षे ते ४.५ टक्के इतके वाढले. कारण युद्धसाहित्याविषयीच्या दयनीय केविलवाण्या स्थितीची जाणीव झाली होती. परंतु तो युद्धज्वर ओसरल्यानंतर, ते साधारणपणे ३ टक्क्यावर स्थिरावले. अणु-शक्तीवर भारताने २ टक्क्यापेक्षा अधिक खर्च केलेला नाही. संरक्षणाच्या बाबतीतल्या या अक्षम्य आत्मघातकी कंजुषीची कारणे शांतीच्या मृगजळाला शोभण्यासारखीच सांगितली जातात– ती ही : (१) अधिक पैसा उपलब्ध करून दिल्यास आक्रमक वृत्ती उत्पन्न होईल आणि रक्त–पिपासा फोफावेल. (२) शस्त्रसंभाराच्या स्पर्धेत भारत दाखल होईल !

वित्तमंत्र्याने गळा घोटून शेवटी मंजूर करून घेतलेली रकमसुद्धा आपल्या संरक्षणमंत्रालयाने पूर्ण खर्च केलेली नाही. भारत–चीन युद्धानंतरही एका **वर्षी ५१ कोटी** आणि एका **वर्षी ४८ कोटी रुपये** मंजूर झालेल्या तुटपुंज्या रकमेतूनही खर्च केले नाहीत म्हणून सरकारी **मध्यवर्ती खजिन्याला परत (Surrendered) केले.** दरवर्षी सुमारे १० कोटी रुपये खर्च न होता असेच परत (Laps) होत असतात. ही आहे वित्तमंत्री, संरक्षणमंत्री आणि लोकप्रतिनिधी यांची भारताच्या संरक्षणाची आस्था आणि ही आहे भारताच्या संरक्षणाची हृदयस्पर्शी केविलवाणी कथा !

भारताच्या गेल्या ३० वर्षांतल्या युद्धखेरीज करून दुसऱ्या सर्व बारीकसारीक सुद्धा योजना ' युद्धपातळी ' वरूनच ठरविल्या गेल्या होत्या; तरी भारताची दूरदर्शी कणखर अशी संरक्षणाची योजनाच नव्हती. भारताच्या सेनादलांनी सोनार बांगला मुक्त केला तो ' अग्रक्रियात्मक चढाईच्या ' (Pre–emptive) अत्याधुनिक रण-तंत्राने, आपल्या स्वतःच्या कर्तबगारीने. त्यात दुसऱ्या कोणाचाही हात नव्हता– मदत नव्हती. तिन्ही सेनादलांच्या सहकार्याचे ते फळ होते.

कथेची कथा

मानवी जीवनात जेव्हा एखादा अपेक्षित अथवा अनपेक्षित प्रसंग समोर उभा राहतो—घटना घडून येते—तेव्हा कथेचे बीज तयार होते. आधी बीज 'एकले' असते. नंतर त्याला अंकुर फुटून त्यातून एक सांगाडा (Chasis) तयार होतो. त्यात दुसऱ्या व्यक्तींच्या संबंधाची भर पडते. हे संबंध निरनिराळ्या प्रकारचे असल्याकारणाने त्यांचा एक गोफ विणला जातो. या गोफाची वीण सरल, विरल किंवा क्लिष्ट बनते आणि त्यातून त्या प्रकारची कथा तयार होते.

कथा भूतकाळाचीच असू शकते. वस्तुतः ज्याला 'वर्तमान' असे म्हणतात असे काहीच नसते. काळाच्या खऱ्या अवस्था दोनच. एक भूत आणि दुसरी भविष्य. भूतकाळ जाणवलेला अनुभवलेला असल्या कारणाने तोच काय तो खरा असतो. भविष्य अज्ञात असते. त्याच्याकडे श्रद्धेने अथवा बऱ्या वाईट अपेक्षेने डोळे लावून बस-ण्यातच—समाधान मानावे लागते. मधल्या तथाकथित वर्तमानाला क्षणाचेही आयुष्य नसते. काळ हा एक आदी आणि अंत अज्ञात असलेला प्रचंड प्रवाह आहे. त्याला मानसशास्त्राच्या परिभाषेत जाणिवेचास्रोत—Stream of Conciousness म्हणतात. वर्तमानाला स्थिर असावे लागेल. परंतु ते शक्य नाही. भूत त्याला आपल्याकडे ओढीत असतो आणि भविष्य खाली दडपीत असतो.

कालौघ ही एक गोलपट्टीची करवत (Endless Band Saw) आहे. समोर येईल त्याला कापीत राहण्याची तिला खंत नाही आणि पदार्थ–मात्राला तिला सामोरे जाऊन कापून घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.

कथेला व्यथेमुळे खुमारी येते आणि अर्थही प्राप्त होतो. व्यथा नसलेली कथा मिळमिळीत, सपक आणि रसहीन असते. गुणावगुण कसोटीला न लावणाऱ्या घटना, पेच आणि समरप्रसंग नसलेले जीवन, वर्णन करून सांगण्यासारखे नसते. जे व्यक्तीला लागू तेच देशालाही लागू असते.

भारताचा इतिहास ही एक प्रदीर्घ कथा आहे–

धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् ।
इतिवृत्तकथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥

ही इतिहासाची पारंपरिक व्याख्या आहे. १८५७ च्या समरप्रसंगाच्या समाप्ती-नंतर ब्रिटिश बेटांच्या राजवंशाकडे भारताची सार्वभौम राजसत्ता जाईपर्यंत भारतात अनेक लहानमोठे प्रबळदुर्बळ परंतु स्वतंत्र अधिपती होते. व्हिक्टोरिया राणीच्या काळापर्यंत भारतातले निरनिराळे अधिपती आपल्याला जमेल तसे आप-आपले (फुटकळपणे) संरक्षण करण्याचे प्रयत्न करीत असत. परंतु राणीचे राज्य सुरू झाले तेव्हापासून, एक सरकार, एक राजा/राणी, एक कायदा अशी एक–हाती व्यवस्था सुरू झाली आणि आपल्या या परतंत्र देशाच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी परकीय राज्यकर्त्यांवर आली व ती त्यांनी उत्तमरीतीने अर्थातच आपल्या मदतीने पार पाडली.

१८५७ साली कंपनीच्या काळचा शिपायांनी दिल्ली काबीज करून पदच्युत मुघल बादशहा बहादूरशहाला जेव्हा तख्तनशीन केले तेव्हाच्या त्याच्या काव्य-पंक्ती मोठ्या अर्थगर्भ आहेत. हा शाही कवी ' जफर ' म्हणाला होता–

" न ईराननें किया न शाहे रूसने ।
अंग्रेज को तबाह किया कारतूसने ॥ "

इंग्रजांचा नाश इराण किंवा रशिया यांनी केला नाही. तो काडतुसाने केला. परंतु भारताच्या दुर्दैवाने शेवटी इंग्रजांचा जय झाला. बंड मोडले. बहादूरशहा खाली खेचला गेला.

इंग्रजांना भारतावरील रशियाची भयंकर भीती वाटत होती. म्हणून त्यांनी अफगाणिस्तानला स्वतंत्र ठेवून त्याच्याशी सलोखा राखला. तिबेटमध्ये आपले विशिष्ट संबंध (Suzereignty) निर्माण केले आणि तेलखाणींच्या महत्त्वामुळे इराणशीही वचकूनच सलोख्याचे संबंध ठेवले. आपल्या पूर्वीच्या वायव्य सरहद्दी-वरील मुलूख अतिशय डोंगराळ आणि दुर्गम असून त्याला टोळीवाल्यांचा प्रदेश म्हणतात. तिकडील दीर, स्वात, चित्रल, गिलगिट ही पठाणी संस्थाने व्हाईसरायच्या नजरेखाली असत. जवळजवळ २/३ फौज त्या भागात तैनात असे. तिकडच्या

सरहद्दीला ' ड्यूरँड लाईन ' हे नाव होते. तिकडचे वातावरण नेहमीच तंग असे.

पहिल्या जागतिक महायुद्धाच्या वेळी, वायव्य सरहद्दीचे संरक्षण म्हणजे हिंदुस्थानचे संरक्षण अशी परिस्थिती होती. सरहद्दीचे संरक्षण करावयाचे असते ते सरहद्दीवर बसून नसून, त्यांच्या पलीकडील जमिनीवर किंवा नकाशात न दाखवल्या जाणाऱ्या नाजूक सीमांवर (Critical Boundaries) करावयाचे असते. या युद्धशास्त्राच्या सिद्धांतानुसार धूर्त इंग्रजांनी हिंदुस्थानच्या संरक्षणाची प्रारंभरेषा मेसापोटेमिया ठरविली होती (Defence of India begins in the middle East). हिंदुस्थानी फौजा त्या प्रदेशात अतिशय शौर्याने लढल्या. त्यामुळे पहिल्या महायुद्धात हिंदुस्थानचे संरक्षण झाले.

पूर्वेकडील शेजारी म्हणजे ज्या भागाला South East Asia म्हणतात त्यात ब्रह्मदेश, मलाया, थायलंड, इंडोचायना वगैरे देश येतात. १९३७ पर्यंत ब्रह्मदेश हिंदुस्थानात सामील होता. हिंदीसैन्यानेच तो इंग्रजांना जिंकून दिला होता. ईशान्य सरहद्दीकडून, कोणतेही भय नव्हते. तरीही दूरदृष्टी आणि धूर्त इंग्रजांनी सिंगापूरला एक मजबूत आरमारी ठाणे बनविले होते. पूर्वेस सिंगापूर आणि पश्चिमेस एडन ही दोन महत्त्वाची ठाणी इंग्रजांच्या हातात असल्याकारणाने, हिंदुस्थानला समुद्रमार्गे भय नव्हते.

परंतु दुसऱ्या महायुद्धात जपान उतरताच, पूर्वेकडील परिस्थिती अत्यंत नाजूक झाली. जपानी मुसंडीपुढे ब्रिटिशांना हार खावी लागून त्यांनी सिंगापूर सोडून दिले. शेवटी अमेरिकेने अणुबाँब टाकून युद्ध संपविले. अशा प्रकारे १९४७ च्या आगस्ट १५ तारखेपर्यंत हिंदुस्थानचे संरक्षण झाले.

प्रत्येक स्वतंत्र राज्याने ज्याला अग्रक्रम दिलाच पाहिजे असे कर्तव्य देशाचे बाह्य शत्रूंपासून संरक्षण हे असते. दुसऱ्या क्रमांकावर अंतर्गत सुरक्षिततेची निश्चिती करणे हे असते. ही दोन कर्तव्ये पार पाडल्यावरच इतर दुसऱ्या सुराज्य–रामराज्य वगैरे गोष्टींचा विचार करावयाचा असतो. कारण Being before wel–being सुखाने जीवन व्यतीत करण्यासाठी जिवंत असले पाहिजे. मुड्याला किंवा मरणाच्या द्वारी असलेल्याला श्रृंगारण्याच्या आधी त्याला तन्दुरुस्त केला पाहिजे. हे सुज्ञास सांगणे नलगे !

भारत स्वतंत्र होताच त्याला ही दोन्ही कर्तव्ये एकदमच आणि तातडीने करावी लागली. त्याला नाक खाजवायला देखील फुरसत मिळाली नाही. पहिल्या बाहेरच्या कर्तव्याला युद्ध हे नाव आहे. ते भारताच्या सेनादलांनी सुरू केले. दुसऱ्या कर्तव्यात वाट चुकलेल्या स्वदेशी बांधवांशी संबंध येतो. म्हणून या दोन कर्तव्यांची उद्दिष्टे आणि प्रक्रिया भिन्न भिन्न असतात. अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी राज्याच्या सुरक्षादलावर (Police) असते. प्रसंगविशेषी सेनादलांना आरक्षीदलाच्या मदतीला जावे लागते. भारताच्या सेनादलांना शत्रूशी युद्धे करावी लागली

तशीच आरक्षीदलाला मदतही करावी लागली.

'गद्धेपंचविशी' हा वाक्प्रचार व्यक्तीच्या जीवनातल्या पहिल्या पंचवीस वर्षांच्या काळाविषयी उपयोगात आणला जात असतो. कारण साधारणपणे तो काळ अपरिपक्व, अननुभवी, बेदरकार, स्वप्नील, इच्छाचिंतनी इत्यादी प्रकारच्या जीवनाचा असतो. अर्थात त्याला अपवाद असतात. सार्वभौम भारताच्या स्वतंत्र जीवनाची पहिली पंचविशी १५ आगस्ट १९४७ च्या मध्यरात्री सुरू झाली. त्या क्षणापासून सुरू झालेले भारताचे संरक्षणविषयक पहिले पावशतक कसे गेले याचा निर्विकार मनाने आणि राष्ट्रीय दृष्टीने विचार करून ही पंचविशी वाक्प्रचारातल्या पशूच्या जीवनाला साजेशी होती किंवा दुसऱ्या कशासारखी होती हे पाहणे उद्‌बोधक ठरेल ! आणि उपजताच उगवत्या सूर्याला मुठीत पकडण्यासाठी झेप घेणाऱ्या दुसऱ्या एका प्राण्याच्या नवजात बालकासारखी का नव्हती, याची खंत वाटू लागेल !

हिंदुस्थानचे तुकडे करून जरी पाकिस्तान खडे केले होते तरी, असंतुष्ट पाकिस्तानला उरलेला हिंदुस्थान लढून जिंकून घ्यावयाचा होता असे त्याने केलेल्या मोहिमेच्या योजनेवरून स्पष्ट दिसते. त्याने आपल्या चढाईच्या योजनेला 'ऑपरेशन जिब्राल्टर' हे सांकेतिक नाव दिले होते. या मोहिमेच्या सेनापतीचे सांकेतिक नाव 'जनरल तारीक' हे होते. खरे नाव अकबरखान असून पद मेजर जनरल हे होते. हे सेनापती लष्करी कागदपत्रात 'रजेवर' दाखविले होते. तसेच त्या खडया फौजेतले सैनिकही रजेवरच होते. ते आणि दुसरे काही मिळून ही फौज सुरुवातीला एक ब्रिगेड एवढी ३/४ हजार होती. प्रारंभाचा दिवस 'डी डे' ता. २० आक्टोबर १९४७ हा होता. पहिले 'लक्ष्य' भारताचे काश्मीरमधील पाकिस्तानच्या सरहद्दीजवळचे मुजफ्फराबाद आणि डोमेल मार्गाने काश्मीरची राजधानी श्रीनगर हे अंतिम लक्ष्य होते. या फौजेच्या दिमतीला सुमारे ३०० भारी मोटार ट्रक्स होते आणि पायदळाजवळ असणाऱ्या सर्व शस्त्रा- सहित ही फौज सज्ज होती. या फौजेचे सांकेतिक नाव 'टोळीवाले' हे होते.

पाकिस्तानने भारतावरील चढाईची जी मोहीम योजिली होती ती युद्धशास्त्राच्या 'अटॅक इज दी बेस्ट डिफेन्स–आक्रमण हेच सर्वोत्तम संरक्षण' या तत्त्वानुसार असल्याचे पाकिस्तान समर्थन करू शकला असता. सैतानाने बायबलचा आधार सांगावा तसाच हा प्रकार ! भारताचे विभाजन आणि पाकिस्तानची निर्मिती पक्की ठरून जेव्हा वाटण्या सुरू झाल्या तेव्हाच हिंदुस्थान आपल्यावर हल्ला करणार असल्याच्या आरोळचा मारणे, पाकिस्तानने सुरू केले होते. म्हणून पाकिस्तानचे वर्तन युद्धशास्त्राच्या तत्त्वानुसार होते आणि नंतर भारत जेव्हा तक्रार घेऊन यूनोच्या चावडीवर गेला, तेव्हा पाकिस्तानने भारताविरुद्ध प्रतितक्रार -Counter Complaint करून भारतानेच आपल्यावर आक्रमण केले असल्याचा दावा मांडला होता.

पाकिस्तानची मोहीम ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे २० तारखेस सुरू झाली. २२ तारखेस मुजफ्फराबाद घेऊन डोमेल मार्गाने पाक फौज श्रीनगरच्या रोखाने निघाली. श्रीनगर फक्त ५० मैलांवर होते. मोहिमेची खबर भारताच्या इंगज सरसेनापतीला (जनरल लॉक हार्ट) २६ तारखेस तब्बल ६ दिवसांनी मिळाली. त्यांनी ती संरक्षणमंत्र्यांना कळविली. २४ तारखेस शत्रूने माहूरा हे गाव घेऊन तेथील वीजकेंद्र उद्ध्वस्त करून टाकले. श्रीनगरला सर्वत्र काळोख झाला. पाकिस्तानने काश्मीरची सर्व बाजूंनी सर्व प्रकारे नाकेबंदी केली होती. शेवटी काश्मीरच्या महाराजांनी भारताला सामील झाल्याचे 'कबुलीपत्र' लिहून दिले (ता. २६) आणि त्याच दिवशी दुपारी एक वाजता भारताच्या सैन्याची पहिली तुकडी विमानाने काश्मीरच्या–भारताच्या संरक्षणासाठी रवाना झाली. दरम्यानच्या काळात काश्मीरच्या संस्थानी फौजेने पाकिस्तानी हल्ला रोखण्याचे प्रयत्न केले होते. भारताची फौज श्रीनगरच्या विमानतळावर उतरल्यामुळे **जीनाच्या** पुढील कार्यक्रमाचा पूर्ण विचका झाला. पाकिस्तानातल्या अबोटाबादवरून निघालेल्या पाकिस्तानी फौजा २६ तारखेला श्रीनगरचा कबजा करणार होत्या आणि त्याच दिवशी श्रीनगरच्या सर्व मशिदींतून 'इद'चा 'खुदबा' पढला जाणार होता आणि त्याला पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल कायदे आझम महमदअली जीना खुद तशरीफ आणणार होते.

भारताची फौज आणि पाकिस्तानी फौज यांच्या निरनिराळ्या विभागांत अटीतटीच्या लढाया झाल्या. त्यात भारताच्या फौजेला एका पाठीमागून एक जय मिळणे सुरू झाले. युद्धातल्या हालचालींवर आणि डावपेचांवर भारताच्या फौजेची पकड अधिकाधिक घट्ट बसू लागली. अंतिम विजय दृष्टिपथात येऊ लागला; जवानांचा उत्साह वाढीस लागला. आता पाकिस्तानी फौजेला पिटाळून सीमेबाहेर खदेडून लावण्यास एक सप्ताहापेक्षा अधिक काळ लागणार नाही असे दिसू लागले. आणि !

भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लुई मौंटबेटन यांनी आपले परममित्र पंडित जवाहरलाल नेहरू भारताचे पंतप्रधान यांना पाकिस्तानविरुद्ध यूनोच्या सुरक्षा मंडळाकडे तक्रार गुदरण्याचा सल्ला दिला (लॉर्ड साहेबांना पाकिस्तानचा पराभव नको होता काय ?). नेहरूंना मौंटबेटनने हा सल्ला दिला; त्याला संयुक्त राष्ट्राच्या सनदेच्या ३५ व्या कलमाचा आधार होता. त्यात असे म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा यांना धोका उत्पन्न होणारी परिस्थिती उत्पन्न झाल्यास, आणि ती चालू राहिल्यास, सभासद देशाला ती परिस्थिती यूनोच्या सुरक्षा समितीच्या निदर्शनास आणता येते.

मौंटबेटनचे मन जर शुद्ध असते, तर या युद्धातली पहिली गोळी सुटताच (ती पाकिस्तानने सोडली होती) त्यांनी नेहरूंना यूनोत जाण्याचा सल्ला द्यायला

पाहिजे होता. सुरुवातीस पाकिस्तानची चढाई यशस्वी होत होती तेव्हा, बडे लाटसाहेब मनातल्या मनात आनंदून गप्प बसले असावेत. परंतु जेव्हा भारताचा जोर वाढला आणि युद्धाचा शेवट भारताच्या यशाने जवळ आणला; म्हणजे जेव्हा पाकिस्तानचा पराभव स्पष्ट झाला, तेव्हा लाटसाहेब हा सल्ला देतात ! याचा अर्थ काय ? आणि नेहरूही तो मान्य करतात. बरोबरच आहे मित्राला कसे नाराज करावयाचे ? वास्तविक यूनोच्या दुसऱ्या एखाद्या सभासद–देशाने आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षित राखण्याचे पुण्य गाठी बांधणे योग्य झाले असते.

मौंटबेटन गव्हर्नर जनरलचा तनखा भारतापासून घेत होते. ते अर्थाचे दास होते. परंतु त्यांनी हा बदसल्ला देऊन स्वामिद्रोह केला असे म्हणता येईल आणि उदार मालकाने अविचाराने नोकराचा मान ठेवला असे नेहरूंविषयी म्हणता येईल. मौंटबेटन आणि नेहरू या दोघांनाही पाकिस्तानचा पराभव नको असेल काय ? भारताच्या संरक्षणाच्या पहिल्या विशिष्ट प्रकारच्या पंचविशीला अशी सुरुवात झाली. ता. १ जानेवारी १९४८ रोजी भारताचे १५ कलमी तक्रारपत्र यूनोच्या सुरक्षा समितीकडे रवाना झाले (UNCIP, Reports 5/400 Annex–28 India 1947–50 Vol. two, External Affairs.).

ता. १९ डिसेंबर १९४७ रोजी भारताच्या संरक्षण मंत्रालयाने पाकिस्तानच्या या भारतावरील स्वारीविषयी आणि त्याच्या उलटचा आरोळचांविषयी एक प्रसिद्धिपत्रक प्रसृत केले होते. हेतू हा होता की जगाला सत्य जाहीर व्हावे. त्यात स्पष्ट केले होते की, पाकिस्तानचीच ही स्वारी असून ती टोळीवाल्यांची आहे, हा पाकिस्तानचा कांगावा खोटा होता. त्यात या स्वारीचे नेतृत्व करणारे मेजर जनरल अकबरखान यांची माहिती दिली असून 'आझाद हिंद फौजेत' पूर्वी गेलेल्या आणि आता पाकिस्तानी फौजेत असलेल्या अधिकाऱ्यांची नावेही दिलेली होती.

ता. २० जानेवारी १९४८ रोजी यूनोच्या सुरक्षा समितीने, या विवादाची चौकशी करण्याकरिता तीन सभासदांची एक समिती नेमली. ता. १३ ऑगस्ट रोजी उभय राज्यांकडून (१) युद्धबंदी, (२) तात्पुरता तह आणि (३) काश्मीरचे जनमत या तीन बाबींविषयी प्रतिक्रिया मागण्यात आल्या. त्यावर पाकिस्तानने उत्तर दिले की आपला या युद्धाशी कसलाच संबंध नाही. युद्धबंदी, तह वगैरे काश्मीरच्या मुक्ततेकरिता स्थापन झालेल्या 'आझाद काश्मीर सरकारच्या' अखत्यारातल्या बाबी आहेत. या स्वारीत पाकिस्तानचा एकही सैनिक नाही. त्याच्या सुमारे एक महिना आधी ता. १० जुलै रोजी सुरक्षा मंडळाने नियुक्त केलेली समिती–'युनायटेड नेशन्स् कमिशन फार इंडिया अँड पाकिस्तान' **–यू. एन. सी. आय. पी.** भारतात येऊन पोहोचली होती. लढाई चालूच होती. समितीने **यताच, चौकशी चालू असताना दोन्ही देशांनी प्रथम गोळी बंद करावी आणि**

कोणतेही ' युद्ध–सदृश ' कृत्य करू नये अशी सूचना केली. भारताने ती तावडतोब अंमलात आणली. सर्व आघाडयांवर आणि पथकांना तसे हुकूम गेले. पाकिस्तानने या सूचनेकडे लक्ष न देता, गोळीबार चालूच ठेवला आणि भारताच्या तलवारी म्यान झाल्याचा पुरेपूर फायदा घेतला. कमिशन उघडया डोळयांनी हे सर्व पाहत होते.

चौकशीत शेवटी पाकिस्तानला या युद्धाची कबुली द्यावी लागली. " It was now admitted that since May 1948 three Brigades of Pakistan Army had been fighting in Kashmir and the Pakistan Army Head Quarters was in full command of the operations in Jammu and Kashmir." Longer-Red coats to olive green. इंग्रजांचे दोन जनरल रसेल आणि लॉर्ड वर्डवुड यांचेही प्रामाणिक मत हेच होते. शेवटी टोळीवाल्यांचा पडदा फाटला.

पाकिस्तानने ही जी कबुली दिली ती सुखाने व प्रामाणिकपणाने दिली नसून त्याचा गौप्यस्फोट झालेला असल्याकारणाने, पुरे माप पदरात घालणे शक्य झाल्याकारणाने दिली. यूनोचे कमिशन येऊन पोहोचून त्याने उभय राज्यांना युद्ध थांबविण्याच्या दिलेल्या सूचनेच्या कितीतरी आधी पाकिस्तानचे सर सेनापती सर डग्लस ग्रेसी यांनी पाकिस्तान सरकारला लष्करी परिस्थितीचे आपले समालोचन (Appreciation) एप्रिलच्या २० तारखेस सादर केले होते.

त्यात असे म्हटले होते की भारतीय फौजेने आक्रमक पवित्रा घेऊन **राजूरीवर** कब्जा केला आहे. मोठ्या प्रमाणावर चढाई करून (General Offencive) **बिंभार** आणि **भिरपूर** ती घेईल अशी भीती वाटते. तसे झाले तर भारताची फौज पाकिस्तानच्या सरहद्दीवर येऊन कोसळेल आणि मंगला धरण तिच्या ताब्यात जाईल. भारतीय फौजेने आपल्या उंबरठ्यावर (Door Step) ठाण मांडून बसू नये आणि आपले नागरी आणि लष्करी मनोधैर्य कोसळून पडून धूळधाण होऊ नये असे पाकिस्तानला वाटत असेल तर, त्याने **उरी–पूंच–नौषेरा** या रेषेच्या अलीकडे भारताला येऊ देता कामा नये. जनरल ग्रेसीची ही चेतावणी मान्य करून फार मोठ्या पाकिस्तानी–फौजेची आघाडयांवर रवानगी करण्यात आली होती (Indian Armed forces Year Book 1974–75).

इकडे आलेल्या चौकशी समितीची वर दिलेली सूचना हाती पडताच भारत सरकारने आपल्या सर सेनापतीमार्फत पाकिस्तानच्या सर सेनापतीला एक तार पाठविली होती. " My Government authorises me to state that I will have their full support if I order Indian Troops to remain in present positions and to cease fire. Naturally I can not issue such order until I have assurance from you that you are

in a position to take immediate reciprocal and effective action. Please reply. Most immediate." असतील तेथेच थांबून गोळी बंद करण्याचा हुकूम मी जर भारताच्या फौजेला दिला तर माझे सरकार त्याला मान्यता देईल, परंतु तुमच्याकडून ताबडतोब आणि परिणामकारक कारवाई होण्याचे आश्वासन मिळेपर्यंत मी असा हुकूम देऊ शकत नाही. कृपया ताबडतोब उत्तर द्यावे. दुसरे दिवशी पाकिस्तानचा होकार आला.

भारताच्या सर सेनापतीने पाकिस्तानच्या सर सेनापतीला जरी तारेने कळविले होते की, त्यांच्याकडून संमती येईपर्यंत भारताच्या जवानांना गोळी बंद करण्याचे हुकूम देता येणार नाहीत, तरी ते फक्त त्या तारेपुरतेच होते. **पंडित जवाहरलाल नेहरूंनी गोळी बंद करण्याचा भारताच्या सर सेनापतीला आधी हुकूम दिला आणि नंतर ही तार पाठविली गेली.** पाकिस्तानचा होकार आला त्याच्या आधीच भारताची तलवार म्यान झाली होती. प्रथम आपण गोळी बंद करणे नंतर विरुद्ध बाजूने तसे करावे म्हणून अनुनय करणे, ही भारताची आत्मघातकी दुर्दैवी खोडच आहे. पाकिस्तानशी झालेल्या प्रत्येक युद्धाच्या वेळी भारताच्या पंतप्रधानांनी हेच केले. वाईट सवयी अधिक खोल रुजतात (Die–Hard). भारतीय योद्धा शत्रू काय करतो याचा विचार न करता आज्ञा मानतो आणि फुकट मरतो, हे ऐतिहासिक सत्य आहे.

पाकिस्तानने जरी गोळी बंद करण्यास मान्यता दिली, तरी गोळी बंद केली नाही. त्यानंतरही डिसेंबरपर्यंत अनेक आघाड्यांवर निकराचे हल्ले चढविले होते. तोपर्यंत भारताच्या जवानांनी जवळजवळ ३,००० वर्ग मैलांचा प्रदेश सोडविला होता. पाकिस्तानची गोळी मंदावली ती निसर्गामुळे–हिमवृष्टीमुळे, कराराला दिलेल्या मान्यतेमुळे नव्हे !

जुलै १९४८ पासून जुलै १९४९ पर्यंत चाललेल्या वाटाघाटी संपल्या आणि त्यात युद्धबंदी रेषा ठरली. शेवटची बैठक १८ ते २७ जुलै १९४९ कराची येथे भरली होती. ता. ३१ डिसेंबर १९४८ रोजी मध्यरात्री उभय देशांच्या फौजा जेथे असतील तेथपर्यंत मागे घेतल्या जाव्या; असे ठरविण्यात आले. भारताने आपल्या फौजा क्षणाचाही विलंब न लावता ताबडतोब मागे घेतल्या. भारताने सोडविलेला काश्मीरचा फार मोठा भाग सोडून दिला. तो पाकिस्तानने पुन्हा बळकावला. ही युद्धबंदी रेषा ८०० कि. मी. लांब होती. प्रत्येक वेळी हेच घडत जात आहे. भारताच्या जवानांचे रक्त सांडते. ते वाळत नाही, जमिनीत जिरत नाही तोच, पाकिस्तानी फौजा ती त्यागभूमी–पुण्यभूमी पुनः पुनः तुडवतात.

या घनघोर युद्धात भारताचे १,५०० वीर ठार झाले. ३,५०० जखमी झाले आणि १,००० बेपत्ता झाले. हे सर्व का ? कशाकरिता ? जवान विचारीत नाही ! तो कधीच विचारणार नाही ! जनतेने विचारले पाहिजे.

१९४९ सालच्या आक्टोबर महिन्याची १ तारीख आणि चीनचे लोकसत्ताक राज्य–Peoples Republic याचा उदय झाला, बरोबर तीन महिन्यांनी ता. ३० डिसेंबर रोजी भारताने या नव्या राज्याला राजकीय मान्यता (Political Sanction) दिली आणि नेहरूंनी त्याला यूनोत सभासदत्व मिळवून देण्याची खटपट सुरू केली. १९५० सालच्या जानेवारीच्या १ तारखेस चिनी फौजा तिबेटात घुसल्या. कशाकरिता ? तीन दशलक्ष तिबेटी लोकांची साम्राज्यशाही आक्रमणापासून मुक्ती करण्याकरिता for the liberation of three millions Tibetans from Imperialist aggression. याच्या काही दिवस आधी भारताने चीन तिबेटला स्वतंत्र ठेवील, या भोळसट आशेने आपले तिबेटमधले सर्व हक्क आणि अधिकार सोडून दिले होते. द्रष्टया **सरदार पटेलांची भविष्यवाणी** वदली–भारताला आता एकाच वेळी आपल्या संरक्षणासाठी दोन आघाड्यांवर आपले चित्त एकाग्र करावे लागेल " Indias defence has to concentrate itself on two fronts simultaneously." नेहरूंनी लोकसभेत घोषणा केली: " The Mcmohan line is our boundary, map or no map. We will not allow anyone to cross that boundary." नकाशा असो अथवा नसो ! मॅकमहान रेषा आमची सरहद्द आहे. आम्ही ती कोणालाही ओलांडू देणार नाही. चीनने नवीन नकाशे तयार करून ८०,००० वर्ग कि. मी. भूप्रदेश आपल्या हद्दीत दाखवला होता.

ता. २९ एप्रिल १९५४ रोजी भारत आणि चीन यांचा एक करारनामा झाला होता. त्यात कलम २ हे परस्परांवर अनाक्रमणाचे कलम होते. या करारनाम्याला मुदत नव्हती. परंतु चीनने हा करारनामा आठ वर्षे पाळू असे तोंडी सांगितले होते. हा करारनामा करून त्याची शाई वाळण्याचीसुद्धा चीनने वाट पाहिली नाही. ता. ७ जुलै रोजी चीनने कुरापत काढून भारताच्या हद्दीत घुसण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याचबरोबर त्याचे रस्ते बांधण्याचे काम चालूच ठेवले. अक्साई चीन हा भारताच्या भूमीवरून जाणारा रस्ता पूर्ण केला. याबाबत लोकसभेत जेव्हा प्रश्न विचारला गेला तेव्हा नेहरू म्हणाले हा रस्ता आपल्या भूमीवरून जातो हे आम्हाला माहीत नव्हते. १९५६ पर्यंत भारत-चीन संपूर्ण सरहद्दीवर चीनची मजबूत नाकेबंदी झाली होती. फौज होती २० डिव्हिजन्स्. हे सर्व इकडे चालू अगताना २९ एप्रिल १९५४ रोजी 'पंचशील' जाहीर करण्यात आले होते. हिंदचीन भाईभाईच्या गगनभेदी गर्जनांनी वातावरण भरून आणि भारून गेलेले होते आणि तिकडे चीनचे अधिकाधिक डिव्हिजन्स् येऊन आपआपल्या जागा घेत होते आणि जसजशी चिनी फौज येत होती तसतशी भारताच्या भूमीवर अधिकाधिक आक्रमणे, सरहद्दीवरील प्रसंग (Border Incidents) वाढत गेले. १९६० पर्यंत चीनने ५२ वेळा हवाई सीमाभंग केला आणि शेवटी जुलै १९६२ मध्ये भारतावर चीनने जबरदस्त

हल्ला चढवला.

ता. ८ सप्टेंबरला पंतप्रधान जवाहरलाल नेहरू परदेशात खुशाल चालते झाले. जाताना सांगून गेले "रक्त न सांडता चिनी परत जातील असे करा." मुरारजी देसाईही राजधानीत हजर नव्हते. नेहरू २ आक्टोबर रोजी परत आले. संरक्षणमंत्री कृष्णा मेनन २२ सप्टेंबरला परदेशात गेले होते, ते ३० सप्टेंबरला परत आले. इकडे लढाई चालूच होती. संरक्षणमंत्री परदेशात असताना इकडे २२ सप्टेंबरला संरक्षण मंत्रालयात एक तातडीची सभा भरली. अध्यक्षस्थानी बसले रघुरामय्या आणि एक ठराव पास केला. **चिन्यांना धोला परिसरातून घालवून द्यावे.** ठरावाने युद्ध करणारे मुत्सद्दी, राजकारण–पटू भारताच्या वाट्याला यावेत इतका का भारत पापी, पतित आहे ? पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री भारतात नसल्यावर, बिचारे रघुरामय्या तरी काय करणार ? त्यांनी ठराव मांडला "या सभेचे असे मत आहे की इत्यादी इत्यादी !"

पंतप्रधान परत आल्यावर त्यांनी चीनच्या युद्धाकरिता एक आर्मी कोअर संगठित करण्याचा हुकूम दिला आणि लेफ्टनंट जनरल कौल यांना तिचे सेनापती नियुक्त केले. ही नवी आर्मी कोअर कशी होती याविषयी खुद्द सेनापती कौल लिहितात, "I was given command of a corps which was practically non–existant on the ground." जमिनीवर सैन्यच नसणाऱ्या सेनेची मला हुकुमत दिली गेली. भारताचे जे काही जवान होते त्यांच्याजवळ लढण्याची जिद्द आणि राष्ट्राभिमान याच्याशिवाय दुसरे काहीच नव्हते. रसद, दारुगोळा यांचा साठा नव्हता, पुरवठा नव्हता, कपडे नव्हते, हत्यारांच्या दुरुस्तीची व्यवस्था नव्हती आणि दळणवळणाची साधने नव्हती. ही नाही नव्हतेची मालिका फार लांब होती.

आक्टोबरच्या १२ तारखेस प्रधानमंत्री कोलंबोस चालते झाले. या खेपेस चिनी नेफातून परत जातील असे करण्यास ते सांगून गेले. इकडे चीनने आक्टोबरच्या २४ तारखेस एक मुत्सद्देगिरीचा प्रस्ताव भारतापुढे टाकला. प्रस्ताव हा होता की, सप्टेंबरच्या ८ तारखेस दोन्ही देशांच्या फौजा जेथे असतील ती रेषा भारताने प्रत्यक्ष अधिकाराची रेषा Line of actual control म्हणून मान्य करावी. त्यावर भारताने उत्तर दिले की नोव्हेंबर १९५९ च्या ७ तारखेस जेथे चिनी फौजा होत्या ती रेषा मान्य करण्यास आम्ही तयार आहोत. चीनने दिलेली रेषा मान्य करणे म्हणजे २ हजार ५ शे वर्ग मैलावर चिनी फौजेचा ताबा आणि अधिकार मान्य करणे होय. चीनने अर्थातच आपली मागणी दुरुस्त केली नाही. युद्ध चालूच होते.

इतका प्रदेश गेल्यावर आणि इतके रक्त सांडल्यावर भारताचे राष्ट्रपती आणि सशस्त्र सेनादलांचे सर्वोच्च सेनापती Supreme Commander जागे झाले आणि त्यांनी घटनेच्या कलम ३५२ पोटकलम १ याच्या आधाराने भारतात

आणीबाणी जाहीर केली. (दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखाली डिफेन्स ऑफ इंडिया आर्डिनन्स लागू केल्याचे जाहीर केले गेले होते. कशाकरिता ? लोकांनी नेटाने युद्धप्रयत्न करावे, सरकारला मनोभावे मदत करावी, कुचराई करू नये म्हणून !) ही होती अविस्मरणीय तारीख २६ आक्टो-बर सन १९६२. युद्ध चालू असताना परदेशच्या वाऱ्या करणारे इत्यादी इत्यादी संरक्षणमंत्री श्रीकृष्णा मेनन यांनी तीन दिवसांनी २९ तारखेस राजीनामा दिला. नेहरूंनी तो मंजूर केला आणि संरक्षण मंत्रालयाची सर्व सूत्रे आणि अधिकार खुद्द खाशांच्या (नेहरूंच्या) हातात घेतला. लढाया चालू होत्या. २१ नोव्हेंबरला तेजपूर रिकामे झाले होते आणि त्याच दिवशी चीनने एकतर्फी युद्ध बंद केले. चीनचा दावा ९०,००० कि.मी. चा आहे. त्यातले १/३ पदरात पाडून घेऊन विश्रांतीसाठी चीन थांबला.

मुखात भाईभाईचा 'राम' आणि खाकेत विश्वासघाताची 'सुरी' (मुखमें राम बगलमें छूरी) बाळगणाऱ्या चीनने या युद्धात २४,५०० वर्ग मैल भारताचा प्रदेश बळकावला. मानवी भूदंड असा होता. ६७ अधिकारी, ५७ कनिष्ठ अधिकारी, नायब सुभेदार–सुभेदार आणि १,२९५ एकूण १,४२३ ठार झाले. ९४ अधिकारी, ९६ सुभेदार वगैरे आणि २,८८८ जवान, एकूण ३,०७८ जखमी झाले. २७ अधिकारी, ३९ सुभेदार आणि १,५८९ जवान, एकूण १,६५५ बेपत्ता झाले. नंतर रेडक्रासच्या मार्फत काही सापडले तरी ७७१ शूरांचा थांगपत्ता लागला नाही.

परंतु हे युद्ध चीनने थांबवले नाही. ७ फेब्रु. १९६३ रोजी भारताने लडाक भागात सीमोल्लंघन केल्याचा आरोप करून, भारताच्या भूमीवर बेधडक नवीन चौक्या बसवणे सुरू केले. २६ चौक्या बसवल्याची बेशरम कबुलीही दिली. हे भाताच्या संरक्षणाचे दुसरे युद्ध. याचा जबाब कोण देणार ? या युद्धात दोन विशेष गोष्टी होत्या. पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री युद्धाची धुमश्चक्री चालू असताना, परदेशात पाहुणचार घेत होते आणि मागे राहिलेले मुत्सद्दी–दुय्यम राज्यकर्ते ठराव पास करून लढाया लढत होते. सेनापती बिचारा ! त्याने लढाईचे आदेश द्यायला जागेवर पुरेसे जवान नव्हते आणि जवानांजवळ प्राण, राष्ट्राभिमान आणि धैर्य याशिवाय आणखी लढाईला लागणारे **पार्थिव** काही नव्हते. असले तरी पुरेसे नव्हते. आणि धड दुरुस्तही नव्हते, दुरुस्त करता येत नव्हते !

भारताची इतकी जमीन बळकावून इतके जवान चीनने मारल्याचे पाहून पाकिस्तानला चेव आला. त्याने कच्छमधल्या ३२० मैल लांब आणि ५० मैल रुंद भागावर आपला हक्क सांगितला (हा भाग युद्धाच्या दृष्टीने उपयुक्त होता.) आणि लगेच आपली फौज सरहद्दीवर आणली आणि भारताच्या सीमांच्या आत आपल्या चौक्या बसवणे सुरू केले. ९ एप्रिल १९६५ रोजी भारताच्या सरदार पोस्ट पोलिस चौकीवर हल्ला चढवून ती चौकी मारून काढली. येथपर्यंत जानेवारी

१९६५ ते ११ एप्रिल १९६५ इतका काळ गेलेला होता.

११ एप्रिलपासून लोकसभेत भाषणे, पाकिस्तानला विनंत्या, यूनोकडे रडगाणे, इत्यादी **भारताच्या संरक्षणाचे अहिंसात्मक जालीम उपाय सुरू झाले.**

ता. २४ एप्रिल रोजी पाकिस्तानने भारताच्या परराष्ट्रीय सचिवाच्या हातात एक ' पर्चा ' दिला. त्यात म्हटले होते २४ व्या समांतर रेषेवरील (अमेरिकेच्या भाषेत 24th Parallel) ३५०० मैलांचा प्रदेश पाकिस्तानचा असून तो भारताने बेकायदेशीरपणाने आपल्या ताब्यात ठेवला आहे (Adverse possession) आणि त्यावर चौक्या बसवल्या आहेत, तो ताबडतोब रिकामा करून दिला पाहिजे.

इकडे हातात खलिता दिला आणि तिकडे चढाया सुरू केल्या. पाचव्या चढाईत भारताची स्वदेशी इसापूर रायफल शत्रूवर आग ओकू लागली. परीक्षेत ती उत्तीर्ण झाली. **पहिल्या स्वदेशी रायफलीचा पहिला उपयोग कच्छमध्ये झाला** आणि तेथेच पाकिस्तानने अमेरिकन **पॅटन रणगाडे** पहिल्यांदा लढाईत आणले. पण ते नापास झाले. भारताने ६ बेकाम करून टाकले.

चकमकी चालूच होत्या. पाकिस्तानी सैनिक मार खात होते आणि २८ तारखेस दिल्लीस पंतप्रधानांनी लोकसभेत कच्छवर निवेदन केले आणि ब्रिटिश पंतप्रधान **विल्सन** मध्यस्थी करायला तयार असल्याचे त्यांच्या चांगूलपणाचे रसाळ वर्णन केले. जूनच्या १७ तारखेस लंडन शहरी ब्रिटिश कॉमनवेल्थ प्रधानमंत्री परिषदेच्या वेळी, अयूबखान आणि शास्त्री यांची भेट झाली. पंतप्रधान विल्सन यांची मध्यस्थी उभयतांनी मान्य केली. ता. ३० रोजी दुपारी १२ वाजता कच्छ करारावर सह्या झाल्या. भारताची सही शास्त्रींनी केली. नेहरू परलोकी गेलेले होते. भारताने पाकिस्तानला ३०० वर्ग मैल प्रदेश कांजरकोट, धारावाणी आणि छाड-बेट राजीखुषीने अक्कलहुशारीने (?) निशापाणी न करता देऊन टाकले.

ही कपटी धूर्त मध्यस्थीला दिलेली भाबडी आत्मघातकी मान्यता होती. ' युद्धबंदी रेषा ' किंवा ' प्रत्यक्ष ताबा रेषा ' यांच्यासारखी अगतिक परिस्थिती नव्हती. असे जरी असले तरी प्रश्न विचारता येईल—रस्त्यावरच्या माणसाला (Man on the Street) की पंतप्रधानाला भारताची जमीन **कोणालाही न विचारता** अशी देऊन टाकण्याचा भारताच्या घटनेने अधिकार दिलेला आहे काय ? दिला असल्यास बोलणे खुंटले. कच्छच्या लढायांत भारताचे शेपन्नास जवान कामास आले. पण साठकोटीत ती दर्यामें खसखसच होती ! आणि गोमेचा एक पाय मुरगाळल्याने ती लंगडी होत नाही.

कच्छमधले पाकिस्तानचे आक्रमण हा प्रयोगशाळेतला एक प्रयोग आणि भव्य रंगीत तालीम होती (Laboratory Test and Grand Rehearsal), असे पाकिस्तानने म्हटले होते. भारताच्या सेनादलांना, ब्रिटिशांनी टाकून दिलेला दुय्यम दर्जाचा गाळ म्हणणाऱ्या विघ्नसंतोषी आणि भारतद्वेष्टया जगाला चीनने

केलेल्या दुर्दशेमुळे स्फुरण चढले. त्यांनी कोणीही चेंदामेंदा करू शकेल अशी पाल्यापाचोळ्याची फौज (Grass Army) म्हणणे सुरू केले (कारण जागा झालेल्या नव्या चीनची ताकत त्यांना प्रथम दिसली ती प्रतिकूल परिस्थितीत लढणाऱ्या भारतीय जवानांच्याविरुद्ध). भारताच्या दुर्दम्य वीरश्री असलेल्या रणशूरांचे हात शिवशिवत होते. त्यांना युद्धसाहित्य नसल्याची खंत नव्हती. कपडेलत्ते, शिधाआटा इत्यादी क्षुद्र वस्तूंची पर्वा नव्हती. अर्काटच्या वेढ्यात भारताची पेज पिऊन घट्ट भात गोऱ्या सोल्जर बाळांना देऊन टाकून, त्यांना जिवंत ठेवून क्लाईव्हला जय मिळवून देणाऱ्या पूर्वजांचे रक्त त्यांच्या नसात वाहत होते. पण मालकाची परवानगी नव्हती. 'अहिंसाव्रती' काँग्रेस सरकार त्यांना लढू देत नव्हते.

म्हणणारे म्हणतात नेहरूंच्या धीरोदात्त वर्तनाने त्यांची प्रतिमा प्रतिसूर्यासारखी तेजाळून जाऊन अंतर्धान पावली. त्याच्या जागी आलेल्या मोठ्या भारताच्या **छोट्या आदमीने** (हा त्यांचा विनय) लालबहादूर शास्त्रीजींनी कच्छचा करार मान्य करून, जवाहरलालची परंपरा पुढे चालू ठेवली. ही नुसती सुरुवात होती. पाकिस्तानच्या सपाट्यात त्यांना तावून सुलाखून निघावयाचे होते; ते पुढेच ! आणि त्याकरिता फार वाट पाहावी लागली नाही.

पाकिस्तान–भारत यांची पहिलीवहिली युद्धबंदी रेषा ठरताच पाकिस्तान पुढच्या सर्वंकष (Total) युद्धाच्या तयारीला लागला. त्याने दीड लाख **मुजाहीद** आणि साडेआठ हजार **रझाकार** अशी **२ लक्ष नवी सेना** उभारली. त्या सैन्याला चिनी शिक्षकांनी लढाई करण्यात तरबेज केले. त्यांना सर्व अद्ययावत शस्त्रे दिली आणि हिरव्या सलवार कमीजांचा गणवेश दिला. १५ वर्षे वयापासून पुढच्या प्रत्येक पाक नागरिकाला सैनिकी सेवा सक्तीची केली. अमेरिकेकडून त्यांचे अजिंक्य **जनरल पेटन** याचे नाव दिलेले रणगाडे मिळविले, विमाने मिळविली आणि एक पाणबुडी बोट मिळविली व तिचे अमेरिकन नाव बदलून ते 'गाझी' केले. अरब देशांकडून नाना प्रकारचे युद्ध–साहित्य मिळविले. आपल्या या नव्या फौजेच्या विभागांना **सलाउद्दीन फोर्स, गझनवी फोर्स** अशी नावे दिली. १९६५ च्या जुलै महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यात अध्यक्ष आणि फील्ड मार्शल अयूबखान (कोणते फील्ड गाजवून हे महाशय त्याचे मार्शल झाले ते फक्त त्यांनाच आणि खुदातालाला माहीत) यांनी आपल्या फौजांना उत्तेजनपर भाषणे (Pep Talk) सुनावण्याचा दौरा सुरू केला आणि तिकडे युद्धबंदीरेषा ओलांडून १९६५ च्या पहिल्या सात महिन्यांत पाकिस्तानने १,८३४ सीमा घटना (Border Incidents) म्हणजे आक्रमणे केली होती.

तारीख ५ आगस्ट रोजी दुपारी महमद दीन नावाच्या एका काश्मिरी मेंढपाळाला हिरव्या सलवार कमीजातले काही पाकिस्तानी सशस्त्र मुजाहीद

गुलमर्ग जवळ एका कुरणात भेटले, तसेच तेथून ५० मैलांवरील पुंच जिल्ह्यातल्या गलूथी गावाजवळ वजीर महमद नावाच्या एका खेडुताला भेटले. भारताच्या सैन्याची माहिती या दोघांकडून मिळावी म्हणून त्या मुजाहिदांनी जंगजंग पछाडले, धाकदपटशा, धर्म, पैसा, सर्व व्यर्थ झाले. या दोघा **सच्च्या भारताच्या राष्ट्रीय नागरिकांनी** ताकास तूर लागू दिला नाही. ते कसेबसे निसटले आणि त्यांनी नागरिकाचे कर्तव्य पहिल्याने पार पाडले. ते तडक नजीकच्या पोलीस ठाण्यावर गेले आणि पुऱ्या हकीकतीची **बयाने** दिली.

हजारो ' हिरवे ' काश्मिरात घुसले होते आणि त्यांच्या भारताच्या गस्ती पथकाशी चकमकी सुरू झाल्या होत्या. भारत यूनोच्या निरीक्षकांना एकामागून एक हकीकती कळवीत होता. निरीक्षक आपले काम चोख बजावीत होते. **ते पाहत होते.**

तारीख २४ आगस्टपर्यंत पाकिस्तानी फौजांनी युद्धबंदीरेषा (CFL) ओलांडून टिथवाल, उरी, पूंच, मेंढर, नौशेरा आणि कारगिलपासून छांब इतक्या विस्तीर्ण क्षेत्रात रायफली, उखळीतोफा, तोफखाना, यांचे आणि विमानांचे हल्ले केलेले होते.

इतके झाल्यानंतर ता. २४ आगस्ट रोजी भारताच्या छोट्या (?) पण मोठ्या पंतप्रधानाने शास्त्रीजीने भारताच्या जवानाला प्रतिकार करण्याची परवानगी दिली. **परंतु फक्त स्थलसेनेच्या जवानालाच** ! वायुसेनेचे जवान आपआपल्या विमानांची इंजिने चालू करून उंच केलेल्या आंगठ्याच्या सांकेतिक खुणेची आतुरतेने वाट पाहत तयारीने उभे होते. ती खूण त्यांना **२७ तारखेस मिळाली.**

शास्त्रीजींनी दोन जबाब द्यायला पाहिजे होते.

(१) तारीख ६ आगस्टपासून २४ आगस्टपर्यंत ते कशाची वाट पाहत होते ? त्यांना भारताचे आणखी किती नुकसान हवे होते ?

(२) स्थलसेनेबरोबरच वायुसेनेला हिरवी झंडी का दाखवली नाही. युद्ध म्हणजे युद्ध ! ते अमक्या सेनेने अमक्या वेळी करावे किंवा करू नये ही **रणरीती** त्यांना कोणी शिकविली ? ते चरखा टाकून युद्ध–विद्या–विशारद केव्हा झाले ?

सप्टेंबरच्या ७ तारखेस पाकिस्तानी जलसेनेने रात्री श्रीकृष्णाच्या द्वारकेवर तोफा डागल्या. त्याच्यापूर्वी त्यांची पाणबुडी ' गाझी ' समुद्रात संचार करीत होतीच. आपल्या सुदैवाने तिला भक्ष्य मिळाले नाही. सप्टेंबरच्या ८, १५ आणि १७ या तारखांस पाकी विमानांनी अमृतसर, सांबा आणि गुलूथीवर नापाम बांब टाकून आपल्याला फार मोठी हानी पोहोचविली होती. आता चीन सरसावला. ता. ९ सप्टेंबरला त्याने भारतावर आक्रमणांचे आरोप करून आपल्या सेना आणखी पुढे आणल्या आणि १६ सप्टेंबरला रात्री ९.३० वाजता तीन दिवसांच्या मुदतीची धमकी दिली. नंतर ही मुदत ७२ तासांनी वाढविली.

९ ते १४ सप्टेंबरच्या दरम्यान जेव्हा भारत पाकिस्तानला पिटाळून लावीत होता, लाहोरचे मैलाचे दगड मागे पडत चालले होते, तेव्हा यूनोच्या सुरक्षामंडळाने (त्याला पाकिस्तान सुरक्षित ठेवायचा होता) गोळीबंदीची खटपट सुरू केली. भारत तयारच होता. पाकिस्तानने चिनी धमकीची वाट पाहून निराश झाल्यावर मान्यता दिली. २३ तारखेला पहाटे ३.३० वाजता युद्ध बंद झाले. म्हणजे भारताने बंद केले. पाकिस्तानने नव्हे. त्यानंतर २१ आक्टोबरपर्यंतच्या एकाच महिन्यात पाकिस्तानाने ५५६ आक्रमणे केली. हे युद्ध चालू असताना ता. ८ सप्टेंबर रोजी ताज्या दमाचे नवे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण लोकसभेत बोलते झाले होते, " आम्हाला पाकिस्तान नष्ट करायचा नाही. त्याला फक्त आमची ताकद दाखवायाची आहे." पाकिस्तानने ती डोळे भरून पाहिली आणि अंगभर अनुभवली. **पाकिस्तानला धक्का लागू नये** अशी उभ्या जगाचीच इच्छा होती आणि नियतीचीही होती. म्हणून (ता. १० जानेवारी १९६६) शास्त्रीजींनी रशियात ताश्कंदला जाऊन (अयूबखानानीही तेथे आपली तशरीफ नेली होती) एका दस्तैवजावर स्वाक्षरी केली आणि दुसरे दिवशी रात्री १.३२ वाजता आपले इहलोकीचे वास्तव्य संपविले !

या युद्धात १२,००० वर्ग कि. मि. भूमी–भारताची भूमी–पाकिस्तानला परत केली गेली. आतापर्यंत पाकिस्तानच्या कबजात नक्की किती भूमी गेली हे समजलेच नाही. कारण युद्धबंदीरेषा CFL मागे पुढे सरकत असतात. भारताचे २,७६३ वीर कामास आले, ८,४४४ जखमी झाले, १,५०७ बेपत्ता झाले !

पुन्हा प्रश्न ! परंतु हे कोणाला आणि कोणी विचारावयाचे आणि त्यांची उत्तरे कोण देणार ? एक ग्रंथकारही प्रश्न (लोंगर) विचारतो Who won the victory ? कोणाचा जय झाला ? उत्तरही तोच देतो, " Pakistan was able to regain through UNO what she could not get by Valour." आपल्या शौर्याने पाकिस्तानला जे घेता आले नाही, ते त्याने यूनोमार्फत मिळविले. त्यावर एक प्रश्न उभा राहतो. भारताने यूनोचे असे धडधडीत अन्यायाचे वर्तन का मान्य केले ? सहन केले ?

पाकिस्तानने पूर्वपश्चिम दोन्ही आघाड्यांवर आधी आक्रमणे केली. अमृतसर, श्रीनगर, अवंतीपूर, फरीदकोट इत्यादी शहरे आणि धावपट्टचा व राडार केंद्र यांच्यावर विमानांतून बांबस्वर्षाव केला आणि डिसेंबर १९७१ रोजी दुपारी ५ वाजून ४७ मिनिटांनी भारताविरुद्ध युद्ध जाहीर केले. भारताने ४ तारखेस मध्यरात्री ००.२० वाजता प्रत्युत्तर दिले. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी तिन्ही सेनादलांना एकदमच हिरवी झेंडी दाखवली आणि तिन्ही भारतीय दले एकसाथ शत्रूवर दोन्ही आघाड्यांवर तुटून पडली.

डिसेंबरच्या ६ तारखेला भारताने गणतंत्र बांगला देशाच्या सरकारला

मान्यता दिली. ता. १६ रोजी पाकिस्तानचा पूर्व आघाडीवरील सरसेनापती ४.३१ वाजता बिनशर्त शरण आला. गजेंद्रमोक्ष झाला.

दुसऱ्या दिवशी १७ तारखेला रात्री ८ वाजता भारताने पश्चिम आघाडीवरील युद्ध आपणहून एकतर्फी (Unilateral) बंद केले. या आघाडीवर प्रत्येक भागात भारत जिंकीत पुढे पुढे चाललेला होता ! भारताने बांगला मुक्त केल्यानंतर, त्याच्या फौजा मोकळ्या झाल्या होत्या. त्या पश्चिम आघाडीवर पाठवून पाकिस्तानने बळकावलेला सारा प्रवेश इंच इंच भूमी मुक्त करणे सहज शक्य होते. परंतु तसे का केले नाही ? कोणाची छाती होती भारताच्या विजयी जवानांना रोखण्याची ? याचे उत्तर कोण देणार ? या युद्धात भारताचे २,३०७ वीर प्राणास मुकले, ५,१६३ जखमी झाले, २,१६३ बेपत्ता झाले, हे सर्व का झाले ?– भारताचे तीन प्रधानमंत्री लोकांना सांगत सुटले होते, भारताची इंच इंच भूमी परत घेतल्याशिवाय आम्ही राहणार नाही ! परंतु हा इंच मोजायचा कुठून आणि कोणी आणि हे काम सुरू केव्हा होणार ?

भारताने अनाहूतपणे हे युद्ध थांबवले असले तरी, पाकिस्तानची गोळी बंद झालेली नाही आणि होणारही नाही. उदाहरणार्थ, एप्रिल ते जून ७२ या काळात पाकिस्तानने वाढत्या संख्येने आक्रमणे केली. मार्चमध्ये ३१ होती. एप्रिलमध्ये ८० झाली. मेमध्ये ४५४ झाली आणि जूनमध्ये १,०१६ झाली. सर्वात गंभीर आणि मोठे आक्रमण मे महिन्याच्या ५ तारखेला टिथवाल भागातल्या केयान परिसरावर झाले. तोफेचे गोळे बरसले. भारताची १३.२ वर्ग मैल जमीन पाकिस्तानने जबरदस्तीने घेतली (आधार संरक्षण मंत्रालय इतिवृत्त १९७२–७३, पान १).

सात वेळा अयशस्वी झालेल्या सिमला बैठकी, नवीन युद्धबंदीरेषा ठरवू शकल्या नाहीत. भारताचे प्रतिनिधी होते जनरल माणेकशा (नंतर ते फील्ड मार्शल झाले). हा स्वाभिमानी वीर अपमानकारक असत्य रेषा मान्य करणे शक्यच नव्हते ! शेवटी त्यांना सही करावी लागली. ती का ? हाही एक प्रश्न आहे ! नवे नकाशे तयार करण्यात आले. फौजा मागे घेण्याचे काम सुरू झाले. भारताच्या फौजा मागे घेतल्या गेल्या. सदरहू सरकारी इतिवृत्त साल १९७२–७३ पान ५ लिहिते, " Pakistan had to withdraw its troops only from a few pockets." पाकिस्तानला फक्त थोड्याशा किरकोळ जागांवर फौज हटवावी लागली. यावरून नवीन रेषा ठरविताना भारताने दाखविलेले आत्मघातकी औदार्य एखाद्या पाळण्यातल्या पोरालाही सहज समजू शकेल !

१९४७ ते १९७२ पर्यंतच्या पहिल्या पंचविशीत भारताचे संरक्षण कसे केले गेले याचे चित्र हे असे आहे. ही पहिली पंचविशी मराठीतल्या एका विशिष्ट पशूच्या जीवनासारखी, त्याला शोभण्यासारखी झाली किंवा कशी झाली, याचे उत्तर द्यायला कोणा प्रज्ञावंताला, आचार्याला किंवा महात्म्याला अथवा लोकनाय-

काला पाचारण करण्याची किंवा त्याच्याशी विचार–विनिमय करण्याची आवश्यकता असू नये !

एका स्वतंत्र सार्वभौम देशाच्या नागरिकाला–प्रत्येक नागरिकाला–हा प्रश्न विचारण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो आणीबाणीने जुलुमजबरदस्तीने हिरावून घेतला होता. आता नागरिक स्वतंत्र आणि निर्भय झाला आहे असे म्हणतात !

भारताला नवे राज्यकर्ते लाभले आहेत. त्यांनी अजूनपर्यंत इंचइंच भूमी परत घेण्याच्या सरकारी घोषणा केलेल्या नसल्या तरी, नागरिक त्यांना प्रश्न करू शकतो, नव्हे असा प्रश्न प्रत्येकाने केलाच पाहिजे. मान्यवर महाशय आपण काय करणार आहात ? भारताचे गेलेले इंच परत घेण्याची जवानांना परवानगी देणार आहात काय ? दोन वर्षांवर काळ उलटून गेला आहे. अजून काही हालचाल नाही. "मैत्रीचे दौरे" चालू आहेत.

व्यथाच व्यथा

भारताची सर्वात भयंकर दु:खदायक, त्याच्या अस्मितेला आणि गौरवाला न सोसणारा जबरदस्त धक्का देणारी, त्याच्या प्राचीन उज्ज्वल इतिहासाला खाली पाहायला लावणारी आणि सर्वात अभद्र आणि अमंगल व्यथा–त्याचे तुकडे–कायम स्वरूपाचे तुकडे होणे– नुसत्या उघडचा डोळचांनीच नव्हे तर अत्यंत अविचाराने आणि स्वाभिमानशून्यतेने मान्य करणे ही आहे. भारत स्वतंत्र झाला खरा परंतु त्याचे तुकडे मान्य करून, त्या तुकडचांचे 'स्वागत' केल्याने झाला. आपला देश हा चिरंजीव अक्षय्य वटवृक्ष असल्याचा भारतीयांचा दावा निर्घृणपणे पायदळी तुडवून स्वतंत्र झाला.

ज्या गांधीजींना त्यांचे अनुयायी आदरार्थ 'राष्ट्रपिता' हे संबोधन लावतात त्या महात्म्याला आपली पूज्य मातृभूमी छिन्नविच्छिन्न होणे मंजूर नव्हते. त्यांनी आपल्या 'हरिजन' या वर्तमानपत्राच्या ता. २२–९–१९४२ च्या अंकात "मैं वचन देता हूं, मेरे शरीरके टुकडे हो जायेंगे परंतु मैं हिंदुस्थान का विभाजन अथवा पाकिस्तान का निर्माण कदापि नहीं होने दूंगा," असे जाहीर केले होते. परंतु त्यांच्या शिष्यवरांनीच त्यांच्या या वचनाला सपशेल हरताळ फासून अक्षम्य पितृद्रोह आणि **गुरुद्रोह** केला. पाकिस्तान वेगळा काढून उरलेला भारत स्वतंत्र होणे हा गांधीजींचा सपशेल पराभव होता आणि तो त्यांच्या अंतेवासी आणि पूजक

महाभागांनीच केला.

जे या पराभवाला कारण झाले ते आज हयात नाहीत. दिवंगता विषयी औदार्य दाखवावे (Nil nissi bonum) या सौजन्ययुक्त तत्त्वाला अनुसरून विभाजनाची चिकित्सा उपयुक्त असली तरी येथे ती पुन्हा करण्याचे प्रयोजन नाही. ते जरी आता येथे नसले तरी जे मागे राहिलेले आहेत, त्यांनी 'राष्ट्रपित्याच्या' दारुण पराभवाचे परिमार्जन करणे, हे त्यांचे कर्तव्य ठरते. परंतु तसे काही एक न करता, जे कोणी हे विभाजन रद्दबातल होण्याची इच्छा करतात, त्यांना ते लोक नाना प्रकारची दूषणे देतात. त्यांची मजल अशा लोकांना देशद्रोही म्हणण्यापर्यंत जाऊन पोहोचते. हे आश्चर्यकारक, उद्‌वेगजनक आणि उबग आणणारे आहे, असे म्हणावे लागते.

पाकिस्तान मान्य केले गेले नसते तर, कदाचित भारताचे पूर्ण स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व थोडेसे लांबणीवर पडले असते इतकेच. भारतीयांपेक्षा इंग्रजांनाच भारतातून गाशा गुंडाळण्याची अधिक निकड लागलेली होती. त्यांनी स्वातंत्र्य-प्रदानाचा दिवस आपणहून जवळ ओढला आणि आपल्या पार्लमेंटात भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा तडकाफडकी पास करून घेऊन, त्याच्यावर आपल्या राणीचे शिक्कामोर्तबही घाईनेच करून घेतले होते. घिसाडघाईने, तयारी नसताना मिळालेले स्वातंत्र्य, इतके महाग पडले !

भारतातून पाकिस्तान बाहेर वेगळा काढण्याचे ठरल्यानंतर, जवाहरलाल नेहरूंनी एक उभय देशांच्या राज्यकारभाराची तात्पुरती व्यवस्था सुचविली होती. तिच्यातल्या मुख्य गोष्टी पुढीलप्रमाणे होत्या : (१) उभय देशांचा संयुक्त गव्हर्नर जनरल असावा आणि तो त्यांचा मित्र **मौंटबेटन** हाच असावा. जीनांनी हे अमान्य केले. त्यांना आपल्या राज्यकारभारात परक्याला कसलेही स्थान नको होते. परंतु नेहरूंनी मौंटबेटनना आग्रहपूर्वक ठेवून घेतले. (२) उभय देशांचा एकच सर्वोच्च सरसेनापती असावा आणि तो जनरल **ऑकिन्लेक** हाच असावा. त्याशिवाय पाकिस्तानचा सरसेनापती जनरल **मेसव्हीं** आणि भारताचा सरसेनापती जनरल **लॉकहार्ट** हे असावेत. जीनांनी याला सहर्ष मान्यता दिली. नेहरूंनी जीनांनी मान्य केलेली फक्त अर्धीच योजना मान्य केली. ती मान्य केली ही दुसरी व्यथा होती. ती मान्य केली नसती तर **चक्रवर्ती राजगोपालाचारी** भारताचे तेव्हाच **गव्हर्नर जनरल** झाले असते आणि **जनरल करीआप्पा भारताचे सरसेनापती झाले असते** आणि **तसे झाले असते; तर पाकिस्तान भारताशी युद्ध करू धजला नसता** आणि पुढील इतिहास निराळाच झाला असता.

भारत-पाक युद्ध जुंपल्यावर जेव्हा भारतीय जवान पाकी आक्रमकांना पिटाळून लावीत होते आणि यशाचा पेला भारताच्या जवानांच्या ओठाला लागलेला होता तेव्हा मौंटबेटननी नेहरूंना युनोत जाण्याचा सल्ला दिला. कारण त्यांना

पाकिस्तानचा पराभव नको होता असे म्हणता येते. तसे नसते तर भारताच्या फौजा काश्मिरात उतरून पहिली चकमक झाली त्या क्षणीच त्यांनी हा सल्ला द्यायला हवा होता. इतकेच नाही तर त्याच्याही आधी पाकी सैनिक टोळीवाल्यांच्या नावाने काश्मिरात घुसले त्याच वेळी त्यांनी पाकिस्तानकडे आपला स्वतःचा निषेध नोंदवणे प्रामाणिकपणाचे झाले असते. ते अखंड भारताचे फक्त दोन महिनेच आधी व्हाईसरॉय होते. त्यांची नेहरूंशी व्यक्तिगत मैत्री असली तरी, त्यांना **नेहरूंच्या भारताच्या** हिताची चिंता नव्हती हे यावरून स्पष्ट होते.

उभय देशांचा संयुक्त सरसेनापती इंग्रज असून त्याशिवाय प्रत्येक देशाचा वेगळाला सरसेनापतीही इंग्रजच असावा, या व्यवस्थेला जीनांनी दिलेली मान्यता धूर्तपणाची होती. पाकिस्तानी काश्मिरात घुसल्याची खबर भारताच्या इंग्रज सरसेनापतीने भारत सरकारपासून चार दिवस दडपून ठेवली होती, असा संशय घेण्याला जागा आहे.

मिळालेल्या पाकिस्तानात जिना संतुष्ट नव्हते. त्यांना जे मिळाले नव्हते ते तर हस्तगत करावयाचे होतेच त्याशिवाय, " हसते लिया पाकिस्तान लढके लेंगे हिंदुस्थान " अशा आक्रमक महत्त्वाकांक्षी रणगर्जना पाकिस्तानभर सुरू झालेल्या होत्या. त्या केवळ शाब्दिक नसून सक्रिय होत्या आणि त्याची लष्करी योजना तयार झालेली होती. (तिचा तपशील अन्यत्र दिलेला आहे). त्या मोहिमेचे पहिले लष्करी उद्दिष्ट (Military Objective) जम्मू काश्मीर होते. त्याची मुख्य कारणे दोन होती. पहिले ते संस्थान पाकिस्तानला सलग असून त्याला लागूनच पलीकडे हिंदुस्थान असल्याकारणाने जिंकलेले जम्मूकाश्मीर संस्थान प्रत्यक्ष हिंदुस्थानवर झेप घेण्याच्या दृष्टीने (Jumping किंवा Take off ground) सोईचे व उपयुक्त होते. दुसरे कारण काश्मीरची प्रजा प्रचंड बहुमताने मुसलमान असल्याकारणाने, त्यावर ताबा मिळविणे अगदी सोपे होते आणि त्याच कारणाने काश्मीर हा हिंदुस्थानचा अत्यंत कमजोर बिंदू होता (Weakest and critical point). शत्रूच्या कमजोर भागावर हल्ला चढवावा या युद्धशास्त्राच्या सिद्धांतानुसारच पाकिस्तानने आपली मोहीम आखली होती. त्याकरिता पाकिस्तानने सर्वप्रथम जम्मू-काश्मीरची सर्व बाजूंनी नाकेबंदी केली. जीवनावश्यक मिठापासून ते पेट्रोलपर्यंत प्रत्येक बाबतीत जम्मू काश्मीर परावलंबी होते आणि या आवश्यक वस्तूंच्या वाहतुकीचे मार्ग (आता) पाकिस्तानातूनच जात होते. या कोंडीबरोबरच पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या बुरख्यात आपले सैनिक पाकिस्तानात घुसवले. याविषयी **जनरल सेन** slender was the thread या ग्रंथात लिहितात, " Pakistan resolved first to economic coersion and then to naked force." त्यांनी पाकिस्तान काश्मीर सरहद्दीवरील संस्थानी फौजेच्या चौक्यांवर हल्ले चढविले.

पाकिस्तानचे काश्मीरमधील हे चाळे भारताच्या तत्कालीन राज्यकर्त्यांना

वेळोवेळी आणि वेळच्या वेळी समजलेच नाहीत. कारण, " The Director of the Intelligence Bureau was an officer who was about to opt for Pakistani citizenship. This individual who was earmarked for appointment as Director of Pakistan Intelligence Bureau, took full advantage of his position to transfer across to Pakistan every file of importance dealing with intelligence, leaving behind for his counter parts in India the office furniture, empty racks and cupboards ... It is therefore no exaggeration to say that on 15th August Pakistan came into being with a well established Intelligence Service, while India had only a semblance of one." General Sen–Slender was the thread. (भारताच्या) हेर खात्याचा संचालक पाकिस्तानचे नागरिकत्व स्वीकारणारी व्यक्ती होती आणि याच व्यक्तीची पाकिस्तानच्या हेरखात्याच्या संचालक पदावरची नियुक्ती निश्चित झाली होती. या व्यक्तीने आपल्या पदाचा (गैर) फायदा घेऊन महत्त्वाचा प्रत्येक कागद पाकिस्तानात पळविला असून, आपल्या मागून येणाऱ्या भारतीय अधिकाऱ्यासाठी फक्त कार्यालयाची खोली आणि खुर्च्या, टेबले एवढेच मागे ठेवले होते. १५ आगस्ट रोजी पाकिस्तानचे हेरखाते पूर्णपणे सुसज्ज होते असे म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती नाही. याउलट भारताचे हेरखाते केवळ आभास होता. जनरल सेन पुढे म्हणतात, " If Messervy (C. in C. Pakistan) did not keep Anchinleck fully informed, then one can only view the supreme commander as a rather pathetic figure badly let down by one of his senior commanders. If Auchinleck was aware of what was happening, then he was not the neutral in whom India had placed her confidance and it was a case of clear betrayal of trust." जनरल सेन पुढे म्हणतात– जर मेसर्व्हींने (पाकिस्तानचा सर सेनापती) आकिन्लेकला अंधारात ठेवले असेल तर सर्वोच्च सेनापती आपल्या एका ज्येष्ठ सेनापतीने दगा देऊन केविलवाणा बनविल्यासारखे होते आणि जर आकिन्लेकला परिस्थितीची जाणीव असेल, तर तो निर्लेप त्रयस्थ नसून भारताचा विश्वासघात करणारा ठरतो. विस्तारभयास्तव आणि स्थलाभावी या विषयाचा अधिक ऊहापोह येथे करता येत नाही. जिज्ञासूंनी जनरल सेन यांच्या Slender was the thread या ग्रंथाची पहिली चार प्रकरणे अवश्य वाचावीत. सारांश हा की, मौंटबेटन, आकिन्लेक, मेसर्व्ही आणि लॉकहार्ट या इंग्रज XXX चौकडीचे वर्तन धुतल्या तादळासारखे स्वच्छ नव्हते, असे स्पष्टपणे म्हणता येते आणि तेही बरोबरच होते. त्यांच्या डोळ्यांदेखत आणि त्यांच्याच हस्ते भारत स्वतंत्र होणे आणि ते **स्वतंत्र भारताचे पगारी चाकर**

बनणे त्यांना कसे सहन व्हावे ? या चौकडीच्या हातात भारताच्या संरक्षणाची सर्वसूत्रे दिली जाणे ही भारताच्या संरक्षणाची आणखी एक महत्त्वाची दूरपरिणामी दुष्ट व्यथा !

पाकिस्तानी सैन्याने काश्मीरमधील मुजफराबाद जाळून लुटून फस्त करून ता. २२ आक्टोबर रोजी आपल्या ताब्यात घेतले व त्याची डोमेल–उरी–बारामुल्ला या (एकच) मार्गाने श्रीनगरच्या रोखाने दौड सुरू झाल्याची, श्रीनगरनजीकच्या बडगाववर येऊन महुरा येथील विद्युत् केंद्राचा विध्वंस केला; ती तारीख २६ होती. या दरम्यानच्या काळात भारतसरकारने काहीच केले नाही. कारण काय तर काश्मीरच्या महाराजांनी सामीलनाम्यावर सही केली नव्हती. परंतु ही निष्क्रियता भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने भयंकर चूक होती. काश्मीर सामील झाले नसताना आणि त्याने मदत मागितली नसताना त्याच्या प्रदेशातून जमिनीवरून किंवा हवाई मार्गाने जाऊन पाकिस्तानी सेनेला अटकाव करणे हे ‘ पापभीरू ’ भारताला आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणे होईल, असे वाटले असावे ! काश्मीरने जरी कोणताच निर्णय घेतलेला नसला तरी त्या संस्थानाला आंतरराष्ट्रीय कायद्यात स्थान नव्हते. काश्मीर पूर्वीच्या अखंड भारताचाच एक भाग होता. इंग्रज गेल्यामुळे हिंदी संस्थानांना सार्वभौमत्वाची आपोआप प्राप्ती झालेली नव्हती. त्याला अजून-पर्यंत बराच अवकाश होता. त्यांच्याशी झालेले इंग्रजांचे करार स्थगित होऊन त्यांना निर्णय-स्वातंत्र्य मिळालेले असले तरी, काश्मीरच्या राजाने कोणताच निर्णय घेतला नव्हता. म्हणून त्या संस्थानाला आपोआपच सार्वभौमत्व मिळू शकत नव्हते. अशा स्थितीत भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या मुकाबल्यास जाणे यात काहीच गैर नव्हते. त्याशिवाय ते काश्मीरच्या हिताचेच होते. मग त्याचा काहीही निर्णय नंतर घेतला जावो !

दुसरी जी चूक भारताच्या राज्यकर्त्यांनी केली ती युद्धशास्त्रीय चूक होती. भारताने जे आत्मसंरक्षण करायला पाहिजे होते ते शत्रूला आपल्या नाजूक सीमां-बाहेर (Critical Boundaries) अटकाव करून; नकाशावरील सीमांवर नव्हे. (भारताची जुनी नकाशावरील सीमा **ड्यूरँड लाईन** ही होती. आता ती पाकि-स्तानात गेली होती). भारताने ते केले नाही हे ‘ कुपथ्य ’ केले. येथे पहिल्या जागतिक महायुद्धाच्या वेळेच्या ब्रिटिशांच्या " Defence of India begins in the Middle East " या दूरदृष्टीच्या युद्धशास्त्राशी सुसंगत असलेल्या धोरणाचा दाखला पूर्णपणे लागू पडतो. याच अक्षम्य कुपथ्यामुळे भारताच्या शरीरात पाकि-स्तानी कॅन्सर घर करू शकला.

नंतर यूनोच्या निरीक्षक मंडळाच्या म्हणण्याप्रमाणे, ता. ३१ डिसेंबर १९४८ रोजी उभय देशांच्या फौजा ज्या रेषेवर असतील ती रेषा गोळीबंद रेषा (Cease Fire Line) म्हणून उभय देशांनी मान्य केली. ही भारताच्या संरक्षणाची

आणखी एक व्यथा ! कारण ती मान्य करणे पाकिस्तानच्याच हिताचे होते. ती मान्य करून भारताने जिंकलेला प्रदेश गमावला (**मोल्टके** या सुप्रसिद्ध जर्मन युद्ध–विशारद सेनापतीचे " तलवार जे अर्ध्या तासात जिंकून घेते ते अर्धा–शतक तरी कमीतकमी आपल्या हातात घट्ट धरून ठेवले पाहिजे " अशा अर्थाचे एक व्यवहारी सुभाषित आहे. त्याला भारताच्या राज्यकर्त्यांनी प्रत्येक प्रसंगी हरताळ फासलेला आहे). पाकिस्तानाने हीच रेषा आपल्या पुढच्या युद्धाची आधार रेषा (Base Line) बनविली. त्याचा अर्थ हा झाला की त्या रेषेपर्यंतचा पाकिस्तानचा जबरदस्तीचा ताबा, आपसूकच मान्यता पावला– Possession is nine–points Law. ताबा कसा का असेना नऊ-दशांश कायदेशीर ठरतो. या कायद्याच्या काल्पनिक आधाराने (Legal Fiction) पाकिस्तान शिरजोर झाला आणि ती शिरजोरी भारताने उदारपणे सहन केली. खरी आणि न्याय्य गोळीबंद रेषा, १५ आगस्ट रोजी उभय देशांच्या फौजा जेथे असतील तीच होती. भारताने तिचाच हट्ट धरून बसणे न्याय्य होते. परंतु भारताने ते केले नाही. ही आणखी एक व्यथा.

भारताच्या व्यथांचे दुसरे उगमस्थान चीन आहे. चीन आणि तिबेट, तिबेट आणि भारत आणि त्यातून निर्माण झालेले भारत आणि चीन यांच्या परस्पर संबंधांची गुंतावळ निर्माण झालेली आहे. त्याचे कारण तिबेटचे स्वातंत्र्य, suzereignty आणि sovereignty या राज्यशास्त्रीय संज्ञांचे अर्थ आणि व्याप्ती आणि भारताला वारसा हक्काने इंग्रजाकडून मिळालेले तिबेटमधील काही हक्क या तीन बाबी आहेत.

स्वत: स्वतंत्र होताच कोणाचेही कसलेही किंचितही पारतंत्र्य न मानवणाऱ्या आणि मानवतेची कणव असलेल्या भारताने तिबेटवरील आपले सर्व हक्क आपखुषीने सोडून दिले. परंतु ते चांदीच्या तबकात ठेवून चीनला त्यांची भेट म्हणून नजर केल्यासारखा भारताच्या या निवृत्तीचा परिणाम झाला. **शिके तुटले आणि बोक्याचे फावले**. चीनने ताबडतोब तिबेटवर कबजा केला आणि आपला भारी जुलमी रोड-रोलर तिबेटवर घातला. भारताला त्याचे अतोनात दु:ख झाले. परंतु तिबेटच्या राज–धर्मगुरूला आणि दुर्दैवी तिबेटी प्रजेला अभय-स्थान देण्याशिवाय भारत अधिक काहीच करू शकत नव्हता.

पाकिस्तानच्या २२ आक्टोबर १९४७ च्या भारतावरील आक्रमणापासून सुरु झालेल्या भारताच्या व्यथेमुळे आणि त्याने मान्य केलेल्या गोळीबंद रेषेच्या नकाशावरील, भारतविरोधी भारताला अहितकारी जागेमुळे चीनला उत्तेजन मिळून तो चेकाळला. त्याने इंग्रजांच्या वेळी मान्य केलेली **मॅकमहान सीमारेषा** अमान्य केली. मनात भारताच्या फार मोठ्या प्रदेशाचा एक आकडा धरला. ती आपली नाजूक सीमारेषा (Critical Boundary) निश्चित केली आणि ती आपल्या देशाच्या संरक्षणाची रेषा मनात पक्की करून, तसे नवीन नकाशे तयार

केले. आपल्या सरहद्दी (frontiers) **एकतर्फी** ठरविल्या. सरहद्दीविषयीचे लार्ड कर्झनचे उद्गार अतिशय अर्थगर्भ आहेत : " frontiers are indeed a razor edge on which are suspended the issues of peace and war." देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमा क्षुरधारेसारख्या असतात आणि त्यांच्यावरच शांती की युद्ध हा प्रश्न टांगलेला असतो. चीनने तयार केलेले नवे नकाशे भारताने अर्थातच अमान्य केले. त्यांच्याविषयी उभय देशांत चर्चा, विचारविनिमय, करार-मदार किंवा तह यांपैकी काही एक झालेले नव्हते. जुन्या ब्रिटिश काळातल्या नकाशावरील मॅकमहान रेषेला बरेच वर्षापूर्वी चीनने सिमला परिषदेत मान्यता दिलेली असूनही, आता चीनने त्या कराराविरुद्ध वर्तन सुरू केले होते. त्यामुळे चीनचे नवे नकाशे युद्धाचे कारण ठरणारे होते. **वाल्टर लिपमनने** नकाशाविषयी एके ठिकाणी म्हटले आहे, " Every Treaty or agreement which purports to settle a mortal conflict is essentially a map." प्रत्येक अटीतटीच्या मतभेदाचे निराकरण नकाशाने होत असते. परंतु असा नकाशा उभय पक्षांनी मान्य केलेला असला पाहिजे. जुने नकाशे चीनने अमान्य केलेले आहेत आणि चीनने तयार केलेले नवे नकाशे भारत मान्य करीत नाही. तेव्हा दोघांमधला हा विवाद मिटला नाही, इतकेच नव्हे तर भारताचा जीव घेणारा (Mortal) झालेला आहे.

चीनच्या मनोनीत सीमापर्यंतचे रस्ते, सैन्याची जमवाजमव, रसद, दाणागोटा आणि दारूगोळा यांचा पुरवठा इत्यादी सर्व तयारी पूर्ण झाल्यानंतर त्याने भारतावर सप्टेंबर १९६२ मध्ये खुल्लंखुल्ला जबरदस्त हल्ला चढवला. त्याच्यापूर्वी जुलैपासून गॅलव्हान खोरे, दौलतबेग ओल्डी, नेफा इत्यादी भागांत त्याने चकमकी सुरू करून दिलेल्या होत्या. त्याच्यापूर्वी तयारीच्या काळातल्या १९६० या एका वर्षात चीनने ५२ वेळा सीमाभंग केला होता.

मनात योजलेल्या आकड्यांपैकी काही भाग चीनने सहज ताब्यात घेऊन विसाव्याकरिता किंवा परिणाम पाहण्याकरिता, आपणहून गोळीबंद केली. चीनला सबुरी होती आणि उरलेला कार्यभाग उरकण्याची खात्रीही होती. भारत, पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्याइतका ताकदवान असला तरी, चीनपुढे तो दुबळा ठरला होता आणि पुढेही ठरणार होता (आहे) हे मान्य केलेच पाहिजे. भारत–चीन युद्धात आपली नामुष्की झाली असली तरी ती इष्टापत्तीच ठरली. कारण तिच्यामुळे तत्कालीन भारताच्या राज्यकर्त्यांचे डोळे थोडेसे चुरचुरून किलकिले झाले. त्यानंतर चीनने जरी तसा मोठा उपद्रव भारताला दिलेला नसला तरी प्रत्येक भारत–पाक युद्धाच्या वेळी भारताला धमक्या दिल्या आणि निर्वाणीचे खलिते पाठविले. भारताने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. तरीही चीनने त्या धमक्या अमलात आणण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न केला नाही. याचे कारण चीनला जागतिक युद्ध पेटण्याची आणि ते युद्ध सर्वंकष Total होण्याची आणि त्या युद्धात अण्वस्त्र-

प्रयोगाची शंका आणि भीती वाटली असावी ! भारत–चीन युद्धाच्या वेळी त्याचे रशियाशी असलेले संबंध इतके विघडलेले नव्हते आणि त्याचे अण्वस्त्र 'सिद्ध' झालेले नव्हते.

याही परिस्थितीत भारताने चीनला यूनोत प्रवेश मिळवून देण्याचे प्रयत्न चालू ठेवले होते. पाकिस्तानविरुद्ध केलेल्या भारताच्या तक्रारीचा कटू अनुभव येऊनसुद्धा, इच्छाचिंतन आणि स्वप्नरंजन यात मश्गुल असलेल्या भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांची अशी भोळी भावना असावी की, यूनोचा एक सभासद या नात्याने चीनला मनाची नसली तरी जनाची काही तरी (?) वाटेल, आणि त्यांचे हृदय-परिवर्तन होईल. १९६२ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या २१ तारखेला चीनने गोळीबंद केल्याचे जाहीर केले. त्याविषयी भारताच्या संरक्षण मंत्रालयाचे १९६२–६३ सालचे इतिवृत्त सांगते, " The Chines were opening fire on our several posts even after the unilateral cease fire." एकतर्फी युद्धबंदी-नंतरही भारताच्या कित्येक चौक्यांवर चीनची गोळी चालूच होती. १९७७–७८ चे ताजे इतिवृत्त सांगते, " There is little change in our security environment ... ... The threat to our security continues." (भारताच्या) सुरक्षिततेच्या वातावरणात काहीही (हितावह) बदल नाही. आपल्या सुरक्षिततेला असलेला धोका कायमच आहे. भारताला जडलेली चीनची व्याधी **राजयक्ष्मा** आहे. या रोगावर अजूनपर्यंत तरी शस्त्र-क्रियेचा उपाय उपलब्ध झालेला नाही. लाक्षणिक अर्थाने नव्हे. भारत चीनशी यशस्वी लढाई करण्याइतका समर्थ व्हायला भारताला बराच काळ आणि फारमोठे आर्थिक, वैज्ञानिक तसेच मानुषी सामर्थ्य संपादन करावे लागेल.

पाकिस्तानपासून उद्‌भवलेल्या व्याधीचा प्रकार निराळा आहे त्यावर शस्त्र-क्रिया हाच रामबाण इलाज आहे. त्याला लागणारे शल्य–शास्त्र–कौशल्य आणि पुरून उरणारे सामरिक सामर्थ्य भारताच्या (जवानांच्या) सर्जन्स्‌च्या गाठी आहे. परंतु त्यांना एकही ऑपरेशन पुरे करू दिले नाही. पहिलेच ऑपरेशन पुरे झाले असते तर नंतरची ऑपरेशनस् करण्यासाठी रुग्ण पाकिस्तानला ऑपरेशन टेबलावर आडवा करण्याचे कारण पडले नसते. आणि पहिल्याच पूर्ण आणि यशस्वी ऑपरेशनच्या दृश्यामुळे, चीनने भारतावर अशी चढाई केली नसती. पहिल्याच व्याधीचे मूळ उपटून फेकता आले असते तर दुसरी व्याधी दूर राहिली असती.

महत्त्वाच्या क्रमात भारताचे विभाजन झाले ही पहिली व्यथा आणि पहिले ऑपरेशन पूर्ण झाले नाही ही दुसरी व्यथा आणि त्याकारणानेच चीनचा राज-यक्ष्मा भारताच्या शरीरात उद्‌भवला ही तिसरी व्यथा. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू या व्यथांचा वारसा त्यांच्यामागून येणाऱ्या पंतप्रधाना-साठी मागे ठेवून पंचत्व पावले; असे त्यांचे कर्तृत्व, लोकमानसावरचे प्रभुत्व,

असामान्य व्यक्तिमत्त्व आणि जागतिक कौतुक मान्य करूनही म्हणावे लागते. गमावलेली इंचइंच भूमी (जिथे गवताची काडीसुद्धा उगवत नाही त्या भूमीसकट) परत घेण्याचीही नेहरूंनी घोषणा केलेली होती. ती घोषणाही वारसदारीच्या नात्याने त्यांच्यामागून आलेल्या भारताच्या दोन पंतप्रधानांनी केलेली होती. प्रश्न आहे हे केव्हा आणि कसे घडून येणार ? ही व्यथित करणारी चिंता भारतीयांना लागलेली आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू गेले. भारताला अतिशय दुःख झाले. "आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना." "The King (Queen) is dead. Long live the King (Queen)." राजा (राणी) दिवंगत झाला. नवा (राजा (राणी) चिरायू होवो ! या इंग्रजांच्या वृत्तीने भारताने लालबहादुर–शास्त्रीजींचे स्वागत केले. टपून बसलेल्या पाकिस्तानने कच्छची कुरापत काढली. शास्त्रीजींनी ब्रिटिश पंतप्रधानाच्या त्या बाबतीतला अन्यायी लवाद मान्य केला. ही त्यांनी भारताला दिलेली पहिली व्यथा. नंतर भारत–पाकिस्तान घनघोर युद्ध झाले. परंतु ते मध्येच थांबविण्याला सम्मती देऊन शास्त्रीजी ताश्कंदला गेले.तेथे त्यांनी भारताला अनहितकारक ठरणाऱ्या (नंतर) एका दस्तैवजावर स्वाक्षरी करून भारताला दुसरी व्यथा दिली आणि योगायोग (अत्यंत दुःखकारक आणि दुर्दैवी) असा की– स्वाक्षरीची शाई वाळण्याच्या आतच भारताच्या मोठ्या मनाच्या या छोट्या आदरणीय आदमीने भारताचा आणि जगाचा परदेशातच तेथल्या तेथे कायमचा निरोप घेतला.

मग आल्या इंदिराजी. आता पाकिस्तानाने पूर्व आणि पश्चिम या दोन टोकांच्या दोन आघाड्यांवर भारताशी युद्ध मांडले. शत्रू इंदिराजींना बेसावध गाठू शकला नाही. त्यांनी आपल्या तिन्ही सेनादलांना एकसाथ काहीही हाती न राखून ठेवता, युद्ध करण्याचे संपूर्ण अधिकार (Complete delegation o power) देऊन टाकले. त्यामुळे तिन्ही सेनादलांना सर्वोत्तम सहकार्याने पू आघाडीवर विद्युत्वेगाने अपूर्व विजय मिळवून 'सोनार बांगला' मुक्त करत आला आणि भारताच्या सेना पश्चिम आघाडीवर शत्रूला तडाखे देत मागे मा रेटीत सुटल्या. याचे श्रेय इंदिराजींनाही देणे योग्य होईल.

परंतु काही विशेष कारणामुळे भारताच्या सैन्याने पश्चिम आघाडीव पाकिस्तानला युद्धबंदीचे आवाहन करून तूर्तास जीव वाचविण्याची संधी दिल ती का ?

मुक्त केलेला सोनार बांगला भारताशी बरोबरीच्या बंधुभावाने बां घेतला नाही. ही संरक्षणाच्या दृष्टीने एक अधिकची व्यथा निर्माण झाली. इंदिराजींच्या कारकिर्दीतली व्यथा आहे. भारताच्या घटनेच्या पहिल्या भागा तिसऱ्या कलमाच्या सी (C) या पोट कलमात म्हटले आहे, " Such oth

territories as may be acquired." मिळविलेले दुसरे प्रदेश मिळून " India, that is Bharat, shall be a Union of States. " (भाग १, कलम १, पोट कलम १) इंडिया म्हणजे भारत एक राज्यांचा संघ बनेल. बांगला देश भारताविषयी पराकाष्ठेचा कृतज्ञ होता. त्या देशाच्या प्रजाजनात व्यक्तीच्या नावाखेरीज दुसरी कसलीच मुसलमानी नव्हती. त्यांची संस्कृती हिंदू होती आणि त्याबद्दल त्यांना अभिमानही होता. त्यांना भारतीय थोर पुरुषांविषयी आदर होता आणि म्हणूनच त्यांना 'मुसलमान' बनविण्याकरिता पश्चिम पाकिस्तानने त्यांच्यावर इतके अनन्वित अत्याचार केलेले होते. अशा परिस्थितीत बांगला देशाचे-स्वातंत्र्य कायम ठेवून तो देश भारताशी एका खास नात्याने संलग्न करून घेता आला असता–काश्मीर जरी भारताचा अविभाज्य भाग आहे तरी त्याला घटनेने थोडी वेगळी वर्तणूक दिलेली आहे. बांगला देशाला त्यापेक्षा अधिक, भारताच्या बरोबरीचे हक्क देऊन संलग्न करून घेता आले असते. त्याला ती वेळ अतिशय अनुकूल होती. नाही तरी भारताची घटना (Unitary) आणि (Federal) अशी मिश्र स्वरूपाची आहेच !

ह्याकरिता घटनेत जरूर तो बदल सहज करून घेता आला असता. असे झाले असते तरी भारताला विस्तारवादी म्हणता आले नसते कारण तो राजीखुषीचा व्यवहार झाला असता. परंतु या विषयाचा कोणीही त्यावेळी विचार केल्याचे दिसत नाही. याला दृष्टिमांद्य म्हणता येईल. हे जर झाले असते तर भारताच्या पूर्व दिशेच्या संरक्षणाची चिंता करण्याचे कारणच उरले नसते आणि मुजीब–उर्–रहिमान यांची कुटुंब-कबिल्यासह निर्घृण हत्याही झाली नसती.

भारताच्या संरक्षणाची मागील अंकावरून पुढे चालू असलेली अशी ही व्यथांची चिंताजनक कथा आहे–अनेक व्यथायुक्त उपकथा असलेले प्रचंड महा-भारत आहे.

१४

समर्थ भारत

भारत स्वतंत्र झाल्याने त्याला आंतरराष्ट्रीय प्रांगणात दुसऱ्या स्वतंत्र देशांच्या बरोबरीचे स्थान मिळाले. आंतरराष्ट्रीय राजकारण, समान राज्यांच्या परस्परसंबंधातील राजकारण असते. राज्याचा आकार, लोकसंख्या, सबल-दुर्बलत्व इत्यादीपैकी एकही बाब या समानत्वाला बाधा आणू शकत नाही. प्रत्येक स्वतंत्र राज्य स्वतःला समर्थातल्या समर्थ राज्याच्या बरोबरीचे गणू शकते आणि कोणीही त्याचा हा दर्जा नैतिकतः अमान्य करू शकत नाही. भारताला हे स्थान तो परतंत्र असतानाच मिळालेले होते.

दुसरे जागतिक महायुद्ध चालू असताना चार 'वडयांनी' स्थापन केलेल्या संयुक्त राष्ट्रसंघात भारताला संस्थापक सदस्यत्व बहाल केले गेले होते. हा 'संघ' ज्या देशांनी 'अक्षपक्षा' विरुद्ध (Axis) मार्च १९४५ च्या पूर्वी युद्ध जाहीर केले होते आणि जे या संघाचे सभासद झाले त्यांचाच फक्त एक 'गट' होता– (आहे). या गटात नसलेली किंवा मज्जाव झालेली काही स्वतंत्र राज्ये आहेत. यावरून असे दिसून येते की हा संघ–'यूनो' खुला–विश्वव्यापी नाही. त्याच्यात सभासदत्व मिळण्यासाठी फक्त सार्वभौमत्वच पुरेसे होत नाही. वडयांची मर्जीही लागते.

Peace or War या ग्रंथाचा लेखक **रिचर्ड-रोजक्रेन** म्हणतो, " The elimination or modera-

tion of conflict has in fact become the predominant goal of International Relations." राज्यांचा आपसातील झगडा नष्ट करणे किंवा राज्यात संयम उत्पन्न करणे हेच आंतर-राष्ट्रीय (सु) संबंधांचे प्रधान उद्दिष्ट झाले आहे. सी. डेल फुलर याने Training of specialists in International Relations या ग्रंथात "Those activities in the intercourse of Nation States which make for War or Peace," युद्ध किंवा शांति-प्रीत्यर्थ्य राष्ट्र राज्यांनी केलेल्या उद्योगाला आंतरराष्ट्रीय संबंध हे नाव दिले आहे. या उद्योगाविषयी, या उद्धरणाच्यावरील उद्धरणाचा लेखक रिचर्ड रोजक्रेन याने मार्मिक उद्गार काढले आहेत. तो म्हणतो, "Throughout history theories were developed to prevent the *last war*, but with little application to future wars." लढून झालेली युद्धे न व्हावीत म्हणून, जे सिद्धांत विकसित केले गेले, ते आगामी युद्धांना लागू पडणारे नाहीत, असाच आजपर्यंतचा इतिहास आहे. "The more there is of yours, the less there is of mine" तुझ्याजवळ जितके जे अधिक ते तितके माझ्याजवळ कमी हे Alice in wonder land या पुस्तकात सांगितलेले तत्त्व आंतरराष्ट्रीय संबंध बिघडवीत असते. आतरराष्ट्रीय सु-संबंधामुळे युद्ध थांबले नाही आणि शांतीही प्रस्थापित झालेली नाही. त्याला आणखीही एक कारण आहे. ते कारण आहे–स्वराष्ट्राभिमान विरुद्ध आंतरराष्ट्रीय–पर-राष्ट्रीय सुख संवाद. "काजीजी, दुबले क्यों ? शहर का अंदेशा." शहराचे कसे होईल या काळजीने काजीजी रोड झाले. जगाला शांती मिळावी या काळजीने स्वतंत्र भारत स्व-सामर्थ्याविषयी निष्काळजीपणाने वागला.

आंतर-राष्ट्रीय संबंधातच नव्हे–सर्व प्रकारच्या संबंधात लोकमताचा प्रभाव पडत असतो. लोक काय म्हणतील, याचा भारत जितका विचार करतो तितका क्वचितच दुसरा एखादा देश करीत असेल ! जवाहरलाल नेहरू पाकिस्तानविरुद्ध 'यूनोत' तक्रार घेऊन गेले तेव्हा, पाकिस्तानने आक्रमण करून भारतावर युद्ध लादले हे संयुक्त राष्ट्रसंघाला आणि जगाला सांगावे, युद्ध-खोरीचा भारताला बोल लावू नये, हाच मुख्य उद्देश होता. १९७१ च्या भारत–पाक युद्धाच्या आधी, त्यावेळच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी जातीने सोव्हिएट रशिया, बेल्जम, आस्ट्रिया आणि ग्रेटब्रिटन या देशांना भेटी दिल्या होत्या आणि दुसऱ्या देशांना प्रतिनिधी पाठविले होते. सर्व मिळून देशांची संख्या चाळीस होती. त्या देशात जाऊन लोकमत आपल्या बाजूचे करण्याकरिता सांगितले गेले होते, "पाहा हो, हा पाकिस्तान कसा वागतो आहे ! आम्ही हे कुठवर सहन करावे ?" इतर बरेच देश हा आटापिटा न करता त्यांच्या देशाला जे हितकर ते बेधडक करतात. त्यांचा पवित्रा My Country–Right or Wrong बरोबर असो वा नसो ! –माझा देश ! हा असते. स्वराष्ट्राभिमान की आंतरराष्ट्रीय सुखसंवाद ? या प्रश्नात ते काला-

पव्यय करीत नाहीत; आणि फजीतही होत नाहीत. प्रत्येक राष्ट्राचे एक स्वतःचे व्यक्तिमत्त्व असते–अस्मिता असते. तिचे संरक्षण हे त्या राष्ट्राचे आद्य आणि पवित्र कर्तव्य असते. फक्त पार्थिव सरहद्दीचे संरक्षण हे संपूर्ण संरक्षण नव्हे.

भारत अलिप्त आहे (अलिप्त, तटस्थ, उदासीन, निःपक्षपाती हे शब्द समानार्थी भावाने वापरले जात असले तरी, त्यांच्या अर्थात विशिष्ट श्लेष आहेत). तो कोणत्याही सत्तागटात कोणत्याही कारणाकरिता सामील झालेला नाही. Military institutions and power in New States या ग्रंथात **विल्यम गटरीज** म्हणतो, " Neutralism and reasonable military provision are not incompatible in the present situation. A neutral nation which neglects its own defences increases its reliance on foreign aid and at the same time diminishes its capacity to initiate Inter–National action by example." प्रस्तुत परिस्थितीत अलिप्तता आणि स्वसंरक्षणाची उचित लष्करी तरतूद विसगत नाही. आत्मरक्षणाकडे दुर्लक्ष करणारे अलिप्त देश, आपले परावलंबित्व वाढवितात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातली स्वतःची उपक्रमशीलता क्षीण करतात.

भारत स्वतंत्र झाला तो 'जेलयात्रा' आणि 'चले जाव' म्हटल्यानेच झाला; अशी सत्तारूढ पक्षातील मोठमोठ्या श्रेष्ठींनी आपली समजूत करून घेतली असल्याकारणाने, त्यांना सशस्त्र सेनादलांची मुळीच आवश्यकता वाटत नव्हती. स्वातंत्र्यदिन समारंभात प्रधानमंत्र्याला (राष्ट्रपतीला नव्हे !) सलामी देणे, एवढाच सेनेचा उपयोग, असे त्यांना वाटत होते. सेनादले पोसलीच तर ती लहान करून त्यांना काँग्रेसच्या **रचनात्मक कार्यक्रमाला** (Constructive Programme) जुंपावे, असे ते म्हणत होते. या धारणेच्या कारणाने भारताची लष्करी उद्दिष्टे (Military Objectives) जी तावडतोब निश्चित करणे जरूर होते ते केले गेले नाही.

भारताने कोणत्याही सत्ता–गटात सामील न होण्याचे कारण, त्याला स्वावलंबनानेच बनेल तसे आत्मसंरक्षण करावयाचे आहे. परंतु या पवित्र्याने, दुसऱ्या देशांनी संघटितपणे भारताची सुरक्षितता धोक्यात आणण्याची परिस्थिती नाकारता येत नाही. पाकिस्तानने अनेक देशांकडून जे सामरिक सामर्थ्य मिळविले आहे आणि स्वतःचेही वाढविले आहे, ते संघटितपणे भारताला पराभूत करण्याकरिताच. (त्यात त्याला यश मिळालेले नाही, हा भाग वेगळा.) चिनी किंवा पाकिस्तानी फौजांबरोबर, दुसऱ्या देशांच्या फौजा किंवा पाकिस्तान आणि चीन यांच्या फौजा संयुक्तपणे अजूनपर्यंत लढल्या नसल्या तरी, ती शक्यता नाकारता येत नाही. भारत त्याला तयार आहे ही भारताची अभिमानास्पद **जमेची बाजू** आहे. तो अमेरिकेच्या 'छत्रीच्या डावपेचात' (Umbrella Strategy) गुरफटला गेला नाही; ही परम सौभाग्याची गोष्ट झाली.

आपल्यावर कोणी विनाकारण आक्रमण कशाला करील ? आपल्याला संरक्षणाचा विचार करण्याची गरजच काय ? या भोळ्या भरवशावर विसंबून राहिल्यामुळे स्वतंत्र होताक्षणीच संरक्षणाचा विचार करून आपली लष्करी उद्दिष्टे निश्चित करायला हवी होती. ते निकडीचे काम केले नाही. त्याचे राजकीय धोरण अलिप्तता आणि उद्दिष्ट जगत्–शांती हे आहे. त्याला चपराक बसायला दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ लागला नाही, मनातली धीरोदात्त उद्दिष्टे, 'क्रियेवीण' संरक्षण देऊ शकत नाहीत. ते सर्व व्यर्थ वाचाळताच ठरते.

आता एका जगाची **तीन जगे** वनविण्यात आली आहेत. पश्चिमी राष्ट्रे हे पहिले जग, साम्यवादी (Communist) राष्ट्रे हे दुसरे जग. आशिया, आफ्रिका, मध्ययूरोप आणि लॅटिन अमेरिका यांना तिसऱ्या जगात कोंबले गेलेले आहे. पहिल्या आणि तिसऱ्या जगातील अलिप्त राष्ट्रांच्या अलीकडे परिषदा भरू लागल्या आहेत. त्याचा अर्थ अलिप्त राष्ट्रांचाही एक गट बनला आहे. भारत अलिप्त राष्ट्रांच्या परिषदांना हजर असतो. याचा अर्थ भारतानेही आता एका गटात प्रवेश केला आहे. त्याचे Non-Alignment चे तत्त्व त्याने स्थगित केले आहे असा होऊ शकतो.

या अलिप्त राष्ट्रांच्या युतीला Unity is strength-ऐक्य हीच शक्ती या तत्त्वानुसार सामर्थ्य प्राप्त झाले पाहिजे. त्याला जर काही करता सामर्थ्य प्राप्त झालेच तर ते नुसत्या इच्छाचिंतनाचेच असेल ! परंतु हे सामर्थ्य कोणाचेही कशापासूनही संरक्षण करू शकणार नाही (भारताला त्याचा अनुभव आलेला आहे.) अशा प्रकारच्या सामर्थ्याकरिता, भारताने अलिप्त गटात दाखल होण्याने, त्याच्या तत्त्वाला हरताळ फासल्यासारखे होईल. या गटातील सभासद आपत्काली परस्परांना कोणती आणि कशी मदत करणार, करू शकतील हा एक प्रश्न आहे. शांतीच्या आणि अलिप्ततेच्या उद्घोषाने युद्ध बंद झाले नाही आणि जगाच्या नीतिमत्तेत भरही पडलेली नाही. "सामर्थ्याशिवाय (निराळ्याच प्रकारच्या) न्यायाला क्लैव्य येते. अन्यायी सामर्थ्य म्हणजे जुलूमजबरदस्तीचे साधन" अशा अर्थाचे **पास्कलचे** एक वचन आहे.

भारत आंतरराष्ट्रीय राजकारणात जसा अलिप्त आहे तसाच तो धर्मकारणातही अलिप्त (Secular) आहे. एनसायक्लोपीडिया अमेरिकाना निधर्मीपणाची Secularism ची अशी व्याख्या करतो–" Secularism means a creed where human well–being is contemplated, here in this world, and during the span of life and not beyond." निधर्मीपणा म्हणजे येथे, या जगात, मानवाच्या जीवितकालात, मरणोत्तर नव्हे, त्याचे कल्याण चिंतिणारा पंथ (किंवा श्रद्धा). त्याच विश्वकोशाची नीतीची व्याख्या अशी आहे– " Ethics means organisation of human life in the present con-

text on the four tenets Freedom, Equality, Equity and Secularism in the case of a nation its constitution." संघटित मानवी जीवनाच्या संदर्भात नीती म्हणजे स्वातंत्र्य, समता, न्याय आणि निधार्मिकता ही चार तत्त्वे आणि राष्ट्राच्या संबंधात त्या देशाची घटना. हा कोश घटनेला नीतीचे स्थान देतो. नयनीती जितकी पवित्र आणि आदरणीय तितकीच त्या राष्ट्राची घटना आदरणीय ! (असली पाहिजे). **व्हॉलटेयरने** घटनेविषयी मोठे विलक्षण उद्गार काढलेले आहेत " The constitution is a virgin who in order to bear fruit must be violated." घटना ही फलित होण्याकरिता बलात्कार करावा लागणारी कुमारी आहे. सरळ अर्थ हा की घटना बदलता येते. तिला नयनीतीच्या बरोबरीचे स्थान दिले जाऊ शकत नाही. इतक्या थोड्या काळात भारताच्या घटनेत जितक्या दुरुस्त्या बदल झाले आहेत तितके दुसऱ्या एकाही देशाच्या घटनेत झालेले नाहीत. याचे कारण भारताची घटना नीतीच्या बरोबर येण्याइतकी परिपक्व झालेली नाही. किंवा ती घडवितानाच तिच्या भविष्याचा, रचनाकारांना अंदाज लागला नाही, किंवा भावी राज्यकर्त्यांना घटनेला आपल्या सोयीप्रमाणे राबविण्याची दिक्कत वाटली नाही. ब्रिटिशांच्या राज्याची लिखित घटनाच नाही !

ख्रिस्त्यांच्या रोमन कॅथॉलिक पंथाच्या धर्मगुरूचे प्राचीन ग्रीक नगर राज्या-सारखे **व्हॅटिकन** नावाचे एक स्वतंत्र राज्य आहे. त्याला आंतरराष्ट्रीय–राजकीय स्थान नाही. कारण ते धर्मराज्य आहे. तरीही पोपच्या दरबारात भारताचा प्रति-निधी आहे. भारताचा निधर्मीपणा असा आहे (त्याचा संरक्षणाशी संबंध नाही हे मान्य !). परराज्यात वकील असण्याला आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थ असतो. दुसऱ्या देशांचे व्हॅटिकन राज्यात वकील आहेत. असतील ! निधर्मी भारताने दुसरे करतात म्हणूनच केवळ ते का करावे ?

व्ही. बी. कुलकर्णी यांनी आपल्या Is India a Big Power या पुस्तकात भारत हा एक समर्थ देश आणि महान लोकशाही (" As the one great power and democracy.") असल्याचे **ॲडलाय स्टीव्हन्सन** याचे उद्गार आणि ब्रिटिश परराष्ट्र मंत्री **डग्लस होम** यांची, " समर्थ झालेला भारत पुढील वर्षांत आपल्या अधिकारात आणि प्रभावात भर घालील" (" India which had already become a powerful nation would add to its authority and influ-ence in the coming years") ही भविष्यवाणी उद्धृत केली आहे.

परंतु भारताने या शिफारसीमुळे किंवा चापलुशीमुळे फसून स्वतःला कृतकृत्य समजता कामा नये. जोपर्यंत पाकिस्तान आणि चीन या भारताच्या उघड शत्रूंच्या वेगवेगळ्या आणि संयुक्त सामरिक सामर्थ्याला पुरून उरण्याइतके सामरिक सामर्थ्य भारत मिळवीत नाही, तोपर्यंत, कोणताही आशावाद आणि कोणाचीही भविष्यवाणी फलद्रूप होण्याची आशा करणे, ही गाफिलगिरी ठरेल. धूर्तशिरोमणी

चर्चिल म्हणतो, " Mistrust is the soul of politics and philosophy " गैरविश्वास हा राजकारण आणि तत्त्वज्ञान यांचा आत्मा आहे. चाणक्यानेही राजकारणाविषयी तेच म्हटलेले आहे.

रेमंड अॅरन On war या ग्रंथात म्हणतो, " Through out history superiority has been essentially due to armaments and organisation which together reflected the capacity of the state for production and a capacity to maintain order. Not that conquering nations were always superior in respect of cultural values." देशाच्या लष्करी श्रेष्ठत्वाचा आधार त्याची शस्त्रास्त्रसमृद्धी, सेनादल–संघटना, निर्मितिक्षमता आणि सुव्यवस्था राखण्याची शक्ती हे असतात. जेत्यांची सांस्कृतिक मूल्ये श्रेष्ठ होती, म्हणून ते विजयी झाले नव्हते; असा सबंध इतिहासाचा दाखला आहे. हाच भारताचाही इतिहास आहे. मुसलमान, मुघल, ख्रिस्ती, इंग्रज भारताचे 'स्वामी' झाले होते, ते त्यांचा धर्म अथवा संस्कृती, भारतीयांच्या धर्मापेक्षा आणि संस्कृतीपेक्षा उजवी होती म्हणून नव्हे; तर त्याची कारणे वर दिलेली असून त्याशिवाय दुसरीही होती.

लष्कराला विशेष महत्त्व किंवा 'लष्करवाद'–Militarism या संज्ञेविषयी एन्सायक्लोपीडिया अमेरिकॅना हा विश्वकोश म्हणतो, " Militarism...preparation for war encourages the growth of militaristic spirit, to strengthen the combatants for battle." युद्धाची तयारी क्षात्रवृत्तीला उत्तेजन देऊन योद्ध्यांना बलसंपन्न करते. परंतु याकरिता परकीय कोशाकडे जाण्याचे कारण नाही. महाभारताच्या शांतिपर्वात भीष्मपितामहांनी ते आधीच सांगितले आहे. (अध्याय ९५.) त्याच्यापूर्वी रामाने सीतेला सांगितले होते. वनवासात असताना सीता रामास म्हणते, " तुम्ही अष्टौप्रहर धनुष्यबाण बाळगता त्यामुळे तुमच्यात अविचारी हिंसक वृत्ती उत्पन्न होईल." त्यावर रामाचे उत्तर होते, " तसे मी न केले तर माझी क्षात्रवृत्ती नष्ट होईल. (सुंदरकांड.) त्याच्याहीपूर्वी ऋग्वेदाने सांगून ठेवलेले आहे " " अनायुधास आसतां सचंताम् । " जे निःशस्त्र असतात ते दुःखभोगी असतात. असा भारताचा प्राचीन सांस्कृतिक इतिहास आहे. A Nation is what history makes of it. नंतरचा इतिहास वेगळा झाला म्हणून भारताला पारतंत्र्य भोगावे लागले.

भारतासारखाच स्वित्झरलंडही एक अलिप्त देश आहे. त्या देशात भारतासारख्याच अनेक भाषा, अनेक धर्मपंथ आणि अनेक राज्ये (Cantons) आहेत परंतु तो चिमुकला देश **शस्त्रसज्ज राष्ट्र**-Nation in Arms आहे. म्हणूनच त्याच्यावर गेल्या ४०० वर्षांत कोणी रायफल रोखू धजला नाही. अलिप्त भारतालाही 'शस्त्रसज्जराष्ट्र' बनावे लागेल. तरच त्याच्या अलिप्ततेला अर्थ

उत्पन्न होईल. त्याशिवाय भारताच्या प्रत्येक नागरिकाने भारताचा खड्गहस्त Sword Arm बनले पाहिजे. धूर्त इंग्रजांनी ' फोडा व झोडा ' आणि ' चढवा व पाडा ' या कुटिल नीतीने, पंजाबला हिंदुस्थानचा खड्गहस्त ही पदवी बहाल केली होती. तो दुष्ट इतिहास पुसून टाकला पाहिजे.

परंतु भारताने एवढेच करून भागणार नाही. त्याचे सामर्थ्य सर्वांग-परिपूर्ण होणार नाही, कारण George Juenger एका ठिकाणी म्हणतो, " Technical progress and conduct of warfare to day are merging. We have reached a stage and state of affairs, where technical potentialities of a State is the determining factor in the even of war. Superior technology means victory, inferior technology means defeat." तांत्रिक प्रगती आणि ' रणरीती ' एकजीव होत आहेत. आता आपण या मुक्कामाला येऊन पोहोचलो आहोत, जेथे देशाच्या संभाव्य शक्ती, युद्धात निर्णायक ठरतात. श्रेष्ठ तंत्र-विज्ञान म्हणजे यश, निकृष्ट म्हणजे पराभव.

Military management for Defence या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत अमेरिकेचा जनरल T. MC Narvey लिहितो, " The effective utilisation of man power, money and material resources by the armed forces has become an absolute necessity. The national interest demand an effective Defence. Establishment that is capable of expeditious and decisive action. Technological Revolution has over taken defence." मनुष्यबळ, द्रव्यबळ आणि साधनबळ यांचा सशस्त्र सेनादलांनी परिणामकारक उपयोग करणे अगत्याचे झाले आहे. अविलंबेकरून निर्णय घेऊन ते कठोर निर्धाराने अमलात आणण्याची क्षमता असलेली संरक्षण-योजना, ही राष्ट्रहिताची निकडीची गरज आहे. तंत्रवैज्ञानिक क्रांतीने आता संरक्षणाला मागे टाकले आहे.

औद्योगिक 'कमरबंदी' (Industrial mobilisation) ही एक नवी संकल्पना आता लष्करी कोशात आली आहे असे **बाल्डविन** World War I या ग्रंथात म्हणतो. जर्मनीच्या सामरिक श्रेष्ठत्वाचे मर्म लोण्याचे उत्पादन नसून तोफांचे उत्पादन होते. (Production of Guns not butter) असा **गोअरिंगला** गर्व होता. कॉलबर्टने असा सिद्धांत मांडलेला आहे की व्यापार आर्थिक समृद्धीचा उगम असतो आणि आर्थिक समृद्धी युद्धाचा आधार असते. असे जरी असले तरी, " The Budget has to take care of both the Sword and the Plough " (Raymond Allon–On war). देशाच्या अंदाजपत्रकाने तलवारीची काळजी घेतली पाहिजे तशीच नांगराचीही काळजी घेतली पाहिजे.

वरील विवेचनावरून भारताने कोणकोणत्या क्षेत्रात ' समर्थ ' झाले पाहिजे

याची कल्पना यावी. भारत–चीन युद्धाचे पूर्वी उभय देशांनी संयुक्तपणे उद्घोषित केलेल्या पंचशीलने किंवा ज्यांना एक इंग्रज लेखक भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा आधार असलेल्या पाचशिला म्हणतो त्यांनी, भारताचे संरक्षण झाले नाही. एक 'कल्याणकारी राज्य' यापेक्षा भारताच्या अस्मितेला अधिक गंभीर आणि गौरवास्पद अर्थ आहे; हे 'पुढिलांना' प्रतीत झाले पाहिजे. गेल्या तीस वर्षांत तसे काहीच झालेले नाही ही भयंकर 'व्यथा' इतर व्यथांचे उगमस्थान आहे. भारताचे पंचशील अथवा त्याच्या आत्मरक्षणाच्या पाच 'आधारशिला' (१) जाज्वल्य राष्ट्राभिमान, (२) एकात्मभाव, (३) आर्थिक शक्ती, (४) तांत्रिक आणि वैज्ञानिक युक्ती आणि (५) सामरिक सामर्थ्य या मानल्या गेल्या पाहिजेत. भारताने हे जे सामर्थ्य मिळवावयाचे आहे आणि आत्मरक्षण करावयाचे आहे ते त्याच्या स्वतःच्या बळावर. भारताला आत्म–स्व–संरक्षण करावयाचे म्हणजे, त्याने नयनीती, संस्कृती आणि अस्मिता यांचेही संरक्षण करावयाचे आहे, फक्त नकाशावर काढलेल्या रेषांचेच नव्हे. सुरक्षितता आणि गुप्तता यांच्या आवश्यकतेचे अवधान ठेवूनही, असे म्हणावे लागते की, लोकांना आपल्या देशाच्या संरक्षणाची खरी परिस्थिती अभ्यासण्याची संधी मिळालेली नाही आणि लोकांनीही त्याविषयी अधिक उत्सुकता दाखविलेली नाही. " कोणत्याही आक्रमणाला तोंड देण्यास देश सिद्ध आहे " अशा सरकारी घोषणा मधूनमधून होत असतात. परंतु सरकारने लोकांना यापेक्षा अधिक विश्वासात घेतले पाहिजे आणि लोकांनीही आपल्या देशाच्या संरक्षणात अधिक 'रस' घेतला पाहिजे.

लढाई सुरू झाली म्हणजे सभांना आणि तावातावाने केलेल्या भाषणांना ऊत येतो. मुंबईला नटी उघड्या ट्रकस्मधून स्वतःच्या मिरवणुकी काढून आपल्यावर खऱ्याखोटया डागिन्यांचा आणि नोटांचा पाऊस पाडून घेतात. विद्यार्थी बूटपॉलिश करून मिळविलेले पैसे वॉर फंडाला देतात. झेड्. पी. देशाला रणगाडे दिल्याचे जाहीर करतात. सुगृहिणी जवानांकरिता रंगीबेरंगी स्वेटर विणतात आणि कुरडाया, पापड्या, लोणची तयार करतात. उच्चपदस्थ मडमा नटूनथटून बरोबर फोटोग्राफर घेऊन रेल्वे स्टेशनावर जातात आणि आगगाड्यांतून प्रवास करणाऱ्या जवानांना बिडी, सिगारेट, चहा, संत्री, केळी वाटतात. युद्ध संपले की पुन्हा युद्ध सुरू होईपर्यंत हा 'रस' आटलेला असतो. असा गेल्या पंचवीस वर्षांचा इतिहास आहे.

१५

उपसंहार

संरक्षण हा एक तात्पुरता उपाय आहे. चढाईकरिता, पुरेशी शक्ती संघटित करण्याकरिता, आपली व्यूहरचना दुरुस्त करून किंवा बदलून स्थगित केलेली चढाई पुन्हा सुरू करण्याकरिता, शत्रूला डांबून ठेवून (fix the enemy) त्याच्या कमजोर मर्मावर अचानक चढाई करण्याकरिता, हा उपाय योजावयाचा असतो. वास्तविक आक्रमण हेच उत्तम संरक्षण असते (Attack is the best Defence). हे युद्धशास्त्राचे तत्त्व आहे. युद्ध हे संरक्षणाचे साधन आहे आणि राष्ट्राचे धोरण यशस्वी करण्याचा पर्यायी आणि अंतिम उपाय आहे. युद्धाचे तीन पवित्रे आहेत. १. आक्रमण, २. संरक्षण, ३. यथास्थिती-जैसे थे (Status Quo).

भारताला पहिला पवित्रा वर्ज्य आहे. त्याचा दुसरा संरक्षण हाच कायमचा पवित्रा राहणार आहे. भारताच्या या पवित्र्याचा गाभा–मूलाधार 'यथास्थिती' हा तिसरा पवित्रा आहे. परंतु येथे प्रश्न उत्पन्न होतो यथास्थिती म्हणजे कोणती–केव्हाची ? खरे पाहू गेले असता, भारतावरील ब्रिटिश सत्ता संपली त्यावेळची **अखंड भारताची जी स्थिती होती तीच ' यथास्थिती '.** परंतु भारताचे विभाजन झालेले आहे आणि त्याचे परिणामही भारत भोगतो आहे. भारत पुन्हा अखंड होईपर्यंत भारत आणि पाकिस्तान यांच्या विभाजनाने ठरविल्या गेलेल्या सीमारेषा आणि इंग्रजांकडून भारताकडे

वारसा हक्काने आलेली त्याची आणि चीनची **मॅकमहान लाईन** ही सीमा हीच १५ आगस्ट १९४७ पासूनची 'यथास्थिती' असली पाहिजे. भारताने **ती यथास्थिती** पुन्हा प्रस्थापित केली पाहिजे. हा त्याच्या संरक्षणाचा पहिला चरण असेल !

परंतु वाटाघाटी, भेटीगाठी, संबंध सुधारण्याचे प्रयत्न इत्यादी उपायांमुळे, हे होणे नाही. एक व्यवहारी विचारवंत म्हणतो, " you may like your neighbour or you may dislike him, but it is not necessary that you visit him." तुमचा शेजारी तुम्हाला आवडो अथवा न आवडो परंतु तुम्ही त्याला भेटी दिल्या पाहिजेत असे नाही. ईद असो अथवा नसो ! भारत पाकिस्तानला 'ईद मुबारक' करीत असतोच आणि आता मुसलमान बांगला देशाशीही तेच करतो आहे. भारत–चीनचे काय झाले ? **बिस्मार्कने** स्पष्टपणे सांगितलेले आहे, " settle everything by discusssions, but keep a million Bayonets behind." दहा लाख संगिनी तयार ठेवा आणि नंतर वाटाघाटींनी विवाद मिटवा. पत्रे, खलिते, कागदी घोडे विवाद मिटवू शकणार नाहीत (आता घोडे गेले). त्याकरिता रणगाडे पुढे घातले पाहिजेत. Military in the Third World या ग्रंथात गेव्हिन केनेडी लिहितो, " Nobody has yet devised a substitute for Armed forces." सशस्त्र सेनादलांची जागा घेणारे काही 'दुसरे' अजूनपर्यंत कोणी तयार केलेली नाही. " A Nation is what history makes of it." जसा इतिहास तसे राष्ट्र. स्वतंत्र भारताचा गेल्या तीस वर्षांचा सामरिक इतिहास प्रत्येकवेळी सरशी होऊनही, स्वाभिमानी राष्ट्रनिष्ठ अंतःकरणे व्यथित करणारा आहे.

for want of a nail a shoe was lost
for want of a shoe a horse was lost
for want of a horse the *Battle was Lost.*

खिळा निखळला म्हणून नाल पडला. नाल पडला म्हणून घोडा निकामी झाला. घोडा निकामी झाला म्हणून लढाईत पराभव झाला !

भीष्म पितामह शरशय्येवरून युधिष्ठिराला राजधर्म सांगत असताना म्हणतात :–

" नालसाः प्राभुवन्त्यर्थान्न क्लीबाः नाभिमानिनः ।
न च लोकापवादभीता नैव शश्वत्प्रतीक्षिणः ॥ " म. भा. शांतिपर्वांतर्गत
राजधर्म पर्व अ. १४०

आळशी, भेकड, वृथाभिमानी, षंढ, लोकनिंदेला उगाचच भिणारे, वृथा विचारात कालाचा अपव्यय करणारे, अनुकूल कालाची उगाचच वाट पाहत बसणारे कधीच आपले मनोगत आणि कार्य यशस्वी करू शकणार नाहीत.

एक व्यवहारी विचारवंत सांगतो, " It is not the countries which

lack the atom bomb or big battalions which should be called second rate powers but countries which lack big ideals. Our young people must be taught to make their country mean something more than just a Welfare State. They must learn that the preveledges and benifits conferred upon them involve complimentary obligations." केवळ हातात अणुबांब किंवा प्रचंड फौज नसल्यानेच राष्ट्र दुय्यम दर्जाचे ठरत नसते. उच्च उद्दिष्टांच्या अभावाने ते तसे निकृष्ट ठरते. (नुसता अणुबांबच काय प्राचीन काळातली भारताची मंत्रयुक्त अस्त्र–विद्या खरी असेल तर, आजच्या भारताने तिचा जीर्णोद्धार का करू नये ?) आपला देश केवळ एक 'कल्याणकारी राज्य' आहे– असावा यापेक्षा त्याला अधिक गंभीर अर्थ असल्याची जाणीव, आपल्या तरुणांना (प्रत्येक स्त्रीपुरुष, आबालवृद्ध नागरिकाला) करून दिली गेली पाहिजे. आपल्याला मिळालेले हक्क आणि सोयी-सवलती आपल्याला आपल्या देशाशी कृतज्ञतेने बांधून टाकीत असतात हे त्यांना (सर्वांना) उमजले पाहिजे.

श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलेले आहे–

" अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानाम् योगक्षेमं वहाम्यहम् ॥ "

गीता ९–२२

जे अनन्यनिष्ठ माझे चिंतन करून मला भजतात त्या योगयुक्त पुरुषांचा 'योगक्षेम' मी चालवीत असतो. येथे मला भजतात याचा अर्थ मी सांगितलेला मार्ग अनुसरतात हाच घेतला पाहिजे. भजणे म्हणजे नुसते नामजपाचे डोंगर रचणे नव्हे. गीता रणक्षेत्रावर उपदेशिलेली आहे आणि ती अर्जुनाला कृतनिश्चयाने युद्धाला प्रवृत्त करण्याकरिताच फक्त सांगितलेली आहे.

योगक्षेम म्हणजे फक्त कल्याण नव्हे. "अनर्जितस्य अर्जनम् योगः । अर्जितस्य रक्षणं क्षेमः" हा त्याचा खरा अर्थ आहे. आपल्या स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे निरलसपणे संरक्षण करणे, हेच भारताचे क्षेम–कल्याण आहे आणि त्याचेच असलेले, आता त्याच्या शत्रूंनी गिळंकृत केलेले परत मिळविणे, हा 'योग' त्याला सिद्ध करावयाचा आहे. "योगः कर्मसु कौशलम्" अशी योगाची व्याख्या आहे. देशाच्या संरक्षणाच्या योगात–कार्यात प्रत्येक भारतीयाने कौशल्य प्राप्त करून घेतले पाहिजे. तरच भारत एक शस्त्रसज्ज राष्ट्र (A Nation in Arms) होईल. परंतु त्याकरिता भारताला प्रथम 'संरक्षणप्रवृत्त' (Defence minded) झाले पाहिजे. सुरक्षितता आणि गुप्तता यांचे अवधान ठेवून भारतीयांना आपल्या देशाच्या संरक्षणाची खरी परिस्थिती समजून घेण्याची संधी मिळाली

पाहिजे आणि तिचा सर्वांनी पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे. " कोणत्याही आक्रमणाला तोंड देण्यास देश समर्थ आहे, " अशा सरकारी घोषणा मधून मधून उठत असतात. परंतु एवढे पुरे होणार नाही. राज्यकर्त्यांनी जनतेला यापेक्षा अधिक विश्वासात घेतले पाहिजे आणि लोकांनीही आपल्या संरक्षणात अधिक ' रस ' घेतला पाहिजे.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा यशस्वी ब्रिटिश सेनापती फील्ड मार्शल व्हायकौंट **माँटगामेरी** आपल्या ' हिस्ट्री ऑफ वॉरफेयर ' या ग्रंथाच्या ५६४ व्या पानावर म्हणतो, " It is essential to remember that the true and ultimate strength of a nation does not lie in its armed forces, nor in its gold and dollar reserves. It lies in the National character, in its people, in their virility in their willingness to work, in their under-standing the truth that if they want prosperity and economic strength they must get it for themselves, or go without it.

The most important single factor in War is Morale. It is impossible to prosecute a war for long, if the will of the people to fight is lacking; in such a case the national war machine will not function. In battle it is morale which counts; no strategy can succeed without it. Once morale is gone, defeat is inevitable, They apply equally in Peace. " राष्ट्राचे खरे आणि अंतिम सामर्थ्य त्याच्या सेनादलात, किंवा त्याच्या सुवर्ण आणि चलनी नाणे यांच्या गंगाजळीत नसते हे नीट लक्षात ठेवले गेले पाहिजे. ते राष्ट्रीय चारित्र्यात, लोकांत, लोकांच्या–पौरुषात स्वेच्छया आनंदाने कष्ट करण्याच्या तयारीत, आपला उत्कर्ष आपणच केला पाहिजे आणि आपणच आर्थिक शक्ती मिळविली पाहिजे, किंवा या सर्वांविना कसे तरी जीवन जगावे लागेल, या कठोर सत्याच्या जाणिवेत असते. युद्धात मनोधैर्य हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. लोकांच्या लढण्याच्या दृढ निश्चयाविना, कोणतेही युद्ध फार काळ लढविणे शक्य नाही. अशा परिस्थितीत देशाची युद्धयंत्रणा कार्यक्षम न राहता, ती कोसळून पडेल. लढाईत मनोधैर्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्याशिवाय कोणतेही डावपेच यशस्वी होणार नाहीत. मनोधैर्याला जर धक्का लागला, तर पराभव ठेवलेलाच. हे शांतीलाही लागू आहे.

शांती हेच भारताचे उद्दिष्ट आहे. तो कुरापतखोर, भांडकुदळ नाही. इतकेच नव्हे तर पराकोटीचा सहनशील आहे. असे असले तरी, त्याच्या दोन प्रमुख शेजाऱ्यांनी त्याला थोडीसुद्धा शांती मिळू दिलेली नाही. त्याच्यावर युद्धे लादली.

भारत पहिलेच पाकिस्तानविरुद्धचे १९४७ चे युद्ध निर्णायकपणे लढला असता (fight to finish); तर त्याच्या संरक्षणाचा प्रश्न उद्‌भवला नसता व त्याला आपल्या संरक्षणाची अधिक तयारी करता आली असती. वास्तविक आंतरराष्ट्रीय राजकारणात शांती म्हणजे दोन युद्धांच्या मधला काळ–मध्यंतर. हे मध्यंतर छोटे किंवा मोठे असेल इतकेच. शांती म्हणजे शक्य तितके प्रदीर्घ मध्यंतर. यापेक्षा अधिक काही नाही. कारण युद्ध बंद व्हावे–शांती नांदावी–म्हणून युद्धच केले जात असते. war to end war हाच जगाचा नियम आहे. **म्हणून शांतीकरिता संरक्षणाची तयारी जय्यत असली पाहिजे.** हाच निष्कर्ष !

आपल्या स्वतंत्र सार्वभौम देशाच्या पहिल्या पंचविशीची भयंकर असह्य व्यथायुक्त कथा ही अशी घडली. या दुःखपर्यवसायी (Tragic) कथानकातले **जवान** हे पात्र दुर्लक्षितच आहे. नाही म्हणायला राजधानीत ‘अमर जवान ज्योति’ या नावाचे एक स्मारक उभारण्यात आलेले आहे इतकेच ! आपल्या मातृभूमीच्या संरक्षणासाठी प्राण अर्पण करणारे आपले सैनिक जिवंत असणाऱ्या आणि जन्मास येणार असलेल्या सर्व आजी आणि भावी भारतीयांस सांगत आहेत–

“ We are the dead......
....
To you from failing hands we throw
The TORCH; be yours to hold it high
If ye break faith with us who die,
We shall not sleep..................

(F. M. Montgomery यांच्या A History of warfare या ग्रंथातून.)

आम्ही आता (तुमच्यात) हयात नाही. परंतु आमच्या शक्तिहीन हातातली ही ‘ज्योती’ उंच धरण्याकरिता आम्ही ती तुमच्या हवाली करीत आहोत. आम्हा (मातृभूमीकरिता) प्राणार्पण करणाऱ्यांचा तुम्ही विश्वासघात केलात, तर आम्हाला निद्रा-सुख मिळणार नाही.

कर्नल परांजपे वाचकमान्य आणि राजमान्य लष्करी लेखक आहेत. या पुस्तकाचे प्रस्तावना लेखक डॉ. जोशी म्हणतात, "देशाच्या फाळणी पासूनच संरक्षणाची कथा आणि व्यथा सुरू झाल्या; असे लेखकाचे प्रतिपादन आहे....जाज्ज्वल्य राष्ट्राभिमान, एकात्मभाव, आर्थिक शक्ती, वैज्ञानिक-युक्ती, आणि सामरिक-सामर्थ्य या पंचशीलाचा लेखकानी पुरस्कार केला आहे........हे पुस्तक अवश्य वाचावे."



विजय प्रकाशन
हनुमान गल्ली, सीताबर्डी
नागपूर ४४० ०१२